# स्वातंत्र्यवीर सावरकर



# समग्र कविता

वितरण

साहित्य प्रतिष्ठान

*स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या कविता*

*इंटरनेट हक्क : स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक ट्रस्ट,*

*शिवाजी पार्क*

*दादर ,मुंबई*

*©हिमानी सावरकर*

*वितरण : ई साहित्य प्रतिष्ठान*

*e Sahity Pratishthan*

*eleventh floor*

*eternity, G1102*

*estern express highway*

*Thane. 400604*

प्रस्तुत ई आवृत्ती ही विनामूल्य वितरणासाठी आहे.

या पुस्तकाचे इतर कोणत्याही स्वरुपात वितरण वा प्रदर्शन करण्यापुर्वी स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक ट्रस्टची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# ई साहित्य प्रतिष्ठान

## बारा लाख मराठी वाचकांसाठी ई चळवळ

*चार वर्षांपुर्वी स्थापन झालेल्या ई साहित्य प्रतिष्ठानने आजवर आपल्या वाचकांना अडिचशेहून अधिक, दर्जेदार, मराठी ई पुस्तके विनामूल्य दिली आहेत. मोरया, मीरा, कृष्णा, गुरुदेव रविंद्रनाथ, स्वा. विवेकानंद, विंदा करंदिकर, ना धों महानोर, ग्रेस , नारायण सुर्वे, लोकमान्य टिळक, छत्रपती शिवाजी महाराज, शंभूराजे असे एकाहून एक सरस विषय आम्ही घेतले. सुमारे चारशे नवीन साहित्यिकांना या व्यासपीठावरून सादर केले. इंटरनेटवर मराठी भाषेतील साहित्य लोकप्रिय करण्याची चळवळ हिरिरीने पुढे नेली. प्रेम आणि सौंदर्याबरोबरच विद्यार्थी आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या, दहशतवाद अशा ज्वलंत विषयांवरचं साहित्य मांडलं. विनोदाला वाहिलेलं ई श्टाप देऊन हसवलं. लहान मुलांसाठी बालनेटाक्षरीची निर्मिती केली. शास्त्रीय संगीताची समज तरुणांत येण्यासाठी संगीत कानसेनचे ई वर्ग चालवले. नव्या कवींसाठी एक भक्कम व्यासपीठ म्हणजे नेटाक्षरी चालवले. तर महाराष्ट्रातल्या किल्ल्यांची माहिती देणाऱ्या पुस्तिकांची मालिका "दुर्ग दुर्गट भारी" द्वारे महाराष्ट्रातल्याच नव्हे तर जगभरातल्या मराठी मंडळींना मराठमोळ्या इतिहासाची उभारी दिली. "जिथे जिथे मराठी माणूस, तिथे तिथे ज्ञानेश्वरी" ही चळवळ आपण पहात आहातच. केवळ कविताच नव्हे तर कथा कादंबऱ्या आणि गंभीर विषयांवरची पुस्तकेही आपल्याला इथे मिळतील.*

*सव्वा लाखभर रसिकांपर्यंत दर्जेदार साहित्य नियमितपणे विनामूल्य पोचवण्याची आमची परंपरा आम्ही सातत्याने चालू ठेवूच. आम्हाला हा उत्साह आणि प्रेरणा देणारी आपली पत्रेही येत राहू द्या. पण मनात एक विचार येतो. आपली वाचकसंख्या फ़क्त लाखभर लोकांपर्यंत मर्यादित का? १२ कोटी मराठी माणसांपैकी निदान १२ लाख वाचकांपर्यंत तरी हे विनामूल्य ई साहित्य पोचलंच पाहिजे असं नाही का वाटत आपल्याला? आणि त्यासाठी काही फ़ार करायची गरज नाही बंधो. आपल्या ओळखीच्या बारा लोकांची, फ़क्त बारा मराठी लोकांची मेल आय डी द्याल? जास्त दिलीत तरी हरकत नाही. पण निदान १२ मित्र किंवा नातेवाईकांची मेल आय डी पाठवा. असे लोक ज्यांनी मराठी साहित्य वाचावे अशी आपली इच्छा आहे. एक लाख लोकांनी जर प्रत्येकी बारा आय डी पाठवले तर लाखाचे बारा लाख व्हायला कितीसा वेळ लागणार?*

*बारा लोकांची मेल आयडी पाठवणाऱ्या वाचकांना आम्ही ई साहित्य पाठीराखे म्हणून वेगळे मानाचे स्थान देऊ. तुम्हाला आमच्या पुढील प्रवासाची कल्पना देत राहू. तुमच्या सूचना मागवू. तुमच्याकडून मार्गदर्शन घेत राहू. आमच्या पुढील प्रवासाचे तुम्ही सहप्रवासी असाल.*

***तर होणार ना ई साहित्यचे पाठीराखे** ?आपल्या खास मराठी मित्र नातेवाईकांच्या बारा मेल आय डी* esahity@gmail.com *वर पाठवा. खात्री बाळगा, या मेल्सचा कोणत्याही तऱ्हेने गैरवापर केला जाणार नाही. त्यांना जाहिराती किंवा फ़ालतू मेल पाठवून त्रास देणार नाही. यांचा उपयोग केवळ चांगले दर्जेदार मराठी साहित्य पाठवण्यासाठी केला जाईल.*

*www.esahity.com*

# स्वा. सावरकरांच्या कविता

© Himani Savarkar,

Savarkar Bhavan, Raja Thakur Path, Shanivar Peth, Pune.

tel :+912025544751

Internet Rights are with Swatantryaveer Savarkar Rashtriya Smarak Trust, Dadar, Mumbai

# स्वा. सावरकरांच्या कविता

## १. श्रीमंत सवाई माधवरावांचा रंग

(जाति : स्वर्गङ्गा) (फटका)

(परिचय : सावरकरांनी वयाच्या अकराव्या वर्षी रचलेला फटका ह्या फटक्यांत कवि स्वातंत्र्यवीर सावरकरांचा अगदी लहानपणी झालेला बखरींचा परिचय ध्यानांत येतोच; पण, प्रभाकराचाही पोवाडा त्यांच्या अवलोकनांत आल्याचे ओळखतां येते.)

धन्य कुलामधिं धनी सवाई भाग्य धन्यची रायाचें ।
सेवक हातीं यशस्वि असती पुण्य किती त्या पायांचें ॥ १
श्रीमंतांचे भाग्यप्रतापें द्वादश वर्षे बहु श्रमले ।
अटकेला जरिपटका रोंविति पुन्हां सर्वजण चट नमले ॥ २
रजपूतादी शूर रिपूही श्रीमंतांसी शरण अले ।
मोंगलपतिंनीं प्रसन्न होउनि वजिरपदासी अर्पियलें ॥ ३
जिकडे तिकडे नाम पेशवे काळ शत्रुसी वाटुनियां ।
प्रजेंत झाली बहू शांतता रिपू सर्व हे हटूनियां ॥ ४
नाच शिकारी रंग तमाशे प्रजेंत होती नित्य पहा ।
श्रीमंतांनीं बेत ठरविला रंग करावा असा महा ॥ ५
रायाचा कल पाहुनि सर्वहि देती सत्वर रूकारा ।
हर्ष होतसे वर्षप्रतिपदे पुण्यांत झाला पूकारा ॥ ६
सरकारांनीं सरदारांनीं सकलजनांनीं दों रस्तीं ।
रंग करोनी ठिकठिकाणिंही केलि सुशोभित ती वस्ती ॥ ७
पागे पथके मानकरी आणि कारभारि हे सरदारा ।
श्रीमंत प्रभु माधवरायासहीत आले दरबारा ॥ ८
जिंहीं रोविला महाप्रतापें जरिपटक्याला अटकेला ।
महादजीची स्वारी आली सरकारांना न्यायाला ॥ ९
हत्ती घोडे फौज असा हा समाज सर्वचि मीळाला
आज्ञा केली श्रीमंतें मग सुरुवात करा खेळाला ॥ १०
अुडूं लागले गुलाल पल्ले हौद खपविले फौजेनें ।
रंगाचे, किति खेळुन स्वारी वाड्यामध्यें मौजेनें ॥ ११
नंतर स्वारी तिसरे प्रहरीं निघालि शहरीं थाटानें ।
वाडा डावा घालुन गेली बुधवाराचे वाटेनें ॥ १२
पुढें विलसते मुख्य स्वारी सवें थाट अंबाऱ्यांचा ।
चंद्रबिंब श्रीमंत अवांतर प्रकाश पडला ताऱ्यांचा ॥ १३
पिचकाऱ्यांचा मार जाहला फार तेधवां बुधवारीं ।
स्वारी कापडआळींतूनी खेळत आली रविवारीं ॥ १४

हरिपंतांचे वाड्यापाशी रंग केशरी उडवुनियां ।
स्वारी गेली नागझरींतुन रंग केशरी तुडवुनियां ।। १५
रास्ते यांचे पेठेमध्यें पाट लागले रस्त्यांनीं ।
गच्च्यांवरूनी बंब लावुनी रंग अुडविला रास्त्यांनीं ।। १६
सलाम मुजरे सर्व राहिले दंग जाहले रंगांनीं ।
द्वापारिं जसे रंग करविले भगवान श्रीरंगांनीं ।। १७
शहरिं भिजविले कैक बंगले चौक गुलालें रंगांनीं ।
द्वापारिं जसे वृंद भिजविले भगवान श्रीरंगांनीं ।। १८
झुकत झुकत समुदाय चालती स्वारी ये मग वानवडी ।
नंतर रंगा आरंभ झाला नाच होअूनी दोन घडी ।। १९
लाखों हौदे अूडूं लागले पिचकाऱ्यांचा मार अती ।
झालि रे झाली गर्दी अेकचि वर्णावी ती पहा किती ।। २०
दों दों हातीं गुलाल भरती लाल छत दिसे बुंदांत ।
हास्यवदन मग राव शोभती शूर शिपाअीवृंदांत ।। २१
नंतर अैसा रंग खेळुनी अुठले स्नानाला जाया ।
अगणित त्या क्षणिं तापुं लागल्या सुगंधि पाण्याच्या कढया ।। २२
वेगवेगळीं सुगंध तेलें रायाला लावायाला ।
अुभे राहिले ब्राह्मण घेअुनि घालायातें न्हायाला ।। २३
अवर्णनियशा थाटानें कीं झालीं सर्वांची स्नानें ।
सर्वांसी मग वाटुनि दिधलीं अनंत वस्त्रें शिंद्यानें ।। २४
नवीं लेवुनी वस्त्रें पुनरपि येति सर्वही दरबारा ।
नाच जाहला सुरू होअुनी पानसुपारी हारतुरा ।। २५
मग शिंद्यांनीं श्रीमंतांना शिरपेंच तुरा नव अर्पियले ।
तसेंच सर्वां जनांस देखा अमोल पोशाखा दिधलें ।। २६
सूर्यबिंब लज्जीत होअिसें हिलाल लावुनि मग रात्री ।
अुलटी परते स्वारी सर्वहि संगें नानादी मंत्री ।। २७
शोभा बघती नरनारीगण चिराकदानें लावुनियां ।
गजरानें अति स्वारी येती वाड्यामध्यें घेअुनियां ।। २८

– भगूर, १८९४

## २. नाशिक येथील अि. स. १८९७च्या गणेशोत्सवप्रसंगी रचलेल्या आर्या (गीति)

वंदुनि प्रथम भवानी वर्णी गेल्या गणेशअुत्साहा ।
कीं हिंदु बांधवासी आधारचि कामधेनु वत्सा हा ॥ १ ॥
जरि पुण्यपत्तनासम गजबजला ना तरी असामान्य ।
झाला तोची बहु कीं लघुसौभद्रहि जनीं जसा मान्य ॥ २ ॥
प्रथम चतुर्थी येतां अुत्कट आनंदभरित जन झाले ।
भावें सकलजनांनीं शिवकुमरा गणवरासि आठवले ॥ ३ ॥
होते मेळ तयारचि जरि चारचि तरि बहूत सुंदर ते ।
गणराजकीर्तिधीला शोभे सुंदर कराचि बंद रते ॥ ४ ॥
त्या निशि पुराण गर्दी गणराया गावयास गवयांची ।
लटपट जन खटपटती मुकले जे त्या कशास चव याची ॥ ५ ॥
रस्तोरस्ती स्तविती गणराया वदति ''तार आर्या या'' ।
प्रभुजी, असह्य हरहर चिरती चरचर हजार गाया यां ॥ ६ ॥
ज्या आर्यांचा पदमलतेज शमाया हरादि खटपटती ।
दैदिप्यमान ब्राह्मण गोरे तेची बघून लटपटती ॥ ७ ॥
जी रामकृष्णवासें सत्क्षेत्रें पावलीं अशा सुपदा ।
हरहर त्यांतचि ब्राह्मण भोगिति निर्बंधनें सदा अपदा ॥ ८ ॥
ज्या शूर पूर्वजांनी जरिपटिका थेट अटकिं फडकविला ।
त्यांचेच आम्ही वंशज भ्याडाकृति ज्या कथासि नड कविला ॥ ९ ॥
आज विजापुर अुदअिक दिल्ली कीं चालले पन्हाळगडा ।
राव भरारी जेथे ही स्थिती तेथेंचि लाजवी दगडा ॥ १० ॥
राजा परकी शिक्षण परकी लक्ष्मीहि जाहली परकी ।
आतां प्रभो दयाळा, तुजविण कोणीच ना रिपू हाकी ॥ ११ ॥
तरि गणराया समया करिं या बदला धरा हरा अपदा ।
अपराध क्षमा व्हावे हे दीन तुझेचि दासची स्तवीति पदां ॥ १२ ॥
नरवर विघ्नहर प्रभु सुखकर भयहर स्मरारि प्रिय अमरां ।
अजरा विश्वाधारा भक्तवरा तुज नमोस्तु शिवकुमरा ॥ १३ ॥

# ३. स्वदेशीचा फटका

(परिचय : हा फटका सावरकरांनी सन १८९८ मध्ये म्हणजे त्यांच्या वयाच्या १५व्या वर्षी रचला आणि तो त्याच वर्षी पुण्याच्या जगद्धितेच्छु ह्या वृत्तपत्रात प्रसिद्ध झाला.)

आर्यबंधु हो अुठा अुठा कां मठासारखे नटा सदा ।
हटा सोडुनि कटा करूं या म्लेंच्छपटां ना धरूं कदा ॥ १
काश्मीराच्या शाली त्यजुनी अलपाकाला कां भुलतां ।
मलमल त्यजुनी वलवल चित्तीं हलहलके पट कां वरितां ? ॥ २
राजमहेंद्री चीट त्यजोनी विटकें चिट तें कां घेतां ।
दैवें मिळतां वाटि इच्छितां नरोटि नाहीं का आतां ? ॥ ३
नागपूरचें रेशिम भासे तागपटासें परि परक्या ।
रद्द बनाती मद्द लोक हो मअू लागती तुम्हां कश्या ? ॥ ४
येवलि सोडुन पितांबरांना विजार करण्या सटिन पहा ।
बेजारचि तुम्हि नटावयामधिं विचार करतो कोणि न हा ॥ ५
केलि अनास्था तुम्हीची स्वतः मग अर्थातचि कला बुडे ।
गेलें धनची नेलें हरुनी मेलां तुम्हि तरि कोण रडे ? ॥ ६
अरे अपणची पूर्वी होतों सकल कलांची खाण अहा ।
भरतभूमिच्या कुशीं दीप ते कलंक आतां अम्ही पहा ॥ ७
जगभर भरुनी अुरला होता नुरला आतां व्यापार ।
सकलही कलाभिज्ञ तेधवां अज्ञ अतां आम्हि रिपु थोर ॥ ८
निर्मियली मयसभा आम्हिंचि ना पांडव किरिटी आठवा रे ।
मद्द लोक हो लाज कांहिंतरि ? लद्द असुनि शठ बनलों रे ॥ ९
आम्रफलाच्या कोयीमध्यें धोतरजोडा वसे तदा ।
होते जेथें प्रतिब्रह्मेची, धिक् आम्हि जन्मुनि अपवादा ॥ १०
हे परके हरकामिं खुलविति भुलविति वरवर वाचेनें ।
व्यवहारी रित असे बराबर सदा हरामी वृत्तीनें ॥ ११
कामधेनुका भरतभूमिका असुनि मागे कां ती भिक्षा ? ।
सहस्त्र कोसांवरुनी खासा पैका हरतो प्रभुदीक्षा ॥ १२
नेअुनि कच्चा माल आमुचा देती साचा पक्क रूपें ।
आमच्यावरी पोट भरी परि थोरि कशाची तरी खपे ॥ १३
पहा तयांची हीच रीत हो मिती नसे त्या लबाडिला ।
नाना कर्मे नाना वर्मे देश असा हा लुबाडिला ॥ १४
निमुलीं हातांमधली फडकीं फडकत नाना ध्वज वरतीं ।
हडेलहप्से करुनि शिपाअी निघत सवारी जगभर ती ॥ १५
नानापरिचे रंग भरीती रंगपुष्प तें दंग करी ।
मोर कावळे पारवे ससे श्वापद विचरति तीं बकरीं ॥ १६
राजगृहें गोपुरें झळकती मजले सजले त्यामधुनी ।
सुंदर नारी दुःखहर्षभरि बघती शोभा त्या तरुणी ॥ १७
नाना जाती पिकली शेती गार हीरवें वस्त्र धरी ।
भात बाजरी गहूं गाजरी आच्छादिलि ही भूमि बरी ॥ १८

अगनग गेले गगन चुंबण्या सवें थोर बहु कोरांकी ।
भास पुरुषची निजांकिं बसवी स्वानंदानें पोरां कीं ॥ १९
नाना अैसीं विचित्र चित्रें दाविति तुम्हां भुलधंदा ।
तुम्हीहि भुलतां बघतां घेतां क्षणांत स्वपटाला निंदा ॥ २०
याला आतां अुपाय बरवा अेकी करवा मन भरवा ।
ओतप्रोत अभिमानें हरवा देशी धंदे पट धरवा ॥ २१
परके वरवर कितीहि बोलति गोडगोड तरि मनिं समजा ।
सुंदर म्यानीं असे असिलता घातचि होअिल झट अुमजा ॥ २२
रावबाजि जरि गाजि जहाले राज्यबुडाअू तरि मुख्य ।
सख्य असें परक्यांचें यांचें गोष्ट हृदयिं ही धरुं लख्ख ॥ २३
वैर टाकुं या यास्तव लवकर खैर करो परमेश्वर ती ।
निश्चय झाला मागें अपुला परदेशि पटें ना धरुं तीं ॥ २४
चलाचला जाअुं या घेअुं या देशि पटांला पटापटा ।
जाडेंभरडें गडे कसेंही असो सेवुं परि झटाझटा ॥ २५
ना स्पर्शू त्या पशूपटाला मअू वर, विखारचि भावू ।
घेऊ खडतर अंतीं सुखकर धर्मचि मानुनियां जाअू ॥ २६
आजवरी जरि भुललों खुललों तत्कपटाला अविचारें ।
जाअूं द्या चला गतगोष्टींचें नको स्मरणची हेंचि बरें ॥ २७
द्रव्यखाणि ही खोरें घेअुनि परकीं पोरें खणती रे ।
अेकचित्त या करूगड्यांनो वित्त जिंकुं तें पुनरपि रे ॥ २८
विश्वेश्वरि[1] ती नारायणि ही यमहरिहर अदि सुरवरिणी ।
कर्मसिद्धिसी दावो नेअूनि मोद देति निजभक्तजनीं ॥ २९
दर अज्ञानी रजनी जावो सांग प्रकाशो रवि थोर ।
वरावयाला रत्नपटाला करो आर्य ते रण घोर ॥ ३०
कवितारूपी माला अर्पी आर्य बुधांला सार्थक हो ।
भक्तांकरवीं मन देवासी सेवायासी अर्पण हो ॥ ३१

– नाशिक, १८९८

---

[1]. ह्या फटक्याच्या २९ नि ३० कडव्यांच्या चार ओळींत कविवर्य 'विनायक दामोदर सावरकर' यांनी शब्दाशब्दांच्या आद्याक्षरांतून आपलें नांव कसें चातुर्याने गुंफले आहे तें त्या कवितांतील ठळक आद्याक्षरांवरून ध्यांनात येअील.

# ४. स्फुट कविता

## (१) लो. टिळकांना वरूं अिच्छिणाऱ्या स्तुति नि कीर्ति

(मालिनी)

अुपवर स्तुतिकन्ये, मानला बाळ भारी ॥
परि सवतिभयें तो, नित्य तीतें निवारी ॥
करुनि मग गुणांही, युक्त त्यातें सुकंठी ॥
दृढ कवळुनि आता नित्य ती काळ कंठी ॥ १ ॥

(शिखरिणी)

दुरोनी अैकोनी वरगुणगुणांलुब्ध रमणी
मृगाक्षी कीर्ति ये टिळक वरण्या अुत्सुक मनीं ॥
परीं कारागारीं वसत न कळोनी न भवनी ॥
प्रियातें शोधाया भटकत फिरे ती त्रिभुवनीं ॥ २ ॥

(हे दोन श्लोक लोकमान्य रा.टिळकांवर ते कारागृहात असताना (भोजनसमयी) रचले आहेत. सन १८९८.)

## (२) प्लेग

(शार्दूलविक्रीडित)

देखोनी अतिरम्य स्थान अुतरे जो मुंबअी बंदरीं ॥
ज्या सारे जपती; त्वरें लपति यत्क्रोधें दरीकंदरीं ॥
जिज्ञासा धरुनी घरोघर समाचारास जो घेतसे ॥
तीर्थे क्षेत्रपुरें प्रसिद्ध नगरें आलोकण्या जातसे ॥ १ ॥
अैसा हा नृपराज प्लेग भटके देशात ह्या त्या सवें ॥
भेटे जो जन त्यास दंड करितो काळा न जो सोसवे ॥
देतो शासन मूषकांकडुन कीं मी येत आहे हटा ॥
जागा द्या; मग दंडितों पळतिना पेटोनियां जे हटा ॥ २ ॥

## (३) काळास नमन

(शार्दूलविक्रीडित)

त्या काळास असो सदा नमन जो नांदे सुखें डोलतां ॥
वाता हाटवितां; चिरंजिव ठरे वातात्मजा तोलता ॥
जो मागे परते न लेश कधिं जो ना थांबतो चालतां ॥
कल्पीता वितळे; रतीभर न भूकंपेहि जो हालतां ॥ १ ॥
मार्गा आक्रमिता सदा करितसे कोट्यानुकोटी कृती ॥
ज्याहीं सुष्ट जनांस सत्फल मिळे. दुष्टां जनां विकृती ॥
ज्ञाता जो अितिहासचिंतक असा पावे सुखा लोकिं तो ॥
यासाठी गतवर्षवृत्त समुदायालागिं आलोकितों ॥ २ ॥

## (४) हिंदुस्थानची सद्यःस्थिती : अन्योक्तित्रय–

### १. शुकान्योक्तिं

(मालिनी)

वनिंअुपवनिं ज्याही रम्य वक्षां वरीले ॥
सुफल सरस तोया मञ्जरीते वरीले ॥
अुडुनि पडुनि घेतो बैठका साजऱ्याही ॥
अहहह! शुकसा तो पिंजरीं आज राही ॥ १ ॥

### २. कोकिलान्योक्ति

(मालिनी)

डुलत तरुवरांच्या अुच्च भागी तगावें ॥
पवनसमयिं झोंके घेत सद्‌गीत गावें ॥
युवति भंवतिं याव्या शोभना आयकाया ॥
पिक अजि तव टोची काक रे हाय काया ॥ १ ॥

### ३. कमलान्योक्ति

(मालिनी)

सुरतनु– धवलांगी जाह्नवी ज्यास वीते ॥
स्वकर शिणवुनीयां मानिलें ज्या सखीतें ॥
सकल सुरवरांच्या आरुढे शीर्षभागी ॥
कमल सुकुनि गेले हाय रानीं अभागीं ॥ १ ॥

## (५) स्वातंत्र्यदेवीस वंदन

(शार्दूलविक्रीडित)

जीच्या धन्य पदारविन्दमकरन्दा स्वादण्या झुंजती ॥
श्रीमत्त्र्यंबक अंबरेश अलिसे गुंजारवा गुंजती ॥
वंद्या मानिति अंबिकादितिरमानंगांकसंगास त्या ॥
श्री मांगल्य शिवप्रदेसि नमितो स्वातंत्र्यदेवीस त्या ॥ १ ॥

## ५. श्रीटिळक–आर्यभू भेट

(खालील आर्या लोकमान्य टिळक तुरुंगातून सुटले तेव्हा त्यानिमित्त मिळालेल्या सुटींत केलेल्या होत्या. वय १५. सन १८९८ 'जगद्धितेच्छु, पुणे' ह्या पत्रात छापून आल्या होत्या.

॥ श्री योगेश्वरी प्रसन्न ॥

रा. रा. जगद्धिच्छुकर्ते यास :–

स. न. वि. विशेष – कृपाकरून आपल्या जगन्मान्य पत्रांत खालील मजकूर छापाल अशी आशा आहे.

ये ये बाळा ये । क्षेम असो ! हो शतायु कुलतिलका ॥
भरते ये दाटुनि किति ? स्वास्थ्य असे कीं गुणानुकुलटिळका ॥ १ ॥
दे भेट, जवळि ये चल चुंबन करण्यासि चित्त अुत्सुकलें ॥
गेले ते दिन गेले, 'बाळा' किति तरि शरीर तव सुकलें ॥ २ ॥
अेकेक मोजुनि दिन अब्दवरी अंतरासि साहियलें ॥
पळभरहि धिर न धरावे तोंच सुदैवें मुखासि पाहियलें ॥ ३ ॥
कां तेथेचि अुभा रे ? वाटे कीं ही न आपली आअी ॥
परि शोकें कृश अैसी स्तनपान्हा – चिन्ह तापली दाअी ॥ ४ ॥
की आश्चर्ये थक्कचि शुद्धीपूर्वच ही कशी शिवते ॥
'बाळा,' प्रेमअुमाळा शुद्ध स्वयें ? मान मानसीं शिवतें ॥ ५ ॥
की क्रुद्ध मानसीं तूं ? ओवाळायासि कोंवि आअु नये ॥
भेटीसी विलंब नको, अैक तसें की गृहांत जाअुं नये ॥ ६ ॥
'श्री बाळ' बहुप्रेमे धांवे तों आर्यजननि घेच करीं ॥
सप्तमि दिनीं सकाळीं भेटीला दाटली घनश्चकरी ॥ ७ ॥
दोषस्थलांची माफी असावी.

नाशिक ता. ७–९–१८९८
आपला
अेक क्ष

# ६. संक्रांतीचे तीळगूळ

(वसंततिलका)

सुप्रेम योजुनि वरा तिळ शुभ्ररागें ।
पाकोनियां सुसहवास रसांत आंगे ॥
मित्रत्व–अंकुर फुटे सहजी सुयोगें ।
सौजन्य–केशर पुढें मग फार रंगे ॥ १ ॥
संक्रांति–क्रांति घडतां सण हा अुदेला ।
आनंद नंदनवनासम येथ झाला ॥
पत्रा सुपात्र गणुनी कविता–वधूला ।
आज्ञापिलें तिळगुळा तुज अर्पिण्याला ॥ २ ॥
ह्या आदरा, अुपरि प्रेम असेंच ठेवा ।
होवो सशास्त्रगुण ह्यां मन हाचि ठेवा ॥
श्री राजश्रेष्ठ शिवकीर्तीरसास सेवा ।
जेवा यथेष्ट न असा अितरत्र मेवा ॥ ३ ॥

हे श्लोक संक्रांतिनिमित्त अेका मित्रास धाडले होते.

३०–१–१८९९

# ७. मातृशोकालापाष्टक

॥ आर्या ॥

माते सोडुनि झालीं आम्हाला येथ आज सहा वर्षे ॥
बरवें नांव वगळिले ? दु:खाग्निंत मेघ हा जसा वर्षे ॥ १ ॥
गेलीस नाअिलाजचि आतां जातीस तूं जरी माते ॥
मी काय सोडितो तुज, शतगुण तप्ता जरी' माते ॥
वाटे असशील खरी नित्य सुखें आज तूं विटलि नाकीं ॥
ग्रंथश्रवणोत्पादक स्वर्गाची हौस तव फिटलि ना कीं ? ॥ ३ ॥
पालट जाअुं कराया पुत्रालिंगन सुखें जरी माते ॥
माते अिच्छा तरि बरि लधिमा परि येथ ना गरीमा ते ॥ ४ ॥
क्षण थांब अनुसरोनी सत्पथ, साधु, श्रुतित्रयाला हो ।
नवरी वरील कीर्ति सुजन म्हणो कीं सुपात्र याला हो ॥ ५ ॥
त्या त्रयगामिनिला मग पुरवाया कामनेसि आगमना ।
करण्या आज्ञापिन मी स्वर्गी द्यायासि तोष सांग मना ॥ ६ ॥
मच्छाया मानुनियां मम ठायां ती सुखे तिला भेटे ।
दाटेल तुझा कंठहि चुकशिल तव वृत्त कळविण्या वाटे ॥ ७ ॥
वंदन पदकमली तव नंदन करि गीत गात आर्यांत ।
मंद न धी होअु, झिजो चंदनसा देह देशकार्यात ॥ ८ ॥

ह्या आर्या अत्यंत नम्रत्वें माझ्या परलोकवासी मातेला अर्पण केल्या आहेत.

३१-१-१८९९
वय १६.

## ८. अेका प्रभाती आलेले पत्र

(वसंततिलका)

झाली प्रभात सुटला बहु थंड वारा ।
जेथें तिथें मुदित हा जन होत सारा ॥
प्रातर्विधी बहु त्वरें अुरकोनि घेतों ।
''घ्या पत्र'' हा ध्वनि अकस्मिक कीं निघे तो ॥ १ ॥

(भुजंगप्रयात)

अुडाली त्वरें अेक घाअी पुसाया ।
''शिपाअी बुवा, काय पत्ता? बसा या.'' ॥
टकां लावुनी पाहतों तीन भाअू ।
तशी दूर ठाके अुभी ती न भाअू ॥ २ ॥
मनीं सर्व अुत्सूक मन्नाम वाचो ।
शिपाअी भला तो बहू काळ वाचो ।
असो पत्र माझ्या सुमित्रेश्वराचें ।
गणी फार आभार विश्वंभराचे ॥ ३ ॥

(द्रुतविलंबित)

अवचितां ध्वनि गोड अुठावतो ।
परिसतां न सुखा मुळिं ठाव तो ॥
वरि 'विनायक' नायक पत्रिका ।
अितर अुत्तर बोलति ''हा ठका'' ॥ ४ ॥

(मालिनी)

झडप झडकरी मी घालुनी पत्र घेतों ।
चकित किति कवीताबद्ध त्याला बघे तो ॥
पुरवि रवि तशी ती पत्रिका कामनाला ।
रविपरिस परी ती तोषदायी मनाला ॥ ५ ॥

(भुजंगप्रयात)

शशी यद्यपी शीत संतापहा हा ।
तरी विव्हला देत संताप हा हा ॥
रवी सर्व निर्दोष तो तापदायी ।
गुणांच्या सवें दोष हा नित्य राही ॥ ६ ॥

जरी मी नसे अेक वक्ता प्रसिद्ध ।
न वाग्देवता साह्य होवोनि सिद्ध ।।
असें मंद, ना देखिली काव्यशक्ती ।
तरी दोष दावी, क्षमा या असो ती ॥ ७ ॥

(द्रुतविलम्बित)

विनत हा प्रणिपात शतें करी ।
धरि न राग करां चल दे करीं ।।
जरि न धाडिसि अुत्तर लौकरी ।

हरिच संशय, मी बनलो करी ॥ ८ ॥

(भुजंगप्रयात)

तुझा येथ येण्या जरी फार हेतू ।
तरी काल ना योग्य हें जाण हें तूं ॥
असो मी अजारी सहे दु:ख भारी ।
नसे अर्थ काहीं म्हणोनी निवारी ॥ ९ ॥

(१८९९-१९००)

# ९. अेका पराङ्मुख मित्रास

(आर्या गीति)

हा मित्र मित्रश्रेष्ठा! प्रेमभरें करित हें तुला नमन
निन्दु नको, अर्पाया कधिं ढळलों सख्य हें तुला न मन ॥ १ ॥
विसरूनि कृतापराधा निन्दुनि सभ्यास, माळवुनी रसना
यश काय जोडिले त्वां सुधिमत वच वद, असत्य नीरसना ॥ २ ॥
मित्रद्रोह न केला आम्हि, वदा सत्य हें, तुवा केला
गेलासि स्पर्धेने धरूनि महत्व हेतु वा केला ॥ ३ ॥
अुपदेश मज न करणें आपणाची मित्रधर्म सांभाळा
वर्तन अुपदेशाला दे शोभा, तिलक तो जसा भाला ॥ ४ ॥
टपलास मित्रदोषा लक्षाया तूं जअी सदा वकसा
ह्या बोधाचा ताअि तव ह्रदयावर राहिला न दाब कसां ॥ ५ ॥
सकलां प्रिय, अप्रिय तुज तुजविण जन सर्व सख्य मशिं करितो
कीं सकल मोददायी कानिजनांना असह्य शशिकर तो ॥ ६ ॥
जरि वरि न दाविं तरि मन अंतरिं आत्मा खराच लकलकतो
कपटाभिमानविलगलित वागावे, धर्म हा सकळ कळतो ॥ ७ ॥
अपराध तुझे असती तैसा मीं ही असेन अपराधी
अन्योन तयां विसरूं त्वद्विजयीं मम असे न अपराधी ॥ ८ ॥
सुज्ञचि असती तूंते म्यां मूढें काय बोध शिकवावा
हंगाम सुखाचा सद्वर्तनजल शिंपडोनि पिकवावा ॥ ९ ॥

# १०. चाफेकर नि रानडे यांजवरील फटका

(परिचय : हा फटका चाफेकर नि रानडे फाशी गेल्याची बातमी येताच सावरकरांनी सन १८९९चे मध्यंतरात रचला. त्या वेळी त्यांचे वय अवघें सोळा–सतरा वर्षांचे होते.

वीर सावरकरांच्या वडिलांना 'अण्णासाहेब' म्हणत. ते त्या वेळच्या टिळकपक्षीय राजकारणाचे अभिमानी होते. त्यांच्या भगूर येथील 'नव्या वाड्या'चे बैठकीत, त्यांच्या गावची नि त्यांच्या आजूबाजूच्या गावची पाटील, शेठजी, शेतकरी, शिक्षक अित्यादि वर्गातील त्यांची अिष्ट मित्रमंडळी जेव्हा जमे, तेव्हा 'केसरी', 'जगद्धितेच्छु', 'पुणे वैभव' नि नवीनच निघालेला आणि तात्यांचार कुमार सावरकरांचार  आवडता 'काळ' अित्यादि पत्रे वाचली जात, चर्चिलीही जात. त्या काळी प्लेगने देशभर प्रथमच भयंकर कहर अुडविला होता. त्या प्लेगची वर्णनें, सरकारची दडपशाही, रँडचा वध, लो. टिळकांचा खटला नि शिक्षा, चाफेकर–रानड्यांचे खटले नि त्यांना झालेल्या फाशीच्या शिक्षा अित्यादि अुत्क्षोभक बातम्या अेकामागून अेक येत गेल्याने सर्वच जनतेत त्या वाचल्या जाताच जशी खळबळ अुडत जाअी तशीच अण्णारावांच्या त्या छोट्याशा बैठकीतही अुडे. त्या बैठकीत हीं वर्तमानपत्रें वाचून दाखविण्याचें काम पुढेपुढे कुमार सावरकरांकडे सोपविलेलें होतें. चर्चेमध्ये तर कुमार सावरकर अितक्या त्वेषाने परकीय सरकारवर तुटून पडत आणि चाफेकरांच्या कृत्याचें नि क्रांतिप्रवणतेचें अितक्या आग्रहाने समर्थन करीत की, त्यांच्या वडिलांनी असें अुघडअुघड न बोलण्याविषयी आपल्या त्या तिखट मुलास अेकान्तात प्रेमाने समजावून सांगावे! – परंतु त्या कुमाराचें मन 'चाफेकरांसारखें काही तरी करावें' अशा अुग्र विचारांनी भारून गेलें ते गेलेंच!

ज्या दिवशी चाफेकर–रानड्यांना शेवटी फाशीवर चढविल्याची वार्ता आली, त्या पुढच्या अेक दोन दिवसांतच कुमार सावरकरांनी त्यांची कुलस्वामिनी असलेल्या अष्टभुजा देवीपुढे प्रतिज्ञा केली की, 'चाफेकरांचें अपूर्ण राहिलेलें कार्य मी पुढे चालवीन! माझ्या देशाला स्वतंत्र करण्यासाठी मी सशस्त्र क्रांतीची अुठावणी करीन!!'

सावरकरांच्या बालवयातील ह्या अुग्र प्रतिज्ञेचा पडसाद, गाभाऱ्यात वेदघोषाचा पडसाद अुठावा त्याप्रमाणे, त्याच वेळी रचलेल्या ह्या फटक्यातील खालील शेवटच्या ओळीतही अुठत आहेत : –

कार्य सोडुनी अपुरें पडलां झुंजत, खंती नको! पुढे ।
कार्य चालवू गिरवित तुमच्या पराक्रमांचे अम्ही धडे ॥

कुमार सावरकरांनी चाफेकर प्रकरणावर अेक नाटिकाही रचिली होती. त्या गावातील तमासगिरांपैकी राणूशेट शिंपी ह्यांचा जो प्रमुख फड होता त्यातील सावरकरांच्या बालमंडळींपैकी परशुराम नि राजाराम शिंपी ह्यांच्या खटपटीमुळे त्या फडाने ती नाटिका बसविली. आता खेळ व्हायचा, तों गावच्या पाटील–कुळकर्ण्यांना ती वार्ता कळली. तेव्हा काही धाक दाखवून, काही गोडीगुलाबीने त्यांनी तो बेत रद्द करविला आणि गावावर येणाऱ्या ह्या 'नसत्या अरिष्टा'पासून गाव बचावलें.

ह्या चळवळीमुळे कुमार सावरकरांच्या वडिलांना आपल्या आवडत्या नि होतकरू मुलाचें हें प्रकट होअू लागलेलें तेज, बुद्धि, प्रखर देशभक्ति आणि वीरवृत्ति पाहून मनात अत्यंत कौतुक नि अभिमान वाटे; पण हृदयात ह्या त्याच्या धाडसीपणामुळे केव्हा काय संकट ओढवेल त्याची चिंता लागून धस्स होअी. आपल्या वडिलांची चिंतातुर मुद्रा पाहून त्या मुलालाही वाअीट वाटे. ह्यासाठी जेव्हा हा फटका कुमार सावरकरांनी रचावयास घेतला तेव्हा तो बेत त्यांनी वडिलांना कळविला नाही. रात्री सगळे निजले म्हणजे 'नव्या वाड्या'तील बंगल्यात झोपाळ्यावर बसून अंधेरातच मनाशी ओळी रचाव्या आणि झटकन् दिवा लावून तेवढ्या ओळी कागदावर अुतरून लगेच दिवा विझवून टाकावा; असा त्यांनी क्रम ठेवला. पण अेका रात्री अण्णा सहज अुठले नि दिवा कोणी लावला म्हणून पाहावयास वर आले. तों त्यांनी पाहिलें, आपला मुलगा तन्मय होअून काही तरी लिहीत आहे! कागद अुचलून पाहतात तों 'चाफेकरांचा फटका!' अण्णा न रागावता पण कळकळीने मुलाला समजाअू लागलें, 'हें पहा, तू अजून लहान आहेस. आपले कुटुंब म्हणजे अेका खांबावर अुभी असलेली द्वारका! तू पुढे थोरपण पावशील, आमचे पांग फेडशील, ह्या आशेवर मी दिवस कंठीत आहे. पण तू अशा भयंकर

नादापायी आपल्या कुटुंबावर अकस्मात् अेखादें प्राणसंकट ओढवून घेशील. म्हणून सध्या तू हा असमय आणि अपक्व खटाटोप सोडून दे. पुढे मोठा झालास, बुद्धि प्रगल्भ झाली म्हणजे काय भवितव्यता असेल तें घडेल?'

चार-पांच महिन्यांच्या आतच कुमार सावरकरांवरील तें पितृप्रेमाचें छत्रही मोडून पडलें! त्यांचे वडील प्लेगमध्ये वारले! सबंध कुटुंबच प्लेगच्या कहरात वाताहत झालें. प्लेगच्या ह्या संकटाला तोंड देण्यात सावरकर कुटुंब गुंतल्यामुळे पुढे अेक वर्षभर ह्या फटक्याकडे कोणासही लक्ष देण्यास झालें नाही.

पुढे सावरकरांचें कुटुंब नाशिकला येअून राहिल्यानंतर त्या फटक्याचा प्रचार चालू झाला. अनेक बैठकांतून सावरकर तो स्वतः म्हणत. नाशिकला येणाऱ्याजाणाऱ्या बाहेरगावच्या नि पुण्यामुंबअीच्या कित्येक मंडळींनाही ह्याचा चटका लागून तो फटका त्यांनी अुतरून न्यावा, पाठ करावा; आणि तेथल्या तेथल्या समाजांत अंतःस्थपणे म्हणून दाखवावा.

शब्दालंकारांनी नि अर्थालंकारांनी अितका रसरसलेला आणि क्रांतिकारक आवेशाने भरलेला हा फटका कुमार सावरकरांनी सोळा-सतराव्या वर्षीच रचावा; ह्याचें आजही जें कौतुक वाटतें त्याच्या दसपट कौतुक त्या वेळच्या राजकीय परिस्थितीत शतावधि तरुणांनाच नव्हे, तर नामांकित कवींना आणि पुढाऱ्यांनाही वाटावें हें साहाजिकच होतें. कुमार सावरकरांनीच स्थापलेल्या गुप्त संस्थेची अुघड प्रचाराची 'मित्रमेळा' ही शाखा होती. त्या शाखेतील कै. वामनराव खरे, म्हसकर, पागे प्रभृति अनेक प्रौढ नि प्रतिष्ठित मंडळींच्याही मनात हा फटका छापावा असें वारंवार येअू लागलें. परंतु ज्या काळात काही मोठमोठे राजकीय नेतेही मनात नसतानासुद्धा आणि बरेचजण मनापासूनच चाफेकर-रानड्यांना आततायी, नीच, 'राजनिष्ठ सौजन्यशील नि सात्त्विक' अशा हिंदुजातीस कलंक लावणारे अित्यादि वेचक शिव्या हसडीत सभांतून नि वृत्तपत्रांतून निषेधाचा विषारी पाअूस पाडीत होते आणि परकी सरकार पिसाळून जाअून ज्याला त्याला चावत सुटलें होतें, त्या १९००-१९०१च्या काळात चाफेकर-रानड्यांना 'राष्ट्र-वीराग्रणी' आणि 'अनुकरणार्ह' म्हणून अितक्या अुत्कटपणे अभिनंदणारा हा फटका छापणें ही गोष्ट मुळातच दुर्घट होती! छापून देणारा तरी कोण मिळणार? तेव्हा हा फटका मूळ धोरण न सोडता, शक्य तों सौम्य करून देण्यासाठी ह्या मंडळींनी सावरकरांना सांगितलें. त्यांनीही काही फेरफार नि गाळागाळी करून तो शक्यतों सौम्य केला. पण तिखटाच्या पाळ्यातून काही तिखट काढलें तरी अुरलेले तें तिखटच असणार! तरीसुद्धा ही सौम्यप्रत सुविख्यात 'काळ'कर्ते यांजकडे अंतःस्थपणे धाडावी आणि छापावी किंवा काय ह्या दृष्टीने अभिप्राय विचारावा असें ठरलें. त्याप्रमाणे श्री. म्हसकर यांनी ती प्रत धाडली. काळकर्त्यांनी त्या कवितेची आणि त्या वेळेस ओळख नसलेल्या त्या बालकवीची अुचित तितकी वाखाणणी करूनही ती कविता छापणें त्या परिस्थितीत अनिष्ट आहे असें मत दिल्याचें म्हसकरांनी मंडळींना सांगितलें.

ह्याच सौम्य प्रतीचे वेळी मूळ फटक्यात सावरकरांनी अंतीच्या चरणातील आपलें सरळ घातलेलें नांव बदललें आणि चित्रकाव्याचा आश्रय करून तें शेवटच्या चारपांच ओळीत कूटस्थपणें गोविलें. ह्या फटक्यात शेवटच्या चारपांच ओळींत ठळक अक्षरांमध्ये तें नांव प्रकट करून छापलें आहे.

पुढे छापण्यासाठीच म्हणून रचलेले सावरकरांचे पोवाडेही जेव्हा धडाधड जप्त होअू लागले तेव्हा या फटक्याची 'सौम्य' प्रतही छापण्याचें नांवच काढणें अशक्य झालें. तथापि त्याचा प्रचार वाढतच गेला. लग्न समारंभ, अुत्सव, संमेलनें अित्यादि प्रसंगी निवडक बैठकींतून हा फटका ठिकठिकाणी म्हटला जाअी. फर्ग्युसन कॉलेजमध्ये सम्मेलनादि प्रसंगी स्वतः तरुण सावरकर हा फटका म्हणत असता श्रोत्यांत क्रांतिशील आवेश आणि स्फूर्ति कशी संचरत असे तें प्रत्यक्ष अनुभवाने सांगणारी मंडळी सुदैवाने आजही विद्यमान आहेत. जेव्हा मधून मधून धरपकडीची सत्रें चालू होत तेव्हा या फटक्याची तुरळक प्रत कोणाजवळ सापडली किंवा हा फटका म्हणत असता कोणी धरले गेले तर ती गोष्ट ते गृहस्थ क्रांतिकारक असल्याचा अेक बळकट पुरावा म्हणून गणला जाअी! परंतु असले धोके पत्करूनही शतावधि स्त्रीपुरुषांनी गुप्तपणे प्रती करून, तोंडपाठ करून, पिढीमागून पिढीचे जिव्हेवर आज पन्नास वर्षे तरी तो फटका जिवंत ठेवलेला आहे! महाराष्ट्रातील जनतेच्या मनावर अेकंदर सावरकरसाहित्याने केवढी छाप पाडलेली आहे त्याचे त्यांची ही बालवयातील कविताही अेक प्रत्यंतरच होय.

आश्चर्य हें की, छापण्यासाठीच म्हणून जे अगदी जपून रचिले ते सावरकरांचे सिंहगडादिक पोवाडे छापले म्हणूनच जप्त झाले! परंतु जप्तीची लवलेशही क्षिति न बाळगता रचलेला आणि अितका शस्त्राचारप्रवण नि क्रांतिशील असणारा हा फटका छापतासुद्धा आला नाही; म्हणूनच केव्हाही रीतसर जप्त झाला नाही!

अनेक वर्षे अनेकांकडून तोंडी म्हटला गेल्याने नि गुप्तपणे प्रतविला गेल्याने ह्या फटक्यात कित्येक पाठांतरें आढळलीं. ती संकलून नि समन्वयून ह्याची शुद्ध प्रत अुण्यापुऱ्या पन्नास वर्षानंतर सन १९४६ मध्ये प्रथमच छापण्यात आली.)

(जाति : स्वर्गङ्गा)

महच्चरित सत्सुधांबुधीमधि करू सुमन हें पाणबुडें ।
अखंड-सद्‌गुणमंडित मौक्तिक निधान सद्यश मग अुघडें ॥ ध्रु.
हांगकांगहुनि ठिणगि अुडोनी गाठी अवचित मुंबअिला ।
अपूर्व अवचित अघोर रूपें प्लेगहुताशन संचरला ॥ १
हाय! बाप! हा! अरेरे! करी गाअि! अगाअी! नरमहिला ।
भयाण शब्दश्रवणें शेषहि टाकू पाही धृत महिला ॥ २
युवतीस्फुंदन वृद्धक्रंदन तो प्राणांतिक कण्ह यांहीं ।
भुतें भयंकर किंकाळति त्या भयासही जें भयदायी ॥ ३
काळापरिसहि काळहृदय तो विषापरिसही विषारि तो ।
पवनापरिसहि जवन असोनी गिरिपरि अचलत्वा धरितो ।। ४
भारतभूचे कुंकुम केलिस स्वतंत्रता जिथ पावतसे ।
धन्य अशा श्रीपुण्यपत्तना पहावया हा धावतसे ॥ ५
अस्मानाची खोड मोडण्या सुलतानाचे मनि भरलें ।
प्रजाहिताहित मुळि न पाहता कडक कायदे बहु ठरले ॥ ६
प्लेगनिवारक नियम परी ते संवर्धकचि न त्या असती ।
लोकमतिस त्या ब्रिटिश न मानी सती-वच जसें ती असती ॥ ७
प्रदीप्त अैसा प्लेग-पावकी काय कायदा आज्य पडे ।
रँड-वायु हा हाहाकारचि करीत सुटला चहूकडे ॥ ८

– २ –

हां हां म्हणता क्षणाभीतरीं असंख्य गवसति काळ-करीं ।
अुदास दुःखित जनांस छळुनी न्यायाची पर राळ करी ॥ १
प्रेताजवळी गिधाड धडके जसा त्वरेने धावतसे ।
भुतावलीसम मृतालयाते सोजिरगण हा पावतसे ॥ २
क्रौर्ये अुद्धत शुद्ध भैरवचि मद्यधुंदिने धुंद सदा ।
आप्तवियोगें युक्तजनातें सक्त भाषणें छळति तदा ॥ ३
प्लेग मृताते असो वा नसो वसोच परि धनि अटकावी ।
शिरा घरामधि करा लूट हो कोण तुम्हांला हटकावी ॥ ४
हवे ते गृही सवेच शिरती धन्या पकडती हे वरती ।
हव्या वस्तुते लुबाडोनिया निरंकुशत्वे वावरती ॥ ५
जया मंदिरी पाय टाकिता म्लेंच्छ तच्छिरा छाटविती ।
हा! हा! अुद्धट सोजिर त्यांसी डोळ्यादेखत बाटविती ॥ ६
पतिव्रतांते कुठे गाठुनी बाटविती हे हाय! अरे! ।
अधमाधम हो! काळ स्थिर नसे सव्याज मुद्दल देअु बरें ॥ ७

आर्या छळिता खुशाल माता तुम्हांस आता माज चढे ।
परंतु होता प्रकट नृसिंहहि लपाल जंबुक कुणीकडे ॥ ८

– ३ –

हाल हाल बहुकाल करोनि चार मांडिले हवे तसे ।
छळुनि सोडिली सकल प्रजा मग 'खून' पडे हें नवल नसे ॥ १
अबलाबाला बालांचे ह्या शाप सहस्त्रावधि होती ।
करिता गमते कृती गोड जी भरिता कडवट कां होती ? ॥ २
धर्माझेला ओशाझेला समाज–कर्तव्याला हो ।
पाळोनीया प्राणा द्याया सिद्ध, तयांचा शुभ लाहो ॥ ३
स्वजनछळाला अैकुनी होती तप्त तरुण ते अरुण जणो ।
देशासाठी प्राणा देती धन्य धन्य त्यां कां न म्हणो ? ॥ ४
परस्परांमधि विचार करिती अुपाय वदती मग सुचला ।
अरे, रँड हा अधम, ह्यासची वधू चला रे चला चला ॥ ५
अरे, कांच हा मनीं डाचतो, जाच असह्यच लोकांना ।
पोचट देखुनि नाचविती हे काळ भासती कैकांना ॥ ६
शतावधी ते जन्मा येती मरोनि जाती ना गणती ।
देशासाठी मरती त्यांसी देशपिते कीं बुध म्हणती ॥ ७
वरू वरू झडकरी मरण तें जरी अमरची असें घडे ।
अनोन्यांमधि बोलति की मग गरुडपतीची जोड जडे ॥ ८

– ४ –

विनयशालिनी विनयधारिणी आंग्लां म्हणति कि यशवंती ।
राणी त्यांची विजया[2] विजयी भाग्यशालिनी अेवं ती ॥ १
चिरायुरारोग्याला भोगी तिचा महोत्सव ते करिती ।
योग्यचि समया छळक वधाया मुहूर्त सारे हे धरिती ॥ २
स्वजन–छलन हरणाला झाले सज्ज अर्पण्या देहाला ।
मोहाला ठोकुनी प्रणामा, निघती त्यागुनि गेहाला ॥ ३
वीरश्रीने शोभित झाली सत्यपालने हर्षवती ।
तारुण्याने सतेज, दैवी स्फूर्ति संचरे हृदि नव ती ॥ ४
लालभडक ते नेत्र, बंधुवर बाळकृष्ण दे धीर मना ।
श्री दामोदर सिद्ध जाहला जायालागी खलदमना ॥ ५
कान्ता वदली, ''कान्ता, जाचा देशहिताला करावया ।
पतिराया, घ्या निरोप जावें त्वरित कीर्तिला वरावया'' ॥ ६
पवन जवन परि मागे सारित 'गणेशखिंडी' प्रति आला ।
कालासम मग समय साधितो घालायाला तो घाला ॥ ७
भक्ष्य रँड बहु मस्त देखता सिंह धावला बगीकडे ।
गोळी सुटली, गडबड मिटली, दुष्ट नराधम चीत पडे ॥ ८

– ५ –

आजवरी किति तरी मारिती म्लेंच्छ मदाने वदा प्रजा ।

---

[2] विजया– व्हिक्टोरिया

सजा न त्यांना मुळी होय हे न्यायदेवते काय मजा ॥ १
परी पहा तो राजदूत ना प्लेगदूत जनछळ करितो ।
भरितो प्रायश्चित्त ठीक जै कोण कोप हा पर धरितो ॥ २
योग ओीश्वरी किंवा रँडचि दृढसंकल्पी खरा असे ।
पिसें करितसे मेल्यावरही होत सळो का पळो असे ॥ ३
पिसाळलें 'सरकार' खुनाने वसकन् डसलें भल्या भल्या ।
भल्या अर्पिल्या सुमनांजलि ज्या शतकोशतकी न लाभल्या ॥ ४
कधी फडकले जादा पोलिस, कधी पकडलें नातूंना ।
जली स्थली त्या दिसू लागला रँडवधासह तो 'पूना' ॥ ५
देशवीर महाराज शूर श्री टिळक तयांचें क्षेम असो ।
खरा हिरा हा कसासि अुतरे काळभीति 'बाळा'सि नसो ॥ ६
सायंकाली सवे चमकती बहुत काजवे आणि शशी ।
तशाच न्याये टिळक-सुधाकर ठरत तोलता अितरांशी ॥ ७
रणांगणावरि खरे राहतील कितीक ठोकुनि दंड खडे ।
तसेच असती देशद्रोही कवण तोहि अुलगडा पडे ॥ ८

– ६ –

'फितुर' 'फूट' ही दुष्ट जनांच्या पाट्यावरती पूजियली ।
नष्ट अक्षरें कष्टमय जिहीं राष्ट्रदेवि बहु गांजियली ॥ १
द्रवीडबंधु द्राड श्वान जे स्वोदरपूर्तिस्तव नाना ।
चार आचरिति फितुरि कराया शरम वाटली यांना ना ॥ २
देशासाठी झटति शूर जे, पकडुनी द्याया नरवर ती ।
सिद्ध होअुनी अनर्थकारी दहा सहस्त्रा सावरिती ॥ ३
सकळांच्या डोळ्यांत येअुनी प्राणकंटका वरि धरिला ।
वरिला रे फायदा काय तरि नित्य अकीर्ति-ध्वज पुरला ॥ ४
छळक छळ करी परी मजा की वरी कीर्ति जो छळलेला ।
चाफेकर यश-यत्न झळकवी द्रवीड अंधःकार भला ॥ ५
श्री चाफेकर त्वरें अटकले फरासखान्यामाझारी ।
तदा अंतरी करिति विचारा, ''कबूल व्हा धडगती तरी ॥ ६
ज्याच्यासाठी प्राणसंकटी लोटियलें म्या अुठाअुठी ।
कठिण काळ मद्देशबंधुजन मत्कृत्यां तव कां कंठी ? ॥ ७
सज्जन संघावरी कोसळति दुःखाद्रीचे थोर कडे ।
दहा जणांच्या हितार्थ जाअू अेक काय मग त्यांत नडे !'' ॥ ८

– ७ –

हांजी हांजी करी सर्वदा राजी म्लेंच्छांच्या कृतिला ।
पोटासाठी खटपटतो परि सुष्ट गमे परभूपतिला ॥ १
पारतंत्र्यपंकांत देश जो बुडवी त्याप्रति नृप म्हणती ।
कडक दंड जो दे त्या छलका राजद्रोही त्या म्हणती ॥ २
अुदात्त ज्याचे विचार, धाडस विशाल, देशप्रीति मनी ।
खुनी बनत तो न्याय-प्रहसनी, हाय ! हाय ! मग होत जनीं ॥ ३
तिळहि नसे की फाशी झाली यामधि दुःखाला वसती ।

देशपिता त्या खुनी म्हणतसा ह्यासचि सज्ञन बहु हसती ॥ ४
न्यायाधीशचि जोशी अुत्तम अुदयमुहूर्ता योग्य गणी ।
सत्य, देशहित, वऱ्हाड जमलें कीर्तिनीति ह्या वऱ्हाडणी ॥ ५
टिळक–गजानन नमस्कारिला फास–बोहलें मग पुरलें ।
स्मरले गीतामंत्र 'दामुने' मुक्ति नवरिला हो वरिलें ॥ ६
लग्न–सोहळा विचित्र दावी चित्र भीतिचें किती बडें ।
सूड अुगविण्या वासुदेवहृदयांत भयंकर कोप चढे ॥ ७

– ८ –

द्रवीड कोपे दाह होतसे ज्वाला नेत्रांतुनि सुटती ।
लाही झाली दाहि दिशाते 'सूड' अक्षरें हीं अुठतीं ॥ १
करकर चावी अधर, चोळितो करांसि, निश्चल पळ बसला ।
'सूड' शब्द कर्णात गुंगतो, वासुदेव मग स्मित हसला ॥ २
बोले, ''मत्ता मशका, दुखवुनि सिंह सुटाया धडपडशी ।
यमनगरीला बदली करितो अुचल जलद चल तव पडशी ॥ ३
चिरुन तुझ्या देहास करिन शतखंड पुन्हाही विखंड हा ।
दंडम रेड्या डंवचळलासी, गड्या, व्याघ्र त्वा प्रचंड हा ॥ ४
सत्यदेश–हितकर्ता जो का, चोरा, छळिलें त्या थोरा ।
अधम कृतघ्ना, लाच खाअुनी जाहलासि मम भाग खरा'' ॥ ५
श्रीचाफेकर तसे रानडे मित्र परस्पर ते होते ।
द्रविड–होम–निश्चया ठरवुनी उभय जाहले मग होते ॥ ६
अधम–शांति–सिद्ध्यर्थ बांधिलें धाडस कंकण शुद्ध सदा ।
स्नेहबांधवप्रेमा ऋत्विज् चपल असिलता दर्भ तदा ॥ ७
कोप–हुताशन भडाड भडके द्रवीड पूर्णाहुति पडे ।
झालें अवभृथस्नान रुधिरजलिं घोर प्रतिज्ञासिद्धि घडे ॥ ८

– ९ –

छळित परोपरि गरिब जनांला म्लेंच्छ पुनरपी या समया ।
तया भिअुनिया स्वये सांगती जन–माया जनकासम या ॥ १
''सूड अुगविण्या प्रिय बंधूंचा द्रविडवधाला करणारा ।
वासुदेव तो मीच होय जो सज्ञनछलना हरणारा ॥ २
मित्रालागी लागोपाठी गाठी द्रविडा अधमाला ।
मीच रानडे सुमित्रापुढे कस्पटसम मत्प्राण मला'' ॥ ३
न्याय–नाटकी थाट अुडाला वाट ना मिळे रतिभर ती ।
मूर्ति मनोहर अवलोकुनिया जनकुतूहला ये भरती ॥ ४
चकित टकमका सर्व पाहती धन्यचि छाती मग म्हणती ।
कुणी धाडसी, कुणी पिसे वा कुणी वीरवर त्यां गणती ॥ ५
फाशी ठरली तरी न फिरली देशहिताची दृष्टी ती
राजकीय कट संबंधाला मुळी न थारा ते देती ॥ ६
धन्य जाहला येरवड्याचा तुरुंग सज्ञनसंगतिने ।
शतनमनें त्या कालगतीला भला भरविला रंग तिने ॥ ७
फाशी चढती प्राणपाखरू देहपिंजऱ्यातुनी अुडे ।

वीर कृतीने राष्ट्रामाजी पराक्रमाचें तेज चढें ॥ ८

– १० –

कालासम ते पती हरपले बाला झाल्या त्या अबला ।
सौभाग्याचा सुरम्य वाडा विद्युत्पाते हा दबला ॥ १
हे भगिनींनो असह्य संकट तरी कीर्तिकर समजावें ।
वरुनी ज्ञाना, करुनी कीर्तिस देवि जानकीसम जावें ॥ २
मायचि ती अुपमा ना दुसरी अंबर भरवी हंबरडे ।
तिघे गिळियले लाल तियेचे घोरतम किती यमनरडें ॥ ३
त्यज शोकासी, रत्नें अैशीं जननि निपजती तुझ्या कुशी ।
कीर्ति तयांची स्नुषा अमर तव चुंबी हर्षे अूठ कशी ॥ ४
पिता म्हणविता पुत्रत्रयीचा निपुत्रिक कसा हो बनला ।
किंवा विधिने अननुभवे सुत–शोक सह्य की हा गणिला ? ॥ ५
अद्वितीय यश तिहीं जोडिलें देशपिते हे कुला भले ।
शतांश त्यांच्या वृद्ध होअुनी तुम्हां आम्हांला न लाभलें ॥ ६
अजरामर ते धन्य पुत्र तव कीर्तीरूपें लखलखती ।
हिरे ! असोनी मर्त्य जाहले अमर तथापी कां खंती ? ॥ ७
नररत्नांच्या वियोगयोगे पशुपक्ष्यादिक धाय रडे ।
बलिदानाविण वीरांच्या परि राष्ट्रोद्धारहि कसा घडे ॥ ८

– ११ –

स्वार्था मारुनि लाथ; ठोकिला रँडा जनछलशमनाला ।
परार्थसाधू श्रीचाफेकर योग्य कां न ते नमनाला ॥ १
राजकीय कट छळी देश त्या, पुढे होअुनी नाशियला ।
देशहितेच्छु श्रीचाफेकर योग्य कां न ते नमनाला ॥ २
प्राणांतीही नाचि चिकटली असत्यवाणी वदनाला ।
सत्यभाषणी श्रीचाफेकर योग्य कां न ते नमनाला ॥ ३
नष्ट कराया तयार झाले द्रविड छळति जे सुजनाला ।
अधमद्वेषी श्रीचाफेकर योग्य कां न ते नमनाला ॥ ४
आजन्मी जे कधी न ढळले जगत्प्रभूचे भजनाला ।
भक्तशिरोमणि श्रीचाफेकर बंधु योग्य शत नमनाला ॥ ५
महाघोर भवपाश तोडिला माया शिवली न मनाला ।
विरक्त पूर्णचि श्रीचाफेकर बंधु योग्य शत नमनाला ॥ ६
प्राणां विटली परी नच तुटली झटली जनहित करण्याला ।
धन्यचि मैत्री, धन्य रानडे वीर युवकही नमनाला ॥ ७
पराक्रमाच्या तेजा तुमच्या त्रासुनि निंदिति जरि घुबडें ।
वीरकथा तुमची ही गाअिल पिढी पिढी नव पुढें पुढें ॥ ८

– १२ –

असोत अरिचे ठायी जरि गुण अनुकरणीयचि जरि ठरती ।
अभिमानास्पद तरि न गमावी स्वजनकीर्ति मज कां हो ती ? ॥ १
भ्याले नाही काळालाही झटावया जनकार्याते ।
वचकावें मी काय म्हणोनी स्तवण्यासी त्या आर्यांते ? ॥ २

विरुद्धपक्षी स्वये वानिती जया धाडसी नररत्नां ।
कृतज्ञ व्हाया, सद्‌गुण गाया म्या न करावें कां यत्नां ? ॥ ३
शतकामागे हेंच चमकतें तेज आज जे खुनी दिसे ।
दिसे अंधळ्या, दुबळ्या धूर्ता जें, तें बहुधा तसें नसे ॥ ४
वितंडवादी पंडित बनतो, साधुश्रेष्ठही तो सोदा ।
नाना सद्‌गुण दुर्गुण ठरती, वक्रकाल हा हरि मोदा ॥ ५
अन्यायप्रवणांना दंडूं, रणीं पुढेची पद ज्यांचें ।
ठरति कसे अपराधी ते जे करिति दमन परसत्तेचें ॥ ६
फाशी ना ती यज्ञवेदिका रक्ते न्हाली जी तुमच्या ! ! ।
सांडुनी होवो त्याचि राष्ट्ररणिं सार्थक रक्ताचें अमुच्या ॥ ७
कार्य सोडुनी अपुरें पडला झुंजत, खंती नको ! पुढे ।
कार्या चालवु गिरवुनि तुमच्या पराक्रमाचे अम्ही धडे ॥ ८

## ११. गेला अहो देश रसातळाला!

(अिंद्रवज्रा)

गेला अहो देश रसातळाला
स्वातंत्र्यप्रासाद अहा जळाला
आला परांचा अति थोर घाला
व्हा सज्ज, तुम्हांस लुटूं निघाला ॥ १
विध्वंसुनी कुंपण हा रिघाला
घालावयाला पर टोळ घाला
स्वातंत्र्यराशीस लुटून नेला
मेल्यापरी काय बसून ठेला ? ॥ २

## १२. नाशकाजवळचीं लेणीं पाहून!

(अिंद्रवज्रा)

लेणीं बघाया मग पांडवांची
गेलों वयस्यांसह मौज साची
अत्यंत रम्य स्थळ पाहतां तें
संतोष झाला बहु मन्मनातें ॥ १
परंतु जातां क्षण हर्ष गेला
शोकानलें दाह मनांत केला
कीं थोर विद्वान् पितरां अशांला
कुपुत्र झालों अम्हि हे कशाला ? ॥ २

## १३. दिवंगत मित्राच्या पत्नीने सांत्वन

(आर्या – गीति)

कुलजे सुभगे माझा गे आशीर्वाद तुजसि हा पावो ॥
मन्मित्रपत्नि तूं तव कार्यक्षमता सुकीर्ति जन गावो ॥ १ ॥
आकाश फाटलें तरि ठिगळानें त्यास केविं झाकांवें ॥
धैर्यालंबन करूनी कर्मगतिपुढे मुकेचि वांकावे ॥ २ ॥
आपुल्यापरिसहि गुरुतर संकटग्रस्तास पाहुनी समजा ॥
व्हा शांत हृदय ह्या शांतिसम दुजी न संकटांत मजा ॥ ३ ॥
धनसंबंधीं ठेवा विश्वास न, हें भल्यास लोभवितें ॥
सद्वर्तन शुचि राहो कीं हें कुलजांस फार शोभवितें ॥ ४ ॥
लेखनवाचन अपणां येतें हें फार फार बरवेंची ॥
सद्ग्रंथकनक कणकण संतत व्हायास तूं गवर वेंचीं ॥ ५ ॥
आशीर्वाद असे त्या बाबूला आणि अुभय कन्यांना ॥
कीं सद्विद्याश्रीधी पावाया ना म्हणोत धन्या ना ॥ ६ ॥
त्वल्लिखित अुत्तराते धाडी वृत्तांत त्यांत कळवावा ॥
वळवावा श्रीश मनें स्वकुलाचा कीर्तिपट न मळवावा ॥ ७ ॥

(१८९९– १९००)

## १४. सायंकाळी रानांत चुकलेलें कोकरूं

(जाति : नृपममता)
(चाल – 'नृपममता रामावरती' सारखी)
कां भटकसि येथें बोलें ? कां नेत्र जाहले ओले ?
कोणिं कां तुला दुखवीलें ? सांग रे ॥ १ ॥
धनि तुझा क्रूर कीं भारी । का माता रागें भरली ?
का तुझ्यापासुनी चुकली ? सांग रे ॥ २ ॥
हा हाय कोंकरूं बचडें ! किति बें बें करुनी अरडे
अुचलोनि घेतलें कडे । गोजिरें ॥ ३ ॥
कां तडफड आतां करिसी ? मीं कडे घेतलें तुजसी
चल गृहीं चैन मग खाशी । अैक रे ॥ ४ ॥
मी क्रूर तुला का वाटे ? हृदय हें म्हणुनि का फाटे ?
भय नको तुला हें खोटें । अैक रे ॥ ५ ॥
हा चंद्र रम्य जरि आहे । मध्यान रात्रिमधिं पाहे
वृक वारुनि रक्षिल ना हें । जाण रे ॥ ६ ॥
तो दूर दिसतसे कोण ? टपतसे क्रूर बघ यवन
गोजिरी कापण्या मान । जाण रे ॥ ७ ॥
कमि कांहिं न तुजलागोनी । मी तुला दूध पाजोनी
ही रात्र गृहीं ठेवोनी । पुढति रे ॥ ८ ॥
उदअीक येथ तव माता । आणीक कळपिं तव पाता
देअीन तयांचे हातां । तुजसि रे ॥ ९ ॥
मग थोपटुनी म्यां हातें । आणिलें गृहातें त्यातें
तों नवल मंडळींना तें । जाहलें ॥ १० ॥
कुरवाळिति कोणी त्यातें । अणि घेति चुंबना कुणि ते
कुणि अरसिक मजला हंसते । जाहले ॥ ११ ॥
गोजिरें कोंकरूं काळें । नअू दहा दिनांचें सगळें
मअुमअू केश ते कुरळे । शोभले ॥ १२ ॥
लाडक्या कां असा भीसी । मी तत्पर तव सेवेसी
कोंवळी मेथि ना खासी । कां बरें ॥ १३ ॥
बघ येथें तुझियासाठीं । आणिली दुधाची वाटी
परि थेंब असा ना चाटी । कां बरें ॥ १४ ॥
तव माता क्षणभर चुकली । म्हणुनि का तनू तव सुकली
माझीही माता नेली । यम करें ॥ १५ ॥
भेटेल अुद्यां तव तुजला । मिळणार न परि मम मजला
कल्पांतकाल जरि आला । हाय रे ॥ १६ ॥
मिथ्या हा सर्व पसारा । हा व्याप नश्वरचि सारा
ममताही करिते मारा । वरति रे ॥ १७ ॥
ह्या जगीं दुःखमय सारें । हीं बांधव पत्नी पोरें

म्हणुनियां शांतमय हो रे। तूं त्वरें ॥ १८ ॥
तरि कांहिं न जेव्हां खाई। धरुनियां अुग्रता कांही
उचटिलें तोंड मीं पाही। चिमुकलें ॥ १९ ॥
हळु दूध थोडकें प्यालें। मग त्वरें तोंड फिरवीलें
कोंकरूं बावरून गेलें। साजिरें ॥ २० ॥
स्वातंत्र्य जयांचें गेलें। परक्यांचे बंदी झाले
त्रिभुवनी सुख न त्यां कसलें। कीं खरें ॥ २१ ॥
लटकून छातिशीं निजलें। तासही भराभर गेले
विश्व हें मुदित मग केलें। रविकरें ॥ २२ ॥
घेअुनी परत त्या हातीं। कुरवाळित वरचेवरती
कालच्या ठिकाणावरती। सोडिलें ॥ २३ ॥
तों माता त्याची होती। शोधीत दूर शिशुसाठीं
दगडांचे तरुंचे पाठीं। हाय रे ॥ २४ ॥
हंबरडे ऐकूं आले। आनंदसिंधु अुसळले
स्तनिं शरासारखें घुसलें। किति त्वरें ॥ २५ ॥
डोलतो मुदित तरुवर तो। सप्रेम पक्षि हा गातो
तोकडा प्रतिध्वनि देतो। मुदभरें ॥ २६ ॥
हे प्रभो हर्षविसि यासी। परि मला रडत बसवीसी
मम माता कां लपविसी। अजुनि रे ॥ २७ ॥

– नाशिक, १९००

## १५. नारोशंकराचें देवालय

(शार्दूलविक्रीडित)

दिल्लीचें पद हालवोनि वरिली तेजें जिंहीं संपदा ।
राहोनी निरपेक्ष वाहुनि दिली श्रीशंभुच्या सं-पदां ।।
होते ते तुमचे सुपूर्वज असे यत्कीर्तितें ना लय ।
नारोशंकरचें असें कथितसें आम्हांसि देवालय ।।

– नाशिक, १९००

## १६. गोदातटीं रात्रीं

(आर्या-गीति)

गंगातीरीं बिंबित दीपशिखा नचि परंतु कज्ज्वळ तें ।
सज्ञनहृदय असेंची त्यजुनी दोषा गुणाकडे वळतें ।।

– नाशिक, १९००

## १७. श्रीटिळकस्तवन

(आर्या–गीति)

लाजविलेंसि निज यशें धवलें त्वां सत्य हिमनगा तिलका ।
संतत जनपदसेवार्पित तूं तुज कवि न गान गातिल कां ? ।। १

अनलस जनकार्यातें आर्यातें रक्षि शंभु टिळकातें ।
शुक्लेंदुयशें लज्जित तेथें होतील ना कुटिळ कां ते ? ।। २

स्वार्थास्तव ना केलें दुष्कृतिमंडन कदापि तिलकानें ।
यत्कीर्तिश्रवणामृत दुर्लभ सज्जन सदा पितिल कानें ।। ३

जनसेवेस्तव झटतां झट कारी नेति बाल तिलकाला ।
दु:सह छल सोसावा लागे या आर्यभालतिलकाला ।। ४

परि धीर धरी केसरि, सरि पार्था ना शरासनचि टाकी ।
कीं[3] ''केसरी'' सरीं जें पात्रत्व न तें ''सरांस'' नचि टांकी ? ।। ५

दृढ स्नेह असे जो जो राष्ट्रहितोद्युक्त त्यांशिं तिलकांचा ।
राष्ट्रविघातक अरिच्या होती केसरिपुढें शिथिल कांचा ।। ६

प्रेमा ठेविति साधू अिहलोकीं, देवता नभीं, तिलकीं ।
यमदूत स्पर्शाया राष्ट्रहितेच्छू सतां न भीतिल कीं ।। ७

देवा तुझ्या हवालीं केला हा कीर्तिनीतिचा ठेवा ।
व्हा वाली, स्तेनभयापासुनि ह्या रक्षुनी सुखें ठेवा ।। ८

गातो आर्यांतें श्रीमयुरेशस्फूर्तिने ''विनायक'' तो ।
नायक तो जगताचा तिलकस्तवास मुदित आयकतो ।। ९

– नाशिक, १९००

---

[3] केसरी म्हणजे टिळकांस जी योग्यता होती ती सरांस म्हणजे 'सर' ही पदवी धारण करण्यारांस नव्हती. जसें (सरीं) सरोवरास जी पात्रता आहे ती टाक्यास नसते.

# १८. केतकरप्रशस्ति

(परिचय – नाशिकचे लो. टिळकांचे व्याही आणि सन्मान्य पुढारी कै. गंगाधरपंत यांच्या स्मृत्यर्थ नगरगृह बांधण्यांत आलें, त्या केतकर–नगर–गृहाचा पाया घालण्यासाठीं न्यायमूर्ति माधवराव रानडे आले होते. त्यावेळीं विनायकरावांनी पुढील श्लोक लिहिले. ते त्या वेळी 'लोकसत्ता' ह्या वृत्तपत्रात प्रसिद्ध झाले होते.)

(शार्दूलविक्रीडित)

सत्कीर्ती विमला वरूनि रमला, जो मातृभूला भला
औदार्ये भरला भवास तरला सत्पुत्र तो शोभला
देशार्थ श्रमला कधीं न दमला त्या सद्यशो–मंदिला
श्रीमत्केतकरा स्वभूहितकरा साष्टांग म्यां वंदिला ॥ १ ॥
ना कोणा छळिलें कुशब्द वदुनी सत्प्रेम तें जोडिलें
ज्यानें देशहितार्थ यत्न करण्या स्वार्थाप्रती सोडिलें
व्यापोनी नगरां पुरांस पसरे यत्कीर्ति देशावरी
हा ! हा ! निर्दय काल ने झडकरी गंगाधरा सत्वरी ॥ २ ॥
आधीं देशहितार्थ यत्न करिती ऐसे किती जन्मती ?
त्यामाजी परतंत्र देश अमुचा कुंठीत जेथें मती
ऐशाही समयीं कसे हरिसि बा या देश–उद्धारका ?
आर्यांचे कलिजे कसे हिसडसी, दीनांवरी मार कां ? ॥ ३ ॥
ज्यांच्या सत्कृति थोर थोर करिती त्यांची वसावी स्मृती
साधूंचीं करिताति यास्तव जनीं हीं स्मारकें सन्मती
आजी नाशिकवासि केतकर जो दैवें अम्हां लाभला
त्याचा स्मारकयोग हा जुळतसे आनंद जाला भला ॥ ४ ॥
बांधावें नगरगृहासि ठरलें पाया तया घालण्या
येती 'जस्टिस' रानडे झडकरी मानोनि बोलावण्या
थोरांचे स्तवनार्थ थोरचि भले आम्हांसि याकारणें
झालें दर्शन साधुचें फिटतसे या चक्षुचें पारणें. ॥ ५ ॥

– नाशिक, १९००

# १९. छंद नसे चांगला!

(जाति : केशवकरणी)

(परिचय – ही लावणी एका तमासगीर फडास करून दिल्यापैकी आहे.)

(चाल – ‘वृषपर्व्याशी युद्ध चालले’)

स्त्री : मन्मन–मित्राच्या कासारा गणिकेचा हा तुला
गड्या रे छंद नसे चांगला
पति : अगे काय करू गे मन मोही सुंदरी
स्त्री : जिवलगा असे परि रम्य मुखी ती दरी
भुलुन रहाल जरि अिज शेजारीं काळ–सिंह क्षोभला
घेअिल प्राण दाबुनी गळा ? १
पति : प्रेमें घाली कंठीं हस्ता नखरे करते किती
स्त्री : नव्हे ती नडग[४] नखे मारिती
जर खिसा खुळखुळे म्हणेल तरि मग बसा
ना तरी ढुंकुनी पाहिल ना अवदसा
पति : मजविरहित ती, सुभगा ठेवित प्रेमभाव ना भला
स्त्री : नव्हे ती लक्ष्मीहुनि चंचला २
पति : मम पद घेअुनि हळूच चुरते मृदुहस्तें कोमला
कशी ती ठकविल सुंदरि मला
स्त्री : खायास मिळेल न कवडीही तुज जअीं
पडशील सडुनियां, हंसेल जग हें तअीं
पदमर्दन तें दूरचि राहो पैशास्तव प्रियकरा
ओढिल बाजारीं फरफरा!

– नाशिक, १९००

[4] नडग = अस्वल.

## २०. सरोवरपुरन्ध्री – लेडी ऑफ दि लेक : सर्ग ५ (भाषांतर)

(परिचय : अिंग्रजी सहाव्या अियत्तेंत असतांना विनायकरावांनी पहिल्या सहा छेदकांचे भाषांतर केले. ते पुढे दिले आहे.)

(वृत्त : भुजंगप्रयात)

– १ –

पुरा ज्या दिशासुंदरी पूर्व वी तो
प्रवासी जनाला सदा हर्षवीतो
करी जो स्मितें तामसी रम्य रेखा
प्रकाशे जलपृष्ठिं कीं रौप्य देखा ॥
गिरीचेवरी घोर मार्गास दावी
जयाची प्रभा शुभ्र भारी वदावी
अशा बालरश्मीपरी संगराच्या
असंख्यांत अभ्रांतुनी संकटांच्या ॥
महावीर धर्मस्वकांतिप्रसारा
तसा दीप्त भारी सुशीलत्व तारा
प्रकाशोत कीं शुभ्रसे सर्वदा ते
भयीं लुब्धता, धाडसीं गर्व दाते ॥

– २ –

(द्रुतविलम्बित)

किरण शुभ्र प्रदीप्त अशापरी
तरुंतुनी झळके वरचेवरी
चमक लाल दिसे जअीं अीक्षणीं
अुठति सत्वर वीर तये क्षणीं ॥
नयन लावुनि चित्रित अंबरीं
जपति वीर प्रभातस्तुती बरी
करुनि सत्वर सिद्ध हुताशना
अुरकिती झट वीर युताशना ॥
तनुस ‘गेल’ झगा मग वेष्टितो
रमवि रम्य विचित्रित दृष्टि तो
वचनपालक चालत मोहपी
हरित रान क्रमी करडे गिरी ॥
निबिड मार्ग कुठें चढती कडे
अुभट दुस्तर चालति वांकडे
तळप्रदेश मनोहर पाहती
वळणिं ‘फोर्थ’ ‘सुटीथ’ प्रवाहती ॥
करसहायि हरीखति सत्वरी
पद अशा चढणी वरचेवरी
दंवसरी गळती तरुचे तलां
प्रविशतां अितुका पथ गुंतला ॥

दंव न मौक्तिक लाजवितें सवे
सकल ना परि सुंदरि–आंसवे ।।

– ३ –

वृत्त – सुनीत (शार्दूलविक्रीडित)

ज्या ठायीं अुतरे सरोवर तिरीं घोर स्वरूपा भली
पंक्तीचे वरि पंक्ति लागति जिच्या 'बेन्लेडि' ती शोभली
'व्हेनाकार' धरोनियां रजतभा भ्रान्ती मनोहारि तें
जेथें ते स्थलिं पावती अुभयतां सत्कीर्तिचे हार ते ।।
घेतो खिंडिंत थेट माग वळसे यन्मस्तकां झांकिती
मोठाले सुळके शिळा लटकती भीतिप्रदा त्या किती
वाफे 'ब्रॅंकन'चेहि गार हिरवे ते शोभती सुंदर
स्पर्धेनें झुडपासमान चढतां डोले कुठें 'हीदर' ।।
अैसा अुंच सखोल हा नगपती घे फाटकासा झगा
फोफावोनि पुनः पुन्हा जल चिरी मार्गास त्या त्या नगा
होता आक्रमिण्या असा बिकट तो कीं आखडोनी गती
त्या घाटांतुनि मार्गदर्शक हळू पान्थास ने संगती ।।
बोले 'काय विचित्र कारण तुम्हां रानांत ह्या यावया
कोणी जेथ शके न रॉडरिकच्या आज्ञेविना जावया ?' ।।

– ४ –

(वृत्त : स्वागता)

''रे कटीं लटकतो परवाना
त्याविना मज दुजी परवा ना
यद्यपी गमलि सत्यचि नाही
कीं तिची मज जरूर जराही ।।
चूकलों करित मी मृगये तों
आज वासर तिचा जअिं येतो
शांत निश्चल गमे मज सारें
कीं नगावरिल बर्फ–पसारे ।।
दूर स्वामि तव भीम मनाचा
शीघ्र संभव न आगमनाचा
मार्गदर्शक मला वदला हें
जें कदाचिदसत्यहि आहे' ।।
'कां पुन्हा परि भयांत घुसावें ?'
'वीर तूं ? मजसि काय पुसावें
आम्हि राहुनि स्वतंत्र बसावें
कीं सुदाससम बद्ध असावें ? ।।
शांत वेळ दिन आज रिकामा
घालवूं धरिति या जरि कामा

कारणें बहुत क्षुल्लकशाही
वीर पावति स्थलांत कशाही ।।
विश्वकद्रु, खग हिंडुनि घेतो
रान; त्याप्रतिचि धुंडुं निघे तो
अद्रिवासिनि सुरम्य कुमारी
नेत्रसायक तया जरि मारी ।।
कीं भयाण पथ आक्रमिण्यातें
रे भयत्वचि भटां भुलवीतें'
पान्थ त्या वदत सत्तितिवाणी
पाणिदार चतुरा अशि वाणी ।।

– ५ –

(वृत्त : मालिनी)

''वद न वच, असों दे गौप्य, नाहींच हेका
परि परियसि येतां तूं न कांहींच हें का ?
करित वरि सवारी मार 'अल्पाअिनाचे'
'मुळिं न मजसि ठावें आण माझीच साचें ।।
नरपतिमृगयेतें पाळण्या सज्ञ सेना
असति म्हणुनि ठावें अेक, बाकी असेना
जमति नगनिवासी अैकतां तप्त जात्या
फडकतिल पताका शांतिनें सुप्त ज्या त्या'' ।।
''फडकवुत सुखें त्या ना मना कामना ते
कसर कुरतडों त्यां, नाचि शंका मनातें
फडकतिल सवेंची चुंबण्या अंबरातें
धरुनि नगनिवासी वृक्षयुक्तांबरातें ।।
म्हणसि चुकुनि आलों शांत हेतू मनातें
अरिसम परि देसी बोल अल्पाअिनातें''
''तव पतिविषयीं कीं दांड तो चंड ठावें
नृपतिवरिच बंडा मांडुनी जो अुठावे ।।
नृपप्रतिनिधिच्याही सन्मुखीं लाजला जो
नचि, करि अमिराचा खून ज्या लाज लाजो
जरि अणखि न ठावें वर्ततो तो कसारे
विटतिल सुमनें, हें अैकतां अेक सारें'' ।।

– ६ –

(वृत्त : वसंततिलका)

आरोप अैकुनि असा अति नीच क्षोभे
तो 'गेल' मूर्त प्रलयाग्नि असाच शोभे
ओढोनि अूर्ध्व भुवअी वदला तयातें
'सिंहास हाणुन बळें मृग लात यातें ।।
जीवंत मत्त सुटणार न, शीरजोरें
निंदोनिया दुखविलें न अुशीर जों रे

तोंची शिरे तदुदरीं तरवार त्याची
मेल्याविना बघ न खोड जिरे जित्याची ॥
हो रान राजगृह वा न कथा तयाची
प्रत्यक्ष हे सुरसभाहि विधातयाची
द्यायास शासन जिथें अुपमर्द होतो
कोणासही डगमगेल न मर्द हो तो' ॥
'होतांच तो जुलुम यद्यपि पादशाही
दंडी न स्वातिक्रमकारकशी दशा ही
दुर्गांत बालनृप तो बलहीन साचा
कोठील मान मग त्यास मुळीं न साचा ॥
मंत्री सुदुर्बल करीं धरि राजदंडा
त्या दांडग्यास मग कोण करील दंडा
वाटे तुझें मन सवें बघुनी विटावें
रोमांच ह्या तव प्रतिकृतिनें अुठावे ॥
जो क्षेत्रकार जन दुर्बल नागवाया
धान्यें गुरें हिसकुनी बहु भागवाया
निष्कारणें सुजन दक्षिणवासियातें
निःशंक लाज शकली न शिवूंहि यातें' ॥

– नाशिक, १९००

# २१. श्रीशिवगीत

(आर्या – गीति)

नेती धर्म लयातें छळिती गो–द्विजवरां यवनकर ते ।
श्रीशंकर शिवरूपें धर्माचें जाहले अवन करते ॥ १
सच्छीला, सद्‌वृत्ता मानिति सीतेसमा शिवा जीतें ।
ती श्रीजिजा जनुस दे आर्यजनधराहिता शिवाजीतें ॥ २
धन्य यवनतम–हर्ता धन्यचि तज्जनक श्रीशहाजि रवी ।
हरवी रिपुकरिवर–मद रग यवनांची नरेश हा जिरवी ॥ ३
श्रीमद्भारत रामायण रम्य कथा–सुधा सदा पीतो ।
श्रीरामकृष्णसा मग अधमां, रक्षुनि बुधांस, दापीतो ॥ ४
धन्या जिजा वदे ती कथिते शिवबा तुला सुजननीति ।
कीं सोनार सुवर्णा दे[5] देवत्वा मला सुजननी ती ॥ ५
अतितर दुस्तर बा हें मानुष्य तशांत अुच्चकुलजनन ।
तरि वरिं सत्कीर्ति, हिला साधिति जे सुज्ञ धन, दुकुल जन न ॥ ६
भवसागर अुतराया सुतराया, रे स्वधर्म ही सुतरी ।
तरि धर्म–छलक अधमां दंडुनि तूं भूमिभार हा अुतरीं ॥ ७
जी जनु देअुनि रक्षण भरण करी अिच्छि आपणां शिव बा ।
ती मायभूमि मुक्त–क्लेशा हो, करिंच ह्या पणा शिवबा ॥ ८
सांप्रत बारे सारें यवनमयचि जाहलें भरतखंड ।
तन्नाश–अुक्तकार्यी पाडुं नको, हो अुदंड रत, खंड ॥ ९
करिं मुक्त मायभूतें, निर्दय हो, जाळ धर्मलंडातें ।
चिरणेंच अुक्त जेथें पोसावें काय त्या गलंडातें ॥ १०
बहु काय वदों रक्षीं साधुस, हो नित्य कार्य–अनलस रे ।
काय यवनतृण खाया मागें मग आर्यशौर्य–अनल सरे ॥ ११
शिवराजहृदयसुघटी बोधामृत ओतिलें जिजाअीनें ।
कीं आम्रवन सुगंधें भरलें सुमनें करोनि जाअीनें ॥ १२
घेअुनि पिता सुतातें यवनपतिकडे विजापुरा गेला ।
यवनास नमन न रुचे, बैसे तैसाचि वीर रागेला ॥ १३
राजसभारीति नसे ठावी यातें, वदे शहा[6], परते ।
घेअुनि सुता वदत जो स्वगत अहह, छळति देश हा पर ते ॥ १४
राय शहाजी बोधी कर यवनाराधना शिवाजीतें ।
मेळविलें केवळ म्यां तत्प्रेमें ह्या धनाशि वाजीतें ॥ १५
सोडीं यवनद्वेषा, जोडी तत्प्रेमहेम हितकर बा ।
हा पिंड तयांचा, त्यां अर्पुनि यश धवल हें महिंत कर बा ॥ १६
विश्वासघात नरकचि त्याचा जो अन्न देअि गा परिस ।
स्वामिद्रोही म्हणती अधमाधम सुज्ञ पन्नगापरिस ॥ १७
गेलें भान शिवाचें कोमलसे गाल जाहले ओले ।

---

[5] दीपक = अलंकार
[6] शहाजी

बोले बाल मधेंची तात, कुठें तेज आपलें गेलें ? ॥ १८
गोद्विज कष्टविती हे नष्ट कराया स्वभूमिला सजले ।
स्वामी स्वामी त्यातें वदण्यातें वदन हें कसें धजलें ? ॥ १९
हरहर खर पर चिरती चरचर दररोज वासरें गाया ।
खाया आर्यरविपुढें, काय यवन–काजवा सरे गा या ॥ २०
लुटिलें सर्वस्व जिंही स्पर्शू जो मायभगिनिला सजला ।
ताता तुम्हीच सांगा वंदूं मी अधम काय तो ? मजला ॥ २१
मरण वरिन, ना जाअिन शरण म्हणुनि दास दुष्ट अधमातें ।
न लगे धन गज हय मज प्रिय जगतीं एक यवनवध मातें ॥ २२

– नाशिक, १९००

# २२. गोदावकिली

(परिचय : नाशिकला प्लेग असल्यामुळें विनायकराव आपल्या मामांच्या येथें कोठूर गांवी गेले होते. तेथें पंतांच्या गंगावकिलीप्रमाणें गोदावकिली लिहिण्याचें त्यांच्या मनांत आलें. गोदेच्या घाटावर बसून त्या गांवच्या लोकांविषयी त्यांनी ही कविता लिहिली आहे. सावरकरांना पंतांच्या आर्या लहानपणापासून आवडत असत. त्यांच्या यमक कौशल्याचे यशस्वी अनुकरण त्यांनी किती हव्यासाने केलें होतें ह्याची प्रतीति ह्या आर्यांवरून ध्यानी येईल.)

(आर्या – गीति)

धवले धन्ये गोदे सन्मुनिवरसंघवेष्टिते गंगे ।
संगें तव तों अतितर दुस्तर भवसिंधु सत्वरें भंगे ॥ १
आजवरी बाह्यांगा न्हाणिति माता न अंतरंगातें ।
श्रीसांब–शिरा खालें साधाया कार्य येत गंगा तें ॥ २
घाट न हे पाट स्वयें मांडुनि न्हाणावया अम्हां लोकां ।
स्वांगी पसरवि खेळवि जगजननी दे अवर्णनिय तोखां[७] ॥ ३
पळतां केव्हां येते धांवत धरण्या फुगोनि रागानें ।
केव्हां खडकीं बैसुनि मोहवि काढोनि सुस्वरा गानें ॥ ४
विकसित कमलें दावुनि न्हाअिल पहिला तया मिळेल वदे ।
ऐशा परोपरीनें चुचकारुनि माय ही सदा शिव दे ॥ ५
पूजापेक्षित अैशा भूमितलिं अनंत देवता वसती ।
स्वशिशुसमावनकीर्ती तुजसम अयि! तूंचि गे दुजी न सती ॥ ६
परि अल्पबुद्धि बालक जननी प्रार्थित तुझ्या पदा हा कीं ।
कौस्तुभवासि[८] जनांच्या योगक्षेमासि तूं सदा हांकी ॥ ७
सांप्रत सर्वचि झालें माते, हें भरतखंड हीन खरें ।
परवशता बहु दुःसह बरवी हृदयस्थ न[९]डगिची नखरें[१०] ॥ ८
तत्तारणा झटावे सदये, संतत समस्त गांवकरी ।
गांव जुटीनें अुठला तरि तदहित केंवि दुष्ट राव करी ? ॥ ९
मम मातुलकुलज जननि, तारीं सारे त्वरें मनोहर[११] ते ।
होअूत तद्वंशज कृति[१२] सत्कृतिनें संतजन–मनोहर ते ॥ १०
गंगे, संकटकाली द्यावा त्या डोंगऱ्यां[१३] सदा थारा ।
तत्सद्वंशज शुचि सति पत्निसहित वृद्ध भाअु अुद्धारा ॥ ११
तद्वंशज अण्णांना तात्यांना तेंवि शंकरा बाला ।
रक्षीं, सांग तयांच्या गेहीं सिद्धिस विशंक राबाला । १२
करिं जननि, यशस्वी ते संतत गोपालराव बिवलकर[१४] ।
वैद्यक–क्रियेंत मिळवी हटकुन ज्यांचा यशास धवल कर ॥ १३

---

[7] संतोषाला.
[8] कोठूर गांवाचे रहिवासी.
[9] अस्वलीचीं.
[10] नखें.
[11] मनोहर ते– मनोहर कुटुंबातील लोक. गोविंद मनोहर हे सावरकरांचे सख्खे मामा.
[12] धन्य.
[13] डोंगरे नांवाच्या कुटुंबातील लोकांना.
[14] डॉ. बिवलकर

बहु अुग्र ग्रंथिरोगें मजसम आले पळून भयसहित ।
सन्मान्य श्रुतिज्ञ महाशब्दे ते वैद्य होत[१५] भयरहित ॥ १४
कानिटकर–बंधुत्रय पावन, दे भक्तिरुचिरसा कर गे ।
तद्वंशवृद्धि होअुनि येवो जनवदनिं रुचिर साकर गे ॥ १५
गुरुजीचे सद्गुणरसिं जावोत गुणज्ञ नित्य तरतरूनी ।
विद्या परीक्षकास्तव जशि तरुणास्तव समुत्सुका तरुणी ॥ १६
नचि विसरावे माते, अुद्योगी ते समस्त कुलकरणी ।
ग्रामजनांचे वदनीं राहो तद्रुचिरकृत्य–ललकरणी ॥ १७
यत्पूर्वजें मिळविलें गांव जहागिर प्रभूरतें बरवें ।
सन्मति स्वभूमिप्रेमा देअुनि तारा समस्त ते बरवे[१६] ॥ १८
होती सुभगा भारति देवी स्वातंत्र्यशालु वापरित ।
त्याच्याच चिंधड्या ह्या अभिमानें जपुनि ठेविं त्या त्वरित ॥ १९
कोणे काळीं धाडिल प्रभु कोणी तुणविणार[१७] कुशल जरी ।
अुपयोगी ह्या पडतिल जरि जपुनि सतेज ठेवुं त्यांस तरी ॥ २०
अपसांतिल कलह मिटो, निष्कारण व्यर्थ डौल समुळ तुटो ।
विघ्नांचे अूर फुटो, सत्कुल हें कीर्तिसंपदेस लुटो ॥ २१
तव भक्त शुद्ध बरवे[१८] श्रीगंगे साप्त तार भाअू ते ।
भवसर्पदंशनाशक प्रभुभक्ति बरा अुतार भाअू[१९] ते ॥ २२
ते रामभाअु बरवे संरक्षी पत्निसहित सकलांना ।
प्रिय दामोदर त्यांचा वाटो सुखकर निवास सु–कलांना ॥ २३
जननी, सकलत्र तशा दादांना प्रेमदृष्टिनें पाळा ।
यश विभव तयां द्यावें रक्षावें गानकुशल गोपाळा ॥ २४
होवो गणपति तो कुलदीपक पावोनि अुत्तमा शिक्षा ।
दे माते, त्या संतत देशोद्धारार्थ योग्यशी दीक्षा ॥ २५
सुज्ञ सुशिक्षित नाना तद्‌बंधु विनायकासि रक्षावें ।
भक्षावें किल्मिष; तिहिं देशहितातें सदैव लक्षावें ॥ २६
पात्र करावें गंगे, सद्गतिदानार्थ बापुंना साचें ।
मुक्त करीं सदये कीं भयकर बहु पाप ना पुन्हा सांचे ॥ २७
ख्यात पित्यासम केशव सुधि हरि गोपाळ बाळ भागवत ।
राहो सुदृढ सुविद्यारत देशहितार्थ दक्ष भागवत ॥ २८
चिंताकानन जाळुन अण्णांना जननि गे सदा शिव दे ।
कर दीर्घायु यशस्वी साप्त तयां दास हें पदाशि वदे ॥ २९
मजला मम सन्मित्रां संरक्षा वासुदेव तात्यांना[२०] ।
मजसम वरदा व्हावी सद्विद्या आशु देवता त्यांना ॥ ३०

---

15 होवोत.

16 बरवे – हे कोठूरचे जहागिरदार. पेशव्यांशी यांचे व्याहीपणाचे संबंध झालेले असून यांचे पूर्वज दिल्लीपर्यंत अधिकारी पदावर येत असत.

17 फाटलेल्या वस्त्रांत सुतें भरून तें पूर्ववत धड करणारा. यात जहागिरी संघटित करणारा कोणी निघाल्यास स्वातंत्र्यसंपादनास अुपयोगी पडतील हा भाव

18 मानोत.

19 अण्णाराव बर्वे – कोठूरचे बाणेदार वृद्ध जहागीरदार. यांच्या अेकुलत्या अेक चिरंजीवास नि पुतण्यास पुढे कटाचे आरोपावरून शिक्षा झाल्या. पण हे डगमगले नाहीत.

20 मानोत

दे वर अम्हां असा कीं ह्या हस्तें देश–शत्रु दंडावे ।
अुद्धार त्रिवर्गसवें तो आधिं असें कीं अम्हीं न तंडावें ।। ३१
सन्मित्र लखपती तो बलवंतहि[२१] नित्य सुपथगमनिं सजो ।
विद्यालंकृत होअुन पंचकडी मिळुन 'रामहरिस'[२२] भजो ।। ३२
देशयशाचे वर्धक सांप्रत अति दीन क्षेत्रकार सदा ।
होवोत धान्य वृष अिंहिं संपन्न असो प्रसन्न त्या रसदा ।। ३३
वाणी सुतार गवळी लिंगाअित भिल्ल आणि येसकर ।
तव दरबार अभेदचि तार सकल तूं जगांत येश कर ।। ३४
विमले, सदये, आअी, नामसुधे, वकिलि शिशुकृता सरली ।
यश दे सुकल्पना मम, कमलें तव जलिं, तरंगसम विरली ।। ३५

– कोटूर, १९००

---

21 अण्णाराव बरव्यांचे अेकुलते अेक चिरंजीव

22 अभिनव भारत या गुप्तसंस्थेचें पहिलें अेक टोपणनांव 'रामहरी' हें असे. ही गोदेस केलेली प्रार्थना योगायोगाने पुढे सफल झाली ! अभिनव भारतावर पुढे सन १९१० मध्ये निरनिराळे खटले अिंग्रजांनी भरले तेव्हा ह्या बरवे कुटुंबावरही संकट कोसळलें. सावरकरांनी त्यांच्या ज्या बालमित्रास कोटूरला ह्या वेळच्या निवासांत शपथा दिलेल्या होत्या त्यांपैकी वर अुल्लिखिलेले तात्या ह्यांना बाँबच्या पुस्तिका वाटल्याविषयी २ वर्षे बंदिवासाची शिक्षा झाली. तेथून सुटताच ते प्लेगने वारले. तरुण बळवंतराव बरवे यांना नि विनायक बरवे यांस अभिनव भारत कटाच्या खटल्यात गोवण्यात आले. बळवंतरावांना दोन वर्षे शिक्षा झाली नि 'विनायका'ला सोडून दिले गेले. तेच पुढे धुळ्याला विधिज्ञ नि समाजसुधारक म्हणून ख्याति पावले. स्वतः वृद्ध जहागिरदार अण्णाराव यांनीही त्यांच्या विहिरीत कटवाल्यांची शस्त्रास्त्रें सापडली म्हणून अटक झाली. त्यांची जहागिरीहि राजहृत झाली ! त्या संकटातच त्यांचा अंत झाला.

## २३. माझें अरति– आर्जव (माझी नम्र तक्रार)

(कै. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचे निधन १६ जानेवारी १९०१ ह्या दिनीं झाले त्यानंतर त्यांच्या मृत्युसंबंधी सुचलेले विचार)

॥ पृथ्वी ॥

अहो बहुत मातला यम स्वतंत्र का जाहला ? ।
वरिष्ठ अधिकारि का कुणि न यावरी राहिला ? ॥
न दंडिसि अुदंड का अजुनि दांडग्याला अशा ? ।
खलास स्वबलोद्धता, सदय सर्वसत्ताधिशा ॥ १ ॥
जुलूम करिती तुझ्या पदरचे जरी नौकर ।
जरी न बडतर्फ ह्या करिन दंडुनी त्वत्कर ॥
तरी न बहु दोष ह्या सकळ मर्त्य राजाप्रती ।
वृथाच आम्हि निंदतों बहु कजाग त्या संप्रती ॥ २ ॥
असेंहि म्हणशील की हननकार्यकर्ता, मना ।
निसर्गनियमेंचि तो गमत दुष्ट साऱ्या जनां ॥
कळे, न टळतें प्रभो! मरण सृष्टवस्तूंस तें ।
विशेष परि वक्रता भरतभूवरी भासते ॥ ३ ॥
शताब्दिं गिळिली प्रभो! कितिक कोंवळीं बालकें ।
किती तरुण भक्षिले! किति कवी । किती बोलके ॥
गुरेंहि न अुरों दिली! अहह हा अधाशी किती ।
खळें छळुनि सोडली भरतभूमिका संप्रती ॥ ४ ॥
हरी अहह आमच्या गुणनिधान त्या माधवा ।
जनकृतिनियामकीं अुचित क्रौर्य का माधवा ?
गणोनि कृतमंतुला बहुत दंडतो हा आम्हा ।
स्वयें असुनि चोरटा, नचि जुमानितो तो तुम्हां ॥ ५ ॥
शके न सुबलान्विता जनपदा छलाया खल ।
हताश जन गांजुनी मिरवि भ्याड जेथे बल ॥
अहा ठकविलें, कले! विभवशौर्यशाली जनां ।
हरोनि विजया तरी चुकत हीहि मत्कल्पना ॥ ६ ॥
गताब्दि पशु मानवें गिळुनि काय हा जेविला ।
रमेश मुखशुद्धिला रुचिर जांब की सेविला ॥
लवंग विजया भली चरचरोनियां चाविली ।
खलास, प्रभु! पाहिजे तव गदा तुवां दाविली ॥ ७ ॥
जगत्रय थरारतें बधुनि यत्प्रतापांप्रती ।
नयत्व अनयासही वदवि तें जनीं संप्रती ॥
ढिले करुनि टाकिलें प्रबल आंग्लबाहू असे ।
यमा नियमिण्या जगीं नच समर्थ कोणी दिसे ॥ ८ ॥
अधी निपजती किती झटति देशकार्यी असे ।
तशांत परतंत्रता जखिणिनें पुरे भारिलें ॥
अशा छळुनियां यमा मिळत काय कीर्ती जनां ।

स्वतुल्य गडि आढळे तरिच मर्द दे सामना ॥ ९ ॥
अर्धी जनहताश हे विगत वैभवें पोळले ।
तशांत सम कोणिही विबुध माधवाच्या नसे ॥
म्हणोनी रडतों प्रभू! न बहु न्यायमूर्तीस्तव।
स्वभक्त-जनकामदा विफल हो न माझा स्तव ॥ १० ॥
स्वदेशहितसाधका जनन हें असो सर्वदा ।
खुशाल मग मारवीं यमकरें अगा सर्वदा ॥
तसेच नृपती सुधी सतत शोभवो ही मही ।
जगत्रय प्रभो! असो सफल नम्र तक्रार ही ॥ ११ ॥

(१९०१)

# २४. पवनलीला

(परिचय : ही कविता नाशिक येथील गोदावरीच्या महिलांच्या घाटावरील पवनलीलांवर रचली आहे.)

(श्लोक)

(वृत्त : वसंततिलका)

होतों पहात बसलों सुवयस्य वाट ।
राजे पुढें युवति–युक्त सुरम्य घाट ॥
तों सूटला सुरभि दक्षिण मंदवात ।
मद्दृष्टिचेसह घुसे युवतीजनांत ॥ १ ॥

(अिंद्रवज्रा – अुपेंद्रवज्रा)

लज्जीत पाहोनि मुखास अिंदू ।
तीं कर्ण मोत्यें मुखधर्म–बिंदू ॥
अशी धुवी वस्त्र सुशोभनास्या ।
ज्योत्स्नेसमा हांसत मंद हास्या ॥ २ ॥
धर्मांचिया सुंदर बिंदु–पंक्ती ।
भालावरी निश्चल शोभताती ॥
दे चालना वायु जअीं तयांसी ।
बिंदीच वाटे डुलते मनासी ॥ ३ ॥
सौंदर्य खाणीवरली भुजंगी ।
वेणी, मणी पुष्पचि रक्तरंगी ॥
शंकोनि वायू भिअुनी पळाला ।
निर्जीव मागोनि बघोनि ठेला ॥ ४ ॥
ओलें सुटे, फांकत देहकान्ति ।
कोणी सती नेसत वस्त्र होती ॥
वाहूनि नेण्या वसनासि तीच्या ।
सदंबराला शिवला सतीच्या ॥ ५ ॥
कोपें भरे, धाष्टर्य बघोनि साची ।
ज्वालाचि कीं कोपहुताशनाची ॥
जअीं तया तीव्र कटाक्ष मारी ।
जाळील वाटे जगतीच सारी ॥ ६ ॥
वायू थरारे, भयभीत तीच्या ।
लागे पदाब्जासि महासतीच्या ॥
सवेंचि तो थोर जवें पळाला ।
''विनायकाचा'' हि वयस्य आला ॥ ७ ॥

– नाशिक, १९०१

# २५. मंगलाचरण

(आर्या – गीति)

निर्मुनियां ब्रह्मांडे शतकोटी भरुनि त्यांत अुरणारा ।
भूजल– तेजादिक ह्या तत्वांचे आद्यजनन करणारा ॥ १ ॥
शीर्षें सहस्त्र ज्याला अगणित मुखनयनहस्त याहि जया ।
दावियलें यद्‌रूपा यदुपतिनें स्वरिपुशीर्षपाद जया ॥ २ ॥
तर्क्य न योगींद्राहीं, गम्य न मुक्तांसही गमावा तो ।
शतकोटी विश्वाच्या अवकाशींही पुरा नमावा तो ॥ ३ ॥
ज्याला गति छंदोबद्‌ध ऋचा जपुनि वेद चार सदा ।
ज्याच्या वरप्रसादें स्त्रवते धनधान्यकंद फलरस हा ॥ ४ ॥
श्रीमद्‌व्यासें केली यत्स्तवनाला पुराणग्रंथकला ।
अठरांदा गाअुनिही यद्‌महिमा पूर्ण नेणतां थकला ॥ ५ ॥
ना आकृति स्वयें परि स्वेच्छेस्तव जो अनंतरूपाने ।
नटला झाला आपण सर्वचि तृणधान्यनीलरूपानें ॥ ६ ॥
ज्याला मुकुंद कोणी कोणि घनश्याम राम मानावें ।
मानावें शिव माधव कोणी केव्हां कसेंहि ज्या गावे ॥ ७ ॥
त्या शुद्ध स्वयंप्रज्ञा अव्यक्ता नित्य स्वात्मलीनातें ।
नमितों कीं पूत करो! मातें अज्ञानतम– मलीनातें ॥ ८ ॥
वंदुनि त्या जगदीशा वाचकवृंदा नमी अनंत रहा ।
सदयानों ओशकृपाकीर्तिस्वरूपें तुम्ही अनंत रहा ॥ ९ ॥
अब्दवरी जी केली सेवा अपुली स्वशक्तिच्या मानें ।
मानुनि घ्यावी तुम्ही सभ्यांनी सर्व तीस प्रेमानें ॥ १० ॥
चुकलो असेन कोठे अंतरलोंही असेन सेवेला ।
व्हावी क्षमा तयाची क्षमण्या संता नसे मुळीं वेला ॥ ११ ॥
'गणपति' ला 'श्रीकृष्णा' 'मोहिनिराजा'स 'विश्वनाथा'ला ।
माझ्या लेखकवृंदा शिव दे मागेन विश्वनाथाला ॥ १२ ॥
पुनरपि निर्मलहृदये वाचकवृंदासि हें असो नमन ।
सेवेपासुनि ज्यांच्या सत्यचि ढळलें कदापि हें न मन ॥ १३ ॥
ठेवी लेखनिला ह्या विनवुनि शिवार्थची विनायक तो ॥
नायक तो जगताचा भक्त स्तवनासि मुदित आयकतो ॥ १४ ॥

## २६. केरळकोकिळकारांचें स्वागत

(परिचय : नाशिक येथें त्यावेळी नुकत्याच स्थापन झालेल्या मित्रमेळा संस्थेस भेट देण्यास केरळकोकिळचे संपादक येणार होते. त्यावेळी विनायकरावांनी रचलेले श्लोक.)

(शार्दूलविक्रीडित)

श्रीमच्छंभुशिरावरी विलसते गोदावरी सर्वदा ।
पापक्षालनकाम, सन्मुनिवरें जी वेष्टितां सर्वदा ।।
धांवे श्रेष्ठपदस्थिता परि धुवूं नीचांग गंगासती ।
श्रेष्ठा मूर्ति तुझी अम्हांस्तव अिथें येतां तशी भासती ।। १
होती नांदत कीर्तिदेवि तुजला सेवूनि अत्यादरें ।
श्रीगीताजननी[23] तुझी तव गृहा येतां त्वरें त्या दरें ।।
सासूचा छळ आठवोनि निसटे गेली पळोनी दुरी ।
माझ्या कर्णपथें असें कळविण्या धैर्यासि जिव्हा करी ।। २
श्रीराजा शिव घोर शत्रुदमनीं दादा भरारी भले ।
स्तोत्रें त्वद्रचितें तयांवरिल, जे दैवें अम्हां लाभले ।।
ही जिव्हा जपते तसे निशिदिनीं हे कर्ण नादावले ।
दृष्टी ही न चळे हिला अुगिच म्यां त्वद्दर्शना दाबलें ।। ३
बिंदूंचे बनतें तळें हृदयिं या सृष्टिक्रमातें धरा ।
हिंदू जे असतील सर्व मिळुनी अेकी करा रे करा ।।
निंदूनी जनघातकारक सुखा देशाभिमाना वरा ।
शुक्लेंदूज्ज्वल वर्धमान यश हो विज्ञापना अीश्वरा ।। ४
या या राष्ट्रहितार्थ नित्य झटुनी कर्तव्यकर्मा स्मरा ।
द्याया शासन यां परांस बुध हो मानेल विश्वंभरा ।।
वायां सोडुनि वाद, संघ करुनी रे अुद्धरूं ही धरा ।
द्याया सिद्धिस अुच्च हेतुस अशा ही[24] जन्मली सुंदरा ।। ५
आजी येअुनियां अमूल्य अपुल्या वेळांत आम्हांवरी ।
त्वां जी केलिस सत्य ती अुपकृती विज्ञापना ही वरी ।।
पाजीं ह्या तरुणांस बोध सुरसा दोषांसही सांवरीं ।
गाजी तूं कर गा दया त्यजुनियां रोषास दासांवरी ।। ६

– नाशिक, १९०१

---

[23] केरळकोकिळकारांच्या सर्व कवितांहून त्यांनी केलेल्या गीतेवरील श्लोकांनी त्यांची कीर्ती फार वाढली.

[24] ही मित्रमेळा संस्था; हिचे अुद्देश श्लोक क्र. ४ नि ५ ह्या दोन श्लोकांत निर्देशिले आहेत.

## २७. वृषोक्ति

(परिचय : जव्हारला जातांना लागणाऱ्या घाटांत सुचलेले विचार या कवितेंत मांडले आहेत. ही कविता 'काळ'मध्ये छापली होती.)

(शार्दूलविक्रीडित)

गाडीला वृष जुंपिला धरित जो जूं थोर मानेवरी ।
आला अुंच चढून घाट दमला गेला अवांका तरी ॥
होता वाहुन नेत वाहन तअीं तो मंदचारी तया ।
कोणी हिंदु वदे सगर्व हृदयें धिक्कारवाणीस ह्या ॥ १ ॥
हा धिक् रे वृष, मान वांकवुनियां तूं दाससा राबशी ।
मोठे जूं जड हें असह्य भर हा विश्रांतिही ना तशी ॥
तोंडी ये बहु फेंस त्राण नुरला मारी धनी हा तरी ।
वाटे पापचि मूर्तिमंत वृष रे त्वज्जन्म हा अंतरी ॥ २ ॥
अैके तो वृष शांतिनें सकल हे अुद्गार त्याचे असे ।
दावोनी स्मित मंद ज्यांत बहुधा धिक्कार भारी वसे ॥
बोले हिंदुसि त्या अरे मज बहू निंदावचें ताडिलें ।
ठावी त्वत्स्थिति अल्पही न तुजला हें म्यां मनीं ताडिलें ॥ ३ ॥
निंदाव्यंजक शब्द योजुनि बहू माझ्या धन्या निंदसी ।
कैसा वागवितो तुला तव धनी हें अल्प ना पाहसी ॥
घेतो काम परंतु देत मजसी खायासि माझा धनी ।
मूढा वेतन काय दे तव धनी शोधोनि पाहें मनीं ॥ ४ ॥
ज्यातें राज्य अफाट आर्यवसुधा तैसी जया अर्पिली ।
दोहायास सुवर्णभू सतत त्वां हस्तें जयाला दिली ॥
लोखंडी असतांहि कांचनमया केलीस यद्भू अरे ।
तो देअी तुज काय वेतन तुझा स्वामी कथीं सत्वरें ॥ ५ ॥
किंवा तू म्हणशील कीं तव धनी आभार भारी वदे ।
राजे रावबहादुरादिक तुला मोठ्या किताबांसि दे ॥
अैसे शुष्क किताब घेअुनि तुवां स्वातंत्र्यसंपत् दिली ।
हा हा ! गर्दभ घेअुनी सुरभिला वेड्या कशी अर्पिली ॥ ६ ॥
'जे.पी.' बैल तसे महावृषभ 'सी.एस.आय.' नंदी अशा ।
देअीना पदव्या मला मम धनी नाना जरी शुष्कशा ॥
देतो नित्य तृणास गार हिरव्या खाया, पिण्यातें जला ।
नाहीं घेत मिठावरी कर, नसे मी धन्य का आजला ॥ ७ ॥
भारी दावुनियां दया हिणविसी कीं थोर जूं मी धरी ।
अंधा पाहसि ना परंतु अपुल्या जें काय मानेवरी ॥
आहे जें जड फार भूमिवरल्या साऱ्या नगांहूनि तें ।
गर्वे अुद्धतशा तुझ्याहिवर तें रे एक जूं राहतें ॥ ८ ॥
नक्षत्रांहुनिही असंख्य वसती अन्याय ज्या अंतरीं ।
जाळी जें ज्वलनाहुनी यमपुरी ज्याहूनि आहे बरी ॥
नाशाचा जबडाचि कीं अवदशा माहेर ज्या मानितें ।

देती ज्याप्रति 'पारतंत्र्य' अभिधा जूं वाहसी हाय तें ।। ९ ।।
माता आर्यवसुंधरा पर तुझ्या डोळ्यांपुढे भोगिती ।
दारिद्र्यासह पारतंत्र्य दुबळ्या मानेवरी लादती ।।
तेव्हां येअुनि मानवी तनुस बा तूं साधिलें काय तें ।
भूभारापरि गर्वभार अजुनी त्वच्चित्त कां वाहतें ? ।। १० ।।
तूं निःशस्त्र परंतु मी न अजुनी निःशृंग झालों तरी ।
स्वशृंगे तुज फाडितो, बघ गड्या सोडोनि देतो परी ।।
सोडीं गर्व स्वदेशभार हरण्या यत्नांसि आधीं करी ।
होई अीशपदी सुलीन पुरवी सद्धेतुला श्रीहरी ।। ११ ।।

– जव्हार, १९०१

## २८. श्रीशिवाजीमहाराजांची आरती

(परिचय : फर्ग्युसन महाविद्यालयांतील ''आर्यन संघ'' नांवाच्या चौथ्या भोजनसंघामध्ये प्रत्येक आठवड्यास म्हणण्यासाठी ही आरती रचली.)

(चाल – आरतीची)

जयदेव जयदेव जय जय शिवराया
या या अनन्यशरणा आर्यां ताराया ॥ ध्रु. ॥
आर्यांच्या देशावरि म्लेंच्छांचा घाला
आला आला सावध हो शिवभूपाला!
सद्गदिता भूमाता दे तुज हांकेला
करुणारव भेदुनि तव हृदय न कां गेला? १
श्रीजगदंबा जीस्तव शुंभादिक भक्षी
दशमुख मर्दुनि जी श्रीरघुवर संरक्षी
ती पूता भूमाता म्लेंच्छांही छळतां
तुजविण तिज शिवराया कोण दुजा त्राता? २
त्रस्त अम्ही दीन अम्ही शरण तुला आलों
परवशतेच्या पाशीं मरणोन्मुख झालों
साधु परित्राणाया दुष्कृति नाशाया
भगवन् भगवद्गीता सार्थ कराया या ३
अैकुनियां आर्यांचा धांवा महिवरला
करुणोक्तें स्वर्गी श्रीशिवनृप गहिंवरला
देशास्तव शिवनेरीं घेअी देहाला
देशास्तव रायगडीं ठेवी देहाला
देशस्वातंत्र्याचा दाता जो झाला
बोला तत्श्रीमत्शिवनृप की जय बोला ४

– पुणे, १९०२

# २९. विश्वांत आजवरि शाश्वत काय झालें ?

(परिचय : खालील कविता 'आर्यन वीक्ली'साठी प्रथम रचली. नंतर 'काळ' पत्रांतही प्रसिद्ध झाली.)

(वसंततिलका)

पौर्वात्य खंड अवघें जित यत्प्रपातें ।
दारिद्य आणि भय कांपति ज्या प्रतापें ॥
नाशासि पारसिक[२५] तेहि पलांत गेले ।
विश्वांत आजवरि शाश्वत काय झालें ॥ १ ॥
ते जिंकि पारसिक, दे जगता दरातें, ।
जें दिग्जयी बल तुझेंहि शिकंदरा, तें ॥
ध्वंसीत रोम[२६] तव राजपुरी रिघालें ।
विश्वांत आजवरि शाश्वत काय झालें ? ॥ २ ॥
साम्राज्य विस्तृत अनंत असेंचि साचें ।
त्याही महाप्रथित रोमकपत्तनाचें ॥
हूणें[२७] हणोनि घण चूर्णविचूर्ण केलें ।
विश्वांत आजवरि शाश्वत काय झालें ? ॥ ३ ॥
हा अुन्नती–अवनतीस समुद्र जातो ।
भास्वान् रवीहि अुदयास्त अखंड घेतो ॥
अुत्कर्ष आणि अपकर्ष समान ठेले ।
विश्वांत आजवरि शाश्वत काय झालें ? ॥ ४ ॥
जे मत्त फारचि बलान्वित गर्ववाही ।
अुद्विग्न मानस अुदासहि जे तयांहीं ॥
हें पाहिजे स्वमनिं संतत चिंतियेलें ।
विश्वांत आजवरि शाश्वत काय झालें ? ॥ ५ ॥

– पुणें, १९०२

---

[25] पारसिक– अिराणी पारसिकांचे पहिले प्रबळ साम्राज्य. ते सिकंदराने जिंकले.

[26] त्या शिकंदराचें साम्राज्यकेंद्र जो ग्रीस देश तोही काही कालांतराने रोमन लोकांनी पादाक्रांत केला.

[27] त्या रोमन साम्राज्यानेही शेकडो वर्षे अजिंक्य जेते म्हणून सत्ता गाजविल्यानंतर अगदी रानवट वाटणाऱ्या 'हूण' लोकांनी ते पादाक्रांत करुन त्याचेही तुकडे तुकडे करून टाकले.

# ३०. बालविधवा–दुःस्थितिकथन

(परिचय : मुंबअीच्या हिंदु युनिअन क्लबाच्या हेमंत व्याख्यानमाला समितीनें खालीं दिलेल्या विषयावरच्या अुत्तम कवितेस २० रुपयांचे पारितोषिक देअूं केलें होतें. त्या स्पर्धेसाठी ज्या अनेक कविता समितीकडे आल्या, त्यांपैकी रा. श्रीपाद नारायण मुजुमदार, बी.ए. आणि रा. विनायक दामोदर सावरकर ह्यांच्या कविता समितीस बहुतेक समान योग्यतेच्या वाटल्यावरून, मूळ रकमेंत आणखी १० रुपयांची भर घालून त्यांस प्रत्येकी पंधरा पंधरा रुपयांचें पारितोषिक देण्यांत आलें.)

विषय : ''प्रस्तुत सुरू असलेल्या ग्रांथिक सन्निपातानें ज्या हिंदु स्त्रियांवर अल्प वयांत वैधव्याचा घाला पडला आहे, त्यांच्या स्थितीचें वर्णन करून, त्यांचें दुःख कमी करावयासाठी अुपाय योजण्यास झटावें, अशी नव्या नि जुन्या मतांच्या लोकांस कवीनें प्रोत्साहनपर विनंति करणे.'' सावरकरांची आर्या रचनेतील प्रगति नि सामाजिक मतांतील अुदारता ह्या कवितेतून ध्यानी येते.)

(आर्या)

पाया परवशता ज्या, दुष्काळाच्या शिलांहि जो रचिला, ।
अवनति–कृतांत–केलि–प्रासादा प्लेग कळस त्या खचिला ॥ १ ॥
नंदनवनसम मोहक सृष्टीचा सारभूत हा देश ।
हो दृष्टि धन्य पाहुनि, धरुनि असा प्लेग हृदयिं अुद्देश ॥ २ ॥
आर्यावर्ती आला, मुंबअिला ठेविलें मग पदाला; ।
झाला अंत सुखाचा, ये अूत अनंतवक्त्र–विपदांला ॥ ३ ॥
जी अैकिली तयाहुनि शतपट अधिकाचि सुरुचिता धन्या ।
पाहुनि भुलला खुलला; वदला : मोहक न भू अशी अन्या ॥ ४ ॥
नाना–स्थल–स्थिता श्री अवलोकुनि नित्य मी नवीनवि ते ।
येथ बसेन प्रत्यहिं सृष्टि रुचीला जिथें नवीन विते ॥ ५ ॥
केला निश्चय अैसा, कुरवाळुनि मुंबई भयाण करीं ।
हो धिग् न निज जिणें तें, यास्तव बघण्या पुणें प्रयाण करी ॥ ६ ॥
गोदास्नानास्तव करि श्रीमत्त्र्यंबकपुरीस गमनाला; ।
आला पंचवटीला तेथुनियां रामराय–नमनाला ॥ ७ ॥
बहु काय वदों ? केलें अेक्या अब्दांत देशपर्यटना ।
पवनाहुनि जवन, नची दमला हा कीं विचित्र विधिघटना ॥ ८ ॥
प्लेग कशाचा आला ? कृतकर्माचाचि भोग अवतरला ।
कर्मायत्त फलाच्या अुपभोगावीण कोण भव तरला ? ॥ ९ ॥
केलीं भयाण नगरें, नगरासम दाट सर्व वन वसतें ।
दमले नमले गमले हतसत्त्वचि मंत्र तंत्र सुनवस ते ॥ १० ॥
लाल गुलालें आणिक ओतियलेल्या समग्र कावडिनें ।
आरक्त नगरमार्गी रक्तप्रिय नाचताति आवडिनें ॥ ११ ॥
''बोलो भाई राम'' ध्वनि हाचि दिगंत सर्व नभभर तो ।
वातावरणस्थांही प्लेगजनक काय तापभर भरतो ? ॥ १२ ॥
गृहनिर्गत हा येथें लोटचि अपशकुनसूचक धुराचा ।
येतो, तत्सह दुःसह हा स्वर कीं विरहतप्त विधुराचा ॥ १३ ॥
''हे कान्ते ! हे कान्ते ! दे ओ ! तव कान्त मारि हांकेला ।

कैसा संसाराचा जड गाडा लंगडा अहा केला ॥ १४ ॥
मी शून्यहृदय, माझी हृदयस्था देवि ती वरा गेली; ।
क्षण थांब सखे, येतों हां होअूं नको अतीव रागेली'' ॥ १५ ॥
तैसा ये कोमलसा कोणाचा येथ रोदनस्वर हा ? ।
हां कळलें; मंद रवें रडतो कुणि अेक बाल भास्वर हा ॥ १६ ॥
''बाबा, आअी गेली टाकुनियां काल, तों तुम्ही मजला ।
आजचि ह्या बालाला त्यजुनीयां जावयासि कां सजलां ॥ १७ ॥
किंवा गेलास तिला परलोकी सोबतीस ? सांग मला ।
परि बाबा, संसाराक्रमणा शिशु हा समर्थ कां गमला ?'' ॥ १८ ॥
परि हाय ! हृदयदाही मंजुळरवसंघ थोर हंबरडे ।
येताति कुठोनी हे ? कीं हा पुरदेवताकदंब रडे ? ॥ १९ ॥
''मत्सौभाग्यश्री–पति, मत्प्रिय, मज्जीव, मीनकासारा ! ।
आटविला अेकाकीं प्रीतीचा धवल ओघ कां सारा ? ॥ २० ॥
कां द्या ना प्रत्युत्तर ? कां केला आज हा असा रुसवा ? ।
भ्यालें मी; द्या रमणा धीर मना अंकिं अेकदां बसवा ॥ २१ ॥
अुपभोग भोगिला नच संवत्सरही अहो नितांत पुरा ।
सजणा ! सजलासि कसा जायाला अेकला कृतांतपुरा ? ॥ २२ ॥
जे आपण घालविले प्रेमाच्या चंद्रिका–करें भरले ।
आठवती का ते दिन जे निमिषार्धात वाटती सरले ? ॥ २३ ॥
मी अेकटीच असतां आपण भिववावया मला आलां ।
पाअुल चुकुनी वाजुनि म्यां बहु अुपहास आपुला केला ॥ २४ ॥
तो डाव धरोनी का मौन वरा घाबरी करायाला ? ।
भ्यालें मी, हांसेन न माझ्या आतां बरीक रायाला ॥ २५ ॥
पोटीं राग नसोनिहि अुगिच अबोले कितीकदां व्हावे; ।
अुभयांसही न कळतां कैसें तत्काल बोलुं लागावें ॥ २६ ॥
क्षुल्लकशा मानास्तव कोपें क्षणिकें रुसोनियां बसलों, ।
दृष्टीस दृष्टि मिळतां हेतुव्यतिरिक्त अुभयही हंसलों ॥ २७ ॥
हें सर्व आठवे का ? देतें तत्स्मरण काय मोद मना ? ।
कां प्रत्युत्तर द्या ना प्रिय अबलाहृदयभीतिचे दमना ? ॥ २८ ॥
तरि काय कान्त गेले ? मणिमंगळसूत्र काय मम तुटलें ? ।
नष्टा दैवा, तडकुनि केंवि तथापी न हृदय हें फुटलें ? ॥ २९ ॥
जो मम संकट वारिल अैशाला शरण मी कुणा जाअूं ? ।
जाअुनियां ह्या फुटक्या नष्ट कपाळासि केंवि मम दावूं ? ॥ ३० ॥
जातां नाथ स्त्रीचा ती गाअीहूनि गाय मानावें, ।
सुटका अबलांची त्या करण्या घेसी न कां यमा नांवें ? ॥ ३१ ॥
बंधू ना, बांधव ना, ना मातापितर ज्या अभागीतें ।
त्या माझीं दुःखाची प्रभुजी ! पोंचति न का नभा गीतें ? ॥ ३२ ॥
मी अल्पवयी बाला, माझा सौभाग्यनिधि अहा जळला ।
वैधव्याचा दुर्धर भयंकर गिरि हा प्रचंड कोसळला ॥ ३३ ॥
काय करूं ? जाअुं कुठें ? हो माझे आप्तसोयरे सारे ।

तारा अनाथ बाला, छळ बघतां स्वस्थ बैसुनी कां रे ? ॥ ३४ ॥
देतें का कोणी ओ अबलेच्या ह्या मदीय हांकेला ? ।
बोला हो, बोला हो, धीराचा शब्द अेक तरि बोला ॥ ३५ ॥
छे ! कोण देत बसतो अबलेच्या कर्मकहाणिस मान ।
स्वसुखांत मग्न जन हे लेखिति परदुःख कस्पटसमान ॥ ३६ ॥
बांधव हो ! परिसतसां का हे दुःखार्त बालिकाबोल ? ।
गमताति सत्य किंवा भासति तुम्हांसि सर्व ते फोल ? ॥ ३७ ॥
क्षणभर तरि सदय मनें शांतीनें सर्वही विचार करा ।
अंधत्व हट्टहि पुरे, न्यायाचा हो अितःपर न विकरा ॥ ३८ ॥
आला प्लेग तयाचें ठरवायासी निदान धडपडलों ।
कांहीं नचि ये हातां, केवल अतट प्रपात न धड पडलों ॥ ३९ ॥
'अिन्स्पेक्शन्' 'डिस्‌अिन्फेक्शन्' अैशीं शेंकडों 'शनें' अुठलीं ।
हटवायातें ह्याला परि बापुडिं सर्व आपणचि हटलीं ॥ ४० ॥
परि ह्या पराजयाचा दोष नसे तिळहि आपुल्यावरतीं ।
''यत्ने कृते न सिद्ध्यति को दोषो'' तत्त्व संत हें वदती ॥ ४१ ॥
परि ज्या कोमल बालांवरती वैधव्य–दुःख कोसळलें ।
विरहाग्नीनें प्रखरें आमस्तकपाद देहही जळले ॥ ४२ ॥
वैधव्य जनक त्यांच्या दुःसह दुःखासि शमन करवाया ।
खर्चियलें का अल्पहि सत्कर्मी सदय सुमन कर वा या ? ॥ ४३ ॥
तद्दुःस्थिती अडवाया ''अिन्स्पेक्शन्'' कोणचें अुभारितसां ? ।
त्यांच्या दुर्दैवाला कवण्या मंत्रेंकरूनि भारितसां ? ॥ ४४ ॥
गरिब बिचाऱ्या बाला आधीं अबला, अनाथ त्यावरती ।
हाय ! तिरस्कृत होती निष्कारण लौकिकांत बावरती ॥ ४५ ॥
जातां पती अकालीं बालेला शून्य दशदिशा होती ।
माहेरीं श्री नसली, पुसतां मग काय ते दशा हो ती ॥ ४६ ॥
पायगुणाची आली भक्षायालाचि अेकदां पतितें ।
खरतर शब्दशरानें दीर नणंदा अनेक दापति ते ॥ ४७ ॥
प्रेमानें बोलविण्या 'क्षण माझ्या आज बाअि ओका या' ।
नाहीं कोणी अुरलें मायेचें दुःख कांहिं ओकाया ॥ ४८ ॥
युवती बरोबरीच्या पतिसह करिती विलास हांसति तें ।
पाहुनि, विरहज्वाला अधिकाधिक जाळि, दुःसहा सतितें ॥ ४९ ॥
चुकवी संतत वदना लज्जायोगें जनांसि दावाया ।
कंठी आयुष्यातें धरुनी जीवा मनासि दावाया ॥ ५० ॥
नेत्र जलें डबडबले, कोमल मृदु गाल जाहले ओले ।
गेले खोल कपोलहि, क्षयसूचक पांडुरत्व बहु आलें ॥ ५१ ॥
स्वपतिविना स्वप्नींही परपुरुषीं नाहिं नेत्र जोडियले ।
जीनें पतिनिधनास्तव सोडियले भोग हार तोडियले ॥ ५२ ॥
शय्या भूमि निजाया, अशन अहोरात्रिं अेक लागावें ।
जित काममोह असती, सतिमालाकीर्तनीं जिला गावें ॥ ५३ ॥
तन्मुख अपशकुनास्पद, शुभवदना विश्वयोषिता गणती ।

सुरभीला भेसुर ते, सौंदर्यागार गर्दभी म्हणती ! ॥ ५४ ॥
स्वस्त्रीच्या निधनोत्तर जरि होति न विधुर अशुभदर्शन ते ।
तरि विधवांवरि दुश्चिन्हांचें कां व्यर्थ ये सुदर्शन तें ? ॥ ५५ ॥
व्यर्थचि दुरुक्तवचनें द्याया विधवांचिया मना चटका ।
सजते ती न झडावी खलजिव्हा दुष्टकामना चट कां ? ॥ ५६ ॥
अिच्छिति तितके वेळां विधुरांनी षड्रसांसि भक्षावें; ।
नित्यैकभुक्त राहुनि विधवांनी परि कदन्न लक्षावें ॥ ५७ ॥
दुकुलालंकारानें विधुरजनांचें शरीर वांकावें ।
हलक्या वस्त्रें संतत विधवांनीं वपु परंतु झांकावें ॥ ५८ ॥
मांगल्यप्रद व्हावें विधुरांचें नीचशाहि वदन खरें ।
गुरु सांगे शिष्यातें : विधवेचें अशुभसेंचि पद नख रे ॥ ५९ ॥
साठीच्या जरठांनो, विधुरांनो, नव वधू खुशाल वरा ।
लग्नाच्या अष्टदिनी विधवा परि अन्य ना वरो नवरा ॥ ६० ॥
हा न्याय कोण ? कां हो विधवा–विधुरांत भेद हा असला ? ।
कसल्या अपराधाचा अबलांना क्रूर दंड हा बसला ? ॥ ६१ ॥
श्रुति काय अनुज्ञेतें देते विधवांसि अशुभ लेखाया ? ।
सांगाल काय तच्छल हा संमत होय निगमलेखा या ? ॥ ६२ ॥
किंवा स्मृति हे कथिती ? किंवा दे धर्मशास्त्र संमतिला ? ।
सदसद्विचारपूर्वक किंवा हें न्याय्य गमतसे मतिला ? ॥ ६३ ॥
पत्निनिधन विधुराचा सामाजिक हक्क नाश करिना तें ।
स्त्रीचें समाज–संमत पतिनिधनें नष्ट कां तरी नातें ? ॥ ६४ ॥
अस्मत्समाज वर्ते क्रौर्ये जरि ना तथापि अन्यायें ।
विधवांशी अितुक्या कीं कींव तयांची परस्थ अन्यां ये ॥ ६५ ॥
लज्जास्पद आम्हां परि सिद्ध गमे, हेंचि अन्य ना कांहीं ।
धर्मानें न्यायानें तर्कानें सद्विवेकमतिनेंही ॥ ६६ ॥
आजवरी हें पातक अन्यायाचें यथेच्छ सांचविलें ।
तत्क्षालनें सुकृत्या अजुनि तरी पाहिजेच वांचविले ॥ ६७ ॥
त्यांतहि दुर्दैवानें धाडियलें प्लेगरोगविष जहर ।
प्रत्यहिं असंख्य बाला विधवा बनती अपूर्व ये कहर ॥ ६८ ॥
ऋतुशांतीचेचि दिनीं कितिकांचें कान्तनिधन होय, किती ।
तत्पूर्वीही वैधव्याच्या वार्तेसि हंत आयकिती ॥ ६९ ॥
त्यांतहि घडतें न असें अपवादास्पद परंतु नित्यहि तें ।
ह्यासम न अन्य घातक प्लेगोत्पादक अनंत अत्यहितें ॥ ७० ॥
ज्यांच्या गृहिणी जाती, कालानें ते गृहस्थ होतात; ।
कन्यापुत्रहि लाभहि द्यायाला धीर स्वस्थ हो तात ॥ ७१ ॥
वृद्धाचा सुत गेला, स्वांकीं तो दत्तकासि घेअील ।
स्वपिता मरतां तद्विण सुत संसारीं समर्थ होअील ॥ ७२ ॥
सर्वांसि अुपाय असे शास्त्रानें वा सुरूढिनें विहित; ।
परि न दया ये अुभयां विधवांचें साधण्यास ते विहित ॥ ७३ ॥
शास्त्रें अुपेक्षिल्या त्या, छळिल्या रुढिनें तयांत शतपट हो ।

अबलांना विधवांना अजुनि तरी तारण्यास खटपट हो ॥ ७४ ॥
आतांहि जरि अुपेक्षा दुःस्थितिंतुनि त्यांसि अुद्धरायातें ।
तरि हा पातकपर्वत शक्त न होओील धरुं धरा ह्यातें ॥ ७५ ॥
वैदिक हो भिक्षुक हो अुद्धारक हो अहो सुधारक हो ।
सदय मनानें कोणी अबलांना संकटांत तारक हो ॥ ७६ ॥
अवलोकितां न पतिचें वदनहि, वैधव्य मात्र अवलोकी ।
कां तत्पुनर्विवाहा प्राप्त असो संमती न नव लोकीं ? ॥ ७७ ॥
धर्माभिमान म्हणजे कांही सुविवेकशून्यता नाहीं ।
कालस्थितिवश धर्महि आहे हें तत्त्व मान्य मान्यांही ॥ ७८ ॥
सुज्ञानें सुविचारें स्थित्यनुसारें स्वधर्म सुधरावा; ।
आपद्गतिचा धोपट मार्गचि हा हट्ट व्यर्थ न धरावा ॥ ७९ ॥
संस्थापक धर्माचे, ज्ञाते श्रुतिशास्त्रतत्त्वकर्माचे ।
आचार्यहि स्वकर्मे स्थापिति औचित्य ह्याचि मर्माचें ॥ ८० ॥
त्या गादीचे स्वामी आम्हां तत्समचि पूज्य होतात; ।
त्यांसचि विनवूं : वारा अबलांचें दुःख पूज्य हो तात ! ॥ ८१ ॥
साठीचा वृद्ध कपी नववधु तारुण्यरूपभवन वरी, ।
तेंवि न मागों आम्ही जरठा विधवाहि होओू नव नवरी ॥ ८२ ॥
परि ज्यांसि पतिसुखाची आली कांहींच कल्पनाही ना ।
त्यांच्या पुनर्विवाहा म्हणणें घेअुनि विकल्प नाही, ना ? ॥ ८३ ॥
आतांहि जरि द्याना अपुला ह्या मागणीस परवाना ।
हा प्लेग स्त्रीजाती नष्ट कराया धरील परवा ना ॥ ८४ ॥
अैसें पुसाल हांसुनि कीं स्त्रीपुरुषांसि हा समान वधी ।
स्त्रीचाचि द्रव कां हो ? जाणुं न शकणार खास मानव-धी ॥ ८५ ॥
तरि परिसा आधिं वधी पुरुषांअितुक्या स्त्रिया, परी वरि तो ।
पुरुषां मारोनि वधू त्यांच्या मेल्यासमानची करितो ॥ ८६ ॥
अैसा कहर दुहेरी प्लेग करी स्त्रीजनांवरी भारी ।
तारा त्यांसी भगवन् अबला होतील फार आभारी ॥ ८७ ॥
आपण अस्मद्धर्माचार्य असां आपुल्याविणें कांहीं ।
होणार सर्वसंमत अैशी सद्योजना न लोकांही ॥ ८८ ॥
ज्या दीन बालविधवा, द्या त्यांसि पुनर्विवाह-संमतिला ।
व्हा सदयहृदय सकृप जें होओील मान्य सत्य सत्ततिला ॥ ८९ ॥
अपमानास्पद वर्तन विधवांप्रति नित्य जें समाज करी ।
आज्ञादंड धरोनी तत्प्रतिषेधा कराचि आज करीं ॥ ९० ॥
विद्यादाना द्यावें शाला स्थापोनि प्रौढ विधवांतें ।
अज्ञान सुविद्येनें नष्टचि अभ्रे अनेकविध वातें ॥ ९१ ॥
विद्यादान स्त्रीप्रति अर्थ न परि तें अनर्थ करणार ।
वदति, सुधाप्राशक तो अमरत्व न मृत्युलाच वरणार ॥ ९२ ॥
म्हणतील सुधा-पेया, परि दैत्यां देअूं देव ना सजती ।
तरि काय मायभगिनीवर्गा ते दैत्य लेखण्या धजती ? ॥ ९३ ॥
विधवा विदुषी व्हाया स्थापूनि अनाथबालिकाश्रम ते ।

जोडा पुण्य, न होईल तुष्ट बघुनि दीन बालिका - श्रम ते ? ॥ ९४ ॥
नीतिव्यहारादिक थोरांच्या रम्य सत्कथा शिकवा ।
हंगाम ज्ञानाचा सच्छिक्षावृष्टिनें सदा पिकवा ॥ ९५ ॥
होईल सुशिक्षितसा विदुषींचा वर्ग येथ नव लोका ।
गृहशिक्षण देऊनि जो तारिल भावि प्रजेसि अवलोका ॥ ९६ ॥
तारायाला माता भगिनी लेकी स्नुषा स्वभावजया ।
होईल कोण सिद्ध न, अहा ! असे मानवी स्वभाव जया ? ॥ ९७ ॥
कुंकुमविरहित भालें युवतिजनांची असंख्य संतत तीं ।
पाहुनि लज्ञायोगें खेदें झांकोत नयन संत-तती ॥ ९८ ॥
वृद्ध तरुण नविन जुने नेमस्त जहाल लोक तरि सारे ।
व्हारे सुसज्ञ विधवा-दुःस्थितिहरणासि आजि परिसा रे ॥ ९९ ॥
सत्वर कडाड मोडा हानिद ह्या रूढिचा महा खोडा ।
तोडा दुःस्थिति-बेडी अबला तारोनि धवलयश जोडा ॥ १०० ॥
धर्मा तारायाला, अज्ञाना रूढिच्या हरायाला, ।
कालीं कालीं येवो भक्तावन अीश तो करायाला ॥ १०१ ॥
ठेवी लेखनिला हें विश्वेशा विनवुनी विनायक तो ।
नायक तो जगताचा भक्तस्तवनासि मुदित आयकतो ॥ १०२ ॥

- पुणें, १९०२

टीप : आर्या क्र. ३९चा दुसरा चरण कै. मामाराव दाते आणि कै. बाळाराव सावरकर ह्यांनी पुढीलप्रमाणे दिला आहे. कांही नचि ये हाता पडलो अुन्मळुनिया न धड पडलो ॥ आर्या क्र. ४९च्या दुसऱ्या चरणाचा पाठभेद (मायदेव संकलित ढवळे प्रकाशनाच्या सावरकरांची कवितामध्ये) असाही आढळतो. पाहुनि विरहज्वाला जाळी अधिकाचि दुःसहा सतितें ॥ हा कै. मामा दाते आणि कै. बाळाराव सावरकर ह्यांच्या समग्र सावरकर वाङ्मय साहित्य खंडांमधील कविता खंडांत आलेला पाठभेद ह्या खंडात घेतलेला आहे.

# ३१. हे सदया गणया तार

(परिचय : मेळ्यांसाठी सावरकर अनेक कवने करून देत असत. त्यांतले वानगी म्हणून हे कवन घेतले आहे. हे गोविंदकवींचे नाही. सावरकरांचेच आहे.)

(जाति : प्रतिचंद्रकान्त नि प्रचंद्रकांत)

(चाल – तूं टाक चिरूनि)

हे सदया गणया तार । तुझ्यावरि भार
तूं मायबाप आधार । तुझ्यावरि भार
किति देश–शत्रु भूतलीं
हृच्छत्रु सहाही परी
शापें वा सुशरें जाळी
तो ब्राह्मण आतां खाओ परक्या लाथांचा बा मार १
देशावरि हल्ला आला
पुरुष तो लढोनी मेला
स्त्री गिळी अग्निकाष्ठाला
रजपूत परी त्या परवशतेचें भूत पछाडी, तार २
अटकेला झेंडा नेला
रिपु–कटका फटका दिधला
दिल्लीचा स्वामी झाला
तो शूर मराठा पाहिं तयाचे खाअि न कुतरें हाल ३

– नाशिक, १९०२

## ३२. सत्संग दिवाळी

(शार्दूलविक्रीडित)

अन्यायासहि ये, जगीं जय जऔं धैर्या धरोनी तदा
जे न्यायाप्रति रक्षण्यास धजती, सोसोनिही आपदा
अैशा धन्य नराग्रणीसह घडे, आम्हाप्रती संग हा
झालो धन्य अम्ही सुनंदयुतही झाली दिवाळी पहा ॥ १ ॥

(चौथ्या क्लबच्या मंडळींच्या आग्रहावरून ५ मिनिटांत रचलेला (श्लोक)

(१०-१०-१९०२)

# ३३. स्नेहगीति पत्रिका

(मित्रवर्य श्री नागेश आपटे ह्यांना पाठविलेल्या पत्रांतील वेंचा)

हे मित्रा 'श्रीकृष्णा,' छे दाजी तरिहि मोद दे न मना ।
''मामा'' ह्याचि प्रेमळ हांकेला देत अर्पितों नमना ॥ १ ॥
जे आपण घालविलें प्रेमाच्या चंद्रिका करें भरलें ।
आठवितीका ते दिन दे निमिषार्धात वाटती सरले ॥ २ ॥
संध्यासमयी बसलों बागेंत पहात श्री तया सरुची ।
आठवते का कैसी भासलि ते सुखद अुभयांस रुची ॥ ३ ॥
विर्मासये प्रेमे केल्यासि तुझा विनोद म्यां शतदां ।
आठवते का कैसा कोपें क्षणिकें न बोललासि तदा ॥ ४ ॥
स्वज्ञानाची अुभयें करुनि कवायीत स्वाभिमत शूर ।
आठवते का कैसें विजयानंदांत जाहलो चूर ॥ ५ ॥
पोटीं राग नसोनिहि अुगिच अबोले कितीकदां व्हावे ।
अुभयांसही न कळतां कैसें तत्काल बोलु लागावे ॥ ६ ॥
क्षुल्लकशा मानास्तव कोणें क्षणिकें रुसोनियां बसलों ।
दृष्टीस दृष्टि मिळतां हेतुव्यतिरिक्त अुभयही हसलों ॥ ७ ॥
देशास्तव गांभीर्ये कारस्थानासि योजुं लागावें ।
केव्हां प्रेमे कैसें श्रीमच्छिवराजकीर्तिला गावें ॥ ८ ॥
हे सर्व आठवे का ? देतें तत्समरण काय मोद मना ।
किंवा त्याविण येते त्वत्पत्र न मजसि विरहमरद मना ॥ ९ ॥
स्मरताचि असेल सारें कैशा शकसील त्यास विसराया ।
ज्या आयुर्भागाचा लाभ घडेना बड्या बड्या रायां ॥ १० ॥
अैशा धन्य वयामाधिं विद्यालयशा सुधन्यतर स्थलिं जे ।
अीशकृपें घडलें तें मित्रत्व न काय धन्यतम साजे ॥ ११ ॥
मनभूमिकेंत परिचय–माळी मित्रत्व–वृक्ष जो लावी ॥
स्नेहजलानें पूरित घागर त्वां त्यास नित्य घालावी ॥ १२ ॥
कुशली मी, अधिकोत्तर नच, युष्मत्क्षेम तूंहि कळवावें ॥
वळवावें सच्चरिता स्वज्ञाति–सुकीर्ति–पट न मळवावे ॥ १३ ॥

(१–१२–१९०२)

## ३४. शिववीर

(परिचय : स्त्रियांनी विनंती केल्यावरून त्यांचेसाठी हे गीत रचले आहे.)

(छंद : ओवी)

(चाल : स्त्रीगीताच्या चालीवर)

यवनांचा झाला, अवनीला भार
सुंदर मंदीरें भंगीलीं पार ।।
वेद–शास्त्रें नष्टांनीं भ्रष्टविलीं सारी
गोमाता देखतां हरहर मारी ।।
ब्राह्मण मत्तांनीं लत्तांनीं हाणिला
प्रभुवर भूवर शिववीर आला ।।
अधमांसी नाशोनी देशोद्धाराला
प्रभुवर भूवर शिववीर झाला ।। १ ।।
हिंदूंच्या देशाचे बघुनीयां हाल
जगताची जननी ती जाहली लाल ।।
यवनांना क्रोधानें वधण्यासी आओ
शिवनेरीं शिवबासी जननासी देओ ।।
सुरवरां किन्नरां आनंद झाला
प्रभुवर भूवर शिववीर आला ।। २ ।।
रामा कौसल्या कीं कृष्णा यशोदा
शिवराजा जिजाओ साजे जन्मदा ।।
श्रीरामें राक्षस–हननासी केलें
यवनांना नाशीन तैसें मी बोले ।।
सुकलांनीं शशिसम तो वृद्धिंगत झाला
प्रभुवर भूवर शिववीर आला ।। ३ ।।
जयजयजी रघुवीरा, गर्जना झाली
श्रीरामदासांची मूर्ती अुदेली ।।
शिवभूपें पायीं दृढ भालाला केलें
स्वामींनी मस्तकीं हस्ता ठेवियलें ।।
देशा धर्मा तारीं, अुपदेश दीला
प्रभुवर भूवर शिववीर आला ।। ४ ।।
मातला अफजुल्ला यवनांत भारी
तुळजापुरी भंगी भवानी सारी ।।
करकर चावोनी अधरांला धावे
शिवरायाचेवरि, परि दुःखाला पावे ।।
अुदरा वीदारोनी नीचाला वधिला
प्रभुवर भूवर शिववीर आला ।। ५ ।।
स्वातंत्र्यदेवीचा गोंधळ केला
यजमानस्वामी श्रीशिवराय आला ।।
सांवळ्या रंगाचे शूर मावळे

प्रेमानें अभिमानें गोंधळी झाले ।।
पारतंत्र्याचा मग बोकड चिरिला
प्रभुवर भूवर शिववीर आला ।। ६ ।।
धर्माला तारियलें अरिवर मारियले
स्वातंत्र्य संपादुनि देशा शोभविलें ।।
अवतार कृत्याला पूर्णत्वा नेलें
छत्रपती शिव नृप मग निजधामीं गेले ।।
सविनायक कविनायक गाती कवनाला
प्रभुवर भूवर शिववीर आला ।। ७ ।।

– त्र्यंबकेश्वर, १९०३

## ३५. सुमंगल शुभेच्छा वृत्त

(द्रुतविलम्बित)

भुवनमंडप थोर अुभारिला
गगन हेंचि गमे छत त्याजला
चमकती कितीकचि चांदणी
सुरशभेंतिल दीपचि ये मनीं ॥ १ ॥
रव मनोहर ते करते तधीं
परतती स्वपुराप्रति गोपधी
दशदिशांप्रति व्यापिति गोरज
मग मुहूर्त गणी द्विज गोरज ॥ २ ॥
ऋषि अले; बुध मंगलही अले
सकल मंडप शोभविती भले
मग गुरूजन सत्वरिं पातला
त्वरित वाक्कृत निश्चय जाहला ॥ ३ ॥
सुरनदी पुरवीत जला तदा
वधुवरीं मग फेकित अक्षदा
वरशशीजवळी वधु-रोहिणी
हंसति दिग्युवती भंवती मनीं ॥ ४ ॥
बघुनि लग्नविधी नभिं हा निका
स्मरणि येअि निमंत्रण- पत्रिका
शशि बघोनि तुला स्मरलों सख्या
बधुनि रोहिणि ये मनिं त्वत्प्रिया ॥ ५ ॥
शशि खुले वर रोहिणिला जसा
खुलत तू असशील तिला तसा
खुलवि रोहिणि ती शशिला जशी
तव प्रियाहि असेल तुला तशी ॥ ६ ॥
करुनि ही तुलना फसलों परीं
अहह मी किति दु:खित अंतरीं
शशिसि तूं तशि रोहिणीहि ती
अुभयतुल्य असां अुभयांप्रती ॥ ७ ॥
परम जीवसखा शशिचा असा
मदन तो गणतो तव मी तसा
स्वसुहृदासि सपत्निक पाहुनी
मदन धन्य असें गमतें जनीं ॥ ८ ॥
परि न तत्सम कां मम भाग्य तें
अहह संपत कां तुलना अिथें
मम सख्यासि सपत्निक पाहुनी
नयन धन्य असें सलतें मनीं ॥ ९ ॥
नयन हेचि परी न शरीर तें

मन खरें शरिराप्रति शासतें
म्हणुनि यद्यपि देह असे अिथें
मन सख्या तुझिया चरणीं तिथें ॥ १० ॥
सकल सृष्टिंत पंचम तत्व तें
न दिसतांहि चराचर व्यापितें
मन तसें मम ना दिसतां तुतें
वसत लग्नविधींत असेल तें ॥ ११ ॥
कळुनि हें न विवाहविधीप्रती
ठकवुनी न अला मज दुर्मती
म्हणुनि घेअील कोप तुझी मती
कथित यास्तव सत्यकथाचि ती ॥ १२ ॥
तव विवाहविधिप्रति येअुनी
स्वनयनें करुं धन्य असें मनीं
कितिक यत्न यदर्थक योजिले
अहह निष्फळ ते परि जाहले ॥ १३ ॥
समयिं या मम मातुल– पुत्रिचा
शनिदिनींच विवाह ठरे तिचा
म्हणुनि गुंतुनि देह असे अिथें
मन तुझ्याचि विवाहविधींत तें ॥ १४ ॥
प्रियसख्या समजोनि दया करी
करु क्षमा तव सन्मति कीं करी
पणत मित्र अहेर तुला करी
धवल प्रेम तयाप्रति स्वीकरी ॥ १५ ॥
सुकविता वनिता सरसासती
तुजसि आरतिला करण्याप्रती
त्वरित त्वत्प्रति येत सुशोभना
बहुत अुत्सुक त्वन्मुखदर्शना ॥ १६ ॥
तिजसि मानुनि मत्सम मत्परी
बहुत गौरव दावुनि आदरी
मग दयाब्धि जगताचिया पती
सतत रक्षिल नूतन दंपती ॥ १७ ॥

(हे श्लोक पि. रा. श्री. वा. गोखले ह्यांच्या लग्नविधीप्रीत्यर्थ केले होते.)

(ता. १५–५–१९०३, वय २० वे.)

## ३६. स्वतंत्रतेचें स्तोत्र

(जाति : चंद्रकांत) (चाल : चंद्रकांत राजाची)

जयोऽस्तु ते श्रीमहन्मंगले ! शिवास्पदे शुभदे
स्वतंत्रते भगवति ! त्वामहं यशोयुतां वंदे ॥ ध्रु. ॥
राष्ट्राचें चैतन्य मूर्त तूं नीति-संपदांची
स्वतंत्रते भगवति ! श्रीमती राज्ञी तू त्यांची
परवशतेच्या नभांत तूंची आकाशी होशी
स्वतंत्रते भगवती ! चांदणी चमचम लखलखशी ॥
गालावरच्या कुसुमीं किंवा कुसुमांच्या गालीं
स्वतंत्रते भगवती ! तूच जी विलसतसे लाली
तूं सूर्याचें तेज अुदधिचें गांभीर्यहि तूंची
स्वतंत्रते भगवती ! अन्यथा ग्रहण[२८] नष्ट तेंची ॥
मोक्ष मुक्ति हीं तुझींच रूपें तुलाच वेदांती
स्वतंत्रते भगवती ! योगिजन परब्रह्म वदती
जें जें अुत्तम अुदात्त अुन्नत महन्मधुर तें तें
स्वतंत्रते भगवती ! सर्व तव सहचारी होतें ॥
हे अधम रक्त रंजिते । सुजन-पूजिते ! श्रीस्वतंत्रते
    तुजसाठिं मरण तें जनन
    तुजवीण जनन तें मरण
    तुज सकल चराचर शरण
भरतभूमिला दृढालिंगना कधिं देशिल वरदे
स्वतंत्रते भगवति ! त्वामहं यशोयुतां वंदे ॥
हिमालयाच्या हिमसौधाचा लोभ शंकराला
क्रीडा तेथें करण्याचा कां तुला वीट आला ?
होय आरसा अप्सरसांना सरसें करण्याला
सुधाधवल जान्हवीस्त्रोत तो कां गे त्वां त्यजिला ? ॥
स्वतंत्रते ! ह्या सुवर्णभूमिंत कमती काय तुला ?
कोहिनूरचें पुष्प रोज घे ताजें वेणीला
ही सकल-श्री-संयुता ! आमुची माता ! भारती असतां
    कां तुवां ढकलुनी दिधली ?
    पूर्वीची ममता सरली
    परक्यांची दासी झाली
जीव तळमळे, कां तूं त्यजिलें अुत्तर ह्याचें दे ?
स्वतंत्रते भगवति ! त्वामहं यशोयुतां वंदे ॥

– पुणे, १९०३

## ३७. अेक स्वप्न

[28] सूर्याचें तेज ग्रहणात दिसेनासें होतें, आणि समुद्राची थोरवीही अगस्ति ग्रहणात अंजलीत हस्तगत होताच विलुप्त झाली.

॥ दिंडी ॥

कली कोमलिं कमलोदरीं सरींच्या ॥
सकल वसुधा सिंधूंत चंद्रिकेच्या ॥
सुतनु सुंदरि संगांत प्रियकराच्या ॥
मग्न, मीही भुजयुग्मिं मग निशेच्या ॥ १ ॥
कौमुदीच्या हिमधवल सुप्रवाहीं ॥
कमल भासे यद्वदन सौख्यदायी ॥
हस्त ज्याचा मत्कंठिं हार झाला ॥
'भाउ' होता शेजारि मम निजेला ॥ २ ॥
गाढ निद्रा लागली अुभयतांना ॥
कथित असतांना रम्य कथा नाना ॥
पुढें मध्यंतरि काय घडलिं वार्ता ॥
ती न आम्हा मुळि तर्क्य दिसे आतां ॥ ३ ॥
जरी केव्हां कोठून आणि कैसें ॥
हा न कांहीं मुळि मेळ मनीं बैसे ॥
परी भाअूच्या सदनिं अुभय आलों ॥
असे बघते आम्हांस आम्ही झालों ॥ ४ ॥
तेथुनीयां मग माडिवरी येतां ॥
खिडकितूनी ढुंकोनि बघूं जातां ॥
दिसलि खालीं बहु सरसरसयुता ती ॥
पूर्णपात्रा नदि अेक जात होती ॥ ५ ॥
काल होता तो मार्ग अजि जेथें ॥
नदी कैशी ? मन घेअि विस्मयातें ॥
तिची शोभा दे अधिक विस्मयाला ॥
प्रथम विस्मय दुसऱ्यांत लीन झाला ॥ ६ ॥
काय आली आकाशनदी खालीं ॥
भूमि किंवा आकाशगामि झाली ॥
न तरि येता ना धवल जल तटा या ॥
शशी रोहिणिसह लीला ये कराया ॥ ७ ॥
फेनराशी कीं हास्यकान्ति आहे ॥
मत्स्य तळपे कीं नेत्रबाण आहे
विमल जल हें कीं धवल वसन आहे ।
नदी वाहे कीं तरुणि क्रीडताहे ॥ ८ ॥
नयन अमुचे तों बघति अेकमेकां ।
आपुलकी जणुं सांगण्यासि शंका ॥
क्षणैकानें मग करिति ठरावा हे ॥
तरुणि नोहे, गंभीर नदी वाहे ॥ ९ ॥
''भाअु जाअूं पोहून परतटाला ।
तेथ जन जलिं बघ घेति विलासाला'' ॥
''परी अितुकें झेपेल पोहणे का ?'' ।

‘‘सहज जाऊं चल भाउ सोड शंका’’ ॥ १० ॥
खिडकिखालीं साशंक पाहियेलें; ।
पात्र परतटापर्यंत न्याहाळीले; ॥
अेकमेकां अुभयांहि नीरखीलें ।
अुडी पडली ! जलपृष्ठिं अुभय आले ॥ ११ ॥
अगाधा त्या परि बघुनि जलनिधीतें ।
दृष्टि फिरते अवसान सर्व जातें ॥
भीति आंतिलही परि न सोडणें ती ।
असे नेत्रांना सक्त हुकुम होती ॥ १२ ॥
दावियेले वरि धैर्य बहुपरीनें ।
दुजा भीतिस येअील या भयानें ॥
हात दमले परि तोचि जशी काही ।
बसे गटकळि भयभीत अुभयताही ॥ १३ ॥
‘‘भाऊ गेलो’’ हे शब्द कानि आले ।
भाउ भाऊ नदिमाजि हा बुडाले ॥
नवल अद्‌भुत परि आम्ही बुडालो तें ।
आम्हिच झालों खिडकींतुनी पहाते ॥ १४ ॥
अम्हा बुडतां बाहेर काढण्यातें ।
आम्हीच जाऊं तअिं खालिं यावयातें ॥
जिन्यातुनि जणु घाअींत पायरी तों ।।
चुकुनि आम्ही धडधडुनि खालिं येतों ॥ १५ ॥
असा हिसका बसतांच शरीरातें ।
पुरी आली दचकोनि जाग मातें ॥
कुशलि देखुनि भाऊसि मोद झाला ।
दिले आलिंगन प्रेमभरें त्याला ॥ १६ ॥

(पुणे येथे फर्ग्युसन कॉलेजांत प्रिय भाऊ (विष्णु महादेव भट) माझा कम्पॅनियन असतांना वरील स्वप्न पडलें नि तें जरा मजेशीर असल्यानें वर कवितेंत दिलें.)

(१४–२–१९०४)

# ३८. श्री टिळक मुक्ततोत्सव

॥ फटका ॥

आर्यभूमिचा भालतिलकची बालतिलक त्या जय आला ।
झाला रिपुगण चूर म्हणूनी तज्जयजयकारा केला ॥

दिशासुंदरा होति प्रफुल्लित कुमुदनाथ हा हास्य करी ।
वायु वाहती मंद मंद मकरंद गंध भूभाग करी ॥ १ ॥
वसुंधरा न्हातसे सुंदरा धव तमीं चंद्रिका जलीं ।
विस्मित सारा तारांगण हा सस्मित कां आकाशतली ? ॥ २ ॥
अैका परि हा ध्वनी येतसे कोठुनियां गंभीर अती ।
''श्रीमत्तिलकव्यसनवारणोत्सव हा मोदें सुर करिती'' ॥ ३ ॥
चला तरी मग सुरांसह श्रीतिलकनाथ की जय बोला ।
झाला तुमचा देशपिता निष्कलंक नभ दे संमतिला ॥ ४ ॥

पचते आहे नरकामाजी दुष्कर्मास्तव कुलटा[१] जी
ती साध्वी आणि तिलक कलंकी काय न्यायहा अुलटा जी ॥ १ ॥
सरकारा तर अूतचि आला धरितांना श्रीतिलकाला ॥
हर्षे दुर्जन नाचुं लागला सुजनसंघ करि दुःखाला ॥ २ ॥

(१९०३-०४)

# ३९. प्रे. क्रूगर यांचा मृत्यु

(परिचय : क्रूगर हे आफ्रिकेतील 'फ्री स्टेट' नि 'ट्रान्सवाल' ह्या प्रदेशातील बोअर लोकांच्या (डच लोकांच्या) प्रजासत्ताक राज्याचे अध्यक्ष होते. अिंग्रजांनी दोन्ही राज्यें गिळंकृत करण्यासाठी त्यांच्यावर स्वारी केली. शेवटपर्यंत अत्यंत निकराने लढूनही बलाढ्य अिंग्रजांपुढे टिकाव लागणें कठीण असें दिसून आल्यानंतर अिंग्रजांना शरण रिघावयाचें नाही अशा निर्धाराने प्रे. क्रूगरने बाह्य देशांतून साहाय्य मिळविण्यासाठी प्रयत्न केले. अितक्यात त्याच्या देशातील हताश झालेल्या लोकांनी अिंग्रजांना शरणचिठ्ठी लिहून दिली आणि बाहेरच्या ज्या राष्ट्रांनी साहाय्य देण्याचें प्रथम प्रथम आमिष दाखविलें होतें त्यांनीही नकार दिला. तेव्हा प्रे. क्रूगर अिंग्रजांचे हाती सापडू नये म्हणून स्वदेश सोडून विवासनात निघून गेले आणि तेथेच अिंग्रजांनी पादाक्रांत केलेल्या स्वदेशासाठी झुरत झुरत लवकरच मरण पावले. प्रे. क्रूगर वारल्याची बातमी अैकताच सावरकरांनी खालील कविता केल्या.

(वृत्त : मन्दाक्रान्ता)
(रचनाकाल २८ जुलै १९०४)

कोणी साधू अधमछलनें बंदिमाजी पडे की ।
स्वातंत्र्याला कुणी खलबलें आंचवे काय लोकी ॥
हीं तों कृत्यें अनुदिन तयासाठि जो खेद मानी ।
तन्नेत्राचें किती न पुरतें सागराचेंही पाणी ॥ १ ॥
किंवा कोणी नृपति जनता-धर्मगोप्ता निमाला ? ।
मिथ्या शंका मुळिच नव्हती, ये कसा मृत्यु त्याला ? ॥
स्वातंत्र्यार्थ प्रमुख लढता कोणि कां वीर मेला ? ।
मेला लोकीं अभय मरुनी जो असा धन्य झाला ॥ २ ॥
हां देवी हां ! अधिक रडसी आर्त कंठे अशी कां ? ।
सांगे झालें अशुभ असलें काय तें सोड शोका ॥
हा धिक् मृत्यो, सकल कळलें घेअुनी नीच गेला ।
स्वातंत्र्याच्या विमलतिलका त्या अहा क्रूगराला ॥ ३ ॥
सद्‌रत्नांचा तुजसि दिसतो लोभ भारी खरें हें ।
सारीं तूची परि अुपटुनी न्याविं हें ठीक नोहे ॥
ह्या लोकीं जी अुपजति अम्ही प्रेमभावें जपावीं ।
तीं त्वां सारीं यमनगरितें आयती काय न्यावीं ॥ ४ ॥
आहेसी तूं प्रबल तर ह्यासाठिं आम्हां लुटावें ।
निःशक्तातें सबल म्हणुनी व्यर्थही त्वां कुटावें ॥
स्वर्गीचीही जरि दिसतसे हीच नीती तरी हा ।
निःशक्तांनो अिहपरहि ना आसरा हाय तुम्हां ॥ ५ ॥
गेले राजे स्मृतिपथि महाशूर विद्वान्ही गेले ।
मानुष्याची प्रकृति तिजला आजि हे प्राप्त झाले ॥
त्याचा नाही गमत बहु तो खेद चित्तास काही ।
देते त्यांची अुपकृति परी दुःख दुर्धार्यसेंही ॥ ६ ॥
ज्या राष्ट्राला स्वसुतसमसे मानुनी वाढवीलें ।
स्वातंत्र्याच्या अनुपम सुखप्राप्तिला योग्य केलें ॥
ज्याच्यासाठी तनमनधना वेचिलें सर्वकालीं ।
ज्याला साऱ्या भयदसमयीं तूचि होतासी वाली ॥ ७ ॥

संरक्षाया समरिं गळलें अुष्णसें रक्त ज्यातें ।
बोले तैसी करणि करुनी थक्क केलें जगातें ।
हा ! हा ! झालें परवश तुझें राष्ट्र गा क्रूगरा तें ।
अंतःकाली स्मरण करिता वाटलें काय तूतें ॥ ८ ॥
त्वद्राष्ट्राला स्ववश करिती जे महादुष्ट कोणी ।
बापा त्यांची तव विषयिची दुर्वचें तू न मानी ॥
चोरी जोरावर करुनिया थोरवी गावि ज्याहीं ।
नाहीं सारी अवनि भरली केवला अिंग्रजांहीं ॥ ९ ॥
ज्याचा झाला धनगर कुलीं जन्म, जो पौरुषाने ।
शास्ता व्हावें जनपदपिता बोलवूनी तयाने ॥
सामर्थ्यातें लवभरि नये गौणता त्याचिया ती ।
निंदा व्यर्था करुनि तदरी नीच ते तेवि जाती ॥ १० ॥
स्वातंत्र्याची निज भुजबलें बांधवा जोड देअी ।
राष्ट्रोत्कर्षास्तव झटुनिया आपदा दूर नेअी ॥
आला जेव्हा प्रबल रिपुचा तो अकस्मात् घाला ।
देशासाठीं जय मरण वा भोगण्या सिद्ध झाला ॥ ११ ॥
कारस्थानी अतुल विभवें बुद्धिच्या लाजवीले ॥
मोठे मोठे रणपटु किती चोपुनी भागवीले ॥
हड्डी केली नरम रिपुची पूर्ण ज्याने प्रभावें ।
यासाठी त्या नरमणिमहाभागमालेत गावें ॥ १२ ॥
स्वातंत्र्याचें अवन करणें कर्मिं ह्या पुण्यदायी ।
आशा काही नसुनिहि, लढायास जो सिद्ध होअी ॥
नाही जेव्हा मुळिच अुरली तोड देशात काही ।
देशासाठी मदत बघण्या तो विदेशात जाअी ॥ १३ ॥
पूर्वी थापा बहुत दिधल्या साह्य देण्यासि ज्यांनी ।
कामा येअी समयिं दिसला त्यांत अैसा न कोणी ॥
नाही शक्ति रिपु सबल तो; द्रव्य ना, साह्य ज्याने ।
तत्रापीही शरण रिघणें मानलें ना जयाने ॥ १४ ॥
मीं सत्कार्यी झटत असता देव माते सहाय ।
नीचा लागी शरण रिघणें काय बोलून हाय ॥
मद्रक्ताचा गळत असता थेंब तो शेवटीचा ।
देशासाठी समरिं पुढती पाय माझा असाचा ॥ १५ ॥
निष्ठा अैशी धरुनी झटला जो विदेशात भारी ।
राष्ट्राची ती तिथुनि हलवी जो महाभाग दोरी ॥
हा हा गेली तुटुनि परि ती पारतंत्र्यांत राष्ट्रा ।
दुर्दैवाने ढकलुनि दिलें साधुंना थोर कष्टा ॥ १६ ॥
कोणी पक्षी अुडत असता अंतरालात तेथे ।
यावी वार्ता सकल घरटें नष्ट झालें असें तें ॥
नाही मागे स्थल परतण्या ना पुढे शक्ति जाया ।
लागे ची ची करुनि अपुल्या भोवतीची फिराया ॥ १७ ॥

पत्नी बालें सकल त्यजुनी तो महात्मा विदेशी ।
देशासाठी झटत असता ये दशा त्यास अैशी ॥
ज्यासाठी तो धरि अजवरी देह जो जीवहेतू ।
त्या राष्ट्राच्या निधनविधिने तूटला प्राणतंतू ॥ १८ ॥
नाही हा हा क्षितिवरि तया राहिला देश आता ।
सारें त्याच्या जगतितल हें पारखें होय चित्ता ॥
आता त्यातें अुरलि न दुजी अेकची काळजी जी ती
आयुष्याचे दिवस अुरले ते कमी केंवि होती ॥ १९ ॥
अेकांताचा धरुनि मग तो स्नेह राहे नितांत ।
होती केली वसतिस तये झोपडी जी तिच्यात ॥
देशासाठी फिरुनि फिरुनि अश्रू गाळुनि फार ।
ओढा होता नजिकचि तया आणिला रोज पूर ॥ २० ॥
तों कोणेके दिवशिं पडला कंठिं तो काळपाश ।
ध्यानी आलें जगति विरला संपला मन्निवास ॥
आता तूझे मम जिवलगा काय होअील देशा ।
कालाच्याही कमति रिपुच्या यातना घोर अैशा ॥ २१ ॥
जन्मा आलो अजि मरुनिही चाललो मी अहाहा ।
स्वातंत्र्याचा परि न घडला लाभ देशासि हा हा ॥
हे मद्देशा अुपकृति तुवा ह्या हतीं फार केली ।
त्याची माझ्याकडुनि सखया फेड काही न झाली ॥ २२ ॥
मेला वॉशिंग्टन गमतसे माझिनी सत्य मेला ।
ज्यांनी देशा पररिपुबला नाशुनी मुक्त केला ॥
काही केली जगति सुकृती तोचि जन्मासि आला ।
तेव्हा आम्हां मरण कसलें ? जन्मची ना जयाला ॥ २३ ॥
अंती अीशा स्मरुनि तुजला सांगतो की जरी मी ।
माझ्या देशाविण मम मना लाविलें अन्य कामी ॥
किंवा स्वार्थास्तव रिपुजना मीं फितूरी असे हो ।
ह्या पाप्याचा सतत तरि हा रौरवी देह राहो ॥ २४ ॥
जातो; जाणें टळत अुपजे जो तयाला न काही ।
माझी भूमि अहह परि हा! पारतंत्र्यात राही ॥
आहे काहो कुणि सबलसा मुक्त तीते कराया ।
या या कोणी त्वरित म्हणजे भेटतो मृत्युला या ॥ २५ ॥
आशा अैशी धरुनि सखया क्रूगरा फार वेळ ।
आत्मा तूझा फिरफिरुनिया देहि आला असेल ॥
गात्रें झालीं विकल सगळीं सूटली पूर्ण आशा ।
सोडी देहा विनवुनि 'सदा रक्षि मद्देश अीशा' ॥ २६ ॥
गा हो स्तोत्रें सुरस रचुनी सर्व गंधर्व गा हो ।
जा हो साजा चढवुनि पुढे अप्सरांनो निघा हो ॥
घ्या हो माला सुरकुसुमिता देविनो सज्ज व्हा हो ।
ये हो स्वर्गी विमलचरित क्रूगर श्रेष्ठ ये हो ॥ २७ ॥

गंधर्वांनी तनन करुनी घेतल्या गोड ताना।
तालें थै थै नभ डुलवती अप्सरा नाचताना ॥
मोदें तेव्हा सुरतरुसुमें वर्षती स्वर्गवासी ।
श्रीमद्धीर प्रवर नृवर क्रूगराचे प्रवेशी ! ! ॥ २८ ॥
वाटे गेला प्रतिनिधिचि हा बोअरांचे वतीचा ।
स्वातंत्र्यार्थी सुरनृपतिचें साह्य घेण्यासि साचा ॥
देती त्यातें म्हणुनि सुर ते मान हा राजकीय ।
ह्या योगाने सुचविती तया आनुकूल्य स्वकीय ॥ २९ ॥
सांगे नांवें सकल दुबळे देश ते कोण जाची ।
अन्यायाची भय न धरिता क्रूगरा ! सूचि वाची ॥
चोरांची जी फसवणुकिचीं पार्लमेंट न साची ।
न्यायाच्याची जय सुरसभेमाजिं शंका न साची ॥ ३० ॥
देशासाठी मरुनि वरिलें स्वर्ग ज्यांहीं तुला कीं ।
श्रीमद्वॉशिंग्टन, शिव असे भेट देतील नाकीं ॥
स्वातंत्र्याची पुनरपि जगीं स्थापना योग्य व्हाया ।
त्या सार्‍यांना विनवि फिरुनी भूप्रदेशात याया ॥ ३१ ॥
शक्त्युन्मादें बहुत दुबळे देश गांजोनि भारी ।
पापें केलीं अधम नृप हो तीं भरा आजि सारीं ॥
श्रीशाङ्र्गेने सुरबलयुत क्रूगरादी पहा रे ।
स्वातंत्र्याच्या रिपुसि तुडवायासि येतात खालें ॥ ३२ ॥
हा वाग्देवी ! अवतरतसे झोत हा मंगलाचा ।
स्वातंत्र्याचा विजय अथवा स्वर्ग भूलोकिं साचा ॥
देऊ वार्ता परवशजनां तन्मना धीर देऊ ।
स्वातंत्र्याचीं भुवनिं कवनें गात गे ऊठ जाऊ ॥ ३३ ॥

# ४०. मित्रवर वामनराव दातार यांस पत्र

(परिचय : सावरकरांचे बालमित्र ‘वामन’ दातार यांनी वैद्यक शिकावें असा सावरकरांनी आग्रह धरला होता. त्याप्रमाणे आपल्या १७।१८व्या वर्षीच वामनराव मुंबअीला अेका प्रख्यात वैद्याकडे वैद्यक शिकण्यासाठी गेले. त्या वैद्यांच्या घरीच त्यांच्या हाताखाली काही कामें करून ते वैद्यकीय विद्या शिकू लागले. पण परगृही राहणें त्यांस प्रथम प्रथम फार कठीण जाअू लागलें. म्हणून त्यांस अुत्तेजन देण्यासाठी हें कविताबद्ध पत्र धाडलें होतें.)

(अिंद्रवज्रा – अुपेंद्रवज्रा)

आलें तुझें पत्र सुखास दातें । प्रफुल्ल ठेवी स्वमुखा सदा तें ।।
होतें जरी तें मषिने मळालें । सुशुभ्र त्वत्प्रेम मला कळालें ।। १
तत्प्रेमचंद्रास बघून साचा । अुचंबळे सिंधु महामहाचा ।।
पोटीं न मावे नयनांतुनी तो । तदोघ बाहेर निघे असा तो ।। २
तूं यद्यपी वामन वाम मूर्ती । स्पर्शो त्वदीया गगनास कीर्ती ।।
लघ्वंग तो चंद्र तथापि जैसी । तच्चंद्रिका आक्रमिते जगासी ।। ३
स्वयें हिमांशु बहु शांत आहे । माथां स्वये शंकर त्यास वाहे ।।
तथापि तोही कृश नित्य राहे । कीं कष्टरूपी परवास पाहे ।। ४
परंतु मित्रा सुखसागरा तो । दुःखाविना मार्ग न अन्य जातो ।।
मार्गांतला सोशिल त्रास सारा । सुखाब्धिमाजी करि तो विहारा ।। ५

# ४१. सिंहगडाचा पोवाडा

(परिचय : सिंहगडाचा पोवाडा १९०५ मध्ये स्वातंत्र्यवीर सावरकरांनी रचला. त्या वेळेस 'स्वराज्य' हा शब्द होमरूल ह्या मर्यादित अर्थीही वापरणें हा राजद्रोहाचा अपराध समजला जाअी. ब्रिटिशांच्या राजकीय आधिपत्याखाली नुसत्या घरगुती 'स्वराज्या'चे ध्येयाचाही अुच्चार किंवा प्रचार करण्यासाठी श्रीमती अ‍ॅनी बेझंट किंवा लो. टिळक ह्यांसारख्या नामवंत पुढाऱ्यांनासुद्धा राजद्रोहाच्या आरोपाखाली कोर्टात खेचलें गेलें. अशा काळी 'स्वातंत्र्य' - absolute political independance - हें ध्येय पुढें ठेवून त्याच्या प्राप्तीसाठी सशस्त्र क्रांति घडविणें हे अपरिहार्य साधन असल्यामुळे तशी क्रांति करण्याची प्रतिज्ञा केलेल्या अभिनव भारत ह्या – पुढे युरोपरअमेरिकेपर्यंत विस्तारलेल्या आणि गाजलेल्या – गुप्त संस्थेची स्थापना नाशिक येथे केली गेली. शक्य तो नैर्बंधिक कक्षेत अुघड प्रचार आणि अुघड चळवळी करणारी 'मित्रमेळा' ह्या नांवाची तिची प्रकट शाखा काढलेली होती. ह्या संस्थेच्या वतीने लोकमान्यांनी काढलेल्या शिवाजी अुत्सव, गणेशोत्सवप्रभृति सार्वजनिक चळवळीतून आपला स्वातंत्र्यवादी नि सशस्त्र क्रांतिकारी अुपदेश अैतिहासिक नि पौराणिक प्रसंगांचे पडद्याखाली, लोकांत फैलावण्यासाठी 'मित्रमेळा' ह्या नांवाचाच एक मेळाही काढण्यात आला. मेळ्यासाठी स्वातंत्र्यकवि गोविंद नि स्वातंत्र्यवीर सावरकर हे संवाद, पद्ये नि पोवाडे रचीत. त्या मेळ्यासाठीच सिंहगड नि बाजी देशपांडे हे दोन पोवाडे सावरकरांनी रचिले.

हे पोवाडे अगदी पहिल्यांदा म्हणावयास निवडलेली पंधरासोळा वर्षांच्या आतील 'मुलें' ही त्या पोवाड्यांप्रमाणेच तेजस्वी होती. दत्तू, श्रीधर नि बाळ ही त्यांची त्या वेळच्या त्या मंडळीतील आवडती नांवे. अभिनव भारताच्या बालशाखेत हेच प्रमुख असत. हुतात्मा कर्वे नि देशपांडे हे ह्याच बालशाखेतले. ह्या मुलांना त्या पोवाड्यातील स्वातंत्र्यस्फूर्तीची ज्योत धगधगत असल्यामुळे त्यांच्या तोंडून गाअिले जात असता ते पोवाडे अधिकच परिणामकारक ठरत. या मुलांना अभिनय स्वतः स्वातंत्र्यवीर सावरकर शिकवीत; आणि चाल बसवून घेअून त्यांना साथ देणारे पटाअीत तबलजी असत. स्वतः आबा कवि गोविंद! सन १९०५–०६च्या शिवाजी नि गणेश अुत्सवांत हे पोवाडे नाशिककडे जेव्हा प्रथम म्हटले गेले, तेव्हा त्यांची ख्याति त्या प्रांतात बोलबोलता झाली. साहित्याच्या शस्त्रागारातून सूचना, लक्षणा, ध्वनि, व्यंग अित्यादि शब्दशस्त्रांचा अचूक नि अमोघ मारा करणारे हे पोवाडे, त्यांना अैकणाऱ्या सहस्त्रावधि लोकांच्या मनात प्रस्तुत पारतंत्र्याविषयीची तीव्र चीड आणि त्याच्या शृंखला तोडून टाकण्याची अीर्षा अुत्पन्न करीत. थोड्याच दिवसांत त्या मेळ्याचा लौकिक पुण्यापर्यंत पोहोचून, सावरकरांच्या विचारें सुप्रसिद्ध काळकर्ते कै. परांजपे ह्यांनी त्या मेळ्यास पुण्यास बोलाविलें. तेथील शिवजयंत्युत्सवात नि गणेशोत्सवात हे पोवाडे अितके लोकप्रिय झाले की, गायकवाड वाड्यातील गणपतीसमोर ह्या मेळ्यास लोकमान्य टिळकांकडूनही स्वागतिण्यात आलें. श्रोत्यांचे मोठमोठे जमाव त्यांच्या कार्यक्रमास लोटत आणि त्या त्या वेळी अेक नवीन, जाज्ज्वल्य संदेश मिळावा, अेक नवें तेज तळपावें असा त्या जनसंमर्दावर त्यांचा प्रभाव पडत असे. हे पोवाडे नि पद्यें प्रथम म्हणणारी तीन मुले म्हणजेच पुढे प्रसिद्धीस आलेले प्रा. दत्तोपंत केतकर, श्रीधरपंत वर्तक, विधिज्ञ (वकील) आणि डॉ. नारायणराव सावरकर हे होते. पुढे अभिनव भारताच्या गुप्त संस्थेच्या शाखोपशाखांवर जेव्हा परकीय सरकारने आग पाखडली तेव्हा त्या तिघाही तरुणांना राजकीय आपत्तींना नि छळांना तोंड द्यावें लागलें.

ह्या पोवाड्यांच्या तेजस्वी परिणामाविषयी ते जप्त होण्यापूर्वीची आणखी अेक आठवण सांगण्यासारखी आहे. ह्या काळीच लोकमान्य टिळकांनी प्रत्यक्ष रायगडावर शिवोत्सव साजरा करण्यास आरंभिले. त्या अुत्सवाचे वेळी महाराष्ट्रातील प्रमुख कार्यकर्त्यांप्रमाणे शतावधि मावळ्यांचा जमावही गडावर जमे. मुंबअीचे प्रख्यात वकील नि टिळकपक्षीय पुढारी श्री. दाजी आबाजी खरे हे ह्या अुत्सवाचे अध्यक्ष म्हणून लो. टिळक नि काळकर्ते परांजपे यांचेसह रायगडावर आले होते. त्यांच्या अध्यक्षतेखाली ह्या पोवाड्यांचा कार्यक्रम जेव्हा चालू झाला तेव्हा त्यांतील त्या वेळी अपूर्व नि अतिशय 'जहाल' वाटणारे विचार प्रथमच अैकल्यामुळे श्री. खऱ्यांसारख्या तोलून पाअूल टाकणाऱ्या पुढाऱ्याला हें नसतें संकट आपण अध्यक्ष असता ओढअून घेणें बरें नव्हे असें वाटून ते चुळबुळू लागले. अितक्यात 'बाजी देशपांड्यां'चा पोवाडा चालू झाला. त्याचे पहिलेंच तेजस्वी कडवें रंगत रंगत जेव्हा त्या कडव्याचा शेवटचा चरण 'तुम्ही मावळें बोला हर हर महादेव बोला' हा म्हटला जाअू लागला तेव्हा तेथे जमलेल्या अभिनव भारताच्या अनेक गुप्त क्रांतिकारकांसहच ते शतावधि मावळेही अुद्दीपित होअून

चारी बाजूंनी हरहर महादेवाच्या गर्जना अुठू लागल्या. तेव्हा श्री. खरे हे आपण यापुढे अध्यक्षपदी राहून लोकांच्या ह्या अमर्याद नि अनैर्बंधिक (बेकायदा) वर्तनाचें दायित्व घेअू अिच्छीत नाही; तरी कार्यक्रम बंद करावा असे लोकमान्यांना सांगू लागले. तेव्हा लोकमान्यांनी पानावर पान ठेवून सभेस सांगितलें की, अध्यक्षांना प्रवासाचा शीण झालेला आहे., तेव्हा आम्ही दोघे जातो. ह्यापुढे परांजप्यांचे अध्यक्षतेखाली सभा चालेल. लोकमान्य त्यांना घेअून गेले. परंतु काळकर्त्यांनी अध्यक्षपणाचें दायित्व पत्करून कार्यक्रम तसाच पुढे चालविला.

सन १९०६च्या आगेमागे हे पोवाडे बाबाराव सावरकर यांनी छापले. साऱ्या महाराष्ट्रात सहस्त्रावधि स्त्री–पुरुषांच्या नि आबाल–वृद्धांच्या तोंडी ते रुळू लागले. त्यांची मात्राशुद्ध नि अुत्तेजक चालसुद्धा अितकी लोकप्रिय झाली की, पुढे अनेक वर्षे 'सिंहगडची चाल' म्हणजे पोवाड्याची चाल असें समीकरण ठरलें. जेव्हा लवकरच अभिनव भारताच्या सर्वच क्रांतिकारक प्रकाशनांची ब्रिटिशांच्या क्रोधाग्नीत होळी झाली तेव्हा सन १९०९च्या आगेमागे ह्या दोन पोवाड्यांवर ते राजहृत करून बंदी आणण्यात आली.

ही बंदीची आज्ञा अितकी कडक होती की हे पोवाडे कुठेही तोंडी म्हटले तरी म्हणणाऱ्यांना शिक्षा होअी. अुलट लोकही त्यांच्या हस्तलिखित प्रती करून घरोघर अेखाद्या मूल्यवान ठेव्याप्रमाणे रक्षू लागले. प्रांताप्रांतातून जेव्हा झडत्यांची सत्रेंच सारखी सुरू होती तेव्हा अभिनव भारत वाङ्मयाचे असें अेखादें लिहिलेलें वा छापलेलें पानसुद्धा घरी सांपडले तरी क्रांतिकारक कटात ते गृहस्थ समाविष्ट असल्याचा तो अेक प्रबळ पुरावाच मानला जाअी. परंतु असे खडतर छळ सोसूनही जनतेने हे वाङ्मय जिवंत ठेवले. शतावधि मातापितरांनी आपल्या मुलांमुलींकडून हे पोवाडे पाठ करून घेतले. धार्मिक समारंभात, गृहमंगल कार्यांत, शाळा–प्रशाळा–महाशाळांतील संमेलनांत हे पोवाडे अंतःस्थ रीतीने म्हटले जात. पुन्हा पुन्हा गुप्तपणे त्यांच्या लेखी प्रती केल्या जात; अितकेंच नव्हे तर पुन्हा पुन्हा गुप्तपणे ते छापलेही जात. पिढीमागून पिढीने अशा अेकनिष्ठ आस्थेनें नि धैर्यानें हे जप्त झालेले पोवाडे जिवंत ठेवले आहेत. आजही सहस्त्रावधि स्त्री–पुरषांना ते तोंडपाठ झालेले आहेत.

मुद्रणाच्या किंवा लेखनाच्या अभावी लोकांच्या जिभेवरच जिवंत राहतें ते खरें लोकगीत. लोकांच्या आकांक्षांचा नि भावनांचा सहज अुद्गार! त्यांतही तें काव्य असें जिभेवर जिवंत ठेवणें हा परकीय राजसत्तेकडून जेव्हा दंडनीय अपराध ठरविला जातो, त्यासाठी शिक्षा भोगाव्या लागतात, तेव्हाही जें काव्य वा साहित्य पिढ्यानुपिढ्या लोकांच्या जिभेवर जिवंत राहतें तें काव्य किंवा साहित्य लोकांच्या आकांक्षांचा नि भावनांचा केवळ अुद्गारच नसून त्यांच्या जीवनाशी तें समरस झालेलें असतें म्हणूनच ते जगतें. असें जगण्याचा मान ज्या वाङ्मयास मिळाला आहे, त्यात ह्या पोवाड्यांची गणना होते.

त्यांचेवरील बंदी अुठविण्यासाठी सरकारी आज्ञेचा अुघड अुघड भंग करून अनेक वेळी प्रकट सभांतूनही हे पोवाडे म्हटले गेले. अशाच अेका सभेत साहित्यसम्राट श्री. तात्याराव केळकर यांनीही 'सिंहगड'च्या पोवाड्याचे चरण प्रकटपणे म्हणून दाखविले आहेत.

परंतु ब्रिटिश सरकार तर काय, पण पहिल्या काँग्रेस मंत्रिमंडळानेसुद्धा अशा तेजस्वी सावरकर वाङ्मयावरील बंदी अुठविली नाही. कारण काय ? तर त्याला म्हणे हिंसेचा वास येतो!

परंतु लोकांचा निग्रहही वर लिहिल्याप्रमाणे पराकोटीस गेल्यामुळे आणि १९४२च्या चळवळीपासून अहिंसेचा अडसर जनतेने अुडवून दिल्यामुळे अुण्यापुऱ्या चाळीस वर्षानंतर ह्या पोवाड्यांवरील आणि अेकंदर 'सावरकर वाङ्मयावरील बंदी काँग्रेस मंत्रिमंडळाला अुठवावी लागली.)

(जाति : चंद्रकान्त)

– १ –

धन्य शिवाजी तो रणगाजी धन्यचि तानाजी ।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी ॥ ध्रु. ॥
देशामाजी कहर गुजरला पारतंत्र्य–जहरें ।
हलाहलहि ह्या परदास्याहुनि गळा गाठिता बरें ॥ १ ॥
गोमातांची मान आणि ती शिखा ब्राह्मणांची ।

परदास्याची सुरी बंधुनो चिरी अेकदाची ॥ २ ॥
देश हिंदुचा हाय तयाचा मालक म्लेंछ ठरे ।
परि परमेशा फार दिवस हें रुचेल केविं बरें ॥ ३ ॥
चाल : मग आर्य देशतारणा । अधममारणा । कराया रणा ।
परदास्यरात्रि नाशाला।
शिवनेरीं श्रीमान् आला।
स्वातंत्र्यसूर्य अुदयाला।
त्या सूर्याचा किरण रणांगणिं तळपे तानाजी ।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी ॥ ४ ॥

– २ –

ठायी ठायी वीर मावळा सरसावुनि भाला ।
रामदासमत छत्रप तींचा अनुनायी झाला ॥ १ ॥
स्वातंत्र्य–श्रीतोरण तोरणगड अवघड पडला ।
भगवा झेंडा त्या भाल्यासह सरसर वरि चढला ॥ २ ॥
प्रतापगडिची शांत कराया स्वतंत्रता देवी ।
पुढती फाडुनि अफझुल्याला भग तो मग ठेवी ॥ ३ ॥
चाल : ते धन्य मराठे गडी । घेति रणिं अुडी । करुनि तातडी ।
देशार्थ मृत्युही वरिला ।
शाहिस्ता चरचर चिरिला ।
गनिमांनि वचक बहु धरिला ।
झुरती रिपु परि अजुनि नांदतो सिंहगडामाजी ।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी ॥ ४ ॥

– ३ –

जरा ढिलाअी पाहुनि वदली जिजा शिवाजीला ।
गड सर केल्याविण वरणें ना अन्न शपथ तुजला ॥ १ ॥
परके बाला भूमातेला ते लाथा देतां ।
अन्न न गमतें गोमांसाचा घासचि तो घेतां ॥ २ ॥
गुलामगिरिची बेडी पायी तशीच धरिता ना ? ।
गुलामगिरिच्या नरकामाजी तसेच पिचता ना ? ॥ ३ ॥
चाल : निर्जीव अन्न कां रुचे । अुदर शत्रुचे । फोड तेथिचें ।
आतड्यानि भूक शमवावी ।
रक्तानि भूक शमवावी ।
मांसानि भूक शमवावी ।
घ्या गड कडकड चावुनि अधरा धावा ये काजीं ।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी ॥ ४ ॥

– ४ –

धन्या माता जिजा तिलाची शिवबा सुत साजे ।
स्वतंत्र झाल्यावीण सुताला अन्नहि दे ना जे ॥ १ ॥
स्वातंत्र्याच्या सुखनीमाजी जन्म स्वतंत्रांचे ।
गुलामगिरिच्या अुकिरड्यावरि गुलाम निपजाचे ॥ २ ॥

श्वानहि भरितें पोट बापुडें चघळुनिया तुकडे ।
शेणामाजी बांधुनि वाडे नांदति शेणकिडे ॥ ३ ॥
चाल : संसार असा जरि करी । मनुजता तरी । कशासी धरी ।
हो तुच्छ किडाचि न कां तो ।
जो गुलाम असुनी हसतो ।
परदास्यी स्वस्थचि बसतो ।
धिक् धिक् वदला श्री शिव घेउनि गड राखू बाजी ।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी ॥ ४ ॥

– ५ –

प्रभात झाली वाद्यें झडलीं मुहूर्त लग्नाचा ।
बोहल्यावरी उभा राहिला सुत तानाजीचा ॥ १ ॥
घटिका–पात्रें मोजुनि द्विजगण शेवटल्या घटिला ।
दंगल मोडुनि मंगल व्हाया सावधान वदला ॥ २ ॥
वदला द्विज परि कुणि भेटाया तानाजिस आला ।
आला तों तो तलवारींनी मंडप खणखणला ॥ ३ ॥
चाल : तो हर हर अेकचि झाला । चमकला भाला । वदति रे चला ।
शिवराज दूत पातले ।
हें लग्न राहुं द्या भलें ।
देशार्थ जनन आपुलें ।
धर्मार्थ जनन आपुलें ।
लहान मोठा निघे मऱ्हाठा पुढती तानाजी ।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी ॥ ४ ॥

– ६ –

परमात्म्याशी जीवात्म्याची तन्मयता झाली ।
वायुकुमर की रघुविरचरणीं मिठी पुन्हा घाली ॥ १ ॥
अरुणचि कीं श्रीजगन्मित्र वर सूर्या आलिंगी ।
आलिंगी कीं तानाजी श्री शिवरायालागी ॥ २ ॥
भेट जाहली मसलत बसली राया धाडि मला ।
प्राणहि देअिन घेअिन गड परि तानाजी वदला ॥ ३ ॥
चाल : हें पर्व स्वातंत्र्याचें । शत्रुरुधिराचें । स्नान मज साचें ।
घडु द्यावें हो शिवराया ।
देशार्थ पडो द्या काया ।
धर्मार्थ पडो द्या काया ।
जाअील ना तरी वाया ।
अखेर निसटे शिवहस्तांतुनि तीरचि तानाजी ।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी ॥ ४ ॥

– ७ –

शिवरायाच्या तीरा जा बा तानाजी वीरा ।
वीरांमाजी हो रणगाजी अरि मारुनि धीरा ॥ १ ॥
सिंहगडावरि तुझी आर्यभू फोडी हंबरडे ।

गुलामगिरिचे खून पाडण्या जा जा जा तिकडे ॥ २ ॥
देवदूत हो स्वातंत्र्याच्या पवित्र कार्याला ।
जातो आहे अमुचा ताना रक्षण व्हा त्याला ॥ ३ ॥
चाल : हे मंगल तारांगण हो । अप्सरा जनहो । गडावरि जाहो ।

तानाजि लढाया येतो ।
अरि फार, अेकलाचि तो ।
परि धीर पुढेची घुसतो ।
त्या धीरावरि वर्षा अमृत आणि फुलें ताजी ।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी ॥ ४ ॥

– ८ –

मध्यरात्रिची वेळ शांत परि भयदायी घोर ।
गडाखालच्या गर्द झाडिमधि घन अंधःकार ॥ १ ॥
रात्रीलाही निद्रा लागे किर्र शब्द नुमटे ।
करवंदीच्या अेका जाळित तों ध्वनि घोर अुठे ॥ २ ॥
अरे मारिती पूर्वज तुमचे स्वर्गातुनि हाका ।
अहो मराठे कान देअुनी नीट सर्व अैका ॥ ३ ॥
आअी तुमची ही भूमाता पाठीवरि तीच्या ।
अुडतो चाबुक फुटल्या ना रे धारा रक्ताच्या ॥ ४ ॥
त्या रक्ताच्या अेका थेंबासाठी लक्ष शिरा ।
रिपुच्या कुटुनी मलम लावणें आअीच्या शरिरा ॥ ५ ॥
अस्सल जो जो बीज मराठा तो तो मज व्हावा ।
त्याने येअुनि देअुनि प्राणा मजसह गड घ्यावा ॥ ६ ॥
चाल : बाकिचे षंढहो पळा । गृहांप्रति वळा । बचाअुनि गळा ।
गळसरी त्यात घालणें ।
तें योग्य तुम्हांला लेणें ।
तलवार करीं ना घेणें ।
हरहर गर्जुनि सिंह जाळितुनि चवताळुनि येजी ।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी ॥ ७ ॥

– ९ –

दरड अुभट बहु चढणें दुर्घट घोरपडीलाही ।
म्हणुनि पहारा जिथे गडावरि मुळि नव्हता काही ॥ १ ॥
साधुनि संधी ही तानाजी तिथे नीट आला ।
सज्ज चढाया, नव्हे हवेमधि अुडण्याला झाला ॥ २ ॥
कुणि गुणगुणला पाय घसरता अहा काय होअी ।
वदे शूर देशार्थ मरोनी स्वर्गा तरि जाअी ॥ ३ ॥
चाल : यशवंती सरसर चढता । हर्ष हो चित्ता । सोल घे हाता ।
तानाजी चढू लागले ।
सद्भाग्य चढू लागले ।
स्वातंत्र्य चढू लागले ।

सांभाळी रे म्लेंच्छा आला आला तानाजी ।
प्रेमे आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी ॥ ४ ॥

– १० –

अेकामागुनि अेक मराठा सरसर वरि चढला ।
सहस्त्रावरी असुनीहि रिपु चढविति ते हल्ला ॥ १ ॥
कोण कोठुनी किती आणखी कसे कुठे लढती ।
नकळे अंधारी रिपु अपसामधि झुंजुनि मरती ॥ २ ॥
खाली वरती, मागे पुढती आजूबाजूंनी ।
सैरावैरा पळता पाडिति भाला भोसकुनी ॥ ३ ॥
चाल : तो धन्य मराठा गडी । शत्रुचीं मढीं । हजारो पाडी ।
तुडवीत चिखल मांसाचा ।
पोहूनि पूर रक्ताचा ।
घे मार करित ये साचा ।
कल्याणाचे दार धडाडे । झाली रे बाजी ।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी ॥ ४ ॥

– ११ –

बाजी झाली परि तो आहे कोठे तानाजी ।
मारित हाणित छाटित रमला रणरंगामाजी ॥ १ ॥
अुदयखान तो दिसला धरिला घे घे मार अुठे ।
झुंज झुंजता नजरा फिरल्या गर्जे सिंह पुढे ॥ २ ॥
''सह्याद्रीच्या वाघा शेळी अुदयखान खाशी
खान, आपुल्या बापा म्हणविशि मी रजपुतवंशी ॥ ३ ॥
धिक् धिक् नीचा लाविशि वंशा लाज रजपुतांच्या ।
श्रीरामाच्या श्रीकृष्णाच्या प्रतापसिंहाच्या ॥ ४ ॥
मुसलमान तो बाप तुझा का लढशी आम्हांशी ।
मातृभूमिला मुक्त कराया जे झटती त्यांशी'' ॥ ५ ॥
बोलुनि पुनरपि तुटोनि पडला जरि तो श्रमलेला ।
अुदयभानुचा वार मर्मिचा अवचित तो बसला ॥ ६ ॥
चाल : मूर्छना अहा पातली । क्षणाभीतरी । वीररसशाली ।
तानाजी खाली येतो ।
हा धैर्यमेरु अुन्मळतो ।
शिवकरिचा भाला गळतो ।
भूमातेच्या अंकावरती पहुडे तानाजी ।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी ॥ ७ ॥

– १२ –

पडता ताना आणि मराठे बघुनी हटताना ।
सूर्याजीची सिंहगर्जना भय देते कर्णा ॥ १ ॥
अरे चालला कोठे सांगा सर्व मराठे हो ।
भाला ठेवा भरा बांगड्या मग पुढती जाहो ॥ २ ॥
जाअु अिच्छिता काय धरोनी आल्या दोराला ।

अहो षंढ तो दोर मघाची लढोनिया मेला ॥ ३ ॥
बाप मरोनी पडला तुमचा येथे लढताना ।
परत जाउनी अवश्य नरकी ढकला पितरांना ॥ ४ ॥
चाल : धिक्कार शब्द अूठले । पुन्हा परतले । मराठी भाले
घनघोर युद्ध मातलें ।
वीरांसि वीर ते भिडले ।
देशार्थ मराठा लढे ।
धर्मार्थ मराठा लढे ।
त्यांना घुटके वीररसाचे स्वतंत्रता पाजी ।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी ॥ ५ ॥

– १३ –

अरे धरा तो मातृघातकी देशघातकी हो ।
चला चला रे त्या ठायाला अन्य विषय राहो ॥ १ ॥
सर्व मराठा लोटे तिकडे घ्याया सूडाला ।
अुदयभानु परि आधिच कोणी नरकी पाठविला ॥ २ ॥
त्याच्या रक्ती भिजवुनि फडकें केला झेंडा तो ।
स्वातंत्र्याचा अमूर्त तो ध्वज अजुनि तिथे डुलतो ॥ ३ ॥
चाल : तानाजिकडे जन वळे । दाटले गळे । वाहती जळें ।
तानाजि काहिसा अुठला ।
जय पाहुनि हरहर केला ।
देशार्थ मरे मी वदला ।
धर्मार्थ मरे मी वदला ।
मागुति पडला! आता कैचा अुठतो तानाजी ।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी ॥ ४ ॥

– १४ –

मग त्या गडची भूमी ठेवी तानाजिस अुदरीं ।
तेव्हापासुनि रत्नाकर बहु तीचा द्वेष करी ॥ १ ॥
स्वतंत्रतेच्या रणात लढता स्वतंत्रतेसाठी ।
त्या पक्षाचा कैवारी श्री मुरहर जगजेठी ॥ २ ॥
धन्य मराठे पुनीत झाले अरिरुधिरस्नानें ।
आणि विनायक त्यांच्या निर्मल यशःसुधापानें ॥ ३ ॥
असो समाप्ती छत्रपतींच्या सरस्वती माजी ।
गड आला परि सिंह हरपला अमुचा तानाजी ॥ ४ ॥
धन्य शिवाजी तो रणगाजी धन्यचि तानाजी ।
प्रेमें आजी सिंहगडाचा गाजी ॥ ५ ॥

# ४२. श्री बाजी देशपांडे यांचा पोवाडा

(परिचय : हा पोवाडा दि. ११–११–१९११चे सरकारी पत्रकान्वये आक्षिप्त ठरविला गेला होता. त्याचेवरील बंदी दि. ७–१०–१९३८चे सरकारी पत्रकाने अुठली. २६ जानेवारी १९६४ ह्या दिवशी तो पुणे नभोवाणीवरूनही म्हटला गेला. सिंहगडच्या पोवाड्याचे आरंभी जें प्रास्ताविक दिलें आहे तेंच ह्या पोवाड्यालाही लागू आहे.)

(जाति : चंद्रकांत)

जयोस्तु ते श्रीमहन्मंगले शिवास्पदे शुभदे
स्वतंत्रते भगवति ! त्वामहं यशो–युतां वन्दे ॥
स्वतंत्रते भगवती ! या तुम्हि प्रथम सभेमाजी ।
अम्ही गातसो श्रीबाजीचा पोवाडा आजी ॥
चितोडगडिच्या बुरुजांनो त्या जोहारासह या
प्रतापसिंहा प्रथित–विक्रमा, या हो, या समया ॥
तानाजीच्या पराक्रमासह सिंहगडा येअी
निगा रखो महाराज रायगडकी दौलत ही आअी ॥
जरिपटका तोलीत धनाजी संताजी या या
दिल्लीच्या तक्ताचीं छकलें अुधळित भाअू या ॥
स्वतंत्रतेच्या रणात मरु नी चिरंजीव झाले
या ते तुम्ही राष्ट्रवीरवर, या हो या सारे ॥
घनदाट सभा थाटली । गर्जना अुठली । घोर त्या कालीं
जय स्वतंत्रतेचा बोला
जय राष्ट्रदेविचा बोला
जय भवानिकी जय बोला
तुम्ही मावळे बोला हरहर महादेव बोला
चला घालु स्वातंत्र्य–संगरी रिपूवरी घाला ॥ १ ॥

हरहर गर्जुनि सर्व मावळे वीर सज्ज असती
परंतु कोठे चुकले बाजी यांत न कां दिसती ? ॥
हाय हाय तो म्लेंच्छांसंगे घडित बैसलाची
स्वदेश–भूच्या पायासाठी बेडी दास्याची ॥
अैकुनिया शिवहृदय तळमळे म्हणे 'दूत हो, जा
बोधुनि वळवा वीर बाजि तो तुम्ही राष्ट्रकाजा' ॥
शिवदूत तेधवा जाती । बाजिला वदती । सोड रे कुमती
कां जिणें तुच्छ हें नेशी ?
कां म्लेंच्छ कसाअी भजसी ?
कां दास्य–नरकि तू पचसी ?
स्वराज्य नाही स्वदेश नाही धिक् त्या देहाला
चला घालु स्वातंत्र्यसंगरी रिपूवरी घाला ॥ २ ॥

बाजीराया, म्लेंच्छ सबळ हा दोष न काळाचा

ना देवाचा, ना धर्माचा, किंवा नशिबाचा ।।
देशद्रोही चांडाळांचा भरला बाजार
गुलामगिरि जे देती त्यांना निष्ठा विकणार ।।
तुम्हीच ना स्वातंत्र्य चिरियलें या पोटासाठी
तुम्हीच ना रे भूमातेच्या नख दिधलें कंठी ?
हो सावध बाजीराया । दास्यि का राया । झिजविसी वाया ?
तुज भगवान् श्रीशिवराजा
स्वातंत्र्यप्राप्तिच्या काजा
बोलावी तिकडे जा जा
देशभक्तिची सुधा पिउनि घे प्रायश्चित्ताला
चला घालु स्वातंत्र्यसंगरी रिपूवरी घाला ।। ३ ।।

शिवदूताचे बोल अैकुनि बाजी मनि वदला
काळसर्प मी कसा अुराशी मित्र म्हणुनि धरला ।।
घरात शिरता चोर तया मी मानियला राजा
बंड बोललो शिवरायाच्या परमपूज्य काजा ।।
माता माझी भ्रष्टविली मी राजनिष्ठ त्यांशी
या पाप्याने युद्ध मांडिलें देशरक्षकाशी
जा सांगा शिवभूपाला । अशा अधमाला । राजनिष्ठाला
त्वां आधी शतदा चिरणें
तुजकरवी घडता मरणें
पावेन शुद्धि मग मानें
तुझ्या करींच्या तरवारीच्या घेअिन जन्माला
चला घालु स्वातंत्र्यसंगरी रिपूवरी घाला ।। ४ ।।

देशभूमिच्या कसायास का अिमान मी दावू
भाकरि देतो म्हणुनि तयाच्या चाकरीस राहू ।।
कवणाची भाकरी बंधु हो ? चाकरि कवणाची
भाकरि दे भूमाता, चाकरि तिच्या घातकांची ।।
राज्य हिसकिलें, देश जिंकिला त्या पर अधमासी
राजनिष्ठ तू राहुनि कवण्या साधिसि नरकासी ।।
ही गुलामगिरीची गीता । राजनिष्ठता । यापुढे आता
मद्देशचि माझा राजा
तो प्राण देव तो माझा
मी शरण शिवा सांगा जा
राख अुडाली प्रदीप्त बाजी वैश्वानर ठेला
चला घालु स्वातंत्र्यसंगरी रिपूवरी घाला ।। ५ ।।

लोट धुळीचा सुटला अवचित दीन शब्द अुठला
लगट करुनि सिद्दिने पन्हाळागड वेढुनि धरिला ।।

लक्ष्मीचें मृदु कमल, शारदासुंदरिचा वीणा
स्वतंत्रतेचा कलिजा अडके गडात शिवराणा ॥
अफझुल्ल्याच्या वधा स्मरोनी फाजल सुत त्याचा
करितो पण तो शिवभूपाला जिवंत धरण्याचा ॥
बापासि तुझ्या जो खडे । चारि रोकडे । जाशि त्याकडे
            जीवंत धरू तरि साचा
            जीवंत पवन धरण्याचा
            अभ्यास आधिं कर ह्याचा
खुशाल हरणा मग तू धावें धरण्या वणव्याला
चला घालु स्वातंत्र्यसंगरी रिपूवरी घाला ॥ ६ ॥

बाजि लागला शिवभूपाच्या थोडा कानाला
हाती भाला अेक मावळा गडाखालि आला ॥
सिद्दि पाहता चुकुनि हात समशेरीला गेला
दावुनि त्याला मुजरा केला धीट नीट वदला ॥
शिवाजी राजा जिवंत येतो तुमच्या गोटाला
अुद्या सकाळी करु गड खाली कळवी तुम्हांला ॥
अैकुनी सिद्दि बहु फुगला । रिपूजन भुलला । परस्पर वदला
            अजि खान खान खानाजी
            हुअे शिकस्त मराठे आजी
            फिर लढते क्यौंकर आजी
            चलो शराब अुडाये ताजी
            आप लेओ आप लेओ जी
आप गाजि । आप तो रणगाजी
झिंगविला अरि-सर्प फुंकुनी पुंगी गुंगविला
चला घालु स्वातंत्र्यसंगरी रिपूवरी घाला ॥ ७ ॥

गुंगवुनी अरि-सर्प! शिवा गारोडि गडावरि तो
प्रहर रात्र अुलटता मराठी जादू मग करितो ॥
कृष्णपक्षिच्या काळ्या काळ्या त्या रात्री दडल्या
गर्द झाडिला भिअुनि चांदण्या बाहेर न पडल्या ॥
अशा तमी किलकिलें दार कां तटावरी झालें?
बाजि निघाले श्रीशिव आले आले शत भाले ॥
भाला खांद्यावरी मराठा घोड्यावरि स्वारी
भरिता, घोडा थै थै नाचे-तोंच शीळ आली ॥
वीर हो टाच घोड्याला । बाण हा सुटला । अडविणें त्याला
            रिपु तुडवित व्हा व्हा पार
            चौक्यांसि तुम्हा दावील
            काजवा चोर-कंदील
गेला गडतळ गेला सत्तर मैल भूप आला

चला घालु स्वातंत्र्यसंगरी रिपूवरी घाला ॥ ८ ॥

तुरी सिद्धिच्या हाती देउनि सुटता शिव नृपती
'अब्रह्मण्यम्' कितिक भाबडीं भोळिं भटें वदतीं ॥
'अब्रह्मण्यम्' यात काय रे दोष कोणता तो
आला ठक ठकवाया अुलटा भला ठकवितो तो ॥
साप विखारी देशजननिचा ये घ्याया चावा
अवचित गाठुनि ठकवुनि भुलवुनि कसाही ठेचावा ॥
ये यथा प्रपद्यन्ते माम् । भज्यामहं तान् । तथैव श्रीमान्
भारतीं कृष्ण वदला हें
अधमासि अधम या न्यायें
रक्षिलें राष्ट्र शिवरायें
राष्ट्ररक्षका सावध रे रिपु हुडकित तुज आला
चला घालु स्वातंत्र्यसंगरी रिपूवरी घाला ॥ ९ ॥

'पायां पडतो हात जोडतो बाजि तुला राया
गड अवघड रांगणा तिथे तुम्हि जाणें या समया ॥
राष्ट्र–देविचा हस्त कुशल तू तरि लाखो भाले
अम्हांसारिखे मिळतिल चिरतिल चरचर रिपु सारे' ॥
'जाअू काय मी बाजि, मृत्युमुखि ढकलुनि तुम्हांला ?
कधी शिवा जातिचा मराठा मृत्यूला भ्याला ?' ॥
'चढा गड तुम्ही यशोदायिनी तोफा पांच करा
तोवरि लढवू, गनीम अडवू, खिंड करू निकरा ॥
वसुदेव तूच शिवराया । कंसकपटा या । करूनिया वाया
स्वातंत्र्य–कृष्ण–चिन्मूर्ती
जा घेअुनि अपुल्या हाती
गडगोकुळात नांदो ती'
गडी चालला शिव तो खिंडित 'दीन' शब्द अुठला
चला घालु स्वातंत्र्यसंगरी रिपूवरी घाला ॥ १० ॥

आले आले गनीम खिंडित चवताळुनि आले
झाले झाले सज्ज मराठे सरसावुनि भाले ॥
संख्या दुप्पट रिपुची परि ते निकराने भिडती
हरहर गर्जुनि समररंगणी तुटोनिया पडती ॥
खड्गांचे खणखणाट त्यांमधि शर सणसण येती
मारण–मरणावीण नेणती रणी वीर रंगती ॥
तों हरहर अेकची झाला । वदति जय झाला । म्लेंच्छ हो हटला
चला चढवा नेटाचा हल्ला
वीरश्रीचा करा रे हल्ला
निकराचा चालु द्या हल्ला

मारित हाणित हटवित म्लेंच्छा खिंडपार केला
चला घालु स्वातंत्र्यसंगरी रिपुवरी घाला ॥ ११ ॥

म्लेंच्छ हटविता बाजी वळुनी गडाकडे पाहे
श्रीशिव चाले मार्ग बघुनिया वीर गर्जताहे ॥
गडात जाअिल राष्ट्रदेविचा जिवलग शिवराणा
तोंवरी लढवू खिंड शूर हो हा अपुला बाणा ॥
ह्या बाण्याच्या आधि संगरीं जारि घडता मरणें
पुनर्जन्म तत्क्षणी घेअुनी पुन:पुन्हा लढणें ॥
रघुराया रावणहरणा । कंस–मर्दना । भो जनार्दना!
लाडक्या देशजननीचे
स्वातंत्र्यरक्षणी साचे
हें प्राणदान जरि अमुचें
पवित्र हें जरि त्वत्प्रिय हें जरि, दे तरि सुयशाला
चला धालु स्वतंत्र्यसंगरी रिपवूरी घाला ॥ १२ ॥

आले आले गनीम चालुनि पुनरपि तों आले
झाले झाले सज्ञ पुनरपि अुठावले भाले ॥
'दीन दीन' रणशब्दा 'हरहर महादेव' भिडला
भिडला ओष्ठी दंत मस्तकी रंग वक्षि भाला ॥
हल्ला चढवित परस्परांवरि पुन: पुन्हा तुटती
नटुनी योद्धे समरभोजनी वीररसा लुटती ॥
कचरला मराठी भाला । बाजि तो आला । तोलुनी धरिला
रणि रंग पुन्हा ये साचा
गर्जती मराठे रिपुचा
घ्या सूड म्लेंच्छ मत्ताचा
त्याचा मस्तक चेंडू साचा
समररंगणी चेंडुफळीचा डाव भरा आला
चला घालु स्वातंत्र्यसंगरी रिपूवरी घाला ॥ १३ ॥

डाव अुलटला म्लेंच्छांवरि तो पुन्हा परत हटला
जय झाला परि वीर मराठा बहुतांशी पडला ॥
तिकडे गडिच्या तोफा अजुनी पांच कां न सुटती
वीर मराठे सचिंत आशाबंध सर्व तुटती ॥
तशात घेअुनि ताजी टोळी फाजलखां येतो
धन्य बाजिची! पुन्हा अुसळुनी रिपूवरी पडतो ॥
खिंड– तोफ तिजमधुनी गोळा सुटला श्रीबाजी
रणी तळपतो वीरश्रीचा रणनवरा आजी ॥
तों गोळी सू सू आली । अहा त्या काली । मर्मि ती शिरली
श्रीबाजी विव्हळ पडला

मागुती तत्क्षणी अुठला
बेहोष वीरवर वदला
तोफेआधी मरे न बाजी सांगा मृत्यूला
चला घालु स्वातंत्र्यसंगरी रिपूवरी घाला ॥ १४ ॥

थांबा बाजी जखम तरि पुरी बांधू द्या थांबा
हरहर रणिंचा अैकुनि वीरा अुसळू नका थांबा ॥
जखम कुठे रे फक्त असे मी तृषाक्रांत थोडा
रिपुरक्ताला पितो घटाघटा सोडा मज सोडा ॥
खरी जखम भू-आअिस माझ्या फोडी हंबरडा
ओढुनि अरिचीं आतडीं बांधु द्या पट्टि तिला सोडा ॥
भले मराठे लढा तसेची आलो मी सोडा
लढा लढा हो सोडा मजला म्लेंच्छ पुरा झोडा ॥
होअील तोफ शिवबाची । क्षणी दो क्षणिंची । खिंड लढवाची
फेडाया ऋण या भूचें
अजि अुष्ण बिंदु रक्ताचे
द्या मोजुनि मुद्दल साचें
तिला व्याज स्वातंत्र्य देअुनी फेंडा कर्जाला
चला घालु स्वातंत्र्यसंगरी रिपुवरी घाला ॥ १५ ॥

काय वाजलें बाजीराया बार न गडिं झाला
शिळा कोसळे पान सळसळे पक्षी ओरडला ॥
लढा तरी मग चला वीर हो रणात घुसलो मी
रक्तें मढवू लढवु खिंडिची तसू तसू भूमी ॥
शपथ तुम्हांला वृक्ष-पक्षि-जल-शिला-तेज-वारे!
आम्ही पडता तोफेपूर्वी लढा तुम्ही सारे ॥
तों बार धडाधड झाले । प्राण परतले । हास्यमुख केंले
हा पहिला बार शिवाचा
हा दुसरा निजधर्माचा
हा तिसरा निजदेशाचा
हा चवथा कर्तव्याचा
बार पांचवा धडाडला हर बोला जय झाला
चला घालु स्वातंत्र्यसंगरी रिपूवरी घाला ॥ १६ ॥

खबरदार यमदूता! पहुडे श्रीबाजी प्रभु हा
स्पर्शु नको! तद्विद्युत्तेज:पुंज दिव्य देहा ॥
स्वतंत्रतेच्या पूर्वी हा रणतीर्थाला गेला
देशशत्रुरक्तात न्हाअुनि लालभडक झाला ॥
त्याच्या वक्ष:स्थळी रुळे रिपु-रुंडांची माला
तीवर हरहर महादेव हा घोर मंत्र जपला ॥

बघ देवदूतही आले । सूर्य हे आले । अिंद्र हे आले
सुरगुरू सुरतरू सारे
अणि देव वर्षती तारे
मधु मृदुल वाहती वारे
ओवाळी सत्कीर्तिसुंदरी श्रीमत् बाजीला
चला घालु स्वातंत्र्यसंगरी रिपुवरी घाला ॥ १७ ॥

दिव्य धुनीचा चकचकाट का विश्वोदरिं भरला
रथ श्रीमती स्वतंत्रताभगवतिचा अवतरला ॥
अूठ चितोरा अूठ देविला अुत्थापन द्याया
प्रतापसिंहा प्रथितविक्रमा अुठि मंगल समया ॥
भूमातेच्या तान्ह्या अुठि कां वीत–चिंत व्हा ना ?
स्वतंत्रतेचा हा पोवाडा अैकाया आला
अुठा सर्व स्वातंत्र्यवीरवर जय मंगल बोला ॥
असे कुशल रांगण्यात तुमचा जिवलग शिवराणा ॥
श्रीस्वतंत्रता भगवती । आपुल्या रथी बाजिला घेती
गंधर्व तनन तों करिती
दुंदुभी नभी दुमदुमती
श्रीबाजी स्वर्गा जाती
करी चराचरा विश्व बाजिच्या जयजयकाराला
चला घालु स्वातंत्र्यसंगरी रिपुवरी घाला ॥ १८ ॥
तदा मराठे रणी पहुडले जे आणिक सुर ते
पावनखिंडित बसुनी तिजसह जाति नभः पथें ॥
श्रीबाजीचें रक्त पेरिले खिंडित त्या काला
म्हणुनि रायगडिं स्वातंत्र्याचा थोर वृक्ष झाला ॥
अहो बंधुंनो ! पूर्वज अैसे स्वतंत्र रणगाजी
स्वतंत्र त्या पूर्वजां शोभता वंशज का आजी ? ॥
विनवि विनायक ह्यांतिल घ्यावें समजुनि अर्थाला
चला घालु स्वातंत्र्यसंगरी रिपूवरी घाला ॥
स्वराज्य नाहीं स्वदेश नाही धिक् ह्या देहाला
चला घालु स्वातंत्र्यसंगरी रिपूवरी घाला ॥ १९ ॥

# ४३. तारकांस पाहून

(परिचय :– मुंबअी सोडून बॅरिस्टर होण्यासाठी १९०६ साली सावरकर विलायतेस निघाले. लांबच्या समुद्रप्रवासात कित्येक दिवस खाली समुद्र नि वरती आकाश ह्यांवाचून काही दिसत नाही; वादळेंही सुटतात, समुद्र लागतो. घरचीं प्रियकर माणसें दुरावल्यामुळे मनास अुदास वाटतें. बहुतेक समुद्रप्रवाशांप्रमाणे पहिल्यानेच घर सोडलेल्या तरुण सावरकरांचे मन प्रियजनांच्या आठवणी येअून कासावीस होअी. तेव्हा केवळ करमणूक म्हणून वादळी नि निरभ्र रात्री ते बोटीच्या डेकवर फिरत. त्या वेळी त्यांनी खालील कविता रचली.)

(जाति : चंद्रकांत) (चाल : चंद्रकांत राजाची)

सुनील नभ हें, सुंदर नभ हें, नभ हें अतल अहा
सुनील सागर, सुंदर सागर, सागर अतलचि हा
नक्षत्रांहीं तारांकित हें नभ चमचम हासे
प्रतिबिंबांही तसा सागरहि तारांकित भासे
नुमजे लागे कुठे नभ कुठे जलसीमा होअी
नभात जल तें, जलात नभ तें संगमुनी जाअी
खरा कोणता सागर ह्यांतुनि वरती कीं खाली
खरें तसें आकाश कोणतें, गुंग मती झाली
आकाशीचे तारे सागरि प्रतिबिंबित होती
किंवा आकाशी हे बिंबिति सागरिचे मोती
किंवा आकाशचि हें सगळें, की, सागर सगळा
भवसागर बोलती पुराणी प्रथित ऋषी ज्याला ! १

हे चांदणि ! सुखशीतल गमसी तशीच असशीना
आगचि[२९] लागो लोळ आगीचा तुजसी वदत्यांना
विमल विरल मेघांची दुलअी ओढुनि निजलीसे
अशा अप्सरेचिया अनावृत्त वदनासम विलसे
आल्हादक किति चंद्रबिंब हें नंदसुधा झरतें
फुटो भिंग[३०] तें भिकार त्या जें मसणासम करतें
चंद्र चांदण्या असेंच अंतर मापुनि देवाने
खचल्या नभिं नी नयनीं काचा सुललित बेताने
त्यांचे रिझवो रूप जना कीं आल्हादक कोळें
फुटोत ते त्या विद्रुप करिते दुर्बिणिचे डोळे २

कथिति ज्योतिषी तसे आगिचे लोळ कुणी तारे
असतिल दुसरे, नव्हेत हे, हे अमृत–बिंदु सारे !
कीं जैं असुरां–सुरांमध्ये क्षीराब्धि–मंथनकाली
अमृत–कलश वरि येता ओढाताण सबळ झाली
ओढाताणित अितस्ततः त्या अमृत–बिंदु गळले
तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भले भले चकले

29 ह्या चिमुकल्या चांदण्या नसून हे मोठमोठे ज्वालागोल, आगीचे डोंब आहेत असें जे ज्योतिषशास्त्रज्ञ सांगतात त्यांच्या त्या शोधाला आग लागो.

30 दुर्बिणीचें भिंग; कारण दुर्बिणीने चंद्र हा अेक ओसाड, रुक्ष नि निर्जीव अुपग्रह आहे असें दिसतें.

कीं बघुनी अप्सरो-गणें हीं वसुधेवरि खाली
चमेलि जाअी, जुअी, मोगरा, मालतिही फुलली
त्यांच्या नंदन-वनिंहि असावीं अैशीं काम्य फुलें
ह्यास्तव पेरुनि देति अप्सरा हास्य नभीं अपुलें
हास्य-लते सुरसुहासिनींच्या आलीं ऋतुंत फुलें
तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भले भले चकले ३

थवे काजव्यांचे की नंदनवनिंच्या चकचकले
तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भलेभले चकले !
सुनील शालूवरि मायेच्या[31] लकलकती टिकले
तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भले भले चकले !
सुवर्ण-गौरा-गौरी श्रीहर लीलारत झाले
थाप पडे तों द्वारीं श्रीहरि भेटाया आले
नग्ना लगबग गिरिजा धावे सावरु शालूला
हिसका बसूनी हार गळ्यातिल तटकन तो तुटला
त्या हारातिल मोतीं सैरावैरा ओघळले
तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भलेभले चकले !
दशाननें पळवूनि जानकी नभःपथें नेली
अश्रुबिंदु जे देवी टपटप ढाळित त्या काली
तेचि राहिले असे चकाकत जाणो दिव्यबलें
तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भले भले चकले ! ४

नरकपतीचा हल्ला आला चितोडनगराला
देवांनाही स्वर्गि जलदिने वर्दी द्यायाला
सिद्धाग्नीतुनि फर्कन ज्वाला-लोळ नभीं अुठती !
चितोडगडवासिनी देवि तो त्यावरि आरुढती
ज्वालारूढा देवि दुरुनि त्या चमकति तेजोबळें
तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भलेभले चकले !
आकाशाच्या ग्रंथ-संग्रहालयासि अर्पियला
कालें[32] ग्रंथ प्रचंड विश्वेतिहास जो लिहिला
रौप्यमुद्रांकित तद्भागां अनुक्रमे रचिलें ५

तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भले भले चकले
प्रभु विरचित नव नाटक मायाविजय जगद्रंगी
अभिनयिले जाताच सुरांच्या प्रेक्षक अर्धांगी
नाट्यालयिच्या नभातल्या ह्या सज्ञातुनी साऱ्या

---

[31] माया म्हणजे प्रकृतीमाया

[32] विश्वेतिहासाचा प्रचंड ग्रंथ काळाने लिहिला; कारण अितिहासाची माहिती काळापेक्षा कोणाला जास्त असणार ? आणि त्या विश्वेतिहासाच्या प्रचंड ग्रंथाला पुरेसे ग्रंथालय म्हणजे अेकच- आकाश.

चमकत चमकत डोकावूनी जैं बघत्या झाल्या
वदनमंडलें देवींची त्या लुकलुकता भुलले
तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भले भले चकले!
कामव्याकुल शंभु लागला भिल्लिणिचे पाठी
पुराणींच ही कथा, कथीनचि मी कुठली खोटी
नाचत निसटे माया भिल्लिण तोही तिजमागे
कामव्याकुल, आकाशाच्या अंगणांत लागे
टपकत संचितवीर्य प्रभुचे बिंदु बिंदु गेले
तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भले भले चकले! ६

परी सागरा, सांग काय ही लटपट? ही कुठली
चटकचांदणी कवण? नभांतुनि निसटुनिया विपलीं
रात्री अैशा अशी अेकटी लगबगिने घुसली
तुझिया जलमंदिरी सवेंची दिसेनशी झाली
लाजु नको, जा भोग विलासा कामोत्सुक तूं, ती
तुझिया शतजलतरंगमंजुल[33] सुखा साथ देती
प्रेमाची चांदणी परंतू ज्यांची दूर वसे
किती प्रवासी तळमळती बा, तुझ्या निकट अैसे
तुझा तुझ्या चांदणिशी पाहुनि प्रिय संगम साचा
तव मत्सर ना, परी छळी त्या वियोग दयितांचा! ७

हे ताऱ्यांनो, जाणतसा का कुठुनि तुम्ही आला?
कुठें चालला कवण हेतु ह्या असे प्रवासाला?
कवण हेतु तो ज्यास्तव तुम्ही गगनगामि व्हावें
सूर्यापासुनि अितकें दूरचि भूनें विचरावें
गजराजाहुनि फुलपांखरुंची सुरंग शोभावें
बीज फुलावें, फुलुनि सुकावें, सुकुनि बीज व्हावें?
लहान मोठीं घटिका–यंत्रीं बहुविध यंत्रें तीं
स्वस्वगतीने परि अैक्याची साध्यास्तव फिरती
असा कोणता हेतु जयाच्या सिद्धीस्तव साची
विश्वाच्या ह्या चक्रें फिरतीं भव्य घड्याळाचीं
अम्हां कळेना म्हणूनि पुसतों तुम्हां कळे का तें?
का न कळत वर्तावें जाणति अितकेंचि ज्ञाते? ८

– समुद्रमार्ग, १९०६

[33] श्लेषाने 'जलतरंग' वाद्ये.

## ४४. श्रीमान् राजे कृष्णशहा[१] यांस

(अिंद्रवज्रा–अुपेंद्रवज्रा)

यद्यद् विभूति–द्युतिमत्सुसत्त्वं
तत्तद् मदात्म–प्रभवं शृणु त्वम्
अिति स्वयं श्रीभगवान् प्रसिद्धं
गीता–वधू–रत्नमुवाच तत्त्वम् ॥ १ ॥
श्रीमान् नृपा[३४] ! तूं द्युतिमान् तसाची
विशिष्टता व्यक्त तुझ्यात साची
चिदंश ते ह्यास्तव अीश्वराचे
रूपी तुझ्या व्यक्त असावयाचे ॥ २ ॥
पट्टाभिषिक्ता ! स्वयमेव आणी
सक्षेम कीं ती तव पट्टराणी
कीं मौक्तिकीं, त्या सरितांत, आणी
तुझ्या कृपाणात सतेज पाणी[३५] ॥ ३ ॥
परस्परालिंगन–लालसा ती
नृपाल–राज्ञी विसरोनि जाती
सस्पर्ध यच्चुंबन जैं कराया
वर्धिष्णु कीं तो युवराज राया ? ॥ ४ ॥
कीं कान्त–कंठीं विलसे सलीला
चंपावती चंपक–पुष्पमाला
श्रीराजबंधु प्रमुखाप्त राया
सुदक्ष कीं लोकहिता कराया ? ॥ ५ ॥
कीं द्रव्य आणी गुण ते निधानीं[३६]
प्रपूर्ण अैशी तव राजधानी
गुणज्ञ, वेत्ता, अधिकार–भारी
समर्थ कीं तो तव कारभारी ? ॥ ६ ॥
लता तरू संगमिं हासती कीं ?
रता स्वकांतासि महासती की ?
सुदुग्ध कीं वत्ससहीत गाअी ?
तुझें नभीं कीं खग गीत गाअी ? ॥ ७ ॥
बंडासि दंडोनि प्रजा अुदंड
आनंदवी कीं तव राजदंड ?
नराप्रती पाळुनिया त्रिकाल
यथार्थ कीं त्वत्पदवी नृपाल ? ॥ ८ ॥
आणी पवित्रा पदवी अशी ही
नृपा तुला जो जगदीश देअी

---

[34] जव्हार संस्थानचे अधिपती.

[35] हा श्लिष्ट शब्द तेज, जल आणि धारेची तीव्रता असे ह्याचे अनुक्रमे तीन अर्थ होतात.

[36] कोशांत

तया चरित्र प्रभु राघवाचें
अहर्निशीं वाचिसि कीं स्ववाचे ? ॥ ९ ॥
सिंधूमधी राक्षस-बेट लंका
दे रावणा जन्म जगत्कलंका
गांजी बळें आर्य-वसुंधरा ही
माता नृपा आपुलि सुंदरा ही ॥ १० ॥
भूक्रंदनें राघव चापपाणी
सलज्ज आणी नयनांस पाणी
म्हणे 'रिपूने अुपमर्द केला
धिक्कार माझ्या तरि जीविताला ॥ ११ ॥
बटीक जाती असताहि हाय
राजा मला मी म्हणवीत काय
छातीवरी रावण हाणि लाथा
घालू तरी कीं मुकुटासि माथा ?'' ॥ १२ ॥
शत्रूवरी श्रीरघुनाथ घाला
घालावयाला चिर सज्ज झाला
छाटी अरीच्या दशकंधराही
करी स्वयें मुक्त वसुंधरा ही ॥ १३ ॥
चरित्र अुद्बोधक राघवाचें
चरित्र अुत्तेजक राघवाचें
चरित्र सांकेतिक राघवाचें
अहर्निशी वाचिसि कीं स्व-वाचे ? ॥ १४ ॥
नृपा तुला तो जगदीश देअी
सद्राजवंशी जनु पुण्यदायी
तूं भाग्यशाली तुजवीण पाही
तुझ्या प्रजे आश्रय अन्य नाही ॥ १५ ॥
म्हणोनि अेक्या करि मागणीतें
स्वार्थार्थ काही न लगे मला तें
कमी तुम्ही तें मज काय केलें
व्हावें तरी मन्मन हें भुकेलें ? ॥ १६ ॥
परंतु कीं आर्य-वसुंधरा ही
माता नृपा आपुली सुंदरा ही
गेलें तिचें तें तिज द्यावयातें
झटेन ह्या दे वचनासि मातें

(आर्या)

दुर्गम जव्हारच्या त्या रानींचा व्याघ्र जो महाराणा ।
श्रीकृष्ण शहा त्यांच्या राजसभें हा मदीय नजराणा ।।

– लंडन, १९०७

# ४५. प्रियकर हिंदुस्थान

(जाति : गोविंद)

(चाल : म्हातारा अितुका)

सकल जगामधिं छान । अमुचें प्रियकर हिंदुस्थान
केवळ पंचप्राण । अमुचें सुंदर हिंदुस्थान ॥ ध्रु. ॥
बहुत पाहिले बहुत अैकिले देश परी ते सान
सान मिसर पाताल आंग्लभू सान चीन जापान १
बहुत गिरि, परी तुझाच गिरिवर हिमालयाचा मान
कवण नदी दे श्रीगंगेसम पूत-सुधाजल-पान २
कस्तूरी-मृग-परिमल-पूरित जिचें फुलावें रान
प्रभात-कालीं कोकिल-किलकिल-कूजित आम्रोद्यान ३
यज्ञ-धूम-सौगंध मनोहर जिचें सामरव-गान
अैकुनि येती जिथे कराया देव सोमरसपान ४
कालिदास कवि गाती, गौतम शिकविति सांख्यज्ञान
म्लेंच्छ-विनाशक विक्रम दे तुज स्वातंत्र्यश्रीदान ५
जिजा जन्म दे शिवा[३७] जिच्यास्तव गुरु पुत्रांच[३८] प्राण
जिच्यास्तवचि त्या कुमारिकांसी[३९] विस्तवांत ये न्हाण ६
तुझ्या जलांही अनंत पितरां दिलें तिलांजलि-दान
पुण्यभूमि तूं! पितृभूमि तूं[४०]! तूं अमुचा अभिमान ७
जननि! जगत्रयिं शक्त कोण जो करिल तुझा अपमान
प्राणदान-संसिद्ध असुनि त्वत्-त्रिदश-कोटि संतान? ८
जननि! तुझ्या सन्मान-रक्षणीं अर्पु रणीं हे प्राण
शत्रुकंठ भंगोनि घालुं तुज दारुण रक्तस्नान ९

– लंडन, १९०८

---

[37] शिवाजीस.

[38] गुरु गोविंदसिंग यांच्या चारही लहान मुलांना धर्मकार्यार्थ बळी पडावें लागलें. पैकी दोघां दहा बारा वर्षांच्या मुलांस मुसलमानांनी ते मुसलमान होअीनात म्हणून भिंतीत चिणून मारलें. दोघे लढाअींत गुरुजींचे आज्ञेवरून घुसून अभिमन्यूसारखे लढत लढत मेले.

[39] चितोडच्या वीरकन्यकांस.

[40] पुढे अंदमानमध्यें कविरद्रष्ट्या सावरकरांनी हिंदु कोणास म्हणावे? ह्या प्रश्नाचे अुत्तरासाठी केलेल्या व्याख्येचा पाया; ह्या व्याख्येनुसार ज्याची पितृभू आणि पुण्यभूही भारतभूमि आहे तो हिंदु अधिक विवरणासाठी 'हिंदुत्व' वाचावे!

## ४६. हिंद सुंदरा ती!

(चाल : घेउनि ये पंखा)

हिंद सुंदरा ती, वसुंधरा । धन्य–प्रसवा ती ॥ ध्रु. ॥
ऋग्यजुःसामवेदा । अुपनिषत् ज्ञान छंदा
प्राचीना गायत्री । देवी संधात्री ॥ १ ॥
भरद्वाज जनका । वसिष्ठ शुकसनका
श्रीगर्गा ऋषिवर्गा । अशां जन्मदात्री ॥ २ ॥
रामायणकविला । श्रीमत् वाल्मिकिला
व्यासातें शिकवीते । बोल बोबडे ती ॥ ३ ॥
रघु नल दाशरथी । धर्मराज नृपती
हे मातर्! हे मातर् । वदुनि जिला नमिती ॥ ४ ॥
गार्गेयी विदुला । सीता द्रौपदिला
झांशीच्या लक्ष्मीला । उद्भव दे पोटीं ॥ ५ ॥
गौतम चैतन्या । गुरू नानकांना
स्तन्य जिचें धन्य करी । त्रिजगन्मान्या ती ॥ ६ ॥
प्रताप शिव बंदा । श्रीगुरु गोविंदा
संभव दे अुद्भव दे । दे जी अुत्स्फूर्ती ॥ ७ ॥
शास्त्रांची सुखनी । सुकलांची नलिनी
सुजल जला, सुफल फला । रूचिर रस–स्त्रवती ॥ ८ ॥
देअि अशा प्रसवा । जिचा धन्य कुसवा
वसुमति ती दासी कां । क्षण तरि राहो ती ? ॥ ९ ॥
सूर्यग्रहणाचें । आयुः क्षण साचें
भास्वरची, अमर सदा । रविमंडळदीप्ती ॥ १० ॥
शीघ्रचि होअिल ती । मुक्ता शुभमूर्ती
स्वतंत्र ती, समर्थ ती । विश्वोद्धरणा ती ॥ ११ ॥

– लंडन १९०९

## ४७. प्रभाकरास

(परिचय : सावरकरांचा पहिला मुलगा प्रभाकर हा चार वर्षांचा होऊन लहानपणींच वारला. ती वार्ता युरोपमध्ये कळली तेव्हा त्याच्या स्मृत्यर्थ त्यांनी ही कविता रचली.)

(जाति : चंद्रकांत)

(चाल : चंद्रकांत राजाची.)

परिसुनि यौवन-लतिकेला तूं पहिलें फूल फुले
तनया, तनु थरथरली स्नेहें नेत्र स्निग्ध झाले ।।
परंतु अमुचें अभिनव यौवन, त्यांत पितृत्वाचा
प्रथम समागम, गमुनी लज्जा-विनय मना साचा ।।
नवप्रसव तव जननी मजला दावित असतांही
गुरूजन-मर्यादेने म्यां बहु पाहियलें नाही ।।
चोरुनि घ्यावें कधी कधी तव अर्ध चुंबनातें
सुखोत्सवें तव आपण होउनि नयन झाकती ते ।।
प्रभ्या प्रियकरा, होतासी बहु दिवस असा सखया
अमूर्त तू कल्पना एक मधु-मधुर अशी हृदया ।। १ ।।
शीघ्रचि सोडुनि अंक जननिचा दुडदुडु धावत तू
घरात फिरता डोळे भरूनी पाहिन हा हेतू ।।
धरूनि मनी मी अुत्सुक असता विदेश-गमनाचें
प्रभ्या प्रियकरा! कार्य अुदेलें प्रियजन-विरहाचें ।।
मातृस्तनपानात दंग तू असताना तुजला
तव जननीसह चुंबुनि केलें विदेश-गमनाला ।।
अंतरता मज प्रीति-तरु-लता खेद अती झाला
सत्य सांगता[४१] परी न गमला बहु तव विरह मला ।।
देशि जसा होतास विदेशी सन्निधची सखया
अमूर्त तू कल्पना एक मधु-मधुर अशी हृदया ।। २ ।।
अतनु मूर्ति तव लटकुनि कितिदां हृदयाशी निजली
हसली कितिदा दिव्याशेने कितिदा ती सजली ।।
धर्म-कार्य-सिद्ध्यर्थ धाडुनी रणीं खड्गपाणि
बाल बाल-झुंजार आपुले श्रीगोविंदांनी[४२] ।।
हुतात्म होता हसत पाहिले सुकीर्ति परिसुनि ती
म्यांही कितीदा रणी पाहिली अमूर्त तव मूर्ती ।।
अेके समयी प्रभ्या प्रियाळा! विषम वृत्त आलें
वसंतविव्हल लतातरू[४३] ते विव्हळ बहू झाले ।।
मृत्यु-वंचकें हरुनि मूर्ति तव वंचित त्या केलें
परी सत्य सांगतां न काही हरूनि मम नेलें ।।
पूर्वि जसा होतास असिसि तू नंतरही सखया

---

41 सांगायचे तर.

42 गुरुगोविंदसिंग यांनीं.

43 मित्रमैत्रिणी, घरचे आप्तेष्ट अित्यादि.

अमूर्त तू कल्पना अेक मधु–मधुर अशी हृदया ॥ ३ ॥
हृदय जोवरी प्रभ्या प्रियाळा, असाचि तिथ राहे
पूर्वार्जित मद्–हृदय गृह असे तुझेंचि तनया हें ॥
परि जै वारे क्रुद्ध वर्षती मेघ–शिला–धारा
सुरक्षित न हें गमे गृह सख्या तुझिया आधारा ॥
महाराष्ट्र–वाक्‌सुंदरीसवें श्रीगोविंदातें
विहार जेथे अखंड सुंदर–मणिमय मंदिर तें ॥
तुला गेह[४४] हें यास्तव अर्पी सरस्वती स्वकरें
जिथे क्रांतिचे शिवू न शकती अग्नि–मेघ–वारे ॥
अक्षर–मंदिरि नांद सदोदित सलील बाळा, ह्या
अमूर्त तू कल्पना अेक मधु–मधुर अशी हृदया ॥ ४ ॥

– लंडन १९०९

पश्चाल्लेख
जिथे न शकती शिवू भासले अग्नि–मेघ वारे[४५]
तिथेहि शकले शिवू क्रांतिचे अग्निमेघ बा रे ॥ – अंदमान १९१२

---

[44] . क्रांतीच्या झंझावातात हें माझें हृदय– हा देह सांपडलेला म्हणू– तुला राहण्यास सुरक्षित नाही. म्हणून तुझी स्मृती चिरकाल सुरक्षित रहावी यास्तव गोविंदसिंहाच्या पराक्रमाचा गौरव ज्या शीखेतिहासात आहे त्या अितिहासाचा मराठीत रचलेला जो ग्रंथ मी लिहिला तो तुझ्या नांवे अर्पण करतो. म्हणजे तो ग्रंथ आहे तों तुझी स्मृती राहील. अशा भावनेने ही कविता अर्पणपत्रिका म्हणून लिहिली.

[45] परंतु सावरकरांचा तो शीखेतिहासही जप्त झाला. प्रसिद्ध होण्यापूर्वीत हस्तलिखित धरलें गेलें. क्रांतीच्या आगीत जें स्थान सुरक्षित वाटलें तेंही त्या आगीत दग्ध झालें; त्या आश्चर्यांचा वरील पश्चाल्लेखात् अुल्लेख आहे.

## ४८. सागरास

(परिचय : अभिनव भारत या संस्थेवर वक्रदृष्टि झाल्यामुळे अतःपर आपल्याला हिंदुस्थानला परतता येणार नाही नि आपण लवकरच धरले जाअू असें सावरकरांना निश्चितपणे वाटलें. त्या वेळी लंडनपासून साधारणपणे ८० कि. मी.(५० मैल) दूर असलेल्या ब्रायटनच्या समुद्रकाठी ते गेले असता स्वजनांची आठवण होअून त्यांनी ही कविता लिहिली.)

(जाति : अक्रूर)

(चाल : अजि अक्रुर हा)

ने मजसी ने परत मातृभूमीला । सागरा, प्राण तळमळला
भूमातेच्या चरणतला तुज धूतां । मीं नित्य पाहिला होता
मज वदलासी अन्य देशिं चल जाअू । सृष्टिची विविधता पाहू
तअिं जननी-हृद् विरहशंकितहि झालें । परि तुवां वचन तिज दिधलें
मार्गज्ञ स्वयें मीच पृष्ठि वाहीन । त्वरित या परत आणीन
विश्वसलों या तव वचनी । मी
जगदनुभव-योगे बनुनी । मी
तव अधिक शक्त अुद्धरणी । मी

येअीन त्वरें कथुन सोडिलें तिजला । सागरा, प्राण तळमळला १
शुक पंजरिं वा हरिण शिरावा पाशीं । ही फसगत झाली तैशी
भूविरह कसा सतत साहु यापुढती । दशदिशा तमोमय होती
गुण-सुमनें मी वेचियली ह्या भावें । कीं तिने सुगंधा घ्यावें
जरि अुद्धरणी व्यय न तिच्या हो साचा । हा व्यर्थ भार विद्येचा
ती आम्रवृक्षवत्सलता[४६] । रे
नवकुसुमयुता त्या सुलता[४७] । रे
तो बाल गुलाबही[४८] आता । रे

फुलबाग[४९] मला हाय पारखा झाला । सागरा, प्राण तळमळला २
नभिं नक्षत्रें बहुत अेक परि प्यारा । मज भरतभूमिचा तारा
प्रासाद अिथे भव्य परी मज भारी । आअिची झोपडी प्यारी
तिजवीण नको राज्य, मज प्रिय साचा । वनवास तिच्या जरि वनिंचा
भुलविणें व्यर्थ हें आता । रे
बहु जिवलग गमतें चित्ता । रे
तुज सरित्पते ! जी सरिता । रे
तद्विरहाची शपथ घालितो तुजला । सागरा, प्राण तळमळला ३

---

46 बाबाराव सावरकर

47 पत्नी, वहिनी, भगिनी या घरातील स्त्रिया

48 लहान भाऊ बाळ

49 भगूरचे घर, संपूर्ण कुटुंब

या फेन-मिषें हससि निर्दया कैसा । कां वचन भंगिसी अैसा ?
त्वत्स्वामित्वा सांप्रत जी मिरवीते । भिअुनि का आंग्लभूमीतें ?
मन्मातेला अबल म्हणुनि फसवीसी । मज विवासनातें देशी
तरि आंग्लभूमि-भयभीता । रे
अबला न माझिही माता । रे
कथिल हें अगस्तिस आता । रे
जो आचमनी अेक पळीं तुज प्याला । सागरा, प्राण तळमळला ४

– ब्रायटन, १९०९

# ४९. सांत्वन

(परिचय : ख्रिस्ताब्द १९०९ सालच्या जून महिन्यात श्री. गणेशपंत सावरकरांना जन्मठेप काळेपाण्याची शिक्षा झाली नि लवकरच पुढे त्यांचे धाकटे बंधू 'बाळ' (डॉ. सावरकर) यासही अटक झाली! या दोन्ही बातम्या गणेशपंतांच्या पत्नी यशोदाबाआी यांनी विनायकराव सावरकरांना विलायतेस कळविल्या. तेव्हा संत्रस्त झालेल्या आपल्या दुःखी भावजयीस त्यांनी घाआीघाआीने हें अुत्तर लिहून टाकलें.)

(ओवी)

– १ –

जयासी तुवां प्रतिपाळिलें । मातेचें स्मरण होअू न दिलें
श्रीमती वहिनी वत्सले । बंधु तुझा जो तुज नमीं ॥
आशीर्वादपत्र पावलें । जें लिहिलें तें ध्यानी आलें
मानस प्रमुदित झालें । धन्यता वाटली अुदंड ॥
धन्य धन्य आपुला वंश । सुनिश्चये ओश्वरी अंश
की रामसेवा–पुण्य–लेश । आपुल्या भाग्यीं लाधला ॥

– २ –

अनेक फुलें फुलतीं । फुलोनिया सुकोन जाती
कोणी त्यांची महती गणती । ठेविली असे ? ॥
परी जें गजेंद्रशुंडेने अुपटिलें । श्रीहरीसाठी मेलें
कमलफूल तें अमर ठेलें । मोक्षदातें पावन ॥
त्या पुण्य गजेंद्रासमची । मुमुक्षु–स्थिती भारतीची
करुणारवें ती याची । अिंदीवरश्यामा श्रीरामा ॥
स्वोद्यानी तिने यावें । आपुल्या फुलास भुलावें
खुडोनिया अर्पण करावें । श्रीरामचरणां ॥
धन्य धन्य आपुला वंश । सुनिश्चयें ओश्वरी अंश
श्री–राम–सेवा–पुण्य–लेश । आपुल्या भाग्यीं लाधला ॥

– ३ –

अशींच सर्व फुलें खुडावीं । श्रीरामचरणीं अर्पण व्हावी
काही सार्थकता घडावी । ह्या नश्वर देहाची ॥
अमर होय ती वंशलता । निर्वंश जीचा देवाकरिता
दिगंती पसरे सुगंधता । लोकहितपरिमलाची ॥
सुकुमार आमुच्या अनंत फुलां । गुंफोनि करा हो सुमन–माला
नवरात्रीच्या नवकाला । मातृभूमी वत्सले ॥
अेकदा नवरात्र संपली । नवमाला पूर्ण झाली
कुलदेवी प्रकटेल काली । विजयालक्ष्मी पावन ॥

– ४ –

तूं धैर्याची अससी मूर्ति । माझे वहिनी, माझे स्फूर्ति
रामसेवाव्रताची पूर्ति । ब्रीद तुझे आधीच ॥
महत्कार्याचें कंकण धरिलें । आता महत्तमत्व पाहिजे बाणलें
अैसें वर्तन पाहिजे केलें । की जें पसंत पडलें संतांना ॥
अनेक पूर्वज ऋषीश्वर । अजात वंशजांचे संभार

साधु साधु गर्जतील । अैसें वर्तणें ह्या काला ॥

– लंडन, १९०९

# ५०. माझें मृत्युपत्र

(परिचय : १९१०च्या मार्चमध्ये विनायकराव सावरकर विलायतेत पकडले गेले. तेव्हा या जन्मात जिची पुन्हा भेट होणें जवळ जवळ असंभवनीय झालेलें होतें त्या आपल्या पूजनीय वहिनीस आपल्या अटकेच्या वृत्तकथनाचा कुठाराघात करण्याचें कटु कर्तव्य करतानाच त्यातील अुदात्त, आकर्षक, दिव्य मर्म व्यक्त करण्यास्तव विनायकरावांनी लंडनमधील ब्रिक्स्टन जेलमधून आपल्या या जन्मातला बहुधा शेवटचा होअू पाहणारा हा निरोप – हें मृत्युपत्र – लिहून धाडिलें होतें.)

(वसंततिलका)

वैशाखिचा कुमुदनाथ नभात हासे
यच्चंद्रिका धवल सौधतलीं विलासे
घाली स्वयें जल जिला प्रिय बाळ लोभें
जाअी फुले, परिमलें सुमनांत शोभे ॥ १ ॥
आले घरी सकल आप्त–सुहृद् जिवाचे
आनंदमग्न कुल गोकुल काय साचें
आदर्श दीप्ति–शुचिता–धृति–यौवनांचें
पाहूनि जें तरुणमंडळ, कीर्ति नाचे ॥ २ ॥
प्रेमें हृदें विकसली नव यौवनाच्या
गंधें सुवासित अुदात्त सुसंस्कृतीच्या
दिव्यालता–तरुंसि जें गृह बाग झाला
ज्या पौर हर्षित वदे जन 'धर्म–शाला' ॥ ३ ॥
सैंपाक त्वां निजकरें कुशलें करावा
प्रेमें तुझ्या अधिकची सु–रसाल व्हावा
संवाद सर्व मिळुनी करिता नितांत
जेवावयासि बसलों जअिं चांदण्यांत ॥ ४ ॥
श्रीरामचंद्र–वनवास–कथा रसाला
की केवि देश अिटली रिपुमुक्त झाला
तानाजिचा समरधीर तसा पवाडा
गावा चितोरगड वा शनवारवाडा ॥ ५ ॥
झाली कशी प्रियकरा अपुली अनाथा
दुर्दास्यखिन्न शरभिन्न विपन्न माता
शोके विवंचुनि तिच्या जअिं मोचनाचे
केले अनंत तरुणां अुपदेश साचे ॥ ६ ॥
तो काल रम्य, मधुर प्रिय संगतीनी
तें चांदणें, नवकथा, रमणीय रात्री
तें ध्येय दिव्य निजमातृ– विमोचनाचें
तो अुग्र निश्चयही, ते अुपदेश साचे ॥ ७ ॥
झाल्या तदा प्रियकरांसह आणभाका
त्या सर्व देवि वहिनी स्मरती तुम्हां का ?
'बाजी प्रभू ठरु' वदे युवसंघ सर्व
'आम्ही चितोरसुवती' युवती सगर्व ॥ ८ ॥
की घेतलें व्रत न हें अम्हि अंधतेने

लब्धप्रकाश अितिहास-निसर्ग-मानें
जें दिव्य, दाहक म्हणूनि असावयाचें
बुद्ध्याचि वाण धरिलें करिं हें सतीचें ॥ ९ ॥
- २ -
ज्या होति तैं प्रियजनांसह आणभाका
त्यांते स्मरोनि मग सांप्रत हें विलोका
नाही पुरी अुलटलीं जरि आठ वर्षे
तों कार्यसिद्धि अितुकी मन कां न हर्षे ? ॥ १० ॥
आसेतु-पर्वत अुचंबळला प्रदेश
वीराकृती धरित टाकुनि दीनवेष
भक्तांचिया रघुपदीं झुलताति झुंडी
जाज्वल्य होयहि हुताशन यज्ञकुंडी ॥ ११ ॥
तो यज्ञ सिद्ध करण्यास्तव अुग्र दीक्षा
जे घेति येअि तअिं तत्कृतिची परीक्षा
''विश्वाचिया अखिल मंगल-धारणाला
बोला असे कवण भक्ष्य हुताशनाला ?'' ॥ १२ ॥
आमंत्रण प्रभु रघूत्तम सोडिता हें
दिव्यार्थ, देव ! अमुचें कुल सज्ज आहे
हे साध्वि, गर्जुनि असें पहिल्या हवीचा
हा अीश्वरी मिळविला अम्हि मान साचा ॥ १३ ॥
धर्मार्थ देह वदलो ठरले नितांत
ते बोल फोल नच बालिश बायकांत
ना भंगली भिअुनिया धृति यातनांना
निष्काम-कर्मरति योगही खंडिला ना ॥ १४ ॥
ज्या होति तैं प्रियजनांसह आणभाका
केल्याचि सत्य कृतिने अजि ह्या विलोका
दीप्तानलात निजमातृ-विमोचनार्थ
हा स्वार्थ जाळुनि अम्ही ठरलो कृतार्थ ॥ १५ ॥
- ३ -
हे मातृभूमि ! तुजला मन वाहियेलें
वक्तृत्व वाग्विभवही तुज अर्पियेलें
तूतेंचि अर्पिलि नवी कविता रसाला
लेखाप्रती विषय तूंचि अनन्य झाला ॥ १६ ॥
त्वत्स्थंडिलीं ढकलिलें प्रिय मित्रसंघा
केलें स्वयें दहन यौवन-देह-भोगां
त्वत्कार्य नैतिक सुसंमत सर्व देवां
तत्सेवनीच गमली रघुवीर-सेवा ॥ १७ ॥
त्वत्स्थंडिलीं ढकलिली गृहवित्तमत्ता
दावानलांत वहिनी नवपुत्रकान्ता
त्वत्स्थंडिलीं अतुल-धैर्य वरिष्ठ बंधू

केला हवी परमकारुण पुण्यसिंधू ॥ १८ ॥
त्वत्स्थंडिलावरि बळी प्रिय बाळ झाला
त्वत्स्थंडिलीं बघ अता मम देह ठेला
हें काय बंधु असतो जरि सात आम्ही
त्वत्स्थंडिलींच असते दिधले बळी मी ॥ १९ ॥
संतान ह्या भरतभूमिस तीस कोटी
जे मातृभक्ति-रत सज्जन धन्य होती
हें आपुलें कुलही त्यामधि अीश्वरांश
निर्वंश होअुनि ठरेल अखंड-वंश ॥ २० ॥
- ४ -
की तें ठरोही अथवा न ठरो परंतु
हे मातृभू अम्हि असो परिपूर्ण-हेतु
दीप्तानलात निज-मातृ-विमोचनार्थ
हा स्वार्थ जाळुनि अम्ही ठरलो कृतार्थ ॥ २१ ॥
अैसें विसंचुनि, अहो वहिनी ! व्रताते
पाळोनि वर्धन करा कुल-दिव्यतेते
श्रीपार्वती तप करी हिमपर्वतीं ती
की विस्तवात हसल्या बहु राजपूती ॥ २२ ॥
तें भारतीय अबला-बलतेज काही
अद्यापि ह्या भरतभूमित लुप्त नाही
हें सिद्ध होअिल असेंचि अुदार अुग्र
वीरांगने, तव सुवर्तन हो समग्र ॥ २३ ॥
माझा निरोप तुज येथुनि हाच देवी
हा वत्स वत्सल तुझ्या पदिं शीर्ष ठेवी
सप्रेम अर्पण असो प्रणती तुम्हांतें
आलिंगन प्रियकरा, मम अंगनेतें ॥ २४ ॥
की घेतलें व्रत न हें अम्हि अंधतेने
लब्ध-प्रकाश अितिहास-निसर्ग-मानें[1]
जें दिव्य, दाहक म्हणूनि असावयाचें
बु[2]द्ध्याचि वाण धरिलें करिं हें सतींचे ॥ २५ ॥

- लंडन, १९१०

## ५१. आत्मबल

(परिचय – मार्सेलिसला बोटीवरून निसटण्याचा प्रयत्न केला, त्याचा सूड म्हणून आपला अमानुष छळ होणार ह्या जाणिवेने अशा छळास पुरून उरेल अशा धैर्याचा पुरवठा करण्यासाठी कवचमंत्र म्हणून सावरकरांनी ही कविता रचिली.)

(चाल : चामराचे सुरावर)

अनादि मी अनंत मी, अवध्य मी भला
मारिल रिपु जगतिं असा कवण जन्मला ॥ ध्रु. ॥
अट्टाहास करित जर्डी धर्मधारणीं
मृत्युसीच गाठ घालु मी घुसे रणीं
अग्नि जाळि मजसी ना खड्ग छेदितो
भिउनि मला भ्याड मृत्यु पळत सूटतो
खुळाऽरिपूऽ । तया स्वयें
मृत्युच्याचि भीतिने भिववु मजसि ये ॥ १ ॥
लोटि हिंस्त्र सिंहाच्या पंजरी मला
नम्र दाससम चाटिल तो पदांगुला
कल्लोळीं ज्वालांच्या फेकिशी जरी
हटुनि भंवति रचिल शीत सुप्रभावली
आण तुझ्या तोफांना क्रूर सैन्य तें
यंत्र तंत्र शस्त्र अस्त्र आग ओकते
हलाऽहलाऽ । त्रिनेत्र तो
मी तुम्हांसि तैसाची गिळुनि जिरवितो ! ॥ २ ॥

– समुद्रमार्ग, १९१०

## ५२. पहिला हप्ता

(परिचय – १९१० सालचा डिसेंबर. खटल्याचा निर्णय लागून फाशीची नि काळ्या पाण्याची शिक्षा आरोपितांस होणार! सावरकरांना सर्वांत कठोरतम शिक्षा मिळून त्यांच्या स्वतंत्र आयुष्याचा अंत होणार हें पाहून त्यांनी आपल्या बरोबरच्या देशभक्तांत जे शीघ्र सुटण्याचा संभव होता त्यांच्या हस्ते आपल्या मातृभूमीस आणि देशबांधवांस आपल्या ऋणाच्या फेडीचा हा 'पहिला हप्ता' धाडला.)

(जाति : गोविंद)

मानुनि घे साची । जननि गे । मानुनि घे साची
अल्प स्वल्प तरि । सेवा अपुल्या अर्भक बालांची ।। ध्रु. ।।
ऋण हें बहु झालें । तुझ्या स्तनींचे स्तन्य पाजुनी धन्य अम्हां केलें
ऋण तें फेडाया । हप्ता पहिला तप्त स्थंडिलिं देह अर्पितो हा
सवेंचि जन्मुनियां । त्वन्मोचनहवनात हवी करू पुन:पुन्हा काया
सारथी जिचा अभिमानी । कृष्णाजी आणी । राम सेनानी
अशि तीस कोटि तव सेना
ती अम्हांविना थांबेना
परि करुनि दुष्टदलदलना
रोविलची स्वकरीं । स्वातंत्र्याचा हिमालयावरि झेंडा जरतारी ।। १ ।।

– मुंबई, १९१०

# ५३. सप्तर्षि

कारागृहातील प्रथमाह्निकी (पहिल्या दिवसाची डायरी)

(परिचय : स्वातंत्र्यवीर सावरकर प्रथम अिंग्लंडमध्ये पकडले गेले. त्यामुळे तो लंडनच्या 'ब्रिक्स्टन' जेलमधला पहिला दिवसच त्यांच्या बंदिगृहातील खरा पहिला दिवस होय. पण ती नुसती अटक होती. अशा प्रसंगी न्यायनिवाड्याच्या चौकशी, खटले, अपिलें प्रभृति कितीतरी अुलाढाली होत होत क्वचित् सुटकाही होण्याची निश्चिति नसली, संभवही नसला, तरी अगदी असंभवनीयताही नसते. त्यातही पुढे मार्सेलीस प्रकरण अुद्भवून सारा देशविदेश 'सावरकरांना फ्रान्सला परत द्यावें लागणारच! सावरकर सुटणारच!' अशा ध्वनीने निनादून अुठला. तेव्हा नाही म्हटलें तरी सुटकेच्या आशेचा किरण त्यांच्याही मनात डोकावून जाअीच. परंतु शेवटी दोन जन्मठेपींची भयंकर शिक्षा वज्रलेप झाल्याची नक्की बातमी ज्या दिवशी आली, स्वतंत्र नागरिकाचे कपडे जे तों वेळ त्यांचे अंगावर राहू दिले होते तेसुद्धा छिनावून घेअून पुनः जन्मात न अुतरण्यासाठी काळ्या पाण्याचे कपडे त्यांच्या अंगावर घातले गेले, तो शिक्षेचा पहिला दिवस मात्र त्या अटकेच्या पहिल्या दिवसापेक्षा, बंदिगृहातील खरा खरा पहिला दिवस ठरला! त्या काळी काळ्या पाण्याची जन्मठेप अैकताच शेकडा पाअुणशे निर्ढावलेले बंदिवानसुद्धा 'फाशी द्या, पण तें काळी पाणी नको!' म्हणून मटकन खाली बसत! 'काळें पाणी' हा शब्द अितका भयंकर असे! तीच गति आपली झाली ह्यात त्या दिवशी वेड्या आशेलादेखील लवलेश शंका अुरली नाही. सती जायला म्हणूनच चितेवर अढळ स्थान मांडिले असताही चिता प्रत्यक्ष भडकताच सतीला जसा खरा चटका बसतो तशीच धृतीची स्थिति झाली. त्या विव्हलतेच्या विषाचा अुतारा म्हणून मन जें विवेकाचें प्रतिविष पिअू लागलें तों तेंही, पिता पिता तरी विषासारखेंच दुःसह होणारच! त्या विषप्रतिविषांच्या लहरींचा पहिला झटका, मनातील विरहविवेकांची ती खळबळ, त्या शिक्षेच्या पहिल्या दिवसाच्या कार्यक्रमाची 'आह्निकी' (Diary) होणाऱ्या ह्या कवितेत स्वतः त्यांनीच त्या वर्षी पुढे ग्रंथिली. रचनाकाल सन १९११)

(आर्या–गीति)

सप्तर्षींनों अैसे तुम्हांसी विश्ववाद करिता ते
कोठेंही देह पडो तरि त्याचा खेद काय चित्ताते! ॥ १ ॥
अंधारकोठडीच्या हरण्या हृदिच्या तशा तमाला ही
मज विश्वदीप्ति संतत तुमच्या देवोत सातमालाही ॥ २ ॥
रुद्राक्षांच्या तैशा यदलकिं ह्या साज सात मालाही ।
त्या व्योमकेश देवा वाही कविता सदुत्तमाला ही ॥ ३ ॥

त त त

आशाचि! फलाशाचि!! अेक्या घ्यावें धृती कशी तडके ।
मुक्ता[50] वदली त्याचें कचेंचि तसें मना तुझें मडकें ॥ १ ॥
गेहीं गेहीं स्वपुरीं फिरतीं घेअूनि दीप हातीं तो ।
ज्यांसी हुडकू निष्फल, परतुनि येता गृहीं पहाती तों ॥ २ ॥
तस्कर ते अपुल्याची गेहीं निश्चिंत सर्व असलेले ।
दीपा! तुझ्याचि खालें पटल तमाचें लपूनि बसलेले!! ॥ ३ ॥
स्मरुनी नैष्काम्याचा करिता अुपदेश तै जगाला जो ।
स्पृहणीय दाविलासी अुत्साह अदम्यसा, अगा लाजो ॥ ४ ॥
माझ्या मना! तशा तुज हें मन माझे असें! अहा साचा ।
हे सहसाश्रू माझे फुगवीतिल पूर सदुपहासाचा! ॥ ५ ॥
वत्सर झाले, झालें कारागृह गृह अनन्य मज; गमला ।
नचि मोह, न चंचलवी विरहाची ही असह्य आग मला ॥ ६ ॥

---

[50] संत मुक्ताबाअी.

गमलें, स्वभावची हा बनला निष्काम कर्म सांग तसें ।
तो भास परि! मना! हा तवचि निरुत्साह आज सांगतसे ॥ ७ ॥
न्यायालयांत होअिल निर्णय जो काय ही अनिश्चितता ।
जाअुनि होताचि अजी मोचन ना शक्य ही सुनिश्चितता! ॥ ८ ॥
स्फुरलें ना म्हणुनि तुवा केला निश्चय मुळीच तें शमलें, ।
दिसलेंना जें म्हणुनि नाहितसेंची मना! तुला गमलें ॥ ९ ॥
पंथि अनिश्चिततेची परि ती विझताचि हृत्तमीं कुठले ।
लपले विकारतस्कर गेहिंच ते हे तुझ्यावरी अुठले! ॥ १० ॥
आशाचिं! फलाशाची! स्वार्थाची ना? तथापि आशाची ।
विणितेचि परार्थाशा स्वार्थाच्या सम कठोर पाशाची ॥ ११ ॥
लांब नअू न पदें जीं रुंद पदें पांच ही नसे पुरती ।
यद्भित्तींच्या भयसम काळें डांबर अलंकृती वरती ॥ १२ ॥
खिडकी ना जाळी ना अेकहि खोली अशीच अभगा, जे ।
बंदीशालेमधि ही अेकलकोंडी म्हणोनिया गाजे! ॥ १३ ॥
लोहगजांचें तिज हें दार अरुंदचि, दिनींहि कुलुपातें ।
लावूनि बंद ठेवायासी केवल! न चक्षु घूकातें ॥ १४ ॥
अितुकें पूर्ण विसंगत गमती! बाजूंसि अेकही न वसे ।
नीचहि हो परि माणुस कोणि न बोलावया मिळे नवसें ॥ १५ ॥
तैसेंची हें जेथे तरुपल्लव ही मिळे न नवसासी ।
अंगण अरुंद पुढती दुर्मुखलेलें, जयांत दिवसासी ॥ १६ ॥
वाळत अुन्हात पडती कैद्यांची कांबळीं अणी तरटी; ।
कोटावरी सामोरी बांधितसे घूक कावळा घरटीं ॥ १७ ॥
मानव जाति-बहिष्कृत, पाहूंही ज्या मनात दचकावें, ।
अेक्या राज्यास्तवही ज्या संबोधावयासि वचकावें ॥ १८ ॥
संवादप्रिय अितुका मनुज मनाचा निसर्ग! पापांशी ।
अैशांसही शिराणी गमतें बोलावयास, जैं पाशी ॥ १९ ॥
वाग्दुष्काळाच्या ह्या तळमळतो जीव की तुरुंगात ।
चड्डी आणि बंडी खादीची रखरखीत अंगात ॥ २०॥
टोपी नामा पिवळी झोळी झाकीत कवच माथ्याचें ।
अेक चवाळें काळें, शयना काटेरि तरट काथ्याचें ॥ २१ ॥
स्नाना पाना प्रातर्विधि समयास्तवहि अेकची होतें ।
जलपात्र, अपात्रहि जें जस्ती हस्तार्थ मापटें हो तें ॥ २२ ॥
जस्ती पदक प्रतिपदिं वक्षिं पुकारित सजा सदा रुळतें ।
चरणांत लोहदंडाबेडी दुस्वन भयाण खळखळते ॥ २३ ॥
वाळे जिचे सकीलक-कंटक, ती तीन शेर वजनाची ।
खाअी दैवहतांचीं सोलुनि जीं, सांतडीं नवजनांचीं ॥ २४ ॥
बिलगे कटिसी ती, पद टाकू नेदीच सहज दिवसाही ।
वळतां स्वप्नीं पुसल्याविण डसतेची, न भंग लव साही! ॥ २५ ॥
नव पद खोलीमाजी जेवूं बैसे तिथेचि जडकुंडी ।
हट्टे फुंकुनिया जी घाण, घ्राणा करीत रणकुंडी ॥ २६ ॥

‘तनु घृण्य! निंद्यतनु ही!’ बोधित अवधूत कीं पिसा कोणी, –
शौचादि नित्य–कर्मा अेक अनावृत असे चतुष्कोणी ॥ २७ ॥
खायासि खापराची थाली, लंगोटि ही क्वचित्, सारा ।
संसार आमुचा हा, शिकवी तदधिक अवश्य न पसारा ॥ २८ ॥
जितुका जनीं अवश्यक समजुनि झटताति लोक मिळवाया ।
अनवश्यक तो, ज्वर तो, क्षीण करी श्रांत मनुज–बळ वाया ॥ २९ ॥
प्रातःकाळीं आला कळवू, कारागृहाधिपति मजला ।
झाली सजा अहा! हीं वर्षे पन्नास की पुरीं तुजला! ॥ ३० ॥
अभ्यासकठोरहि तें हृदय तयाचें सखेद कळवळलें! ।
परि हें स्मित मद्वदनावरुनी, श्रवणें न लेश मावळलें ॥ ३१ ॥
तोंची वस्त्रें माझीं सहवासाचीं हिरोनिया मजशी ।
देता बंदीचीं, तीं केली धारण करीच राम जशीं ॥ ३२ ॥
मंत्र तसाची वारंवार स्फूर्त्यर्थ मी सदा साचा ।
वर्णितरामविवासन जपता तो श्लोक कालिदासाचा![51] ॥ ३३ ॥
जाताचि परी अधिपति सोडुनी मज अेकला सशृंखळ तो ।
सहसाचि लोट तत्क्षण दुःखाश्रूंचा अदम्य खळखळतो!! ॥ ३४ ॥
वर्षे पन्नास! अहा! वर्षे पन्नास हीं! अहा! वर्षे!
ध्वनि हा पुनः पुन्हा ही मजवरि पाअूस की तसा वर्षे! ॥ ३५ ॥
वर्णित–राम–विवासन मंत्रहि तो म्यां पुनः पुन्हा जपला ।
चळत्या धैर्यासहची अुलटुनि वदली स्मृतीहि परि चपला ॥ ३६ ॥
सीतेसंगीं अैशा अविकृत रामेंहि तव अहा कां ना ।
जाता सीता व्याकुल केलें वन देत करुण हाकांना! ॥ ३७ ॥
अश्रु तुझ्या विरहाचे; वृत्ति प्रीते! न कोमला का ही ।
शोभाची हृदयाची! प्रीते तुजविण नको मला काही!! ॥ ३८ ॥
आणी पुनः पुन्हाही म्हणता माझ्याचि मी मना ‘नाही’ ।
मुक्त्यब्द कवण पाही! सोडि अशक्या न कामनांनाही! ॥ ३९ ॥
यावज्जीवन शिक्षा तीं वर्षे पंचवीसची गणती ।
पापकृत्तमास्तव ही याहुनि बंदी अवैधची म्हणती ॥ ४० ॥
होतो सिद्धचि शिक्षा शक्या अधिकांत अधिक ही भरण्या ।
वर्षे आयुष्याचीं अत्युत्तम पंचवीस तीं करण्या ॥ ४१ ॥
कारानलात हुत मी तिळतिळ जाळोनि देह, कार्याते ।
अत्युत्तमाचि अुद्धाराया जननी स्वभूमि आर्या ते ॥ ४२ ॥
द्वीपांतरातुनी की–धैर्या अुत्साह अेक दे हाची ।
येअू शकेन रक्षा ठेवू ह्या पुण्यभूत देहाची ॥ ४३ ॥
‘वर्षे पन्नास!’ परी अैकुनि अुत्साह तोहि कोसळला ।
सुकला तरंग अंतिम होता जो मृगजळात सळसळला!! ॥ ४४ ॥
परचक्रदुर्विलासारभोगी पडदा करूनि तमसाचा ।
अपराध देश जागृतिरपरवश देशात घोरतम साचा! ॥ ४५ ॥

51 ‘दधतो मंगलक्षौमे वसानस्य च वल्कले । ददृशुर्विस्मितास्तस्य मुखरागं समं जना: ॥– कालिदास

तरि का शिक्षा जी मज यावज्जीवन भरोनि न सरे ही ।
अिच्छिति पर हे भरणें म्यां ती घेअूनि जन्म दुसरेही ! ॥ ४६ ॥
शिक्षेच्या परिसीमेची परिसीमा ![52] सुदुर्भगा ठाया ।
शक्त स्वप्नी देखिल होअी मत्कल्पना न गाठाया ॥ ४७ ॥
दीर्घायूची कीर्ती कृतिही स्मरली किती मनाने ती; ।
बंदीत त्या तअीं मम थोराथोरासि कामना नेती ॥ ४८ ॥
वर्षी अशीतितमिं नवरोजी[53] क्षेत्रीं अुभा स्वराज्याच्या ।
तो श्रीकुमार[54] खडा भीती देशघ्न भास्वरा ज्याच्या ॥ ४९ ॥
तो डिझरायलि,[55] तो तत् प्रतिपक्षीही,[56] सुवाक्प्रभूवर ते ।
जे मल्ल झुंजती त्या लोकसभेच्या विवादभूवरते ॥ ५० ॥
ते जरि अैशींमाजी देती तिशिच्याहि यौवना लाजे ।
कां हे निराशता मज सुटकेची ही छळी मनाला जे ॥ ५१ ॥
श्रीभाष्याची[57] विणता पावनरवाक्कुसुम–शुभ्र–माला ही ।
जो शुद्धबुद्ध[58] भगवान् वीर पराभवि भवभ्रमालाही– ॥ ५२ ॥
तो बुद्ध ! रअहा ! तो त्या तृष्णोच्छेदक पवित्र सत्स्मरणे ।
ये लज्जेने माझ्या तृष्णाव्याकुल मनाप्रती मरणें ! ॥ ५३ ॥
तृष्णासमर्थनासी आठवि माझी विमूढ आशा ते ।
तृष्णाच्छेदक त्याची मारजितासीरस्वकीय नाशातें ! ॥ ५४ ॥
सत्कार्यपिपासाही तृष्णाचि[59] न कां ? न सुखविलासाची ।
तरि देशकार्य सक्तिहि विरहाहुनि जी छळी तुला साची ? ॥ ५५ ॥
वैतागे मी बघुनी धृतिचा ढळलाचि नित्य नेम, गती ।
दुःखद होय; दिवाळें काढुनिया आपुलें मनें मग ती ॥ ५६ ॥
अपुली आशा–पेढी जाळियली ! तों अहो कसें नवल ! ।
आशेच्या रक्षेतुनि मंजूषा अुद्भवे प्रभा–धवल ! ! ! ॥ ५७ ॥
मन अुत्साहे भरलें; गुरुकिल्ली जी कृपा महंताची ।
त्या तुकयाची लावुनि अुघडुनि म्या कुलुप तें अहंताची ॥ ५८ ॥
अुचली झांकण नैराश्याचेंरआतूनि सुखनिधान असे ।
सर्वोपाधिरप्रभु जें, मोक्षाचें जें महाविधान असे ॥ ५९ ॥
तें वैराग्य ! रविनाश न अनुरागाचा विकासची[60] परि तो ।
चिंतामणि सम चमके ! चिद्गम्या मी महोत्सवा करितो ! ॥ ६० ॥

---

[52] जन्मठेप म्हणजे २५ वर्षे अशीच समजली जाअी. पण दोन जन्मठेपी मोजून ५० वर्षे काळेंपाणी ही शिक्षा त्या वेळीही अेक अश्रूतपूर्व गोष्ट होती ! शिक्षेची परिसीमा जन्मठेप - पण ही जन्मठेपेवर आणखी जन्मठेप- परिसीमेहून परिसीमा.

[53] दादाभाअी नवरोजी.

[54] सत्तावन्नच्या क्रांतियुद्धातील स्वातंत्र्यवीर राजा कुंवरसिंह हें अैंशीव्या वर्षी अतुल शौर्याने अिंग्रजांशी लढले; अनेक रणांत विजय पावून , समरीं पडलें.

[55] डिझरायली.

[56] त्यांचे प्रतिस्पर्धी ग्लॅडस्टनसाहेब.

[57] श्री. रामानुज अैंशीव्या वर्षी प्रचारकार्ये करीत असत.

[58] भगवान गौतम बुद्ध - हेही अैंशी वर्षे जगले. तसा मीही जगून ही पन्नास वर्षे शिक्षा भोगून परत मातृभूमीत देह ठेवण्यापुरता तरी परत जाअू शकण्याचा संभव कां नसावा ? हा भावार्थ.

[59] समर्थांचे वचन 'स्वार्थ गेला ताटातुटी । जडली परमार्थ अुपाधी' तुलनार्ह आहे.

[60] अनुरागाचा विनाश नव्हे (तो वैताग होय.) पण खरें वैराग्य म्हणजे अनुरागाचा विकासच होय.

बंदी पन्नासचि ना वर्षे ? पन्नास कल्पना ही तो ।
आभासरकाल केवल, वस्तुस्थितिचा पदार्थ नाही तो ! ॥ ६१ ॥
बंदी ? ती आत तशी बाहेरहि ह्या शिवासि जीवाची ।
पगडा तुजवरि पांचा वृत्तींचा तोंवरी न केव्हाची ॥ ६२ ॥
आनंद गवसणारा मुक्तीचारतुज तुरुंग मानस हा ।
त्याचा बंदी जो तू तो जूं हें वाकवूनि मान सहा ॥ ६३ ॥
परि करुनि चित्तवृत्तींचा तू अपुल्या निरोध, साम्याने ।
मन हस्तगत स्ववशीं, ठेविशि कीं खड्ग हा जसा म्यानें ॥ ६४ ॥
अीश-प्रणिधानाच्या[६१] अुमजुनियां हृद्गता जसें जनकीं ।
गुण वर्तती गुणी, मी साक्षी केवळ तया निरंजन की ॥ ६५ ॥
जें सत्य-परम शाश्वत-तेथे स्थापुनि अचंचला मतिते ।
अुपहसुनी तदिदर या गुणवृत्तींच्या[६२] सहस्त्रविध गतिते ॥ ६६ ॥
जरि डोलशील बापा परमानंदात-कवण तुज तरि ते ।
अेकलकोंडी कोंडी ? किंवा अंधार कोठडी करिते ॥ ६७ ॥
तू अंतर्ज्योति ! तुला अंधःकारात घाबरा ? पाहे ।
सुखदुःखाचें साधन बाह्य न परि ह्या मनात बापा हें ! ॥ ६८ ॥
राजगृही काय कमी ? पक्वान्नें पांच नित्य शिजतात; ।
प्रासादतल स्फटिकी, कळस सुवर्णांत, घुमट रजतात ॥ ६९ ॥
चमकत गर्वे घेती अनुदिन शतशतसहस्त्र मुजरा जे ।
चतुरंग सिद्ध शब्दा झेलायासी खडी चमु ! जरा जें ॥ ७० ॥
परि त्या प्रासादांचें निरखिशि तू सूक्ष्म अंतरंग तसें ।
जरि तोलशील कैसा पर्णकुटीचा महंत रंगतसे, ॥ ७१ ॥
अुमजेल तरि तुला की बाह्यनिधीमधिं वसे न सुखधन तें ।
रागोपहतिर्भोगान्नचि की, संतोष सौख्यसाधन तें ॥ ७२ ॥
पक्वान्नें पांचचि तीं नाहीत सहा म्हणोनिया राजा ।
कोणी बटीक अपुली साध्य न होअी म्हणोनि युवराजा ॥ ७३ ॥
सोन्याचेचि कळस ते नचि रत्नांचे म्हणोनिया राजा ।
केला मुजरा कोण्या सामंते ना, म्हणोनि युवराजा ॥ ७४ ॥
होअीन हाय ! केव्हा ? मी अधिराजा, म्हणूनिया राजा ।
राजा होअिन केव्हा ? आहे त्याचा म्हणूनि युवराज ॥ ७५ ॥
दुःखी सदैव ! राजे झाले वेडे किती ! किती त्यांहीं ।
छळ सोशिले ! सुखाच्या दुःखें घडल्याचि आत्महत्याही ! ॥ ७६ ॥

---

[61] 'अीशप्रणिधानाद्वा' पातंजल योगसूत्र.
[62] 'गुणवृत्तिविरोधाच्च' योगसूत्र.

तो भीमसिंग[63] अेलाग्याबूलस[64] तो, शहा ‘जहानाचा, [65]’ ।
माधव[66] गर्भ श्रीमंतीतचि मोठा न का लहानाचा ॥ ७७ ॥
हें चित्र पहा– आणिक हेंहि पहा चित्र संत तुकयाचें ।
नित्यानंदी फुललें मानस, हो मानसा[67] कुतक याचें ॥ ७८ ॥
मी डोंगरीत[68] बंदी असता वृत्तान्त परिसिला कानी ।
होते सन्निध कोणी अवलीया, ज्या अनंत लोकांनी – ॥ ७९ ॥
वंदू द्वारी अनुदिन तिष्ठावें दाट, ते स्वये बसती ।
अेकान्त; आत्मरतिने डुलती झुलती मधेच वा हसती ॥ ८० ॥
परमानंदाचा जैं सावे न हृदी वरी अुमाळा तो ।
अुसळे! पायाखाली गालीचा जीर्ण कुसुममाळा तों – ॥ ८१ ॥
भाविक भक्तांहीं ज्या खिडकीतुनि फेकिल्या, जशा गळल्या ।
भूवरि आत तशाची फिरता चरणी धुळीत चुरमुळल्या; ॥ ८२ ॥
बंद मठीत दुरोनी फेकिति जन जे जिथे तसें पडतें ।
प्रातःकाली खोली झाडू ये त्या तसेचि सापडते ॥ ८३ ॥
मोती मखमल, मेवे–सावरुनी त्या जरी निके रचितो ।
तरि ‘ने! कशासि येथे? ने ने झाडूनि सर्व केरचि तो!’ ॥ ८४ ॥
काकुळतीने अैसे विनवुनि करवूनि, रिक्त खोलीला, ।
खेळे अवधूत पुन्हा परमात्म्याशी पवित्र तो लीला! ॥ ८५ ॥
दशवत्सर अेकान्ती खोलीमाजीच त्या असे वसती ।
खाती किंवा निरशन आच्छादित वा अवस्त्रची बसती ॥ ८६ ॥
जेथुनि हिरवें अेकहि शेत, न वा मंजु विहग, वा सर वा ।
आकाशही दिसेना, न–कळे की अब्द–मास–वासर वा; ॥ ८७ ॥
जी नित्य अशी तमसाच्छन्नचि की ही मदीय काराही ।
अेकलकोंडी किंवा अितुकी मढली न अंधकाराही ॥ ८८ ॥
त्या कोठडीत अपरिग्रह[69] दे सर्वोपलाभ ह्या–ह्यांच्या ।
कैवल्यानंदाचा अवलंब वरी न बाह्य विषयांच्या ॥ ८९ ॥
‘विषमप्यमृतं’[70] न ‘क्वचित्’ नित्यचि ह्या सुखद दुःखविष, यांच्या ।
कैवल्यानंदाचा अवलंब वरी न बाह्य विषयांच्या!! ॥ ९० ॥
दुःख–सुखाचें केवल अवलंबुनि बाह्य विषय जें असतें; ।
सुखतत्त्व विशुद्धचि जें, सुख तें की आत्मरतितचीं वसतें ॥ ९१ ॥
हें सत्य हृदी चमके! धृतिने आकंठ मन पुन्हा भरलें; ।
मज केवि निरुत्साहे क्षणचि परी की खिळूनिया धरलें ॥ ९२ ॥

---

63 राजपूत राणा, वेड लागून मेला!
64 रोमन बादशहा. गिबनचा अितिहास पहा.
65 शहाजहानाचा. पृथ्वीचा शहा! औरंगजेबाचा बाप.
66 सवाअी माधवराव ह्या सगळ्यांचा दु:खदायी शेवट प्रसिद्धच आहे.
67 मानस सरोवर.
68 डोंगरी तुरुंग - मुंबअीचा.
69 अपरिग्रहप्रतिष्ठायाम् सर्वरत्नोपलाभ: । - योगसूत्र.
70 हें कालिदासाचें अवतरण - विषमप्यमृतं क्वचिद् भवेदमृतं वा विषमीश्वरेच्छया ।

झालें लज्जेने ह्या ओशाळें! तनुभयासि नच नतसे ।
मन्मन मदुक्तची तैं प्रथित स्मरलें स्वपूर्ववचन[७१] न तसें ॥ ९३ ॥
कथिले जें म्या देऊ दिव्योत्साहा तदा मदीय जना ।
यज्ञी त्या जैं सजलो स्वप्राणाच्या करावया यजना ॥ ९४ ॥
''पडले शत शत मत्सम तरि का अगतिक असेल भारत,[७२] हा!
श्रीकृष्ण सारथी यद्रथ हाकाया स्वये अुभा रत हा?'' ॥ ९५ ॥
मूर्खा थांबेलचि की पृथ्वी कारे तू जरी मरशी?
अुपहसत असें माझें वचनचि माझ्यावरी करी सरशी! ॥ ९६ ॥
निश्चिंतचि मग बसलो पल मी, परि तें बघूनि रागेले ।
'नाअिक' सोलायासी काथ्या लावुनि मला जरा गेले ॥ ९७ ॥
श्रम ते शांत मने मी लागे करण्या सवे करीं धरुनी, ।
स्वे स्वे कर्मण्यभिरत संसिद्धिसि लाभताति ते स्मरुनी ॥ ९८ ॥
जाता सोलाया जो काथ्या निघति स्वहस्त सोलोनी ।
पिंजुनि दिधला नियमित तितुका सोन्यासमान तोलोनी ॥ ९९ ॥
तों दिवस मावळू ये, मग ज्या होतो धरूनि नियमासी ।
चित्तैकाग्र्यासी मी साधित अेकान्त विगत षण्मासी; ॥ १०० ॥
ख्यात विवेकानंद प्रभु तो जो त्या महावितृष्णाचा ।
शिष्योत्तंम श्रीमान् भगवद्भूदेव रामकृष्णाचा; ॥ १०१ ॥
जडवादी अश्रद्धा मतिचा काही विकल्प असत्याशी ।
आम्हासि कपिल पातंजलिसूत्रित त्या सुसूक्ष्म सत्याशी ॥ १०२ ॥
जडवस्तुशास्त्रभाषेतचि जो पटवी, तदुक्तिने पटता ।
योग न गौप्य परी तें शास्त्र, करी अेकतंतुता पटता ॥ १०३ ॥
नियमानुरूप त्या मी चित्तैकाग्र्यीं करावया प्रगती, ।
पुरती 'सक्तमजूरी' होताची की धुवोनी कर मग ती; ॥ १०४ ॥
योगी राजाचा त्या ग्रंथ श्री राजयोग मी अुघडी, ।
शांत रसाचा पेला दूर करावा गमेचि जो न घडी; ॥ १०५ ॥
तत्रस्थ समाधिस्था तन्मूर्तिसि देवमूर्तिसमचि नतें ।
वंदुनि नासाग्री की रोवियलेची सदृष्टि म्या मन तें ॥ १०६ ॥
मन हें चंचल भारी! दुर्निग्रह भासलेचि साधुजना, ।
जडजीव अनभ्यस्तचि त्यात अम्ही; आवरेचि तें मज ना! ॥ १०७ ॥
प्रिय अप्रिय हेंचि कळ, नकळे परि विहित वा तयास हित; ।
जिकडुनि तिकडुनि धावे ठकवुनि बुद्धीस अिंद्रियांसहित! ॥ १०८ ॥
वेडा निसर्ग आहे मनुज मनाचा जरी असा पडला ।
तरि दुष्कर भूसेवाव्रति जो काही करात सापडला ॥ १०९ ॥
निष्काम कर्मयोगाचा मज ठेवा, तया बळे आधी ।
लेश वशंवद होतें स्वच्छंदाची सुटोनि मन आधी ॥ ११० ॥
यास्तव तें जरि जेव्हा तेव्हा अितरत्र सहज लव जातें ।

---

71 'माझेंच पूर्वीचे पद मला धीर देतें झालें' ते पद 'पहिला हप्ता' म्हणून ह्या ग्रंथात छापलें आहे.

72 मुख्य चिंता ही वाटे की क्रांतीच्या चळवळीचा ह्या आपल्या काराबद्धतेने मोड होतो कीं काय? भारत हटतो कीं काय? - त्या शंकेचे ह्या पदात समाधान आहे.

तरि पकडताचि लज्ञाहत दे सोडोनि वृत्ति भवजा ते ॥ १११ ॥
घेता घेता अैशा वृत्ती ध्यानस्थ चित्ति विलयाते ।
ये सुखद अनुभवाया आत्मरतीचा प्रसाद तिल याते ॥ ११२ ॥
मोहक मोहक झरती शांत रसाचे हृदात पाझर ते ।
कैवल्यामृत निधिचे अुडता काही तुषार ओझरते! ॥ ११३ ॥
तिलही प्रसाद तुमच्या प्रभुजी! मजसी अदृष्ट चरणांचा ।
जरि की शीतलवी पल मज समही हो त्रिताप शरणांचा ॥ ११४ ॥
असणारचि तें तरि की जें तव अधरामृतासि प्यालेले ।
हे केवल! त्या कैवल्यानंदाच्या पुरात न्हालेले!! ॥ ११५ ॥
बंदी वारंवारहि ''कस्मै देवाय''[७३] त्या! तअीं भावें ।
लाभास्तव स्तवार्हा सद्गुरुच्या हें स्वचित्त लोभावें ॥ ११६ ॥
श्री रामकृष्ण जैसे अैकुनि जडवाद दिव्य हेतूचे, ।
मोक्षार्थचि त्या अश्रद्धाचे, सत्यार्थ तर्ककेतूचे, ॥ ११७ ॥
अन्वर्थ नरेन्द्राचे[७४] 'ओीश्वर नाही' वदे 'वदावा; वा ।
आस्तिक्य सत्य, परि तो मजसी प्रत्यक्ष देव दावावा!'' ॥ ११८ ॥
स्पर्शुनि हसले ''बाला! अचिरचि तू पाहशील देवाला!
स्पर्शेचि या विवेकानंदा घे, केवला न नांवाला! ।।'' ॥ ११९ ॥
स्पर्श तसा करुनि तसा देवा दाविल मला अहा काय
गुरु लाभे तो? कुरवंडीन तयावरुनि आजि हा काय! ॥ १२० ॥
सकल गुरूंचा गुरुवर! भगवान् श्रीकृष्णजी स्वये कथिती,
अमृता अमृतास्तव जैं धर्मक्षीराब्धिला पुन्हा मथिती ॥ १२१ ॥
भिन्नमता गमताती यद्यपि बहु भिन्न दिक् प्रवाहांहीं ।
रसवाहिनी रसातलिं, गमतो निष्ठुर विरोध वा हाही ॥ १२२ ॥
अंतर शत शत कोसांचें तें त्यांच्या पथांत पाहुनिया; ।
परि अचलाधिप शिखरीं निश्चल काही मुहूर्त राहुनिया ॥ १२३ ॥
विस्तीर्ण आसमंतात् भूमीचा चित्रपट अशेषतया ।
दृष्टिक्षेपी घे त्या नाढळतो तो विरोध दोष तया ॥ १२४ ॥
अेक्याचि द्यौस्तनाच्या पिअुनि पयासी अनंत मार्गाने
प्रभु नियत कर्म करिता, शस्यें सुफलें, जलें, फुलें, गानें, ॥ १२५ ॥
तत्तद्योग्ये भोग्ये नानाविध रंजवीत देशातें ।
अेकाचि नद नद्या त्या अंतीं आलिंगिती नदेशाते[७५] ॥ १२६ ॥
ज्ञान भक्ति कर्मादिक धर्ममतें तेवि साम्यता वरुनी ।
योग्यी अनन्य योजक गमती अत्यधिकेचिया वरुनी ॥ १२७ ॥
तत्त्वप्रभसौवर्णाद्रीच्या ज्या, जीव यद्वचे तरती ।
श्रीमद्भगवद्गीता भावाने वाचिली अनंतर ती! ॥ १२८ ॥
छाया सांजेची ये तों की, पुढती दिसे न वाचाया ।
मग जो ब्रह्मीभूतचि, असताही देह मानवाचा या ॥ १२९ ॥

---

73 'कस्मै देवाय हविषा विधेम' ह्या प्रख्यात वेद–ऋचेतील त्या अज्ञात देवाला ।

74 विवेकानंद.

75 नदेश – समुद्र.

त्या तुकयाच्या भावे भक्तिरसपरिलुप्ता अभंगा या ।
लागे, व्यायामा मी फिरता नवपद बिळात त्या, गाया ॥ १३० ॥
दंडा बेडीचे जे वाळे ते टाळ करुनिया नामी ।
भजना त्या गुणगुणता वाजविले ताल धरुनि यांना मी ॥ १३१ ॥
रात्री अर्धमुहूर्ता नगरांतुनि देवदर्शने करुनी ।
गृहिणी गेही येता प्रज्वलिती वह्नि धूम फुंकरुनी, ॥ १३२ ॥
हस्ती जुअिसम सुरभी धुतले तांदूळ घेत असताना ।
स्मरताति दशन मुकुला अपुल्या बालाचिया विहंसताना ॥ १३३ ॥
गुणगुणत गीत काही, लगबगिने भात वैरुनी, त्याही
नसतील अजुनि ल्यालीं वस्त्रेंही सोवळीं सुदत्यांहीं; ॥ १३४ ॥
सायंकाल असा की रात्री माजीं पुरा न जो विरतो ।
तों निर्दीपा अेकलकोंडी भवती तमोनिधी भरतो ! ॥ १३५ ॥
आणी फेकिव किरणा, मज केवल दाविण्यासि तम कां तो ! ।
आसन्नमरण नाडी जेवी निस्तेज तेवि चमका तो ॥ १३६ ॥
अपुल्या मधेचि घेता, पाहुनि ज्यांना न घूकही पळतो, ।
कंदील अेक मिणमिण अंगण सोडुनि पलीकडे जळतो ॥ १३७ ॥
लोहगजांच्या दाराजवळी येअून सहज मग बसलो ।
बाहेरच्या तमासचि जाता डोळे बघू तया हसलो ॥ १३८ ॥
दृक्शून्य तमीं नयना भुलवुनिया दृश्य कोणतें तें ने ! ।
जो धर्म अिंद्रियांचा करु तो धावेचि तें अवशतेने ! ॥ १३९ ॥
बसलों तों दिसली मज तेजाची चमक अेक ओझरती
लवुनी निरखी पुनरपि तों चमके चांदणी नभी वरती ! ॥ १४० ॥
ज्योतिर्विद ते जैसे अवकाशाची पुनः पुन्हा गणती ।
करुनी शतदा, वेधा साधुनि, शोधावया नभोगण, ती ॥ १४१ ॥
डावी, अुजवी, पुनरपि कलती, वरती, तशांत अति, कमती,
नलिका सुदर्शनक्षम करण्यासी दूरदर्शनी श्रमती ॥ १४२ ॥
मी मान तशी शतदां त्या लोखंडी गजांसि रोवुनिया, ।
तिरपी शिरपी परि ती रोधे त्याची स्वदृष्टि खोवुनिया ॥ १४३ ॥
त्या फटितूनी दिसली चमक जिथोनी; सवेचि देहाते ।
मुडपुनि फरशी वरती खाली, धरुनी गजावरी हातें ॥ १४४ ॥
अूर्ध्वमुखाकुंचित तनु, देवा सन्मुख सुभक्त कीं नतसा, ।
स्पष्ट दिसावें नभ त्या कोठडितुनि साधिलाचि कोन तसा ! ॥ १४५ ॥
कोर लहान नभाची दृश्या येथुनि, परंतु संगम ते
सप्तर्षींच्या सातामालांचें तींत ! बघुनिया गमतें ॥ १४६ ॥
विलसे न विरल तारक नील नभाची समोर कोर, मला
देवी अनंततेच्या चुनडीचा पदर पालवी गमला ! ! ॥ १४७ ॥

– २ –

भास्वान् वदताति तुला, हे भानो ! विश्वचक्षु मिरवीशी ।
पदवी तू तेजाने आम्हा अपुल्या पदार्थ करवीसी ॥ १४८ ॥

दृश्य अशेष धरित्री वरिलें! जैं हुडकिता अुषा युवती ।
येशी अरुण–पुरस्सर पूर्वेला तू प्रभाकरा! तव ती ॥ १४९ ॥
प्रत्येक कीड मुंगी मशक रजःकणहि सूक्ष्म असताना
ठेले दृग्गोचर जया तुझिया तेजें, मनात नसताना ॥ १५० ॥
संशय किमपि तशा त्वां लपवीलीं हीं सहस्त्र असशील
ब्रह्मांडें मनुजाच्या दृष्टीपासूनि, तुजसि सच्छील ॥ १५१ ॥
अकृत्रिम कृतज्ञ पूर्वज दिवस असे बोलुनी अनंतर ती ।
जी ये रात्रि म्हणुनि निज निर्दर्शक गणुनि जैं स्वपा करती ॥ १५२ ॥
अेक्या ग्रहासि दावुनि लपवी शतसूर्य मालिका तो का ।
जी श्रीकृष्णमुखासम दावुनि विश्वस्वरूप दे तोखा ॥ १५३ ॥
–कवण यथार्थ तिमिस्त्रा? दृक्साफल्यासि देसि तू कां ती? ।
सोनेरी तव किंवा दिव्यतरा श्यामला तिची कांती? ॥ १५४ ॥
येअि असा संशय की दिवसकरा! अुगवतो कदा भुविस ।
अुदयानंतर किंवा अस्तानंतर तुझ्या खरा दिवस!! ॥ १५५ ॥
तुच्छ अुपग्रहची जो स्वयमपि परभुक्त भूग्रहाचा कीं ।
धावे दिनरात तिच्या, दासीचा दास, बद्ध हा चाकी, ॥ १५६ ॥
अुच्छिष्ट सूर्यकिरणा चोरी लावूनि भूमिचा वशिला ।
मिरवी मग जो त्या सित छत्रा अपुलें तसेचि; त्या शशिला – ॥ १५७ ॥
निर्जीवन नीरस निस्तेज कलंकित तनूहि ते ज्याची, ।
त्या वदती तारापति! – सप्तर्षींनो, अनंत तेजाची ॥ १५८ ॥
जगतेंचि सात तुम्हीं–तुम्हां तारे! असेंचि हो तात, ।
चोर ऋषींचे राजे बुध्यंधांच्या पुरीत होतात! ॥ १५९ ॥
क्षुद्रधरेवरिला मी अत्यंत क्षुद्र अेक कीटक तों ।
अपुल्या वदनावरती बसलों लावूनिया नि की टक तो ॥ १६० ॥
तें कां दिसें तुम्हांसी? कीं किरणाश्वा असें पिटाळुनिया ।
बसताति पहारे हे शत मजवरती तथापि टाळुनिया ॥ १६१ ॥
कोणी न साह्य व्हावें, मजसी कोणी न शब्द बोलावा ।
द्याया सहानुभूतीचा ह्या जळत्या हृदासि ओलावा ॥ १६२ ॥
भिंतीभवती भिंती, कुलुपावरती कुलूप जरि टपलें ।
चुकवीत तया सर्वां तुम्हीं मज भेटलातची अपलें! ॥ १६३ ॥
ऋषियोग्य, ऋषीश्वर हो, अुपकारा अुपकृतें किती म्या तें ।
वानावें दीनदयालुत्वाच्या युष्मदीय महिम्यातें! ॥ १६४ ॥
बंदीच मज बघूनी कां ते तुमच्या हृदात कळकळतें? ।
कळकळतें मज बघुनी हृदय असें कां तुम्हांप्रती कळतें? ॥ १६५ ॥
अथवा वाहे वारा मंजुल, मोहक सुगंध सुमनांचा ।
निरपेक्ष अुपकृतितें करणें किंवा स्वभाव सुमनांचा ॥ १६६ ॥
तेवि प्रकाशाची कां तें चिंतुनि न वा कळूनिहि तें ।
साधित तमोहताची, सप्ताग्निंत त्या स्वयें जळून, हितें? ॥ १६७ ॥
सप्ताग्नींत जळोनी काय स्वर्गीहि साध्य साधितसा? ।
कीं ब्रह्मचर्यपालनि संसाराचा नसे अुपाधि तसा! ॥ १६८ ॥

तरि रविमाला अमुची वारी अमुच्या जशी तमाला ही ।
वारू तमा कुणाच्या झटती भवदीय सात मालाही ? ॥ १६९ ॥
किंवा ऋषी पुरातन तैसे तुम्ही ऋषी असूनीही ।
भोगा गृहस्थता त्या ललनालिंगन सुखी बसूनी ही ? ॥ १७० ॥
तरि पांडवासि तैसी साता अेकचि तुम्हांसि अभिरामा ।
भोगा भूललना ? वा अेका अेकचि जशी सती रामा ? ॥ १७१ ॥
ज्या[७६] अेक भूत-धात्री स्वकरे स्पर्शुनि समुद्ररशना ही ।
स्थापी तिच्यात केवल गर्भा, अन्य स्त्रियांसि वश नाही, ॥ १७२ ॥
सद्धर्म भीरू अमुचा भानु व्रत हें सदा करी नतसा ।
तुम्हांत अेक पत्नी, सप्तर्षींनो, जरी कुणी न तसा ॥ १७३ ॥
संयमशील तरि तया अेका पत्नी अनेक कां वरती ? ।
अेक्या सूर्याभोवतीं तुमच्या पृथ्वी अनेक कां फिरती ? ॥ १७४ ॥
सेतु विमानांचा का पृथ्वीमध्ये असेल त्या केला ।
जाअू प्रेमास्तव वा विजयास्तव राम जेवि लंकेला ? ॥ १७५ ॥
चित्रविचित्र पसरुनी मोर असेची तिथे पिसारा तो ।
नाचे सस्पर्ध अणी वन पसरुनि कुसुमवृंद सारा तो ? ॥ १७६ ॥
तेथेहि मृगजलाच्या मागे हरिणें अशींच वामांगे[७७] ।
आणिक धावति मानव प्यायासी कां सुखासवा मागे ? ॥ १७७ ॥
विद्युच्छास्त्राची ही विद्या अवगत असे तया[७८] का तें ? ।
वाही सागर पृष्ठावरती अैशाचि बाष्प नौकांते ? ॥ १७८ ॥
किंवा शास्त्रपटुत्वी आम्हांहुनि अर्हताति मानाते ।
मेघामागे लागति पळवुनि तद्बाल का विमानांतें[७९] ? ॥ १७९ ॥
रस, रूप, गंध, शब्द स्पर्शासी जाणतीच तनु ज्यासी ।
वसती वसुधेवरती अपुल्या आम्हांसमान मनुजांसी ? ॥ १८० ॥
अुत्क्रांतिगतिपरत्वे वा जे अिंद्रियरसासि अनुभविती ।
पांचाहुनि या अधिका, नानाविध जीं विकीर्ण हीं भवती ॥ १८१ ॥
आम्हासि अगोचर परि यास्तव गोचर जयाप्रती असती ।
गौप्यें विगूढ सृष्टीचीं, की मानव असे तिथे वसती ? ॥ १८२ ॥
सूर्यापासुनि जितुकी पृथ्वी अमुची सुदूर ना तितुकी ।
मंगल अमुचा जितुका सूर्यापासुनि समीप ना अितुकी – ॥ १८३ ॥
पृथ्वी तुमची असता अैशा मध्यंतरात फिरताना, ।
तुम्हांपासुनि तेजोगर्भा अेवं विशिष्ट धरिताना ॥ १८४ ॥
अश्रुत, अतर्क्य, अद्भुत, अुत्क्रांतीच्या क्रमा तिथे होतें ।
प्रादुर्भवन ? भुवन कीं आमूलात् भिन्नविभवची हो तें ॥ १८५ ॥
बांधुनि विमानमय दे गगनीं लीलापुरासि अधरासी ।
हाही ललना पण[८०] ते पुरवुनि कां पिति रसाल अधरासी ? ॥ १८६ ॥

---

[76] सूर्याची पृथ्वी ही पत्नी असा भाव कारण ती भूतधात्री; तिची समुद्ररशना तोच स्वकरें स्पर्शून तिच्यात भूतमात्राचा गर्भ स्थापतो ! श्लेषात्मक अर्थ स्पष्टच आहे.

[77] वामांगे– सुंदर.

[78] सप्तर्षीच्या भोवती भूगोल असेल तर त्यावरील लोकांस.

[79] कविता रचली तेव्हा विमानांची युक्ति मनुष्याच्या पूर्णपणे कह्यात नव्हती.

पवनाकर्षितसत्त्वाहारी[८१] होता, विलुप्तहत्या ही, ।
भूगामी, जलगामी, गगनग वा भूतमात्र जें त्यांही, ॥ १८७ ॥
करुनी संघटना कां अेक्या राष्ट्रांत अेकराट् प्रभुच्या ।
भूतदयेच्या ध्येया करुनी वास्तव, सभेत त्या विभुच्या ॥ १८८ ॥
मृग, मत्स्य, सिंह, मूषक, नाग, कपी, श्येन, चटक, वा, नर ते ।
पंजांकरवी ना परि पंचांकरवी सुनिर्णया करते ! ॥ १८९ ॥
मंजुलतेसहची कां संगीतावरि सुगंध झुलताती ? ।
कां त्या सुगंधतेसह गीतें चंदनवनांत फुलताती ? ॥ १९० ॥
वाचा फुटे गुलाबा ? किंवा फुलती गुलाब मनुजाला ? ।
सांगा सप्तर्षी हो ! काय चमत्कार जो तिथे झाला ! ! ॥ १९१ ॥
त्या श्यामकर्ण तुरगासम रामाच्या, नभीं हि अधृत रणीं ।
जो किरण अिथे ये हा, मागे सारित अनेक ते तरणीं ॥ १९२ ॥
तुमचा किरण, ऋषी हो तुमच्यापासूनि तो कधी सुटला ? ।
दिसतां मज यत्तेजोबुद्बुद कृतकार्यसा सवे फुटला ? ॥ १९३ ॥
जवनांत जवन अपुले घोडे भरधाव सोडुनी पवने ।
जरि चेतवावया त्या अधिकचि पाठीवरी वनोवने ॥ १९४ ॥
[८२]चाबुक हजार-पाती ते सडकीले तडाड जों तुटती ।
तरि ज्यांपुढे मशकसे बाजी माजी पलांतची हटती ॥ १९५ ॥
जरि त्यांहि, हे प्रकाशा, तुरगांसी तूं तुझ्याहि चपलांसी ।
सोडिसि सप्तमुखासी,[८३] दवडुनि जलही पिअूं नच पलांसी ॥ १९६ ॥
आक्रमित पलोंपली की कोसांच्या अेक अेक लक्षा या ।
तरि लागतील शत शत वर्षे आश्रम यदीय लक्षाया ॥ १९७ ॥
अैसे नभस्तपोवनि करित तपस्या पिअूनि आतप ती ।
सप्तर्षी हो ! तुमच्यासम नचि कां ते दुजे ऋषी तपती ॥ १९८ ॥
तरि जो प्रत्यावर्तित शतकांपूर्वी प्रकाश भूवरिला ।
तो आजची अहा त्या ताऱ्यांवरती असेल की धरिला ! ॥ १९९ ॥
धरिला असेल तरि की छायालिपिही,[८४] ऋषी ! धरा हो ती ।
जी त्यां किरणांपाशी, पाहुं कैशी तदा धरा होती ! ॥ २०० ॥
हाडें हुडकित अुकरित भूस्तर, शुष्कौघ, भग्नसेतु, कडे ।
मरुभू, पर्वत, जुळवित पत्रांचे कीट गलितसे तुकडे, ॥ २०१ ॥
हे अैतिहास संशोधक वेडे श्रम कशास करिताती ?
तर्कवितर्कांमध्ये सत्याचा शेष जीव हरिताती ! ॥ २०२ ॥
असुनी अुपाय अुत्तम अैसा दवडित तया सदा वाया ।
अघटित सोय असोनी घटना प्रत्यक्ष त्यांस दावाया ! ॥ २०३ ॥
दावीलचि जी आणी त्या त्या ताऱ्यांवरील घटनाही ।

---

80 पण – प्रतिज्ञा, मागणी स्वयंवराचा पण.

81 वायूंत नायटोजन अित्यादि घटक. त्यांचा अन्नाचे ठायी अुपयोग करून अन्नाच्या पुरवठ्याचा प्रश्न सुटला; म्हणून जीवनकलहही गेला.

82 वनोपवनें हेच हजारपती चाबूक.

83 किरण हेच तुरग, ते सप्तमुखी कारण त्यांत सात रंग असतात.

84 छायालिपि = फोटो. पृथ्वीवर काही ताऱ्यांचे किरण शेकडो हजारो वर्षांनी पोचतात नि त्यामुळे त्या ताऱ्यांवर हजारो वर्षांपूर्वीचे पृथ्वीवरील ते प्रसंग आजही प्रत्यक्ष दिसूं शकले पाहिजेत.

प्रत्यक्ष ! आनुमानिक लागत पट वा जुनाट घट नाहीं ! ! ॥ २०४ ॥
रकेवल विमान तत्क्षम[८५] घेअुनि अुड्डाण व्हाल हो करिते ।
वातावरणीं, वातावरणाभावांत वा, नभीं जरि तें ॥ २०५ ॥
केवल जरि साधु अणी, सकुटुंबचि की निघाल मनुजहितें ।
अयुताब्दलभ्य ताऱ्यांसी कीं पोचोत पथज तनुजहि ते । ॥ २०६ ॥
रतरि हो प्रत्यक्ष पहा कैशी झांशीकरीण अमराते ।
लढवय्यि समरलक्ष्मी लक्ष्मी लढवी स्वधर्म समरा ते ! ॥ २०७ ॥
त्याच्याही पलिकडच्या ताऱ्यांवरुनी स्वयें पहा कां तें, ।
पाझरवितील पाषाणांसी अैशाहि भूप हाकाते ॥ २०८ ॥
'दे बंधु ! दान जीवन ! दे दे !' अैकुनि हाय ना प्रखरें ।
लोभें मारी बांधव, कथिती जे द्वेषदुष्ट विप्र, खरें ? ॥ २०९ ॥
र मारी तो ! जो श्रीमान् भारतनृपधर्म मूर्त अवतरला ।
सुश्लोक राजयोगी योगीराजा अशोक[८६] भव तरला ॥ २१० ॥
निर्मल हिमशीतल यद्वचनी भवतप्त जीव लोभावा ।
धाडी देव कधी तरि–सत्यचि जो देवदूत शोभावा ॥ २११ ॥
त्या शांत दांत भगवद्यश–पावन येशुच्या पदां नमुमी ।
देखा पुनरुत्थाना[८७] घे की तें करुनी आत्मदान मुनी ? ॥ २१२ ॥
जोवरि मानव जगती जगतीं ज्याचें न सुयश हो मरतें ।
देखा गाअी रचुनी अीलीयड कां स्वयेंचि होमर तें ? ॥ २१३ ॥
माक्षिक[८८] देशीं सत्यचि जाअुनि की भारतीय वसताती ।
श्रीरामचरणकमलीं त्या अुपवनिचेहि मधुप रसताती ? ॥ २१४ ॥
वीस सहस्त्रें वर्षे गणुनी, तत्कालकिरण आज गती ।
घेता घेता, कवण्या ताऱ्याच्या तो असेल हा जगती, ॥ २१५ ॥
त्या ताऱ्यांचे वरती मग वीक्षण जाअुनी करा हो तें ।
केव्हा आर्यावर्ती करिती आर्यर्षि ओक राहो तें ? ॥ २१६ ॥
कां अुत्तर ध्रुवींची देवासुर ते पुनः पुन्हा लढले ।
त्या[८९] मंथनांत ? रूपीं मोहनिच्या व्हा परी न हो गढले ! ॥ २१७ ॥

तो हिमनिधि[९०] किंवा तो हिमकरची मूल लोक पितरांचा ? ।
प्रभव पहा, प्रलय पहा, जीवाणूंचा[९१] तसाच अितरांचा ॥ २१८ ॥
अितरांचा केवल जे भौमिक त्यांचा ! न शक्य सकलांचा ! ।
विश्वेतिहास लिप्से, तुजसी वेढा अकाट्य विकलाचा ! ॥ २१९ ॥
कल्पविमानीही कीं तूं ताऱ्यांचे जिने करूनि नभीं ।
जाशील अुंच शोधित शोधित कितिही जरी धरूनि न भी, ॥ २२० ॥

---

85 त्या कार्यास क्षम, सप्तर्षींवर आणि पुढे अुडूं शकणारे विमान.
86 अशोकाने भावास ठार मारलें तें खरें कां पहा.
87 येशू ख्रिस्त खराच जिवंत अुठला का पहा.
88 मेक्सिको देशात हिंदुंच्या वसाहती पहा – अिथे रामलीलेचे अुत्सव त्या हिंदु वसाहतीत होत असत म्हणतात. ते खरे कां पहा.
89 समुद्रमंथन पहा.
90 हिमनिधी – बर्फाचा अुत्तरध्रुवीय समुद्र.
91 मनुष्यांचा प्रभाव शोधीत शोधीत मूळ जीवाणूंच्या मूळ अुत्पत्तीपर्यंत सगळे बघा.

– अितिहासाचें पहिलें पान न मिळणें कधी पहायाते, ।
‘आरंभ तुझा दुसऱ्या पानापासूनि’ शाप हा याते!! ॥ २२१ ॥
मग जें सांगू सारें सांगति जें जें मनासि मानवतें, ।
अितिहास कथन ना! अुपहास कथा त्या रचोत मानव ते! ॥ २२२ ॥
की ह्या गगनात तुम्हांसम पहिल्याने अनंत हे खचिले ।
तारे प्रभुने ‘रंजवु मनुजा[९२]!’ मनुजार्थ विश्व हें रचिलें! ॥ २२३ ॥
मृग मत्स्य निर्मिले की आम्ही खावें तया, न राखावें; ।
(तरि कां सिंह व्याघ्रहि की त्यांनीही अम्हां नरा खावें)! ॥ २२४ ॥
विस्तृत सागर झाले खारट आम्हांसि मीठ द्यायातें!
झाले अुन्नत पर्वत, गहन वनें, सत्वरा नद्या या, तें ॥ २२५ ॥
आम्ही करूनि कृपा की त्यां भोगावें म्हणूनि खटपटती!
आम्हाविण निर्माल्या विलया जाअील सृष्टि झटपट ती!! ॥ २२६ ॥
वाघूळ जशी पाया अुलटें टांगूनि आपुल्या वरती ।
मानी मनात माझे पायचि आकाश अधर सावरती! ॥ २२७ ॥
जाली स्वयंमहत्ता मोहाच्या ह्या तसेचि फसलेले ।
दंतकथांसी मानुनि धर्मकथा जे विमूढ बसलेले ॥ २२८ ॥
ते पाहती न की भू कवण्या अडदांड दुष्ट हेतूने ।
गाठूनि भरडली जरि जळत्या दाढांत धूमकेतूने, ॥ २२९ ॥
ह्या विश्व कारखान्यामध्ये भासेल अुणिव ना तितुकी ।
चुकता अेक मशक ह्या भासे पक्षीगणांमध्ये जितुकी! ॥ २३० ॥
आम्ही किती! जियेसी अचला विश्वंभरा स्थिरा धरणी ।
गौरवु असे तिचीही हीन दशा ही! परंतु तो तरणी? ॥ २३१ ॥
हा रवि अमुचा, ज्याची अेक न परि की त्रिविक्रमख्याति[९३] ।
ज्या वेद ‘विश्वकर्मा’ देती देवा सुभव्य आख्या ती! – ॥ २३२ ॥
अजि तेहि सूर्यनारायण ते अमुचे? नभात दिसते ही ।
जी दिव्य वियद्‌गंगा–तीतिल अुडते तुषार अजि तेही!! ॥ २३३ ॥
की जें गणिता गणिता, ऋषि हो! आधीच गुंगवी मतिते ।
महदंतरावरी त्या घेत असा की तुम्ही जिथे स्थितिते ॥ २३४ ॥
तेथेहि जरी तुमच्या वरती लावूनि दूरवीक्षण तें ।
होतील तुम्हांवरिले ज्योतिर्विद की पुन्हा असे गणते, ॥ २३५ ॥
महदंतरावरी तरि पुनरपि अितुक्या सुदूर बसणारे ।
असतील तुम्हावरिही तारे दुसरे तयांस दिसणारे ॥ २३६ ॥
त्यांवरि? त्यांवरि? त्यांवरि? हे प्रभु! ओतूनि दिव्य हेमजलें!
अेकावरि अेक किती असससी रचिले असंख्य हे मजले! ॥ २३७ ॥
होय असंख्यात तयां अंतिम जोरत्यावरी? तया वरती?
नयने मिटुनि पुसता पुसता प्रश्नावली न आवरती! ॥ २३८ ॥
विश्वस्थितिमर्यादेचा जो तैं होय विस्मिता मतिला ।

92 कित्येक बायबल कुराण प्रभृति पुस्तकांत सृष्टीच्या अुत्पत्तीचा घाट असा मानवाच्या सुखसोयीसाठी झाला असें गंभीरपणें वर्णिलें आहे.
93 सूर्याला त्रिविक्रम – तीन पावलांत भुवन ओलांडणारा म्हणतात.

संस्कार अमर्यादित, मर्यादित वाङ्‌मयी जरी कथिला ॥ २३९ ॥
तरि किमपि तदर्थकसा गवसे अुद्‌गार हा हताश तदा ।
अनंत! अनंत!! अनंत!!! वदुनी वदणें अनंतची शतदा! ॥ २४० ॥
वारूळ तुच्छ भूचें, मानव मुंग्यासमान वावरती ।
तुच्छांतिल तुच्छ तरी मोहुनि अपुल्याच वैभवावरती ॥ २४१ ॥
क्षणिक किती, क्षुद्र किती! आशा आनंद शोक हे अमुचे ।
विझणार अेक दिवशी, ऋषि हो! हे सात सूर्यही तुमचे! ॥ २४२ ॥
प्राणासमची अपुल्या पाहूनि प्रियतमासि मरताना,
की योगयुक्तचित्ते भगवद्‌गीतार्थ मनन करिताना ॥ २४३ ॥
अुपरति नेघे मानस कवणाचें की जरी पुरें विटुनी ।
थापांसि चटुल आशेच्या ह्या, ग्रंथी हृदांतल्या तुटुनी, ॥ २४४ ॥
आश्चर्य गमे तरिही तें नचि; आश्चर्य हें मला गमतें ।
ज्योतिर्वेदाची की ज्यांनी केली अधीत सांग मतें ॥ २४५ ॥
जे विश्वदर्शना ह्या बघती अनुरात्रि, – तेहि धीट कसे ।
ज्योतिर्विद की संसाराच्या जाळ्यात गुंग कीटकसे! ॥ २४६ ॥
ना हे तारे! ते ना वेदहि! दिव्याक्षरें अशीं प्रखरें ।
दिग्पत्रि[९४] वेद हेची प्रकटविती जें अपौरुषेय खरें!!! ॥ २४७ ॥
हो दिव्य वेद! तुमचे अर्थ स्फुरती तुम्हांप्रती कां ते!
कां सार्थता मनुजसंवेदनिची ये तुम्हां प्रतीका[९५] ते? ॥ २४८ ॥
तरि का मज्ञा पिंडी ब्रह्मांडालय अनंत तेजाच्या?
अंत[९६] मनांत तया हें मनची मानी अनंतते ज्याच्या! ॥ २४९ ॥
नयनावाचुनि रवि ना; तरि रविवाचूनि नयन कां होते!
बीजतरूचें कोडें सोडवु भिन्नचि वदू नका हो तें! ॥ २५० ॥
हे तेजाचे सागर होतिल अपुल्या क्रमेचि पेयांचे; ।
पृथ्वी, प्राणी मानव संज्ञावत्ता स्वयेचि घेयाचे ॥ २५१ ॥
आम्हां मनुजांची ही पार्थिवता घेत शतविकारांशी ।
व्युत्क्रम परंपरेने तेजाची हो न होत कां राशी? ॥ २५२ ॥
तुमचे अम्हांत अैसे अमुचें तुम्हांत रूप ओसरतें ।।
सरतें रूपद्वैत प्रकट तरी सत्त्व अेकची अुरतें ॥ २५३ ॥
सप्तर्षी हो! अैसें तुम्हांसी तत्त्ववाद ते करिता ।
हा बाष्पबिंदु माझा सिंधुत विश्वाचिया अहो झरता ॥ २५४ ॥
दिवस वसंती तैशी गेली कारागृहीं पहा राती! ।
येतो आता आज्ञा निजण्या दे बदलता पहारा[९७] ती ॥ २५५ ॥
अंधार कोठडीच्या हरण्या हृदिंच्या तशा तमाला ही
मज विश्वदीप्ति संतत तुमच्या देवोत सातमालाही ॥ २५६ ॥
रुद्राक्षांच्या तैशा यदलकिं ह्या साज सातमालाही ।

[94] आकाश पत्रावर नक्षत्रे हींच रुपेरी अक्षरें खरें अपौरुषेय वेद प्रकटवितात!
[95] प्रतीक –चिह्नें. तुमचें तुम्हांला अर्थ कळतात, का तुम्ही चिद्‌शक्तिशून्य असल्याने माणसांच्या संज्ञाशक्तीनेच तुम्हा जडांचा अर्थ लागतो.
[96] तर काय मन आहे तोवर जग आहे? मनाबाहेर हा पसाराच वसत नाही?
[97] तुरुंगात रात्री फार जागू देत नाहीत. पहारा बदलला की निजलेंच पाहिजें

त्यां व्योमकेशदेवा[९८] वाही कविता सदुत्तमाला ही ! ? ॥ २५७ ॥

– रचनाकाल, १९११

---

98 आकाश (व्योम) हेंच ज्याचे केश आहेत ! ह्या अुभ्या विश्वालाच महादेवमूर्ति कल्पिलें असावें. असें केसांत चंद्र, आकाशगंगा, असते ह्या वर्णनावरून आणि 'व्योमकेश' नांवावरून भासतें ! ह्या साऱ्या चमकणाऱ्या देवांची समष्टि मूर्ति म्हणूनच तो 'महादेव' !

# ५४. चांदोबा चांदोबा ! भागलास का ?

(परिचय : अंदमानच्या कारागारातील खोल्यांची बदली होता होता अेकदा रात्री चंद्राची कोर दिसावी अशा खोलीत सावरकरांची वस्ती झाली. फारा दिवसांनी अेकाअेकीच चंद्राची कोर पाहून जो मनोरम आनंद झाला त्या भरात निश्चिंतपणे चवाळ्यावर पडून चंद्र बघत ते कितीतरी वेळ पडून होते. त्या वेळेस बालपणी घरी आणि आजोळी चांदण्यात लहानपणचें तें 'चांदोबा चांदोबाचें' गाणें गात जे खेळ खेळले होते, त्यांच्या चिमुकल्या आठवणी त्यांना येअू लागल्या. किती वेळ तरी त्या अेकलकोंडीत हें मोहक 'चांदोबा चांदोबा'चें लहानपणचें गाणें गुणगुणत असताना वाटलेली ती कारागारातल्या भयाण रात्रीतील क्षणिक मनोरमता या गाण्यात गाअिली आहे.)

जाति : अचलगति (बालानंद)

(चाल : धिन्ना धिन्नक धीना धी)

तुरुंगात मी तदा तसा । सुखीं हरखलों स्वर्गि जसा
सायंकाळी बंद्यांते । कोठड्यांतुनी कोंडुनि ते
कारेचे ह्या अधिकारी । जाती अपुल्या परत घरी
रखवाले हे रात्रिमधी । मारिति फेऱ्या कधीमधी
दुष्ट स्वप्नें वायुवरी । येती जाती परोपरी
तुरुंग दगडी राक्षस हा । पचवित अन्ना गुंग पहा
मधेच दचकुनि किंकाळी । झोपहि मारी क्वचित् जरी
कारेची ह्या तरी किती । निर्जन वनसम ही शांति !
लोहगजाची जी जाळी । कोठडीस मम तीखाली
टाकुनि कांबळि मी अपुली । टाकित अंगा तों दिसली
समोरची नभिं मज देखा । चमकत चिमुकलि शशिलेखा
'शशिलेखा ! रे शशिलेखा !' । माववु शकुनि न त्या हरिखा
टाळि वाजवुनि मीच मशी ! कथिली वार्ता अद्‌भुतशी
सहा सहा महिन्यांत कधी । चंद्र दिसेना बंदिमधी
वर्षहि न जिथे तिथी तिथें । कळणें कैशी तरिही ते
असेल पंचमिचतुर्थिची । कोर कोवळ्या चंद्राची
प्रथमचि दिसला चंद्र जना । नसेल गमला तैंहि मना
हर्ष तसा तैं मज गमला । आनंदाला भर आला
बुद्धि[99] –मनीं तैं क्षणी परी । बोलाचाली ही झाली
'प्रमुदे होतो । शोकचि अंती !' 'जाताना ती–
शशिलेखा ? नसता का । कधी फुका
झुरलों मी ? मग असता तीं । येवो न मुदा कां भरती ?''
तुरुंगात मी तदा तसा । सुखी हरखलों स्वर्गि जसा !

– २ –

आनंदाचा पूर परी । मधेच बुडवित ती सारी
बोलाचाली नेअि मला । अुंच अुंच त्या अुंच स्थला

[99] बुद्धि म्हणाली, ''तुझी जन्मगाठ दु:खाशी मारलेली आहे. म्हणून क्षणिक आनंदात लिप्त होअू नकोस, नाहीतर पुढे शोक होअील.'' मन अुत्तरलें ''तें कां ? आनंदाची चंद्रकोर चटकन् दिसेनाशी होअील म्हणून ना ? पण दु:खाच्या अनंत अंधाऱ्या रात्री मी ज्या काढल्या आणि काढीत आहे त्यांत आनंदाच्या चंद्रकोरीसाठी ती नव्हती म्हणून फारसा झुरत कोठे पडलो होतो ? नसली तर नसली, पण जर सहज दिसली तर मग त्या आनंदाच्या चंद्रकोरीला ती सहज दिसते आहे तोवर कां हसत हसत पाहून घेअू नये ? 'नसत्या' सुखासाठी रडत बसू नये, तसेंच असत्या सुखातही रडत बसू नये !''

पुरांत मिसळति पूर जिथे । नीलाचे[१००] आणि अनिलांचे[१०१]
मधुर स्मृतिचे विस्मृतिचे । मोदाचे आणि कौमुदिचे
पोळ्यांतुनि त्या मधमाशा । लघु लघु नीडीं निज जैशा
गोड कल्पना तशा तदा । आनंदाचा मध खाता
मम मस्तिष्कीं[१०२] शत गाणीं । गुणगुणतीं मंजुळवाणी
शत सनयांतुनि परि त्याही । शकूं सामवत तें नाही
गीत हृदिं वदे हृदंतरी । 'ततः कुमुदनाथेन' परी–
तान[१०३] कोकिली वदे कशी । मधुर स्वप्नें बुलबुलिचीं ?
'भ्रमर परावर्तन' काही । अेक दोन जड नांवें हीं !
फूल गुलाबा फुले कसें । तत्त्वें कां त्या समजतसे ?
त्या वासाची मोहकता । बुद्धिसि ना ती विषय हृदा
हृदयाचि तरी भाषें ही । कौमुदिची कविता गाअी !
हसूं निकें अणि असूं सुखें । मुके बोल आणि बोल मुके
चुटचुटक्या आणि मिटमिटक्या । छंदी वृत्ती[१०४] अशा निक्या
हृदयाची तैं भाषा ही । कौमुदिची कविता गाअी
गाअी कविता कौमुदिची । चांदाची चांदोबाची
'चांदोबा[१०५]! जें थिजथिजुनी । होत येत कीं हिमपाणी
धका लव जसा घनिल करी । शब्द मुदा तो हृदंतरी
स्मरले ! स्मरले ! लुटा सुखा ! 'चांदोबा, चांदोबा, भागलास कां ?'
ती कौमुदिची । हो हो हीची । कविता साची !
आणि वेंचे । बुलबुलिचे [१०६] । स्वप्नींचे
''चांदोबा चांदोबा भागलास का ।
लिंबुणिच्या झाडाखालि लपलास का ?''

– ३ –

हसे चित हें हृदय हसे । कसें, काय, तें कवण पुसे
बालपणीचा तो खाअू । कोण दे कशाते पाहू
स्तन जननीचा स्वये जसा । हक्कचि अपुला चंद्र तसा
पुनः पुन्हा मी लुटित सुखा । गाअि चांदोबा भागलास का ?
स्मृतिचित्रें तीं विजेपरी । चमकत अुठती परोपरी
''चांदोबा, चांदोबा भागलास का ।

[100] कल्पनेच्या आकाशातील नीलरंगाचे.

[101] वायूचे.

[102] लहान लहान मज्जा पिंडात त्या त्या भावभावना राहतात, जशा पोळ्यांच्या घरांतून मधमाशा. ते ते मज्जापिंड डवचले गेले कीं, त्या त्या भावना आपआपलीं गीतें गुणगुणू लागतात.

[103] तसा आनंद मन सहज व्यक्त करू लागलें. तो प्रथम 'ततः कुमुदनाथेन कामिनी गण्डपाण्डुना । नेत्रानन्देन चन्द्रेण माहेन्द्री दिगलंकृता' ह्या महाभारतीय श्लोकात झाला पण तो कोवळा आनंद त्या गंभीर वर्णाच्या जाड सूत्रात गोवताना फुलासारखा चुरगुळून जाअू लागला. त्याचप्रमाणे पृथक्करणीय बुद्धि ही चांदणे म्हणजे काय ह्याचें शास्त्रीय व्याख्यान देअू लागली. पृथ्वीचे 'भ्रमण', किरणांचे परिवर्तन,' नि बुलबुलाच्या गाण्याचा अुगम शोधण्यासाठी त्या पक्ष्याचेंच पृथक्करणीय विच्छेदन जर कोणी करू लागला तर त्याने त्याचें मंजुळ गाणे जसें कत्तल केले जावें तसा विश्लेषणात्मक बुद्धीने तो आनंद कत्तल केला जाअू लागला.

[104] हृदयाच्या कवितेचीं हंसूं असूं, चुटक्यामिटक्या हींच वृत्तें आणि छंद असणार !

[105] विचारपरंपरा ढिल्या संदर्भाने चालत चालत लहानपणाच्या 'चांदोबा' शब्दाची आठवण झाली त्यासरशी तें गाणे आठवलें. त्यासरशी तो कोवळा आनंद मनाला मनासच अैकविता येअू लागला. पाणी अगदी थंडावत थिजत येते; तेव्हा थोडे हालविताच अेकदम घनिल होते.

[106] बुलबुल स्वप्नांत जें गातात त्यातील निवडक वेंचे.

लिंबुणिच्या झाडाखालिं लपलास का ?
लिंबुणिचें झाड करवंदी'' । चलच्चित्र नव मनःपटी !
बालपण जिथें मम जातें । जुन्या घराचें अमुच्या तें
अंगण सुंदर ज्यामाजीं । खेळवि बालत्वी आजी
तिथे शामला आमलकी । जी, सांजे तत्तलीच कीं
भावंडें अम्हि सकल बसू । कधी हंसूं कधी रूसू.
चौकाच्या त्या पूर्वदिशे । ललित लिंबुणी जी विलसे
डुलत्या पालवितुनि तिच्या । तरंगांत की लघुनदिच्या
होति त्याहुनि लांब अशी । दिसली अेक्या सांजेशी
धार वाहत्या चांदीची । तशी कोर नव चंद्राची !
सहसाची तैं गात अुठू । टाळी बाळें अम्ही पिटूं
''चांदोबा चांदोबा, भागलास का ।
लिंबुणिच्या झाडाखालिं लपलास का ?
लिंबुणिचें झाड करवंदी । मामाचा वाडा चिरेबंदी''
'मामाचा वाडा' मनःपटी । विद्युच्चित्रें अुठाअुठीं !
मामा अमुचा प्रेमाचा । आजोळीं ज्या गृहि साचा
त्यासचि लागुनि बांधियला । चिरेबंदि जो नव वाडा
जे मामाच्यासम प्रेमा । संतत करिती वरति अम्हा,
त्यांचा वाडा तो दिसला । ज्या भंवताली दरवळला
आजोळीच्या लाडांचा । लीलांचा अणि लोभांचा
अस्फुटसा स्मृतिपुंज मनीं । कुठुनि तरी परि विमोहुनि
फुलझेला कीं लपलेला । तसा न दिसता दरवळला !
चांदण्याचिया त्या पाना । पीत गीतिच्या आणि ताना
मनःपटीं त्या मधुमंत्रे । चमकत चलतीं स्मृतिचित्रें
होत तया अणि बघत तया । रंगुनिया अणि गुंगुनिया
पुनः पुन्हा मी लुटित सुखा । गाअिं 'चांदोबा भागलास का ?'
परि कीं भासे क्षणो क्षणीं । मनांतल्या मज तयीं मनीं
की त्या आनंदात तशी । रसांत लपते रुची जशी
तानांच्या, त्या पानांच्या । आंतुनि मधुनी सकलांच्या
जरतारी कीं तारपटीं । होति अेक विणलेलि स्मृती
जी त्या आनंदासी, त्या । कौमुदीसही मधझरत्या
दाता सात्त्विक जसा धना । देत न कळतां चैतन्या
रूपरेख ना अुमटे ती । परी तिची ती गमे स्मृती
चांदण्यांत अंगणांतल्या । आजिस ज्या ज्या आवडल्या
आर्या दावित म्हणुनी मी । बसलो असता सर्व अम्ही
बाला हंसरी मज चुकवूं । खेळकर सुखे जी दुखवूं
मधेंच माझ्या गाअी का । 'चांदोबा चांदोबा भागलास का ?'
तालधरी मज देत धका । लिंबुणिच्या झाडाखालिं लपलास का ?
तिची असावी गमे स्मृती । –तिचीच हो हो तिचीच ती !
आल्हादवि ती हंसत तअीं । जशी सुखद शशिलेखा ही

कार्ये सम जरि । हेतुही सम तरि
स्मर्य आणि अेक मनीं । ही बघुनी --
कोर कोवळ्या चंद्राची । -- ती पोर पोवळ्या ओठांची !

– अंदमान, १९१२

# ५५. सायंघंटा

(परिचय : तुरुंगात संध्याकाळी जी घंटा होते ती कैद्यांना विसावा मिळावा म्हणून कोठड्यांत कोंडण्यासाठी. थोड्या मुदतीच्या कैद्यांस ती अैकून अर्थातच शिक्षेतला अेक दिवस कमी झाला असें वाटून आनंददायक होतें. पण अधिक मुदतीच्या कैद्यांना ती तापदायक वाटते. अंदमानात अेके दिवशी या घंटेचे वेळेस जोडीने बसलेल्या जंगली मले जातीच्या कैद्याबरोबर सावरकरांचा भावनाकल्लोळ अुडविणारा संवाद झाला. तो संवाद नि त्यानंतरचे आपले विचार सावरकरांनी ह्या कवितेत गोवले आहेत.)

(वृत्त : वैनायक)

पशुसेची जे सकाळपासुनी सदा
घाण्यासी तैलाच्या फिरति जुंपले
बंदिवान ते सुटता जूं, जरा कुठे
आताची येताती बंद अंगणी,
घाण्याच्या भंवति भंवति सर्व दिनभरी
तुटु पाहति पाय तरी धावधावता
घामाने गळल्या जें चिंब जाहलें
भूवर्तुल आताची सुकत तें जरा.
तोंची बीभत्स तया परिचिता वचीं
दंडकाष्ठ अुपसुनी तंडेल[१०७] गर्जला :
'जोडी! हां जोडी!' सहसाचि सर्व ते
बंदी होताति दोन दोन जोडिने
''नीचे! –ना, अूपर! मूं बंद! बे–अुठो''
स्वविरोधी[१०८] आज्ञाशत पाळपाळता
येताती नाकीं नव! अंतिं अेकदा
पंगत ही बसली अपराद्ध जनांची
कामाने, घामाने क्लिन्नगंध ती
सांजेच्या जेवणासि. ''रोटि डाल दो[१०९]!''
डालरोटि थाळ्यांतुनि सरसहा पडे
'खावो बे! जलदि! जलदि!' जलदि लागती
खायासी सर्व तोंचि शब्द ये 'अुठो!'
हाय! तया स्नेहममत्वाविना सुक्या
तुकड्यांचा तोंडी चघळीतची भुगा,
भुक्त, अर्धभुक्त, रिक्त–जठर वा जसा
जो असेल तैसा हा सर्व अुठतसे
बंदिवान अपशब्दां गुंजता हळू
असहाय क्षोभाच्या; सारवुनि करें
अुष्टी तू भूमि, अन्न फेकुनी, मुखा
धुवुनि पुन्हा जोडीने सर्व परतती,

---

107 कारागृहातील अेक जमादार.

108 आज्ञा सुसंगत देण्याअितकी देखील बुद्धि ह्या अडाणी जमादारांना नसे. मूर्ख अैटीने फुगून ते अेक आज्ञा देत तोंच तीविरुद्ध दुसरी स्वतःच सोडीत. 'बैठो' हा शब्द त्यांनी अुच्चारला नाही तोंच 'अुठो' म्हणत.

109 रोटी. डाल दो ह्या सर्व जमादारी आज्ञा होत, स्नानाचे वेळेस देखील 'लवा' म्हटलें की सगळ्यांनी लवणें 'भांडे भरा,' 'अंगावर ओता, 'अंग चोळा' सर्व आज्ञा!

आणि तया बंद अंगणात मग पुन्हा
जोडीच्या मागे जोडीस या क्रमे
बंदींच्या ओळी बसवूनि लव जरा
तंडेलादिक होती दंडधर ढिले
बंदिप येऊनि बंद कोठड्यांतुनी
रात्रीच्या पूर्वी बंद्यांसि कराया
अर्ध घडीचा आहे अवधि अजुनि की
हुश्श करुनि बंदिवान बसतसे जरा
जोडीच्या बंदीसी गुप्त बोलता
चोरदृष्टि राखुनिया दूरवर भयें!

***

तोंची जो जोडिस त्या दिवशि माझिया
तो बंदी सहसाची डंवचुनी हळू
मजसि वदे सोल्हासे 'बघ अहा वरी!
बघ सुंदर चांद! किती दिवशि दिसू ये
तो होता अेक निकोबारचा कुणी
वन्य जातिमधला ज्या बोलती 'मले'
मद्याच्या चोरीस्तव दंडिला जया
दाट अरण्यचि ज्याचा मूळ पाळणा
पुरही ज्या वाटावें पंजरचि, तया
बंदीच्या कोठडीत कोंडिता असें
तीन मासही व्हावे, तीन जन्मसे
स्वाभाविकतःचि ते चंद्र पाहुनी
अुल्हसिता वदनी परि वदन लपवुनी
हळुचि मला बोले अेकेक शब्द की
गणुनि गणुनि अंगुलिसी 'अेक हा असा,
अेक असा आणिकही – छे! न तो तिजा
मास अिथे मज पडेल! बस्स दोनची
हे मावळणारे रे चंद्र ह्या स्थलीं
दुर्दशेत बघतिल मज, चंद्र तिजा तो
पाहिल ना मजसि अहा कोठडीत ह्या! –
परि त्या विस्तीर्ण तटीं मंजु सिंधुच्या
आमुचिया निक्कोबारीन सिंधुच्या
जलतरंगदोलावरि दोल खेळता
पाहिल मज चांद तिजा–डोलडोलत्या

डुंगीतुनि[११०] आमुचिया मारिता वल्हें
रआणि करीं हावभाव करितरगीतिच्या
तालावरि जी गाअील मत्प्रिया सवें
वा गातां मजसी कर गुंफुनी तिच्या
लगटुनि लगटूनि कटी मधुनिची जअीं
वल्हवू लागेल तीच नौसि हौशिने
किंवा त्या चांदण्यात धुवुनि निघाल्या
त्या ढवळ्या सिंधुपुलिन–वालुकांतुनी
विहरत वा धावत वा धरित वा कधी
अन्योन्या क्रीडनांत वेचण्याप्रती
लवताना किंवा सहसाचि चमकल्या
शंख, शिंप, गारांसी चित्रविचित्रांर
र चांद तिजा मज बघेल ना अिथे अहा!''
हंसलों मी 'सत्य काय? सुखद हो तरी
मित्रा तुज तव मोचन शीघ्रतर अणी'
निश्चितान्तताहि करी दुःख सुसहसें;
कां न तरी निश्चित–शीघ्रान्तता करो
दुःखासही आताच्या वर्धकचि सुखा[१११]!
मजसह समवेदनांसि दर्शवू तयी
सहजचि तो वळुनि हळू प्रश्नला पुन्हार
''सांग, गड्या, चांद किती काढणें असे
अजुनि परी दुर्दशेत दुष्ट ह्या तुला?''
भावांसी हृदयातिल दाटल्या क्षणी
ओतू मी बाहेरी अुत्तरें ''अहा!
कोण करी ह्या गणिता! – चांद दोन वा
तीन, चार, चाळिस-ना चांद तो किती -
पक्ष, मास, ऋतु, अयनें वत्सरें अहा
तीन, चार, चाळिस तें गणित हातिच्या
किति ह्यापरि चरणांच्या अंगुलीसही
धरुनि ना येणारें सत्य मोजता!
बहुधा मज चांद बघेलचि न कोणता
जेथे तुज चांद तिजा की बघेलची!
चांद मला कोणताहि पाहणार ना
लगटुनि लगटूनि कटी सिंधुतटि कुण्या
रमता वा धावत वा धरित वा प्रिये!
निश्चितसे हेंचि मात्र! अुलट जें असे

---

110 डुंगी– मले लोकांची लांकूड कोरून बनविलेली होडी.

111 दु:खाचा अंत नक्की अमक्या वेळी होणार अशा अवधिज्ञानानेही दु:ख हलकें होते. मग लवकरच ती अवधि संपणार ह्या ज्ञानाने तें दु:ख हलकेंच नव्हे तर प्रस्तुत वाटणारें दु:ख नंतरचे सुख अधिक सुखद करण्यास कारणीभूत होते. असें दु:ख हें सुखपौष्टिक होतें.

सर्व अनिश्चित तें तें ! वदसि 'छे' कसें ?
म्याचि अनिष्टाची ती जडशिळा स्वये
बांधुनिया निजकंठी टाकिली अुडी
ह्याचि तुझ्या निक्कोबारीन सिंधुच्या
रौद्रशांत जलकल्लोळात निर्घृणा !
आता जें बुडणें ती निश्चित स्थिति
तरणें तो अपघातचि जरि क्वचित् घडे !''

***

तो घणघण, घणण, घणण नाद घुमुनिया
हुकुमावरि हुकुम सुटेः 'हो खडे ! खडे !'
कोठड्यांत बंदीजन कोंडुनी झणी
बंदीगृह रात्रिभरी बंद सक्तिने
करण्याची घंटा ही ! शब्द जरि कधी
कारेतहि कवणाचा अैकुनी मना
वाटे लव हलकेसें, अिच्छिताकडे
पद पडलें अेक पुढे गमत जरि असे
साश मना कारेतहि पळभरी कधी,
तरि तें की सायंकालीन परिचिता
ह्या घंटेच्याची घणघणण निनादे
की येता रात्रीतुनि रथ विचित्र ते
स्वप्नांचे भू–जल–ख–ग[११२] शृंखलिताही
देहासी, गेहासी तेंवि, सोडुनी
बंदींते स्वेच्छासंचार घडतसे
प्रियसंगति, भुक्तभोग वा नवीनही !
यास्तव या सायंघंटेसि परिसुनी
हलकासा जीवाचा भार लव गमे
टाकुनिया अेक अुसासा; वदे हळू
बंदिवान जो तो 'दिन हाहि संपला !'
मेला दिन–शत्रु अेक : नष्ट दशेच्या
सेनेतिल दिवसांच्या अेक शिपाअी
पडला होअूनि ठार अधिक अेक हा !

***

[112] पृथ्वी, जल, आकाश असे सर्वत्र संचरणारे, बंदिवानांच्या देहासही सूक्ष्म मायेने वाटेल तिथे नेअून विहरविणारे, स्वप्नांचे रथ.

दिवस–मृत्यु–घंटे[११३] तू गर्ज अशीचीः
तर्क करू ये न आजि मज जरी, तुला
गर्जावें लागणार आणखी असें
कितिदा तें युद्धी या, हे दिनान्तके!
तरि निश्चित हें निदान गमत की असे
संख्या जी दिवसांची कोणती तरी
विधिनियता दास्याची भरतभूमिच्या,
त्यांतिल तू अेक अधिक दिवस दुष्ट हा
मारितेस ठार असा आणि जे असें
मोचन त्या मातेचें तेंच आमचें
अन्वर्थक मोचन होणार हवेंसें!
देय प्रभुनियत स्वातंत्र्यमूल्य जें
आम्हांप्रति त्या मूल्यातील अेक हा
अुग्र तपोदिन–दिनार[११४] टाकिताचि हा
भरपाअी करुनि बंदि–निधित या, अुठे
यंत्रचलप्रतिध्वनिच[११५] पावतिचा हा
हे सायंघंटे, तव नाद जो असा!
ज्या दिवशी हिंदभूमि अति कठोर या
बंदिनिधित दंडाच्या भरिल अंतिमा
दिवस–दिनारा दारूण दुर्दशेचिया
बलिदानाची ही नवरात्रि संपता
पूर्णाहुति पडुनि शक्ति–होमहुताशी
जें विजयादशमीला प्रज्वलोज्ज्वला
त्या ज्वाला–मालीतुनि तृप्त चंडिच्या
होअिल की मुकुट दिव्य–दीप्त आमुचा
ग्रहणमुक्तसूर्यासम प्रकट पुनरपि
त्या दिवशी विजयवृत्त तें करीत की
प्रथित दिशा दाही जो आध्रुवध्रुवी
सिंधु तटोतट प्रतिध्वनित गर्जत्या
जाअिल जयघंटेचा घोष महान् या
राष्ट्राच्या पुनरुत्थित; नाद–सिंधुच्या
त्याची हा अेक असे नादबिंदु की
कष्टगणक घंटे, हा नाद जो तुझा

[113] दिवसाच्या शेवटी होणारी ही घंटा म्हणजे बंदीच्या शिक्षेच्या दिवसांतील अेक दिवस मेला- कमी झाल- सुटका अेक दिवस जवळ आली असेंच वाटविणारी असें.

[114] अेक पूर्वकालीन नाणें. भारताच्या विमोचनार्थ जें मूल्य देणें, यातनांचे जे दिवस भरणें असेल त्यापैकीं हा अेक यातनांचा दिवसरूपी दिनार.

[115] काही यांत्रिक पेट्यांत आत नाणें पडलें की पावती देणारा असा यांत्रिक प्रतिध्वनिनिघतो तसा त्या संध्याकाळच्या घंटेचा नाद वाटत असे.

बिंदुबिंदुने ह्या तो सिंधु[११६] साचणें!
गर्ज तरी तू स्वाहाकार बलींचे
दास्य–दिनांच्या अस्मत्प्राणहवींच्या!
गर्ज तुझा अेक अेक दुर्दिनान्तके
घंटे, त्या सुदिनासी आणितो अहा
अेक अेक दिन सन्निध! दास्यमुक्तिच्या
सुदिना र ना मम र परंतु हिंदुजातिच्या
मुक्त तिचें जीवन की तेंच आमुचें!
कवण जगे? अहह जरी हिंदची मरे!
कवण मरे? हृष्ट जरी हिंद जगे रे!

– अंदमान, १९१३

[116] भारतास मुक्ततेचें मूल्य भरपाअी करण्यासाठी ज्या बलिदानाच्या यातनांचा दंड देणें आहे त्या कष्टांची ही प्रत्यही दिवसाचे शेवटी होणारी बंदीघंटा अेक गणक झाली होती. असे यातनांचे पराजयाचे दिवस अेक अेक मोजून भरले म्हणजे तो विमोचनाच्या अंतिम विजय–दिवस दिसणार! त्या दिवशी जी प्रचंड विजयघंटा सागरासागराच्या तटोतटी हिंदुस्थानाच्या विजयाची ग्वाही फिरवीत गर्जत जाअील त्या तिच्या ‘नाद– सिंधु’चाही कष्टगणक घंटा नाद– बिंदुच होती. कारण बलिदानाच्या पावतीचे ह्या घंटेचे हे बिंदु बिंदु पडतच तो भरपाअीचा दिवस अुगवून त्या विजयघंटेचा नाद– सिंधु भरणार आहे.

# ५६. निद्रे

(परिचय : बंदीगृहांत सर्वतोपरी गांजले गेले असताही सावरकरांच्या वाट्यास अेक सुख दैवाने पहिलीं काही वर्षे तरी राखून ठेवलेलें होतें. तें म्हणजे झोपेचें. त्यांस अेकदा दिवसाचा त्रास संपून संध्याकाळी कोठडीत कोंडलें गेलें की झटकन झोप यावी. ती अितकी सुखद नि गाढ असे की, अनेक वेळा सकाळी घंटा होअी तेव्हा डोळे अुघडल्यानंतर किती वेळ तरी आपण बंदीगृहात आहोत याची जाणीव त्यांना येत नसे. प्रियजनांविषयीच्या स्वप्नांतून किंवा सुखद विसराळू अवस्थेतून किती तरी वेळाने बंदीगृहांतील परिसरात जाणिवेने हळूहळू अुतरावें असें होअी. सर्व सोबती आणि सांगाती दूर झाल्यावर जी अेकच सोबत त्यांस लाभली होती त्या निद्रेचे त्यांस जे मनःपूर्वक अुपकार वाटत तेच या कवितेत त्यांनी व्यक्त केले आहेत.)

(वृत्त : वैनायक)

ये ये निद्रे ये ! तव आगमनाच्या
जअिं वार्ता तारांतुनि[११७] मम शिरांचिया
येती तअिं बाग जशी कुणि सुदूरूनी
ती योजन–गंधा मन मोहवीतसे
गंधेंची भुंग्यांचें, तेंवि भुलवुंनी
नेशी मन माझेंही, हे फुलबागे[११८]
स्वप्न सोनफुलांचिया ! कुशल तें जसें
शस्त्रवैद्य शल्य शरीरांतुनी निकें
अुद्धरिता यातना न कळुहि द्यावया
देताती हुंगाया मोहकुपी[११९] ती;
तेवि हीन दीनहि दिनसमर संपता
त्याचे ने विक्षत तो[१२०] वीर वेचुनी
रुग्णालयि रात्रीच्या; आणि देत जी
हुंगाया मोहकुपी तीच तू ! तया
विश्वकुशल वैद्याची, जीर्ण तें नवें,
ताजें जें सुकलें, जें शुष्क पूर्ण तें
या माझ्या गृहि[१२१] येअुनि करुनि जाशि तू
कळुहि न मज तें देता ! हेंचि सात्विका
दानाचें चिन्ह सत्य किति सुदैव हें
माझें कीं देहा ह्या प्रथम ज्या दिनी
म्यां अपुल्या हस्तेंवी रचुनि मम चिता
ठेवियलें तीवरती, - चंडिके[१२२] तया
करू सुतृप्त ! - अग्निकुंडिं तूहि त्या तअीं,
हे निद्रे, सहगमना अंगने–समा

---

117 शिरांच्या तारांतुनि– श्लेषाने तारायंत्रातून – झोप येअू लागली म्हणजे जें गोड शैथिल्य आणि सुखद विसावा अंगामध्ये संचरू लागतो त्या झोप येत आहे ह्या बातमीच्या आलेल्या 'ताराच' असतात.

118 सुखस्वप्नांच्या सोनफुलांनी डवरलेली बाग–सुखनिद्रा.

119 क्लोरोफॉर्म किंवा अितर तत्सम मूर्च्छक द्रव्यांची कुपी.

120 अीश्वर.

121 शरीरात.

122 देवी, असुरमर्दिनी , ध्येयमूर्ति तिला.

करुनी या यमपुरीत[१२३] येशि मजसवे !
मम शय्या बंदीगृहि संगती तुझ्या
प्रेममृदुल, मोहक, जणु शेज फुलांची
देवा, या निद्रेसी तरि निदान तू
नेऊ नको मजपासुनि र सर्व यद्यपी
नेलेंसि ! काय नसे मजसि ती अिथे ?
पंखांवरि वाहुनि ती विश्व आणिते
कारेंतहि मजसाठी ! बाग, बगीचे
कारंजीं, कुसुमें, प्रियसंग, रंग ते
अद्‌भुत, अतिभव्य, भयद वास्तवाहुनी[१२४]
अति विचित्र घटना नव नवीन अनुभवी
निद्रे, तव मायेचा स्वप्नपट मनी
अुघडे जअिं ! चक्रव्यूहात मृत्युच्या
मागे अेक पदही न परतता पुढे
आणि पुढे मात्र धावत्या अधृष्यशा[१२५]
काळाच्या रथि ह्या भरधाव चालल्या
अभिमन्युसि[१२६] तू आयुष्याचिया पुन्हा
नेशी स्वच्छंद मागुती हवें तिथें
कालाच्या रथिं बळेंचिं चढसि आणि ते
होती तत्तुरग लगामासि वश तुझ्या
सोनेरी स्वप्नांच्या - आणि त्या रथीं
वृद्धांही त्या ययातिसमचि अर्पुनि
नवयौवन, नेशी तू राज्यिं रतीच्या;
पूर्वप्रियकरणींच्या पाजविसी त्या
प्रथम चुंबनासि पुन्हा ! - विरहविव्हला
सत्य समालिंगनसुख ! - जे हताश त्या
फल आशातीत लभ्य ! - अस्त अुदित ते,
विगत होय आगत की ! अुघडतसे जैं
स्वप्नचित्रपट निद्रे, बिजलिचा तुझ्या !
भूत होय वर्तमान–वदति कुणि[१२७] अणी
विगतचि आगत न अनाहतहि होतसे
आगत तव रथीं भविष्याचियाहि की,
चर्मचक्षुसी अद्यापी अनावृता

---

123 कारागृहात.

124 वस्तुस्थितीत ज्या घटना अशक्य अशा विचित्र घटना जेव्हा स्वप्नांचा चित्रपट अुघडतो, तेव्हा झोपेत सत्यशा अनुभविण्यास सापडतात.

125 न आटोपत्या.

126 आयुष्य हें अभिमन्युसारखे मृत्युचे, संसाराचे, चक्रव्यूहात सारखें पुढें जातें. ‘व्यूही शिरेन शरसा मागे परते न अेक पदही न’ ही मयूरपंक्ति येथें सूचित आहे. आयुष्यात म्हणूनच, मागचा क्षण पुन्हां खऱ्या स्वरुपाने अनुभविता येत नाही; पण निद्रा तो अनुभव देते. कालाचा रथ बलानें मागे नेते, आणि मागच्या घटना अगदी वस्तुस्थितीप्रमाणे, अगदी आजच्याप्रमाणे आपणांकडून अनुभवविते. सोनेरी स्वप्नें हे निद्रेचे लगाम होत. तीं स्वप्नें काळाच्या घोड्यांस खेचून मागे नेतात.

127 काहींचा असा अनुभव आहे की, पुढे होणाऱ्या घटनाही कधी कधी स्वप्नांत प्रथम दिसतात.

त्याहि चित्रशालेमधि तू प्रवेशिण्या
होशि दर्शिकाहि[१२८] क्वचित्! योगिजनहि हें
मानिति की या अगम्यि, या अतींद्रिंयीं
अेक तूचि अिंद्रिय जें व्यक्त लव करी
अव्यक्ता,[१२९] हे सुषुप्ति, बद्धही जनां!
देह[१३०] हाचि ना आत्मा, बीजमंत्र हा
धर्मांचा अखिल अम्हां काय सुचविसी
प्रथम तूचि ? अैंद्रजालिका तया तुझ्या
स्वप्नाच्या आरशात देहविरहिता
आत्म्यासी आत्म्याला दाविलासि जैं ?
सामान्यासहि गोचर सात्त्विकोपमा
वेदान्ता अेकचि ही गवसतसे जी -
कैवल्यानंदासी, हे सुषुप्ति, तीर
त्या केवल आनंदाची तुझ्याचि की!
आणि, जरी हे सुषुप्ति!– मरणही असे
तें तुझेंचि संततत्व[१३१]– सांगता तुझी
मधुर तरी मरण किती! सुखद विसावा!

– अंदमान.

---

[128] दर्शिका= तिकीट. भविष्याच्या चित्रशाळेत काय काय चित्रे हळूहळू प्रेक्षकांस अुघडी होत जाणार आहेत तीं निद्रेचे तिकीट काढलें की कधी प्रथमही पाहण्यास सापडतात.

[129] सुषुप्तीत– गाढ झोपेत जी स्थिती ती मूळ अव्यक्ताच्या द्वंद्वरहिताची लवमात्र कल्पना देअू शकते. 'योगनिद्रा' हें नाव समाधीला देण्यात येतें. ह्याचेंही कारण हेंच की, ती समाधीची कल्पना सामान्य जनांस यावयास गाढ निद्रेतील जाणीव ही कशीबशी पण अेकच अुपमा आहे.

[130] देह हाच ना आत्मा. स्पेन्सरादिक पुष्कळ भौतिकशास्त्रज्ञही असें मत प्रतिपादितात की, झोपेत आपला देह जिथे असतो त्याहून अन्यत्र आपण संचरतो. ह्या झोपेतील अनुभवावरूनच प्रथम देह हा आत्मा नाही ही कल्पना सुचली.

[131] संततत्व म्हणजे अखंड प्रवाहीपणा, आणि सांगता म्हणजे संपूर्णपणे भंगणारी अशी गाढ निद्रेतील जी आंशिक अजाणीव तीच कधी न भंगणारी होअून जीत पूर्णपणे बसते अशी झोप म्हणजेच मृत्यु असेल तर 'मधुर तरी मरण किती!'

# ५७. मूर्ति दुजी ती

(परिचय– सन १९१० मध्ये सावरकर फ्रान्समधून परत अिंग्लंडमध्ये येताच धरले गेले. लंडनच्या पोलिसचौकीत प्रथम बंद असता अिंग्लंडच्या मानानेही अतिशय कडक अशी थंडी पडू लागली. त्यातही त्या कोठडीच्या भिंतीही दगडी! फरशी दगडी! त्या काल्यासारख्या गार व्हाव्यात! जवळ अंथरूण तर काय, पण पुरेंसें पांघरूणही नाही. दिवस–रात्र पाय आपटावे, हात चोळावे, त्या पंधरा वीस पावलांच्या लांबीतच भरभर फेऱ्या घालाव्यात, तेव्हा कुठे गारठून जाणारें रक्त काही अुष्णता पावू शकावें. त्या भयंकर शारीरिक गारठ्याचा परिणाम मानसिक अुत्साहही गारठण्यावर होअू नये म्हणून त्यांनी आपल्या मनास वज्रशाली करण्यासाठी जी विचारपरंपरा हृदयात प्रदीप्त केली ती ह्या कवितेत ग्रथित केली आहे.

(वृत्त : वैनायक)

अपरिचित न जो तुझिया मधुर विलासा :
रम्य सरें तीं, नलिनें, नाल सुभग ते,
ते सुगंध भृंगगुंज, त्या सुमंजुला
सारंग्या, गीतें तीं गोड, गोड ती
दयिता–स्मृति आलिंगन जीस तृप्तवी,
शेती ती हिरवी, आल्हादिते मळे,
सरितापुलिनोत्थ थंड तीं कलिंगडें,
मुक्त नील आकाशश्री मनोहरा,
मुक्त नील सागरतल, मुक्त वायु ते,
राजमार्गि भक्तीच्या गजर गोड वा
टाळ मृदुंगांचा हरिनाममत्त तो,
चंद्रबिंब शारदा मेघांत धावतें,
आशा की रिक्त संशयात सुखभरें :
अैसे जें नव, संगत, मंजु, मुक्त जें
त्या त्यातलि मधुर विलासासि जो तुझ्या
मूर्तीच्या लावण्यश्रीस वर्णिता
भाटचिं तो लंपट तव : देवि! तोहि मी
आजि अहह अिच्छितसें रूप देखण्या
तें दुजेंचि तव! तव ती मूर्ति दुजीची!

मूर्ति मधुर ना परंतु ती भयंकरा
तव दुसरी घोर मूर्ति दावि ती मला!
कारण तू बघसि का न आजि मज अिथे
अैशा ह्या लोह–पिंजऱ्यात कोंडिला
हिंस्त्र कुणी पशु जैसा वध्य तसाची;
आणि अैकशी न काय लोक पहा ते
परस्परांसि जे कथिति दावुनी मला :
असता हा हिंस्त्र कुणी पशुचि की क्वचित्
टिकता ह्या पिंजऱ्यात–वीर वा कुणी
हा तो परि केवळ कवि भावकोंवळा;
शोभेची मात्र वस्तु! शयन–रंगणीं

विजयायुध वीणाची, म्हणुनि कां कधी
विजयायुध ती होओी समररंगणी ?
कसली ती कविता सुखभोग–लोलुपा
दाविल ना ह्यास अिथे तोंडही पुन्हा
नसता कवि सहत तरि; हा तगेल ना !''

कां ? कविता काय कुणी पण्य अंगना
की जोंवरि अुत्सवीय मनविमोहका
सुवर्णरत्नमौक्तिकांत तनु अलंकृता
तोंवरीच मात्र हात हसत धरू ये ?
आणि सुदैवाच्या आकस्मिका अशा
दुष्काळीं, पुष्करिणी शुष्कसलिल की
तेंवि रिक्तरसगव्हर हृदय तिचेंही
होअुनि ती होत हात हिसडुनी दुरी ?
ना, ना, ना ! कुसुमसुगंधीय लाघवी
तारेवरि वीणेच्या नाचती मुदें,
तींच तिचीं होअुनिया वज्र–कर्कशें
धारेवरि खड्गाच्या नाचतीं पदें !
ना कविता निजभक्ता त्यागिना कधी !
भक्त तिला त्यागो, ती त्यागिना तया !
कारण कीं मूर्ति तिच्या असती दोन ज्या
कर्तव्या अनुसरुनी रक्षिती तिच्या
पूजकासि वा प्रियासि समयि विभिन्ना
अेक मूर्ति ती नाचत हृदयमंचकी
रसिकमनाची वीणा घेअुनी करी
तंतुतंतुतुनि कुशल–स्पर्श–पुलकिता
प्रेमाची वीज थरारूनि देत जे;
भावनासिं मोहन घालूनि ती करी
लोण्याहुनि कोमलशा– कोमला अशा
की जाव्या चांदण्यामधेहि वितळुनी !
आणि दुजी ती मूर्ति प्रखर जी तुझीं
कविते घेअूनि शिरे वाण सतींचे
अहह ! हास्य करित प्रज्वलित चिताग्नी !

प्रथम मूर्ति तव; यमुना–पुलिन भिजुनि जैं
चांदण्यात शीतल त्या रात्रिं जाहलें,
त्या रात्रीं कमलनयन श्यामसुंदरा–
सहित रासलीलेमधि गुप्त गोडशा
हृदयाहृदयासि नाचनाचवी मुदें;
आणी आनंदाच्या किंकिणीप्रती

हास्य–लास्य–मग्न–गोपिका–हृदांतल्या
ताल धरित मंजुल रुणु झुणु झुणू झुणू!

परि यमुना–पुलिनी रसभरित कीं अशा
त्या कवळ्या नंदकिशोराचिया मऊ
लुसलुशीत अधरांवरि मधुर होतसे
मुरली जी, तीच अहा त्याच कोमला
अधरांवरि कर्कश रणशृंग होअुनी
रणवेताळाच्या वेताळ–तांडवा
ताल पिटी भारतीय त्या रणामध्ये
''अच्छेद्योऽयमदाह्योऽशोष्य अेव च,
लोककक्षयकृत् प्रवृद्ध काळ, काळ, मी!''
दंष्ट्रा विक्राळ, गर्ज भयद कोण तो
कविते, तव!– जो सहस्त्र वत्सरांतुनी
घुमत येत आजहि हें भुवन कंपवी!
–त्या छंदी, त्या वृत्ती, समरभीषणा
प्रकटित तव चंडमूर्ति जी दुजी अहा
देवि, आज देवो मज तीच दर्शना!
कारण की भिन्नचि हें अुदित आजला
कर्तव्य क्रकच–तीक्ष्ण! आज ना असे[१३२]
तन्मुद्रा स्मितशुभ्रा, वेष सौम्य ना
जरतारि थाटमाट रंगराग वा
रत्नखचित मुकुटहि तो आज ना दिसे
वाद्यें ना मंगल, ना गीत–मंजु ते
ताफे रंगेल नव तमासगिरांचे!
आज दों दिशा न पथांतूनि आवली
भवनांच्या वर्षती फुलें; न हर्षती
ललनांचे लोलनयन; गर्जतीहि ना
लोकसंघ जयजयध्वनी कृतज्ञ ते!
आजि सेवकांसि नसे पारितोषिकें
वाटित ये सोन्याची आमुचा धनि
स्वयंसैनिका त्याच्या आज अवधि[१३३] वा
मिळते ना क्षणही की स्वेच्छ विलासा
'अशिथिल परिरंभीं परिमृदितमृणाली[१३४]
–दुर्बलशा अंगकांसि लगटुनी कुण्या

---

[132] केव्हा केव्हा शक्य तितक्या सुखाचा अुपभोग घेणें हेंच कर्तव्य होअून बसतें । गणपत्युत्सव, मिरवणुकी, सभा, संमेलनें हीं अशा सुखद कर्तव्याचींच अुदाहणें होत. परंतु 'त्या दिवशीं' दुसरेंच अेक कर्तव्य समोर ठाकलें होतें. 'आज अुलट सर्व!' हा भाव ह्या छेदकात वर्णन केला आहे.

[133] रजा, सैनिकांस मिळते ती 'आमच्या धन्याने–म्हणजे अीश्वराने– आज आम्हांस कामगिरीची आज्ञा सोडली आहे. विजयानंतर मिळणारी रजा आमच्या वाट्यास आज किंवा क्वचित् कधीही येणारी नाही.' हा भावार्थ.

[134] भवभूतीच्या अुत्तररामचरितातील 'परिमृदितमृणालीदुर्बलान्यंगकानि । त्वमुरसि मम कृत्वा यत्र निद्रामवाप्ता ।' आशिथिलपरिरंभव्यापृतैकैदोष्णो: । अविदितगतयामा रात्रिरेव व्यरंसीत् ।' श्लोकांचा संदर्भ सूचित केला आहे.

अविदितगतयाम यामिनीसि न्यावया !
आज अुलट सर्व ! अुग्र, ना–हिडिस्ससा
लोखंडी जबडा वासूनि आपला
कर्तव्य प्रगट आज ! मज चिरावया,
दातांच्या कवळ्यांच्या करवतींत दो !
दगडाहुनि निर्दय हें हृदय तयाचें
वेषही न बर्बरता झांकि अशी ही
त्याच्या अजि नंगी तरवार तनूची !
आणि बाप रे ! थंडी ही भयंकरा !
निर्दयतेहूनि थंड थंड ! गोठलें
नदनदींत[१३५] पाणी ह्या आणि शरीरीं
रक्तपिंड पिंड अहो जात थिजोनी !
या भयाण अेकलकोंडीत अेक ह्या
नि:सहाय, निंदित, मी बघतसे स्वयें
जीवनरस नाड्यांतुनि माझिया अहा
थंड पडत जाताना ! दगडचुन्यांच्या
या नंग्या अंधाऱ्या भिंतिच्याहुनी
गार गारठा अंगी असह्य भरूनि ये
कारेच्या कोठडीत नागव्या अशा
नंगे कर्तव्य असें मजसि गाठतें !
आणि [१३६] अधांतरि शिखरावरति वायुच्या
संभाळुनि तोल सतत चढत धावण्या
आज्ञा मज दे ! पाठीवरति लादुनी
पर्वतसम दुर्धर सद्‌गर्वभार हा
राष्ट्राचा अखिलाची ! ये तरी अहा
तूहिं ! तुझ्या त्या दुसऱ्या चंडमूर्तिचें
दर्शन मज दे ! कविते, आजि दुजा तो
छेड सूर कर्कश, जो भिववि भैरवा !

सूर ललित ना ! रुणुझुणु ताल तोल ना !
आवडते ज्याचे आघात कोवळे
हृदयकुंजि नाचविती गोड गुलगुल्या
मंजु गीतगोविंदातील छंद ते
अबलांच्या अबल हृदा अधिक अबल जे
करिती ते बिल्हणीय करुण छंद वा.
परि, कविते, भेरीचे सूर ते दुजे
छेड आजि, अबलांच्या अबल हृदांही

---

[135] त्या वेळच्या अिंग्लंडमधल्या कडाक्याच्या थंडीचे हें भौतिक वर्णन आहे नि त्यात मानसिक प्रतिबिंबाचाही ध्वनि अुमटत आहे.
[136] वायूच्या अत्युच्च शिखरावर अधांतरी चढून जाणें जितकें कठीण, तितकेंच केवळ कल्पनासृष्टीतच निवसणाऱ्या ध्येयास्तव शिर हातात घेअून जाणें कठीण.

करिते जे प्रबल प्रलयोर्मि सिंधुसे !
मृत्युंजय मंत्र कुणी प्रकटवील जो
मूर्ति चंडिकेची अुद्दंड, द्यावया
चंड मनोबळदाता ममसि वर अजी !

कुरळी जे खेळावे, केश मृदल ते,
क्रोधाने राठ राठ अुठुनिया जवें,
फुटलेल्या पेवांतूनि सर्प की तसे
बुचड्यांतुनि चवताळत सुटुनि धावती
स्कंधीं वा वक्षीं वा पृष्ठिं वा मुखी
विकराल क्रोधभरे अति भयंकरा:
अेक्या निज हस्तेंची छाटुनि स्वयें
खड्गाने आपलेंच मुंड फल तसें,
अन्या निज हस्तीं घे : आणि अहो जी
रक्ताची धार अुडे वरि अुफाळुनी
लाल लाल चिकट विकट त्या गळ्यांतुनी
धार तीच घट घट त्या क्रुद्ध मुखें पी
पेल्यातुनि लाल मद्य पी जसें कुणी !
पिअुनि रक्त आपुलेंचि आपली तृषा
शांतवित्या त्या प्रचंड रौद्रभीषणा
रुंडधरा छिन्न–मुंड[१३७] मूर्तिसी नमो
नमो नम: सहस्त्रधा प्रमत्त–नर्तने !
तूंची कर्तव्य–मूर्ति ! तूं जरी अशी
सद्य:कर्तव्यमूर्ति मद्हृदापुढे
रुंडधरा, छिन्नमुंड, खंड–कृपाणा
अैशीची मूर्ति धरूनि, तूं ही ये करू
कविते, या हृदयाचा पाठपुरावा !
जें वेताळीय, काळभैरवीय जें
मारक जें, दु:सह जें, कठिण कटुकटू
तेंचि आज आरोग्यद बलद हो तया !
कीं जैसें तैं होओ; अढळ जैं चढे
वीरवर श्रीबंदा[१३८] वध–शिलेवरी

[137] शाक्तसंप्रदायांत चंडिकेचें हे 'छिन्नमुंडा' नावाचें अेक तात्त्विक रूप प्रसिद्ध आहे.
[138] श्रीबंदा हा शीख लोकांचा प्रख्यात पुढारी. श्री गुरुगोविंदांचा शिष्य होय. मुसलमानांस ह्याने दे माय धरणी ठाय केलें. शेवटी तो धरला गेला.

## श्रीबंदावीर

क्रूर लोह–पंजरांत या निरुंदशा
तीक्ष्ण सुळे ! –लोहाचे दांत रक्तपी
तेवी शिवशिवत अहा देतिना मुळीं
अल्प वळायातेही तनुसि तयाच्या !
पीत रक्त लोह–सुळे टोंचटोंचुनी
देहाची जाळी ज्या जाहली असा
निजरक्ती न्हालेला कवण हाय हा
पंजरांत बंदिवान ? सिंह कीं जसा !
पंजरस्थ सिंहाच्या श्वान शिकारी
भवति जसे भीत – धीट रक्तपिपासू
भुंकति बहु टपत तया भक्षु फाडुनी
शत्रूचे तेवि मुक्तखड्ग हे थवे
भुंकत त्या पंजरासि ढकलिती पुढे ![१३९]
दिल्लीचें दीर्घ पटांगण सभोवतें
लोहगजांचें कुंपण रोखतें जना:
ज्या भवती शतसहस्त्र हिंदु अहिंदू
नरनारी दाट अुभ्या दूरवर अहा
प्रेक्षाया हिंदूंच्या वीर रक्षका -
प्रेक्षया हिंदूंच्या रक्षकासही
ना, परंतु हाय हाय तद्वधासही !
प्रेक्षाया मात्र ! तोच मुख्य कसाअी,
बादशाह ज्या वदती, तोहि ये ! हळू
फाटक–ना फट केवल करकरूनिया
पंजर लव अुघडे : ओढून शृंखला
फरफर फरफटित हाय ठेंचठेचुनी
बंदीवानासि टाकिला पटांगणी
खणखण अुपसूनि अुगारूनि भोंवती
शस्त्रास्त्रें शतश: सहसाचि रोखिलीं

अेक अेक शिष्य तया वीरगुरूचा
शृंखलांत बद्ध पुढे अेक अेक ये
‘होशी का मुसलमान ? वांचसीं तरी !’
‘हिंदू मी ! शीख अम्ही ! मरण मी वरी !
‘हें कुराणर हें कृपाण ! - बोल पुनरपी
पुनरपि ये पुनरपि ये ये पुन:पुन्हा

[139] पंजाबमधून बंदावीरास धरून दिल्लीस आणिलें. तेव्हा लोखंडी पिंजऱ्यात बंद करून आणिलें. कारण मुसलमानांस त्याच्या विलक्षण तडफेचा आणि यशाचा अितका धाक बसलेला होता की त्याच्याशी अद्भुत सिद्धाअी आणि जादू आहे आणि तो मनात येताच मांजरादिकांचे अिच्छामात्रे रूप घेअून निसटून जातो असा मुसलमानांचा समज झालेला होता.

प्रत्युत्तर घोरनिश्चयोत्थ सत्वरी
'हिंदू मी ! शीख अम्ही ! मरण मी वरी !'
अेक अेक अुत्तर तुच्छवीत कुराणा
अुठतांची पडत धर्म–वीर वरांचें
अेक अेक शीर्ष बळी क्रूर कृपाणा
शंभरदा प्रश्न अुठत रानटी स्वरी :
'होशी का मुसलमान ? वांचसि तरी !'
शंभरदा अुत्तर दे कंप अंबरी :
'हिंदू मी ! शीख अम्ही ! मरण मी वरी !'
अेक अेक धर्मवीर करित दोनशे
वर्जुनी भय गर्जुनी जय धर्मगुरूचा
वधशिळेशी वाहुनि निजशीर्ष देतसे !
बोथटलें तें कृपाण : जात बुडुनिया
सद्य[१४०] अुष्ण अुष्ण शोणितांत वधशिला :
अति अघोर अति अुदास दिवसही दिसे
झिंगतसा लाल लाल रक्त पिअूनी.

हाय, अहो ! परि त्या अति किळस आणित्या
स्थानि बीभत्स ह्याचि समयि हें कसें,
कां ये अति कोमल अति करुण लेंकरू ?
आणि पडुनी त्या बंदी वीरवराच्या
सहसा तें मूल गळां, स्फुंदुनी वदे :
हाय पिताजी ! हा हा, काय दशा ही
तनुची तव आज राजसाजभूषिता !'
राजराजभूषणार्ह बंदिवान तो
वीरवर श्रीबंदा अहह आपुल्या
अेकुलत्या अेक्या तनयासि हुंगुनी
बोले : 'हे बाळ ! तुझा मी नसे पिता !
हिंदुधर्मची, बाळा, पूज्य तव पिता !
माता तव हिंदु–जाति : जा तिच्यावरी
लिंबलोण ओवाळुनि कमल–कोमला
तनुचें तव तनया जा टाक सत्वरीं !'
सत्वरची साश्रू–सोल्हास तरीही
अुठत राजबिंडा तो वीरतनय तैं
'होशी का मुसलमान ? वांचसि तरी !'
हिंदुधर्म–मंगलार्थ मरण मी वरी !'
आणि हाय हाय त्याहि अर्भकाप्रती

---

[140] सद्य– ताजे. बंदावीराचे आधी त्याचे दोनशे शिष्य त्याचेपुढे मारले गेले आणि तरीही तो गलितधैर्य होअीना म्हणून शेवटी त्याचा अेकुलता अेक रात्रपुत्र त्याचे समोर हालहाल करून मारला गेला– ते वर्णन या आणि पुढल्या छेदकांत आहे.

नेताती ते नृशंस वध–शिळेकडे :
हळू न्यारे, हळु ! संभाळूनि लेकरू
हें लहान अितुकें की साचल्या तया
रक्ताच्या डबक्यातचि सहज बुडुनिया
जावें की जाता त्या वधशिलेकडे !
बोथट[१४१] तरि तें कृपाण कठिणतम तरी
अति सहजचि कर्म भयंकर करींत तें !
कठिणतमहि बलिदानीं सहजतम तसें
वीरसुत श्रीबंदा वीरवराचा
निज तनुच्या नवनालावरुनि खुडुनिया
वाहुनि दे हिंदु–धर्म–मंगलार्थ की
समर–चंडिका–चरण–स्थंडिलावरी
निजसुंदर मुखमंडल कमलकुसुमसें !
हरहर ! सत् श्री अकाल ! जय ! पुन:पुन्हा
श्रीबंदा गर्वभरें गर्जना करी !
वीर करीं गर्ज; आणि शोक करी पिता[१४२]
- किति सुंदर, शूर किती ! बाल अेकची
अंतरलें तेंहि अभाग्यसि : घे अशी
श्रीबंदा हाय हाय हाय अंतरीं !

तों ते आलेच कोप–कंपभराने
थरथरते शब्द, शिव्या, शाप वर्षतां !
आणी यच्छब्द अुभ्या पंचनदासी
सिंहाचा जेंवि गुहे, तेंवि गर्जवी
यद्‌गजें अक्षरश: मुसलमान तो
ग्रामधाम सांडित घे वन सहस्त्रश: !
घोरीपासूनि[१४३] शल्य अति अघोर जें
दास्याचें हृदयिं सले पंचनदाच्या
तें अुपटुनि शतकांचा सूड सहा घे
यत्कृपाण : त्या बंद्या वीरवरातें
तेचि मुसलमान अजि श्वान की जसे
शृंखलिता सिंहावरि भुंकती बहू
तेंवि भुंक भुंकत पुसताति बहुपरी
‘हें कुराण, हें कृपाण ! बोल पुनरपी,
कुफरा, हो मुसलमान : वांचसी तरी !’

141 दोनशेवर शिष्य हिंदुधर्म त्यागिनात म्हणून मारताना बोथट झालेलें मुसलमानी खड्ग.

142 वीरांचे कर्तव्य म्हणून बंदावीरास स्वसुताच्या हुतात्मतेने अेकीकडे आनंदही झाला. पण त्याचें पित्याचें अंत:करण दुसरीकडे नैसर्गिक अपत्यप्रेमाने आतल्या आत विव्हळही होत होतें; स्वसुताचें रक्षण करण्यास असमर्थ झालेल्या स्वत:च्या दु:खद स्थितीने हळहळत होतें.

143 महमद घोरीपासून.

धर्मांधा ! य:कश्चित् सैनिकें दिलें
ज्याच्या ना कवडीचें मोल कुराणा
सेनानी तो स्वयेंचि घालणार का
मूढा, तव भीक भीतिशी अशा खुळ्या ?
‘सचमुच क्या अैसा है ?’ मुख्य कसाअी,
बोलति ज्या बादशहा, तो वदे मधें
‘जावोची तरि सेनानीप्रती तया
सेनेहुनि अधिक सभादर समर्पिला !
तो कुराण फेकी ? तू फेक कृपाणा
आणी जा तीक्ष्णाग्रा सांडसाप्रती
लोहाच्या लाल तापवूनि आण जा’
लाल लाल सांडस तीक्ष्णाग्र तीरसे
घेअुनि ये हत्यारी अढळ आसनीं
वीर बसे योगमुक्त ‘बोल पुनरपी,
होशी ना मुसलमान ?’ अेक अेक त्या
प्रश्नातें प्रश्नचिन्ह तेवि पूर्तवी
तप्त लोह–सांडस सहसाचि घुसोनी
वीराच्या तनुंत तीर तूणिरीं तसा !
प्रश्नान्ती अेक अेक तोडुनी अहा
मांसाचा लचका ओढूनि काढिती
लाल तापलेल्या खुपसूनि सांडसा !
अक्षरशः हा अघोर छल रिपू करी !
अक्षरशः तें अघोर धैर्य तो धरी
तो बंदा, अखिल–हिंदु–वंद्य हुतात्मा

छल अघोर हेंही ते धैर्य चळविता
तरि अघोरतर भोगो खल छलाप्रती’’
बादशाहचि तो ! तन्निधित पडे का
क्रौर्याची ती अुणीव ? घोरतर छळा
कल्पी लव हत्यारी तोंचि गर्जला
बादशहा; ‘ना तैसे मूढ ! हाणिता
आघाता शत न होय घाव शरीरी
विषम तसा घाव होय हाणिता मनी
आघाता अेकमात्र ! कुफर कारटा[१४४]
मृतहि चिरा–तोडा तें हृदय !’हृदय तें
त्या हुतात्म वीरतनय तनुसि चिरुनिया
तोडिति ते क्रव्याद क्रूर : आणखी
अुष्ण रक्त थबथबुनी गळत ज्यातुनी

[144] कारटा– बंदावीराचा तो मारून टाकिलेला मुलगा. त्यांचे हृदय काढून बंदावीराच्या मुखात कोंबण्यात आलें ! की त्याने त्या छळास कंटाळून मुसलमान व्हावें !

जिवलगशा राजसशा लाडक्या अशा
अेकुलत्या तनयाचें हृदय तें अहो
जनकाच्या त्या वदनी कोंबिती बळें
हाय हाय–धन्य धन्य–हाय हाय हा!
धन्य धन्य धन्य! तरिहि धैर्य ना चळे!
अुस्सहि ना निघत मुखांतूनि कीं असे
योगिवराचा आत्मा, क्रूर हो, तया
आधीची गत तेथे की, 'विचाल्यते
गुरुणापि स दु:खेन न यत्र आगत:[१४५] !'

सैतानचि! सैतानचि यात घुसुनिया
वेडावी आम्हांसी : नर न, भूत हें!
किंकाळुनि भुंकुनि भुंकोनि नीच ते
नंतर आसन्नमृत्यु वीरवरा त्या
सभ्य मृत्युचेंही सुख मिळु न द्यावया
अुंटावरि अुफराटें बांधती बळे
आणि त्या लक्ष लक्ष जनततींतुनी
दिल्लीच्या गल्ली–गल्लीत राक्षसी
मिरवणूक ती माते! लोक पहाते!

लोक पहाते त्या, त्यांच्याच रक्षणीं
प्राणदान करि त्याचा घोर वध तसा:
हिंदूंच्या बीजाचे लक्ष लक्ष ते
जन असुनि दोन हात, लांब मिशाही
बहु मिशाळ षंढाहुनि षंढ होअुनी
हिंदूंच्या धर्मरक्षित्यासि पाहती
त्या दशेत, त्या दुर्बीभत्सनेमधें !
अेक जरी मायेचा पूत त्यांमधे -
आअीचें दूध जिते अेक प्यायला
जरि असेल त्यांत तरी शपथ! धिक अरे
धिक् तुमच्या जीवितास! लक्ष नर तुम्ही
लाटेने केवळ की अुसळता जरी
तरि सहसा टाकिताचि पार बुडवूनी -
पार ठार तुडवुनि ह्या दैत्य–शतांसी
र वा निदान त्या निज भीरुत्व र कलंका!

परि आता तो कलंक हिंदुतेवरी

145 'यस्मिंस्थितो न दु:खेन गुरुणापि विचाल्यते।' – (गीता) = कितीही मोठे दारुण दु:ख संकट आले तरीहि त्या स्थितीत, कशाही परिस्थितींत जो भांबावून जात नाही; चळत नाहीं; ढळत नाहीं; 'स्थितप्रज्ञ' राहतो; दृढ खंबीर राहतो.

निज मारक छाया ना पसरविल पुन्हा :
की त्यावरि रक्तासी अुष्ण अुष्ण त्या
हृदयाच्या आपुल्याचि ओतुनी अहा
शुद्ध करूनि हिंदुध्वज रंगवी पुन्हा
हिंदुवीर हा बंदा हिंदु हुतात्मा !
धर्मवीर हा बंदा हिंदु हुतात्मा !
देशवीर हा बंदा हिंदु हुतात्मा

अुठति किळसवाणे दुर्गंध ज्यांतुनी
सडलेल्या कुजलेल्या मूत्रमलांचे
नगराच्या त्या अुकीरड्यावरी दुरी
नेअुनि मग खाटिक ते टाकिती तया
अमरमृता ! 'जा कुफरा ! रक्तमांस ते
गृध्र तुझें खावोती श्वान सूकरें:
आणि जरी आत्मा कुफरांहि असेची
खावो तरि आत्म्याते नरक जा तुझ्या !'

तों होअी काय ! अहो रुजुनिया तिथे
तेंचि रक्त मांस तया अमर मृताचे,
त्यांतुनि हंगाम हुतात्म्याचिया तया
सूडाचा अुठला अुगवूनि अकस्मात् :
मानियले मूषक[१४६] ज्या, क:पदार्थ ज्यां--
तेचि अहा सिंहासन पोखरूनिया
त्या[१४७] धरित्या सिंहांच्या क्रूर भीषणा
तोंडासचि करताती आपलीं बिळें !
मृत झाला अुज्जीवित ! मृतचि मारिते !
गाअींनी मारियले ठार कसाया
चिमण्यांनी मारियले ठार ससाण्या !
पायदळीची रेती तापली अशी
की भाजुनि भस्म करी पायदळासी[१४८]
आणी ना कुतरेंही भीक दे अशी
होय बादशहाची बा दशा अहा -
र बंद्याचा सिंहनाद घेतसे जअीं
रूपांतर हिंदुडिंडिमामधे महान् !
आणि अीश दे अन्ती यश बळाधिका
मूर्तिभंजकांवरती मूर्तिपूजका !

---

[146] बंदावीर मारिल्यानंतर पंजाबात काही काळ जरी हिंदूंची चळवळ दबली तरी ती पुनरपि चेतली गेली. कारण ज्यांना मुसलमानांनी 'मूषक' म्हणून हिणविलें ते महाराष्टीय वीर अटकेपर्यंत चालून गेले. शीखही पुन: बळावले आणि पंजाबात अेक प्रबळ हिंदु राज्य स्थापिते झाले. ह्या अितिहासास अुद्देशून हा संदर्भ आहे

[147] सिंहासनाला धरणाऱ्या, त्या राजपीठाच्या पायाच्या स्थानी केलेल्या सिंहांच्या आकृती. लक्षणेने मुसलमानी साम्राज्याचें आधार असलेंलें त्यांचे बळ.

[148] मुसलमानी सेना. पायांखाली तुडविलेली हिंदुशक्तीची माती– रेती अशी तापली की तिने तिला तुडविणाऱ्या शत्रूच्या पायदळास र बळास जाळून भस्म करून टाकिले.

***

परि होअिल हें असेंचि हें न जाणता;
होअिलही हें असें न, हेंही जाणुनी;
अति भयाण अति महान अुच्च त्या स्थली
अंधःकारांत. घोर दक्षिणायनीं[१४९]
चिरवित निज देहा कीं वध्य पशु तसा,
धर्मास्तव नरकी जो होअुनी पचे
तो वीर श्रीबंदा हिंदु हुतात्मा
आज असो ध्येय मला अेकमात्रची !
तोची मज नरक[१५०] गमो आजि सरससा
स्वर्गाहुनि सप्ताही ! विजय–गीति ना,
-  त्याची गा, स्फूर्ते, तूं असह अपजया
ज्या सुरांत बंद्याच्या हृदय–तंतुसी
लावुनि तूं घोरगीत गाअिलेंस तें
व्यक्ति–मरण सौख्याचें असह - त्याच ये
– त्या सुरांत कविते ! तनुतंतुवाद्य हें
माझेंही बांध : राग तो निराश गा :
धैर्याचा परम तशा ! कां न कीं तशा ?
मी न काय अेक जरी क्षुद्र डहाळी
तरि त्याची प्रथिता अश्वत्थ–तरूची
हिंदवीय वंशाच्या ? ती यदीय[१५१] की
शाखा, जरि दिक्कुंजरहस्त दीर्घशी
हिंदु हुतात्म्या बंद्या वीरवराची ?
तेंचि रक्त, अल्पसत्व, तरि शिरांत या
तेंचि बीज, जीवन ते, मृत्तिकाहि ती !
तो शकला श्रीबंदा हिंदु हुतात्मा
सहण्यासी जरि असह्य छळ तसे तरी
कां शकेन मीहि न हे छळ सहूं अहा
मीहि हिंदुची असतां ? हे सहेनची -
ह्याहुनिही भयद असे छळ सहेनची
परि झटेन, जीवनांतिही झटेनची
करण्यासी ही विमुक्त मातृभू पुन्हा !
मुक्त पुन्हा, शक्य पुन्हा, मनुजमंगला

---

149 दक्षिणायनी = प्रतिकूल कालात. मरणास दक्षिणायन प्रतिकूल असतें. कारण पूर्वी अुत्तर धृवाकडे असताना तो रात्रीचा अंघकारमय काल असे.

150 नरकासमान ज्या स्थानी बंद्याचें प्रेत टाकिलें; नरकासमान असह अशा ज्या हिंदूंच्या अवनत परिस्थितीत बंदावीराने धैर्य न सोडता पुढिलांच्या यशासाठी प्रस्तुतच्या अपयशास आपला बळी दिला; ज्या नरकात त्याचा आत्मा पडेल म्हणून मुसलमानांनी शाप दिला; हे सर्व अर्थ ह्या ओळीतून सूचित केलेले आहेत.

151 यदीय– ‘ज्या हिंदु वंशवृक्षाची बंदावीर अेक शाखा आहे त्याचीच मी अेक डहाळी आहे. हा भावार्थ.

– अंदमान

## ५८. बेडी

(परिचय : तुरुंगात कैद्यांना शिक्षा म्हणून घातलेली बेडी अेखाद्या अलंकाराप्रमाणे घासून पुसून चक्क ठेवणें भाग पडतें. ह्या व्यावहारिक विरोधाभासावरून अेक तात्त्विक विरोधाभास सावरकरांना सुचला तो ह्या कवितेत मांडला आहे.)

बंदिगृहात शिक्षा म्हणून घातलेली बेडी साफच कां करावी, म्हणून पुष्कळ वेळां वैतागून बंदी बेडी साफ करणें सोडून देतात; आणि शिक्षेच्या बेडीचें लालनपालन केलें नाहीं–साफ केली नाहीं; म्हणून बंदिपालाकडून दुसरी शिक्षा खावी लागते. त्यावांचून शेवटीं साफ न केली तर ती बेडी गंजून स्वतःच्या पायाला अधिकच रुपूं लागते; म्हणजे शत्रूनें दिलेल्या अेकपट शिक्षेस नीट कुरवाळून घेतली नाही; तर स्वतःस चौपट शिक्षा स्वतःकरवींच, देअून घ्यावी लागते. म्हणून शेवटी शिक्षेच्या बेडीलाच अेखाद्या अलंकाराप्रमाणेच, घासून पुसून झक्क ठेवणें, भाग पडतें. ह्या विरोधाभासावरून, अर्थातच, ह्या जगाच्या 'अिच्छेच्या' पायांतली, त्या मूळ बेडीची, त्या 'विधिनिषेधीय बेडीची' धर्माधर्माची आठवण होअी. ही लोखंडी बेडी, त्या मूळ बेडीची, केवळ अेक केवळ अेक आंशिक कडी आहे. ती धर्माधर्माच्या बेडीची, अिच्छास्वातंत्र्यास झालेली शिक्षाही, अशाच कारणास्तव, कुरवाळीत बसावें लागतें. ती 'विधिनिषेधांची' बेडीही, अुलट, पुसून ठेवावी लागते. नाही तर अधिकच दुःख होते. ह्या विचारपरंपरेच्या ओघानेच, पुढील प्रश्न अुठतो. ही विधिनिषेधांची मूळ शृंखला कोणी घडवली? अिच्छेच्या पायांत ती कोणीं घातली? तें कोणी सांगावे? विधिनिषेधांच्या शृंखला ज्यांनी घडवल्या; त्यांच्या अिच्छेने, त्या धर्माधर्मांच्या बेड्या, आमच्या मानवी अिच्छेच्या पायांत घातल्या असतील; किंवा त्यांच्या त्या अिच्छेच्या पायातही, आणखी अेखादी अिच्छा, बेडी होअून पडली नसेल म्हणून कशावरुन? की, ज्याच्यायोगे निसर्गनियमांच्या बेडीने जखडलेल्या त्यांच्या अिच्छेला आमच्या अिच्छेच्या पायांत ही विधिनिषेधांची बेडी अडकविणे भाग पडलें? असें हें बंदिगृहांत अुठणारे विचारतरंग ह्या कवितेत गोविले आहेत.

(जाति : घुंगुरवाळा)
(चाल : पाळण्याची)

'अुजळित अुजळित जें। काय करीं
लालिसी तूं दिवसभरी
बंदी, चांदीचे। किंवा ते
अलंकार सोनेरी?'
अजि नचि! केवल ती। लोखंडी
बेडी माझी, खंडी
जखडोनी माझ्या। ह्या पायां
स्वेच्छ गती जी चंडी
'फोडुनि तोडुनि जी। जाळावी
तीच कशी अुजळावी
आपण आपुलिची। रे बेडी?
हौस तुझी ही वेडी!'
सुटते सुटते ही। नचि हो ती
परि जोंवरि तोंवरती
गंजे ती तरि की। गांजी ह्या
अधिक आपल्या पायां
'चरणासि सतत अिच्छेच्या। जी वेढी
घडिं कवण विधिनिषेधांची। ही बेडी'
जाणे कोण अजी। निश्चित तें

परंतु कीं मज गमतें
अिच्छे घडि त्याची। अिच्छाची
वा बेडि तदिच्छेची!

– अंदमान

# ५९. कोठडी[१५२]

(परिचय : तुरुंगात आल्यावर कैदी आपआपली कोठडी ममत्वाने साफ ठेवू लागतात. आपली कोठडी साफ करताना आपल्या मनात जे विचार आले ते सावरकरांनी या कवितेत मांडले आहेत.)

(जाति : घुंगुरवाळा)

(चाल : पाळण्याची)

‘‘लिंपुनि शिंपुनि जें । काय तरी
सजविसि तूं दिवसभरी
बंदी, मंदिर तें । अेखादा
महाल वा सोनेरी ?’
अजि नचि केवळ ह्या । बंदीच्या
भिंति त्या भुयारांच्या
रक्षिति अवसेसी[१५३] । माझ्या ह्या
पासुनिया पुनवेच्या[१५४]
‘तरि ते कोठडिच्या । ह्या क्रूरा
भिंति तोडुंची धीरा
झटशिल तरि होअी । न क्वचित् कां
पूर्ण मुक्तता शक्या ?’
पूर्णा ? अजि ना ना । मातीच्या
भिंति भवति ह्या साच्या
तट जो बंदीचा । कीं त्याच्या
दगडी भिंति दुज्या !
‘आशा सोडी ना । या जगतीं
दगडांच्याही भिंती
धुळिला रे मिळती । तटहि किती
तडकुनीया तुटती !’

---

[152] बंदिगृहांतील कोठडीस प्रत्येक बंदी, तिच्यांत रहाणेंच भाग पडल्यामुळें झाडून झुडून साफ ठेवूं लागतो. प्रथम बंदिगृहाचा नियम म्हणून झाडतो. पुढे पुढे अगदी स्वतःच्या स्वच्छतेची हौस म्हणून वर्षानुवर्षांच्या सहवासाने ती कोठडी अगदी ममत्वाने साफ करीत अितरांबरोबर स्पर्धा करू लागतो, की माझी कोठडी फोडावी कीं ती अुलटी लिंपीत सुटावें! पण शंकेस बुद्धि अुत्तर देअी कीं, कोठडी हें जसें बंदिगृह तसेंच हा देहही अेक बंदिगृहच आहे; पण तें आपण झाडतो पुसतोंच कीं नाही? दुसरें, ‘मुक्तताच’ म्हणाल तर तिचा व्याप बंधाचे विस्तीर्णप्रमाणेच वाढतच जातो. ती मुक्तता नुसती ही भौतिक अेकलकोंडी फोडून कशी मिळणार? तिच्यापुढे बंदिगृहाचे दगडी तट, आणि मानसिक अिच्छाक्षितिजाचे तृष्णेचे तट! पूर्ण मुक्तता कोठें आहे? शंका पुन्हा म्हणे, पण ते ‘जीवनमुक्त’ कोण तर मग? त्यांनी चित्तवृत्तींच्या क्षितिजांना ओलांडून पूर्ण मुक्ति मिळविली नाही का? त्यावर अुलट अुत्तर येअी की, त्यांच्या मरणानंतर आत्म्याचा भाव काय झाला तो फार तर त्यांचा त्यांना ठाअूक; पण जीवनमुक्त जिवंत होते तोंवर त्या वेदान्तिक कुलालचक्राच्या पूर्वगतीपुरतें कां होअीना, पण बंधनातच असलेले दिसत तरी होते. ‘अुषेच्या’ म्हणजे जन्मप्रभावाच्या आणि ‘सांजेच्या’ म्हणजे मरणप्रलयाच्या रंगाने चित्रिलेल्या या ‘मी’च्या म्हणजे अहंकारी व्यक्तित्वाच्या आकाशांत असूं–हसूंचे सुखदुःखांचे जे हलगे ठोकलेले आहेत त्यांना बांधलेल्या वृत्तीच्या झोपाळ्यावरच त्यांना सुखदुःखाचे झोके घेत पहात होतों! या जीवनांत जीवनमुक्तही पूर्ण मुक्तसे दिसत नाहीत. श्रीकृष्ण क्रुद्ध होत. पार्थाची जयद्रथवधाची प्रतिज्ञा पुरी कशी होअील म्हणून रात्रभर तळमळत पडत. बुद्धांचे पोट दुखे. रामकृष्णांना भुकेने रडकुंडी केलें; रामकृष्ण, त्यांचे शिष्ययुवक दिसले नाहीत म्हणून शोक करीत! तुकाराम पंढरीचे वाटेवर रडत बसत. चैतन्याने ‘हे प्रिया हे प्रिया’ करीत रानोमाळ भटकत समुद्राचा नीलश्यामल रंग पाहून तोच घनःश्याम म्हणून त्यांत अुडी घेअून देहत्याग केला!

[153] अवस– हा निराशातिमिमिरात गुरफटलेला काळ.

[154] पुनव– मुक्तजीवनाचा आनंदी दिवस.

तरिही काय ? अहो । आंशिक ती
शक्य ‘पूर्ण’ ना मुक्ति
याहि तटांपुढती । बंदीच्या
क्षितिजांच्याही भिंती !
‘परिसूं परि आम्ही कुणी कुणी
त्याही ओलांडोनी
वृत्तींच्या क्षितिजा । वरिलीची
पूर्ण मुक्तता त्यांनी !’
रंगांत अुषेच्या आणी । सांजेच्या
चित्रिलें विश्वकर्म्याने ! ज्या साच्या
आकाशछता त्या ‘मी’च्या । हलक्यांच्या
हसू–असूंच्या ह्या । झोपाळ्या–
वरतीची झुलत तया
पाहत होतो कीं । होते जों
दिसत तोवरी तरि त्यां !

– अंदमान

# ६०. रवींद्रनाथांचें अभिनंदन

(परिचय : १९१३ सालच्या श्रेष्ठ वाङ्मयासाठी दिलें जाणारें नोबेल प्राअिझ कविवर्य रवींद्रनाथ टागोर यांस मिळाले. हें अैकून सावरकरांस अतिशय आनंद झाला नि त्या आनंदाच्या भरात रचलेली पुढील कविता अंदमानातून त्यांनी रवींद्रनाथांस धाडली.)

(जाति : नृपममता)

(चाल : नृपममता रामावरती)

ज्या समर–बाष्परथकक्षीं[१५५]
चिर–विवासिता कमलाक्षी
भारती राजधानीसी । परतते
घनदाट भाट बंदीचा
सुस्वरांत सुस्वर साचा
कोलाहल रणघोषांचा । क्रांतिच्या
मी तरुण धृष्टतेसरशीं
'जावोचिं' वदे या 'कक्षीं
ही वीरगीतिही माझी । अैकिली'
'कविकक्ष पूर्ण हा माझा
परि अुणीव तेथे जा जा
क्रांतिच्या[१५६] बाष्पयंत्राचा । कक्षा तो ।'
देवीची आज्ञा अैशी
मलधूम कोळशामाजी
त्या अग्निप्रेरक कक्षीं । मी खपे [१५७]
हा आज घुमे जय कैंचा
भारवी कालिदासांच्या
धरि अधृत मान मुकुटाचा । का रवी[१५८] ?
मलधूम कोळशांतुनिया
सोधणें चर्मि[१५९] अुडवुनिया
मी राजकवे, तव विजया । साजवी

– २ –

तद्यज्ञागारीं जेथे
ऋत्विग्वर बसले होते
हवनांहि वीतिहोत्रातें । अर्चितां
अलकांत खोवुनि अेका
करि अन्य गुलाबी कलिका
ये यज्ञपूजना देखा । भारती[१६०]

---

155 भारतमाता आपली राजधानी परत घेण्यासाठी सैनिकबाष्परथातून निघाली.

156 ह्या कार्यी कवींची अुणीव नाही, अुणीव आहे ती त्या समररथाच्या यंत्रात राबणाऱ्या नि स्वत: कोळसे होअून जळून गति देणाऱ्यांची; तर तिथे जा.

157 ह्यासाठी महाकवींची हौस सोडून हें दुसरें कर्तव्य मी स्वीकारलें आणि तो महाकवित्वाचा मान त्यांना मिळाला, त्यातच मी आनंद मानला.

158 रवींद्रनाथ.

159 ह्या वेळी अंदमानात सावरकर कातड्याचें सोधणें गुंडाळून कोळसे भरण्याचें काम करीत होते. स्वाभाविकच हातरु मालाअैवजी आनंदाने तें सोधणेंच अुडवून त्यांनी रवींद्रनाथांचे अभिनंदन साजरें केलें.

निजदास्यमोचना माता
बद्धांजलि मधली हाता –
ती कळी दीप्त दहनीं त्या। अर्पिते
घे प्रफुल्लता निजगंधीं
भ्रमरांची भुलवी मांदी
कळि दुजी गुलाबी परि ती। अलकिंची
भावूनि तद्यशाचा कीं
अलिपुंज–गुंज त्यामाजी
परिणती गुलाबत्वाची। आपुल्या
अलकिंच्या गुलाब फुलत्या
रे खुलत्या डुलत्या तुज त्या
अभिनंदी दहनांतुनि त्या। ती कळी

– ३ –

किति चंदन–तोरण हारी
हें या नव देवद्वारीं
दिव्यार्थ किति कलाकुसरी। सूचवी
कांचनीं खचियलें कोठें
रत्नांत जडविलें कोठे
मधुकुसुममालिका डुलते। नवनवी
ह्या पुण्यदिन–अुषःकालीं
पूजेची दाटी झाली
त्या वानिति शत नरनारी। तोरणा
देवळांत जगदंबेचा[१६१]
हरूं ताप पुजारी तीचा
लघु खंड अुगाळी साचा! चंदनी
झिजझिजत सहाणेवरती
लघु खंड तो तुला देती
घे ख्यात तोरणा प्रणती! मानुनी

– ४ –

श्रीविक्रमसिंहासन तें
चिरलुप्त लुप्त दिव्या ते
वीणाहि मेघदूतातें। गाअि जी
श्री विक्रमसिंहासन तें
अद्यापिहि लुप्तचि परि ते

---

[160] भारतमातेने तिच्या विमोचनास्तव जो यज्ञ चालला होता त्याच्या पूजनार्थ अेक कळी वाहिली नि दुसरी तिने केसात खोवली. केसात खोवलेली कळी खुलु शकली, तिच्या गौरवात गुलाबाच्या फुलांच्या जातीचाच गौरव झाला, तसाच रवींद्रनाथांच्या गौरवात अखिल भारतीय कवींचा राष्टीय गौरव झाला. असे समजूनच त्या यज्ञाच्या अग्नीत जळणारें हें दुसरें पुष्प त्या पहिल्या पुष्पाचें अभिनंदन करीत आहे.

[161] भारतीय महाकवि होअून तोरण होण्याची मनीषा कवीस होती, पण सहाणेवर झिजत राहून देवतेचा ताप हरण्याचें कार्य त्याच्या वाट्यास आलें. आपली अपूर्ण आकांक्षा कोणातरी भारतीयाने पूर्ण केली, जगतास भारतीय प्रतिभेने दिपवून सोडलें ह्याविषयी कवीस कृतार्थता वाटत आहे, हा भावार्थ.

वीणा कीं तरि अवतरते ! त्वत्करीं
कीं गान गुंगवी तीचें
गोलार्धे अुभयहि साचें
प्रथमची कालिदासाचे । नंतरीं
कारागृहि कांचनगेहा
हे बंदीराज रवींद्रा
शृंखला राजबंदी ह्या । वंदितों

– अंदमान

## ६१. आकांक्षा (Aspiration)

(चाल : मंदाक्रांता)

हेमाद्रीच्या वसत करुनी, गव्हरीं जो घरातें
ज्याच्या कल्पद्रुम–समुचयें, आंथरी सेज कांते
अैशा अेक्या सकल–विहग–श्रेणि–सम्राट् सुपर्णा
शापी काल प्रणमित न की, स्वप्रगामी पदांना ॥ १ ॥
तो कांतेच्यासह खगपती सप्तवर्षात शापें
अैशा, स्वत्वा विसरुन, पदीं आपुल्या अुच्च कांपे
वाटे तारा तुटत जाअिं तो कोसळे अंतरिक्षीं
ये भूभागीं अचिरचि शिला–लोहसा हाय! पक्षी ॥ २ ॥
काकांमाजी गणुनि आपणां काकची जोडपें तें
पक्षींद्राचें, दिवस अधमा–वृत्तिने नेत होतें
दांपत्याच्या अुदरिं तव त्या, जन्म रे पावली ही
शापांधत्वें पितर गणती काकची ते मलाही ॥ ३ ॥
माता बांधी परम कुतुकें भूवटीं पाळण्याशी
झोके घ्यावे मज परि गमे पर्वतस्कंधदेशीं
स्वप्नीं गोष्टी बरळत सुटे वादळांच्या विजांच्या
मी जैं तैं तें अशुभ गणुनी दे ह्रदा भी तियेच्या ॥ ४ ॥
देतां प्रेमें करट–घरटा–माजि ह्या तार्क्ष्यबाळे
मृत्पिंडांच्या जनक कवलां, लाल व्हावेत डोळे
लागे दंष्ट्रा नख शिवशिवूं, घोर फूत्कार यावे
कर्णी कोण्या कळत न रसासी जिभेनें झुरावें ॥ ५ ॥
नेती येतां सहज मजला जैं अुडायास काही
त्या काकांचा कळप निघतां संगती ते मलाही
तैं चीत्कारा करुनि सहसा, गृध्र आणी ससाणे
जावे मातें बघुनि, मुखिचें टाकुनि मांस भेणें ॥ ६ ॥
गाती जेव्हा करट वधुनी कीटकां पौरुषातें
अुच्छिष्टातें पळवुनि हळू ज्ञातिकौशल्य वा तें
वाटे लज्जाविषय मज तें, मी जवें झेंप घेते
सिंधु–पृष्ठी तिमि अुसळता, भीतिवैषम्य त्यातें ॥ ७ ॥
अैशा अेका समयिं निघता संगती काक सारे
जाता जाता चुकुनि शिरलो घोरशा कानना रे
काकांमाजी भयविकट तों अेकची हाक झाली
अस्पृश्या ती कवण अहहा आग अंगासि जाळीं ॥ ८ ॥
सों सों फूं फूं करित सुटले दुर्विषाचे फवारे
सारें वातावरण भरिती कालकूटांत वारे
कोण्या आकर्षणि अतितरोद्भीषणीं सापडूनी
हाहाकारासहचि अुडता खालती कोसळूनी ॥ ९ ॥
झुंडी जैशा सणण सुटल्या कृष्णपुच्छी शरांच्या

रोधानेंची कुहरिं कवण्या, घोरशा गव्हराच्या
फूत्कारीं त्या दहनवमत्या. वेग तो नावरोनी
पक्षी पर्णांसम टपटपा भस्म होती जळोनी ॥ १० ॥
मीही तैशी अवशचि जरी कारणें भिन्न साचीं
झाल्यें फूं फूं घनरव मदोन्मत्त तो अैकताची
पाणी जिव्हे सुटत सहसा, भूक लागे, मुसंडी
नेटे पंखांतुनि, सळसळू लागले दंत तुंडीं ॥ ११ ॥
खालोनी त्या भयद कुहरें खेचितां सूं करोनी
औत्सुक्याची नव अवशता; लोटिता ती वरोनी
मी दे वेगें बुडि न अुडता अंतरालांत खालें
आल्ये तों तों श्रवणिं पडली हाक 'गे हाय! बाळे' ॥ १२ ॥
तारी तारी जनकजननी गव्हरी घोर माझी
आतां जों की अवश शिरुनी भस्म होणार तोंची
रोधोनि स्वा गति, हिसडुनी त्यांसि वाहोनि मागां
ये जों अद्रीवरि तधिं दिसे स्वप्न वा सत्य वा गा ॥ १३ ॥
शृंगीं शृंगीं मलमल मअू चुंबितां त्या नभासी
शुभ्रा शांता गिरिं पहुडल्या मेघ-कर्पास-राशी
पिंजारी हा घुसत सहसा त्यांतुनीया तयांचा
पक्षाघातीं विकिरित नभीं चालला पुंज त्यांचा ॥ १४ ॥
आहे जों त्या भयद कुहरापासुनी अुंच काही
पक्षी देहा निज पळभरी तोलुनी स्तब्ध राही
राही राहीनचि तडक तों वांकडा रोख घेअी
घेअीना तों कुहरिं खिळुनी तीरसा तीव्र जाअी ॥ १५ ॥
प्राणी[१६२] गर्तानन कुणि! न तें गव्हर! क्रूरकर्मा
दे घे, घे दे, लगटुनि खगा, घोर आघात मर्मा
हाटे हा, तों अुपसुनी फणा मत्त आव्हान फूं फूं
दे, तो येतां दशन विळखे मारितो त्यास गुंफूं ॥ १६ ॥
काही त्यांची धरसुट अशी रक्तबंबाळ झाली
दंतां वक्रीं क्रकचनखरां, घासता धार आली
झंजा झंजावरि अुसळुनी आपटावा तसे ते
दोघे दोघांप्रति बिलगले, झुंज घायाळ हो ते ॥ १७ ॥
झेपाझेपी धरपकड तों चंचुमाजी विखारी
अेकाअेकी मुडपुनी फणा सापडे हो अखेरी
भंगक्रोधें गरल वमला चाविल्या अुग्र दाढा
पुच्छाघातें अुडवित विजा हाणिली भू तडाडा ॥ १८ ॥
दारूकामामधिं सुटतसे पेटला बाण जैसा
शत्रूसी तो खिळखिळविता अंबरी अुंच तैसा
मर्मा तों दे भयद विळखे चेपिता विद्ध झाला

[162] अेखाद्या भयंकर नि खोल गुहेसारखी ज्याचा प्रचंड जबडा अुघडलेला आहे असा तो प्राणी अजस्त्र भयानक नि महासर्प होता.

हा हा ! पक्षी रिपुसह पडे बाण जैसा विझेला ॥ १९ ॥
चंचूमाजी करकचुनिया कंठ तो[163] रक्त ओकी
ओकी रक्ता विहग वळसे चेपिता वृक्ष तो की
सोडीना हा खग परि फणा; हा[164] न वा ते लपेटे
वैऱ्यांची त्या जटिल पल ही झुंज घे झोंप वाटे ॥ २० ॥
त्याचा त्याचा गुदमरुनिया श्वास अंती चिकाटी
त्याची त्याची शिथिल किमपी, संधि साधूनि तों ती
पक्षी–राजा सकल बल तें खर्चुनी प्राण–घेते
तोडी फोडी विकल वळसे, रे करू हृष्ट मातें ॥ २१ ॥
की[165] सूडाच्या गळुनि पडला रज्जुची चाबुकाचा
प्राणी देहा निज मग करी वर्तुलाकार साचा
मध्ये प्राणासहचि वमला त्या प्रभावान् मण्याशी
वाटे झोपे रवि सपरिवेष स्वयें हा धरेशी ॥ २२ ॥
धापा देता विहग पडला दूर जो भागलेला
मेलेल्याही विभय न धजे स्पर्शुं जेता जिताला
निःशंका ती अचिरचि जयश्री परी माळ घाली
स्पर्धा देती मजसि सखया, सांगतें सत्य झाली ॥ २३ ॥
ती चंचू, तीं क्रकचनखरें, हैमपक्ष्मप्रभा ती
अैटीची ती जय–शिथिलता, पांख शोधीत होती
ग्रीवा ती की प्रबल लवणें जीस ठावे न मानी
व्हावे वाटे विहगपतिची त्याच म्यां पट्टराणी ॥ २४ ॥
दर्पाची कीं सतनु विलसे, अुन्नता वक्रताची
शौर्याच्या वा असिदललते शेंग आरक्त साची
कीं काळाचा तिमि पकडतां आकडा हा गळाचा
चुंबू चंचू विहगपतिची लोभला जीव माझा ॥ २५ ॥
''ये गे गेहीं'' परि परिसतां आर्तवाणी पित्याची
गेल्यें नीडीं; तळमळत ये नीजही अल्प साची
तों त्या नाना दिवस–घटना–मिश्रणांसी विचित्रां
घेता घेता, स्मृति अघटिता रंगवी स्वप्नचित्रां ॥ २६ ॥
प्राण्याची त्या मृदुल तनुची की जशी सेज होअी
आणी वक्षी विहग मज तो दांडगा घट्ट घेअी
मर्मां मर्मां अभिनव कला ! अूंः ! किती गोड लागे
तों की माता मजसि हिसडी, हाय रे ! दूर रागे ॥ २७ ॥
बोधी क्रोधें अहह ! तनये, सोड नादासि ह्याच्या
ह्याच्यासंगे फसशिल मुली, संकटी वादळांच्या
पिंडा खाणें पडुनी घरटीं, झोंपणें स्वस्थ साचें
सोडूनी तें स्मरति तुज कां डोहाळे हे भिकेचे ॥ २८ ॥

---

[163] तो महासर्प
[164] महासर्प
[165] तो प्राणी म्हणजे तो महासर्प जेव्हा मरणासन्न होअून खाली पडला तेव्हा मूर्तिमंत सुडाच्या चाबकाची वादीच खाली गळून पडली आहे कीं काय असें भासलें.

वारे तोंची सुटति, अुठती घोर अंधार, भारें
पर्जन्याच्या नभ लवतसे सिंधु थैमान सारें
प्याली दारू प्रकृति सहसा! दोल घे वादळांच्या
झोपाळ्यांच्यावरि धरुनिया साखळ्यांशी विजांच्या ॥ २९ ॥
तों दो क्रोधोद्धत डुरकते मेघ धिप्पाड आले
अनोन्यांशी धडड टकरा देत आम्हांसमोरे
सारी दोघांमधि पसरुनी पंख, मध्यस्थ जैसा,
पक्षी शोभे अधर तरता दो नगीं पूल तैसा ॥ ३० ॥
बैसू स्वारी भरुनि वरि की दो अम्ही अंबुदांच्या
चंचूंचे अंकुश रुतवुनी मत्त कुंभांत त्यांच्या
गेलों डौलें दवडित तयां की महात द्विपाशी
गेलो गेलो मणिमय कुण्या पूर्वदिङ्मंदिराशी ॥ ३१ ॥
राणी जेथे रति, मदन हा जेथला होय राणा
आलों आम्ही अभिनव अशा रम्य राज्यास कोणा
हैमी हौदांतुनि जिथ अुषःकालच्या ठेविलें गा
मार्गी मार्गी सुखमधुमया चेतना दिव्य रंगा ॥ ३२ ॥
त्या रंगांहीं सुरपधनुच्या पीचकाऱ्या भरोनी
झालो लीलासमर करिता दंग रंगात आम्ही
आल्या आल्या गगनि गगनी, कौमुदीच्या सरी रे
न्हालों प्यालों भरुनि भरुनी त्यांत हे प्राण-प्याले ॥ ३३ ॥
प्राण्याच्या त्या विपुल तनुची मांसला आंथरोनी
गादी जैसी दुकुल-दुलअी त्या घनांची करोनी
भासे माझा जिवलग मला बोलवी ये हृदाशी
जाअू गेल्यें-परि न शकले, हाय! हा! जावयाशी ॥ ३४ ॥
गेलीं गात्रें खिळुनि सहसा, ये हलूं ना चळूं हो
मातें सारे हिणविति कृमी कीट हांसोनि हो! हो!
लज्जेने त्या अधिकचि झटे, भेटण्या वैनतेयीं
अैशा कष्टी तडफडतची रे मला जाग येअी ॥ ३५ ॥
तैशीची मी कळत न कुणा वा मलाही निघालें
स्वप्नी तैशी तडक विपिना कालच्या थेट आलें
पिंजारूनी गिरिं पहुडल्या पार गेलें घनांना
कोठेही तो जिवलग परी हाय रे! हा दिसेना ॥ ३६ ॥
श्रान्ता भ्रान्ता स्मरत दयिता मी भरी रान शोकें
तो त्या अेक्या नभ अुतरत्या दिव्यमूर्तीसि देखे
वीणा ज्याची डुलवित घना घे वहावा! वहावा!
पायी ज्यांच्यावरि जडविल्या चांदण्या त्या खडावा ॥ ३७ ॥
मच्छोके तो गहिवरुनि मत्सन्निधी देव आला
त्या शापाचा मजसि कथिता पूर्ववृत्तान्त झाला
'बाले, तूं तों गरुडतनया; लोभलीसी जयाते
वांछी तोही प्रणयवश गे, तार्क्ष्य कीं अेक तूतें ॥ ३८ ॥

धूलीमाजी विकल विरहें ढाळि तो आसवांना
जाती भोंती विषधर जिते पाहिलें म्यां सुपर्णा
युष्मत्प्राणांसचि न तुमच्या वृद्ध मातापित्यांही
अुद्धाराया प्रणय तुमचा मात्र अुःशाप पाही ॥ ३९ ॥
जाणोनी हें द्रवुनि बघता त्या अणी तीव्र शोकी
साह्या गेलों परि न मम गे, साह्य याचीच तो की
हा तो सारा कलह करवी ! भांडखोरां जनांनी
पूर्वी कंडी पिकविलि गमे, ती जणूं सत्य मानी ॥ ४० ॥
मातेची का, कलह बघता हौस कोणा न वाटे ?
तीचेंही मी परि अलिकडे काढि का नांवही तें ?
लोकार्था म्यां सतत झटता नारदाने पुराणें
गाती थोडें, चुकुनि कळही लागतां लांब गाणें' ॥ ४१ ॥
बोलूनीया हृदय-भरतें, दावु आभार अज्ञा
अेकाअेकी सुरमुनिपुढे मी पडे नष्ट-संज्ञा
आश्वासोनी त्वरित अुठवी देव, तैं पत्रिका ही
प्रभ्वाज्ञेने प्रभुकरिं करीं धाडण्या धाष्ट्‌र्य पाही ॥ ४२ ॥
फाटूं व्हावें करट-घरटें अेक कीं म्यां खुजावें
कां ही वृत्ती विषम करि तें शापवृत्तान्त ठावें
हीतें पूर्वी व्यसनसम जें अंधकारांत जिंकी
दिव्यालोकी तुजसि अजि तें प्रेम अर्पी प्रिया कीं ॥ ४३ ॥
मंथायाची विषधर-विषें हाव ती रत्नकामी
माध्यान्हीच्या दिनमणिवरी धाव ती दिव्य-गामी
झंझा-झोके मज अनुभवू हेचि अुल्हास वाटे
काकस्वास्थ्यीं करटघरिंच्या जीवणें मृत्यू दे तें ॥ ४४ ॥
पक्षांमाजी प्रबल तुझिया गाढ आलिंगनी ते
मर्मी मर्मी शिवशिवतसे चेपिलें जावयातें
तार्क्ष्येच्या ह्या करटगतिची लाज तार्क्ष्या ! तुला ही
येअी ! येअी ! जिवलग खगा, नातरी प्राण जाअी ! ॥ ४५ ॥

(आर्या-गीति)

रतिने, दाक्षिण्याने, अनुकंपेने परी तुवा यावें
राणी म्हणुनी किंवा दासी गणुनी परी हिला न्यावें ॥ ४६ ॥
'हो', त तुझ्या जीवन हें, 'ना' त तुझ्या मरण वा जिचें आता
मूर्तिमतीच महत्वाकांक्षा मी, ध्येय तेंच तूं महता[१६६] ! ॥ ४७ ॥

– अंदमान

---

[166] ह्या आकांक्षा त्या क्रांतिप्रवण तरुण गरुडकन्येच्या आहेत.

# ६२. जगन्नाथाचा रथोत्सव

(परिचय : जगन्नाथपुरी या क्षेत्री जगन्नाथाच्या रथाची मिरवणूक प्रतिवर्षी निघत असते. ती मिरवणूक अेक अुदात्त नि विशाल प्रतीक आहे, अशी कल्पना सुचून तिचें वर्णन या कवितेत केलें आहे. यांत विश्वनियंता जगन्नाथ गतींचे अश्व जुंपलेल्या दिक्क्षितिजांच्या रथात बसून कालाच्या अतुट अुतरणीवरून कुठें जात आहे याबद्दल साश्चर्य प्रश्न केला आहे.)

(जाति : माळीण)

(चाल : हंसतमुख तरुण सारखी)

अैश्वर्ये भारी । ह्या अशा । अैश्वर्ये भारी
महाराज, आपुली कथा ना कुठें निघे स्वारी ॥ ध्रु. ॥
दिक्क्षितिजांचा दैदीप्य रथ तुझा सुटता
ह्या कालपथाच्या अतुट अुतरणीवरता
नक्षत्रकणांचा अुठे धुराळा वरता
युगक्रोश[१६७] दूरी । मागुती । युगक्रोश दूरी
महाराज, आपुली कथा ना कुठे निघे स्वारी ?

– २ –

पुसूं नयेचि परी । पुसतसें । पुसूं नयेचि परी
मिरवणूक ही किमर्थ अथवा कुठे निघे सारी
दुज्या कुण्या द्वारीं । जावया । दुज्या कुण्या द्वारीं
किंवा केवळ मिरवित येअी परत निजागारीं
ह्या सूर्यशतांच्या किती मशाली जळती
मधुनीच शतावधि चंद्रज्योति[१६८] ह्या अडती
सरसरत बाण हे धूमकेतुचे सुटती
कितिदां आणि तरी । हीहि तैं । कितिदां आणि तरी
अुठे चमकुनी रात्रि[१६९] पुरातन तिच्या अंधकारी

– ३ –

जीवाचीच किती । कथा ह्या । जीवाचीच किती
रथासी जगन्नाथ, तुझ्या ह्या ओढूं जे झटती
ज्वालामुखिपंक्ती – । पासुनी । ज्वालामुखिपंक्ती
–– मज्ज्ञापिंडापर्यंत प्रस्फुटिता जी जगतीं
अुंचनिंच पाठीं । पुढति वा । अुंचनिंच पाठीं
गति[१७०] तितुकी तव रथ झटतसे ओढायासाठी
अिच्छांत आणि ह्या भूतमात्र वेगांच्या

---

[167] ही जगन्नाथाची मिरवणूक ज्या कालाच्या अुतरणीवरून येत आहे त्या कालपथाचे युगें हेंच कोस होत ! तो सृष्टिविकासाचा रथ धडधड पुढे जातो तसा मार्गावर चुरडून अुधळून गेलेल्या नक्षत्रमालिकांचा धुराळा मागे अुठत आहे.

[168] दारुकामांतील श्लेषाने निरनिराळ्या सूर्यमालिकांतील चंद्र –आज प्रकाशणारे आणि कालेकरून मागमूस देखील अुरू नये असे चंद्रज्योतीसारखे विझून जाणारे जे चंद्र - त्यांच्या ज्योति.

[169] मूलरात्रिर्महारात्रिः 'आसीदिदं तमोमूढं प्रसुप्तमिव सर्वश:' किंवा भौतिकशास्त्रदृष्ट्या जडद्रव्य विकास घेता घेता त्यातच चेतना, जाणीव स्फुरू लागते. 'अुठे चमकुनी' पुन: तो संघात पृथक् होतांच जाणीव, ज्योत नष्ट होअून जड मागे अुरतें.

[170] जगन्नाथाचा रथ ओढण्यास प्रत्यक्ष 'गती'च घोडा झाली आहे. मज्ज्ञा पिंडातील रसांमध्ये जें स्पंदन होअून भावभावना प्रकट होतात त्या स्पंदनापासून तों जडातील भौतिक गतीपर्यंत सर्व स्फोट - विकास - प्रगती ह्या जगन्नाथाच्या महान् मिरवणुकीस पुढे नेत आहेत..

ओंवून लगामा तुझ्या परम अिच्छेच्या[१७१]
त्या अतुट अुतरणीवरती हो काळाच्या
खेळत हा अतली[१७२] । रथोत्सव । खेळत हा अतली
महाराज, आपुली कथा ना कुठे निघे स्वारी ?

– अंदमान

---

[171] घोड्याच्या वरवर स्वेच्छ दिसणाऱ्या वेगात, धन्याच्या अिच्छेप्रमाणे हलणारा लगाम गोवलेला असतो, तसा ह्या सर्व भूतमात्रांच्या, वस्तुजाताच्या वेगांत अीश्वरेच्छेचा, परमप्रवृत्तीचा रश्मि ओवलेला आहे.

[172] ज्याला तल नाही, धर नाही, अशा पथाने, निर्हेतुक र निरावलंबी र अित्यादि तात्विक संदर्भही त्या शब्दाने ध्वनित होतात.

## ६३. सूत्रधारास

(चाल : माझा तूं यजमानसारखी)

सूत्रधार आपुला । जरी तरि पडदा हा अुचला ॥ धृ. ॥
‘ह्या दृश्याच्या पडद्यामागे कथित कुणी मजला
रंगभूहुनी रंगकक्षची[१७३] आश्चर्यी खचला’
‘त्रिरंगवाटी अेक तिथे ती, तीमधुनी सकलां
दृश्यांसह नटवर्ग निपजता आम्ही पाहियला’
’अितुकें नचि परि विचित्र वाटीमधूनि त्या सजला
सूत्रधारचि स्वयें अुपजतां आम्ही पाहियला’
‘कसली वाटी कसले घेअुनि रंगबिंग बसला
स्वश्वसितीं तो सूत्रधारची रची अिंद्रजाला’
‘प्रत्यक्षासी प्रमाण दुसरें हवें कासयाला
पडद्यामागे आम्ही अंध:कारा पाहियला’
‘स्वयेंहि होतां अंधकारमय आंत पाहत्याला
आंत जाअुनी पडद्याच्या की आम्ही पाहियला’
‘पाहियलें ! प्रत्यक्षचि कथितों पाहियलें त्याला !’
वदती सारे ! आप्तचि सारे मानूं कवणाला ?
अुचला अुचला ! वा न! धन्यची मम आत्मा धाला
तुझ्या जयें या रंगभूमिचा रंग पाहियेला !

– अंदमान

[173] रंगपट.

# ६४. अज्ञेयाचें रुद्धद्वार

(जाति : भूपतिवैभव)
(चाल : भूपती खरें तें)

ज्या घरापासुनी मार्ग सर्व फुटणारे
येणार घरासी मार्ग त्याचि ते सारे
अैकोनि तुझ्या भाटांच्या
गप्पांसि गोड त्या त्यांच्या,
घ्यायासि विसावा माझ्या
जीवासि ये घरीं तुमच्या
ठोठावित थकलों ! अजुनि नुघडती बा रे
आंतूनि तुझीं तीं बंद सदोदित दारें ॥ १ ॥
विस्तीर्ण अनंता भूमी
कवणाहि कुणाच्या धामी
ठोठावित बसण्याहूनी
घेअीन विसावा लव मी
येअीन पुन्हा ना तुझ्या घरा ज्याचीं रे
हीं वज्रकठिणशीं बंद सदोदित दारें ॥ २ ॥
ज्या गति कथा राजांच्या
सोनेरि राजवाड्यांच्या
मा पथें पुराणज्ञांच्या
जावया घरा त्या त्यांच्या
चाललों युगांच्या क्रोशशिला गणितां रे
तों पथा–अंतिं घर अेक तुझें तें सारें ॥ ३ ॥
दुंदुभी नगारे शृंगें
गर्जती ध्वनींचे दंगे
क्रांतीचे वीर रणरंगें
बेभान नाचती नंगे
मी जात मिसळुनी त्यांत त्या पथें जों रे
अंतासि अुभें घर तेंचि तुझें सामोरें ॥ ४ ॥
कोठूनि आणखी कोठें
चिंता न किमपि करिता ते
ही मिरवणूक जी मातें
नटनटुनि थटुनि ह्या वाटे
ये रिघूं तींत तों नाचनाचता मारे
पथ शिरे स्मशानीं ! ज्यांत तुझें तें घर रे ॥ ५ ॥
सोडुनी गलबला सारा
अेकान्तपथा मग धरिला
देताति तारका ज्याला
ओसाडशा अुजेडाला

चढअुतार घेतां अुंचनिंच वळणारे
अजि मार्ग तोहि ये त्याचि घरासी परि रे ॥ ६ ॥
जरि राजमार्ग जे मोठे
तुझियाचि घराचे ते ते
घर अन्य असेलचि कोठे
ह्या अरुंद आळींतुनि तें
मी म्हणुनि अणूंच्या बोगबोगद्यांतुनि रे
हिंडुनी बघें घर अन्ति तुझें सामोरें ॥ ७ ॥
घर दुजें बांधु देअीना
आपुलें कुणा अुघडीना !
ह्या यत्न असा चालेना
बसवे न सोडुनी यत्ना
ठोठावित अजि मी म्हणुनि पुनरपी बा रे
तीं तुझ्या घराचीं बंद सदोदित दारें ! ॥ ८ ॥

– अंदमान

## ६५. मरणोन्मुख शय्येवर

(परिचय– १९११ ते १९२१ पर्यंत अन्दमानमध्ये तुरुंगात सावरकरांची प्रकृति अेकसारखी बिघडत जाअून क्षयावर जाते कीं काय अशी डॉक्टरांनादेखील भीति पडली असताना नि केवळ थोड्याशा दुधावर राहून अंथरुणास महिनोगणती खिळून पडलेले असताना त्यांना मरण बरें वाटू लागे; अितकेंच नव्हे तर ते अेकदा अगदी अंथरुणाशी येअून ठेपलेही! त्या वेळेस मृत्यूच्या त्या गंभीर छायेखाली ही कविता त्यांनी लिहिली. )

(वृत्त : वैनायक)

ये मृत्यो! ये तूं ये, यावयाप्रती
निघालाचि असशिल जरी ये तरी सुखें!
कोमेजुनि जावया भिवोत हीं फुलें
हीं द्राक्षें रसरशीत सुकुनि जावया
भ्यावें तें कां म्हणुनी तुजसि परी मी ?

माझ्या पेल्यांत किती पीत राहिलों
तरि न संपतीच अशा असति आजि ह्या
अश्रूंच्या मदिराची मात्र राहिल्या !
ये, त्या जरि नैवेद्या असिसि भुकेला
आणि जरी दिवस असे अजुनि तरुण हा

तरि लहानथोर अशीं असति संपलीं
दिवसाचीं कार्येंही बहुत करुनिया;
तोडजोड करुनि परी फेडलीं ऋणें
जन्मार्जित जीं जीं तीं; ऋषिऋणाप्रती
श्रुतिजननीचरणतीर्थ सेवुनी कधी,
धरुनि कधी ध्रुवपदांसि संत–ततीच्या
आणी ही आचरुनी अेक तप अशी
आशेच्या ह्या स्मशानभूत तपस्या
देवऋणा, फुंकुनि रणशृंग, दुंदुभी
धडड धडड पिटुनि, आणि तो आघाडिचा
चढवुनि तैं हल्ला सहसाचि ज्या पलीं
सुटली रघुवीराची प्रथम रणाज्ञा
आणि त्याचि रणयज्ञाग्नीत पेटल्या
अस्थि अस्थि, मांस मांस, अिन्धनें तशीं
जळत जळत आज असे शेष राहिली
राख यौवनाची मम! आणि म्हणुनिची
फेडाया पितृ–ऋणासि आजि अहो मी
शास्त्रातें, अनुसरोनि दत्तविधानें,
निपुत्रिकत्व वारियलें पुत्र अखिल हें
अभिनव भारताची मम! जेथ जेथ कीं
पाळण्यांत विकसतसे नयन–कमल तें

तेथ तेथ मीच बघें सृष्टि–कुतुहला.

नव अुन्नति शील भालपटलिं दिसत जैं
अुदयोन्मुख तेज तरुण, तैं पुन: पुन्हा
माझ्याही अुदयोन्मुख होति हृदीं ह्या
आशा नव, आकांक्षा अुच्च, भावि त्या
आमुचिया वंशाच्या गौरवाचिया -
भारतीय केवल ना, मानवीयही
वंशाच्या गौरवार्थ ! अखिल मानवी
यौवनांत अनुभवीन यौवनास मी

आणि पितर माझे ते प्रेमतर्पणा !
येअि सुखें मृत्यो, तरि– असति हीं अशीं,
तोडजोड करुनि परी फेडिलीं ऋणें,
आणि बहुत करुनीया असति संपलीं

दिवसांचीं कार्येंही : यद्यपी कधी
अुगवे हा दिवस,[१७४] कधी मावळोहि वा;
कर्मे वा कवण कशीं कार्य, ह्या दिनीं
ह्याविषयी पंचांगे[१७५] भिन्न, भिन्नची
भट्ट आणि पण्डित हे कथिति मज कथा,
तरिहि लोकसंग्रहार्थ, धारणेप्रती
मानवीय आत्यंतिक आत्महिताच्या,
सज्जनासि गमलीं अनुकूल तींच कीं
कार्यें म्यां धर्म्य अशीं मानिलीं अणी
तदनुरूप अेकाचा म्हणुनि जो ठरे
म्यां माझा भार असे अुचलिला मुदें
यथाशक्ति यथा परिस्थिति न भंगितां
धरिलें तें व्रत कदापि किमपि ना भयें.

सत्कुल, अव्यंग देह, परम दयाळू
जनक आणि जननी ती, त्यांहुनीहि कीं
वात्सल्यें, पुण्यें, प्रतिपाळिता तसा
अग्रज, जो अग्रगण्य तापसांमधे;
मूर्त विनय अनुज असा; अद्वितीयसें
प्रेयांचें प्रेमपुण्य ; धन्य आणि तें
ध्येय महत्, देअी जें जीवनाप्रती

---

[174] अर्थात् हें जीवन, हा जन्म हाच ह्याचा आरंभ आहे की केवळ रूपांतर; मरण हाच अंत आहे की केवळ तिरोधान हे कुणी सांगावे ?

[175] अर्थात् स्मृतिप्रभृति ग्रंथ, स्मृतिकार, तत्वज्ञानी– नैको ऋषिर्यस्य वच:प्रमाणम् ।

सार्थकत्व मनुजांच्या, काव्यमय करी
जें आयु:कालातें, पूत चरित्रा;
तप काही, जप काही, यश काही तें
काहीशी मान्यताहि शारदेचिया
राजसभेमाजी कविरत्नभूषिता

चाखियलें रस नाना; हुंगियले ते
शतभूजलवायुललित शतसुगंध की
पंचाग्नीमधील तया प्रखर भाजल्या
अुत्तापापासुनि तों प्रीतिच्या मअू
स्निग्ध परिष्वंगापर्यंत सर्वही
शीतल, शीतोष्ण, अुष्ण अनुभवीयलें

कटिबंधस्पर्श[१७६] तसें; परिसिले किती
स्वरशत, शतभाषा, शतगीति नवनवा
शतमंजुल कण्ठातिल र आणि मृत्यूच्या
शतकठोर कंठातिल घोर लागल्या;
नाना जन, जानपदें, जातिविभिन्ना
देश किती दृश्यें तीं, भूमिच्या महा
संग्रहालयांत परिभ्रमत पाहिली.

सुरूप तें सुरेख तें, सुललित तें असें
पाहियलें डोळ्यांनी किमपि तरि जया
मृत्यो ! ते डोळे हे झांक तूं सुखे !

- झांकणेंचि आवश्यक जरि गमे तरी !
की सुरेख पाहियलें र किमपि परी तें !
प्रीति विपल : विरह चिरंतन ! नवीं वयीं,
प्रौढ धुरंधरहि न जी शकति तोलण्या,
तीच धुरा भर अुन्हांत तोलणें घडे !

म्हणुनि असे अजुनी अपुरीच राहिली
खेळाची हौस हंसत चांदण्यामधें
ह्या आयुष्याच्या मम ! तरिहि जाणुनी
कीं न ययातीचीहि हौस पुरेशी
झाली जरि आयुष्याचाचि सर्व तो
नृपति करी खेळ अेक; आणि पाहुनी
अिच्छेच्या बीजा फल भोग लागता

---

[176] ह्या शब्दाचे श्लेषार्थ हे त्या सर्व रूपकाचे मानसिक आणि भौतिक असे दोन अर्थ करीत आहेत.

अिच्छेचीं बीजेंची त्यांत फिरोनी;
आणी अनुभवुनी कीं अेक भुकेची
अेक जेवणाने जी तृप्ती जाहली
तृप्ति सहस्त्राव्याही भोजनामुळे
असते की तितुकीची आणि तशीची;
मी दे तुज अनुमोदन संपवू असा
हा जीवनलेख अिथें; पृष्ठिं या, जरी
पृष्ठें जीं पुढलीं तीं मागल्या तया
पृष्ठांची असली पुनरुक्तिची तरी !

म्यां असतां दिवस नसे व्यर्थ गमविला
दिवसास्ताचेंहि म्हणुनि दु:ख ना मला.
र भीति अुद्यांची ही वा ! मृत्युच्या मृता
जरि असेल त्या अंध:कार–लतेला
फुलत दुज्या[१७७] दिवसाचे फूल तरीही
भीति न मज; कीं येथे पेरिलें अम्हीं
फुलत आणि फलत तेंचि. कथिति ते तिथे.
आणी मी पेराया कष्टलों असे
बीजें कीं तीं जीं निवडुनी दिलीं
त्यांनींची अत्युत्तम म्हणुनिया मला
पेरूं फलाशाविरहित. ‘तूं तसें जरी
वर्ततील समपरिस्थितींत अन्यही;
तरि लोकोन्नति–विनाश होय ना असें
वर्त तसेंची वर्तू यत्न म्यां सदा
केला आबाल्य ‘जसे अन्य तुझ्याशीं
वागावें म्हणुनि तुला वाटतें तसें
तूहिं वाग अन्याशीं संतवचन हें

मी अनुपलिं पालाया कष्टलो अणी
जरि आपद्धर्म सेव्य मानिले तरी
ते अितुक्यास्तवची कीं धर्मचीं[१७८] स्वयें
ओपुनि दे आपत्तीच्याचि मज करी !
जैं हिरव्या गवताचा गार गालिचा
वरुनि दहापावलीच अंगणामधे
कारागारात कधी मी फिरे तधी
आत्मौपम्यात मुरत चित्त थिजोनी
कितिदा तरि चरण अकस्मात चालता

[177] दुज्या दिवसाचे फूल = पुनर्जन्म, दुसरा जन्म असेल तर तो कर्मफलाप्रमाणे असतो ही अुपपत्तीही सत्य असली पाहिजें. पुनर्जन्मवादी तसेंच म्हणतात.
[178] धर्मच स्वत:च्या रक्षणासाठी कधी कधीं आपद्धर्माचे हत्यार अुपसतो.

स्तंभित होऊनि रहावेत घटिघटी
काही केल्याहि तया तरुण कोवळ्या
गवताचे अंकुर दुखतील या भयें
पाय त्यांवरी नये पडूचि की पुढे

हातीचा घास कधी हटुनि रहावा
हातीची, की जितुकी त्यात शितें तीं
बीजेंची नव्हत काय ? खातसो अम्ही
फल तें तें भ्रूणघात[१७९] ? आणि कधिकधी
मज पडलें भय की मज वेड लागलें !
आत्मौपम्यास जऔं वर्तण्यात हें

मन माझे अनुसरिता मज पदोपदी
मरणासम दु:ख होय पाहुनी जगी
पूर्ण असंभवचि तया आचरू पुरे
तरिहि यत्न म्या केला; अज्ञतेमुळे
वा अशक्यतेमुळेच पद कधी जरी
स्खलित जाहलें असले तरि असेल तें
म्हणुनि भय अुद्याहि ना. स्मशामभूमिचा
परतटप्रदेश जो अनोळखी तिथे

सुखकर प्रवास करवि जें असें असे
ओळखिचें पत्र अम्हांजवळ त्या स्वयें
भगवान् श्रीकृष्णाचें– श्रीमतां गृहे
शुचीनां च ! बा गेहे योगिनामपि
'कश्चित् कल्याणकृद्य तात दुर्गतिम्
नहि गच्छति नहि गच्छति सांगती अणी

ते निरीश्वर[१८०] स्वभाव–वादिही मला;
म्हणुनि जरी सत्यचि जें वदति ते,
स्वर्ग नरक जन्मांतर, बंध मुक्ति वा
निजकर्माचाची परिपाक तरी
मरणाची वेस जयामाजि अुघडते
त्या अदृष्ट नगरांतिल अति सुरम्य ते
राखवूनि ठेवियलें असति बंगले
आधींची आम्हांस्तव भरूनियां आम्ही
कर्माच्या धर्माच्या नियत विसारा !

---

[179] जें जें खाअू जावें त्याची हत्या होतें असें वाटून घास गिळूच नये. फळ हें भावी वृक्षाचा गर्भच होय. जो जो नारळ आपण खातों तो तो अेक भ्रूणघातकच होतो, असा विचार जों जों सूक्ष्म तों तों जगणें अशक्य नि अनीति वाटे., वेडावून गेल्यासारखें होअी.

[180] निरीश्वरवादी, स्वभाववादी– बुद्धासारखे सांख्यांसारखे. कर्मफलांचा व पुनर्जन्माचा सिद्धांत त्यांचा आणि सेश्वरवादी श्रीकृष्णादिकांचा अेकच आहे.

परि जरि कीं स्वर्ग, जीव, बंध, कर्म वा
ऐहिक तें अिन्द्रजाल मात्र कीं जरी
संघातोत्पन्न भाव मात्र जीव हा
मृत्युपृथक्करणिं अभावांत[१८१] ओसरे
तरि सर्वोत्तमचि! मरण अेक सुषुप्ति
अथवा प्रत्यक्ष मुक्ति! पंचही असे
मिश्रित भूतांश पृथक् मुक्ति होअुनी
विहरोत स्वेच्छ नव्या मिश्रणांतुनी,
वा स्वयेंचि, वा शून्यीं! अिंद्रधनु तसें
संज्ञेच्या आकाशीं विपल शोभुनी
विपलांतचि हा माझा 'मी' हि कीं जरी
विश्वाच्या अंतर्हित 'मी' त मावळे

तरि मरणा! मरण न तूं! मरण मुक्तिची!
--विपलांतचि परि! विनंति अितुकिची असे :
येणें तरि येअुनि जा झटकनी तुझा
दुर्लौकिक जो जगात लोक जो तुझा
द्वेष करिति, तो नचि कीं अससिं तूं स्वत:
निर्दय वा निंद्य म्हणुनि–पाहुनी तुला
आलाची कोणीही परत कीं न तो
सांगूं तूं केवी तें! –परि विशेषत:
मृत्यो! तूं अप्रियसा जगति जें तुझें
सैन्य, पुरस्सर, पीडक हें हिडिस्ससें,
रोगाचें क्रूर असे, त्यामुळेच की!

मीच न कीं परि अजातशत्रु जो जगीं,
तुल्य ज्या प्रियाप्रियादि हानि, लाभ, त्या
भगवान् श्रीगौतमाप्रतीहि भासला
रोग जरा अप्रियची : 'लाभ ना दुजा
आरोग्यासम जगतीं धर्मपद[१८२] वदे
तरिही जे कोणी तुज नुघडतीलची
स्वेच्छेने दरवाजे, दुर्ग ते हठी
जिंकु जीवनाचे तूं धाडधाडही
रोगांच्या सैन्याची गांजत्या तिथे

---

[181] अभावांत. चार्वाक किंवा आधुनिक Positivist Compt. Spencer, Mill, Haeckel. प्रभृति, प्रत्यक्षवादी, तत्त्ववेत्ते म्हणतात तेंच खरें धरिलें तरीही चिंता नाहीं.

[182] बुद्धदेव गौतमांच्या 'धम्मपदा'त ते म्हणतात - 'नह्यारोगसमो लाभ: । संतुष्टिः परमं धनम् ।' समर्थांनाहि रोग अप्रियच होता. 'देही चाले आरोग्यता । लाभ नाहीं त्यापरता'' असे ते म्हणतात.

मीं तों जीं नुघडतील फोडिलीं तरी
जाणारचि, तीं दारें अुघडुनी स्वयें
ह्या माझ्या गेहाचीं, स्वागता असे
अनिवार्या सिद्ध तुझ्या ! म्हणुनि शक्य कीं
ये तरि, हे अखिल–वीर–वीर विजेत्या !
अेकलाचि, अपुरस्सर, आणि अकस्मात्
परि अशक्य जरि तें तुज अेकटें तसें
येणेंची, तरि त्यातही क्रूर पीडका
रोगाच्या सैन्याचा क्षोभ सोसण्या
मी असेंचि सिद्ध आजि दोन वत्सरें
पाहतची अससी तूं मजसि हा असा
शरपंजरिं खिळला ! ज्या मधुर लागलें
जीवनांतलें मधु, प्रकाश चक्षुतें,
प्रीति हृदा, तो मी त्या सर्व सुखाचें
मूल्य म्हणुनि मृत्यूच्या यातनाहि कीं
समजुनि कर्तव्य सहूं सिद्ध असेची !

–अंदमान

# ६६. हिंदूंचे अेकतागान

(परिचय : हें पद अखिल हिंदु मेळ्यासाठी प्रथम शिरगावी रचलें. पुढे तें मोठमोठ्या सभांतून ब्राह्मणांपासून महारभंग्यापर्यंत हिंदूंच्या हजारो नरनारींनी अेककंठाने म्हणण्याचा परिपाठ महाराष्ट्रभर पडून तें अेक वृंदगीत होअून बसलें आहे. अितर भाषांतूनही तें अनुवादिलें गेलें असून अनेक प्रांतांत गाअिलें जातें.)

(जाति : प्रविचंद्रकांत + प्रचंद्रकांत)

(चाल: तूं टाक चिरूनि ही मान)

तुम्ही आम्ही सकल हिंदू । बंधुबंधू
तो महादेवजी पिता आपुला चला तया वंदू ॥ धृ. ॥
ब्राह्मण वा क्षत्रिय चांग । जरि झाला
कसलेंहि रूप वा रंग । जरि ल्याला
तो महार अथवा मांग । सकलांला
ही अेकचि आअी हिंदुजाति । आम्हांस तिला वंदू १
अेकची देश हा अपुल्या । प्रेमाचा
अेकची छंद जीवाच्या । कवनाचा
अेकची धर्म ही आम्हां । सकलांचा
ही हिंदुजातिची गंगा आम्ही तिचे सकल बिंदू २
रघुवीर रामचंद्राचा । जो भक्त
गोविंदपदांबुजिं जो जो । अनुरक्त
गीतेसि गाअुनी पूजी । भगवंत
तो हिंदुधर्मनौकेत बसुनिया तरतो भवसिंधू ३
अुभयांनि दोष अुभयांचे । खोडावे
द्वेषासि दुष्ट रूढीसी । सोडावें
सख्यासि आअिच्यासाठी । जोडावें
आम्हि अपराधांसी विसरुनि प्रेमा पुन्हा पुन्हा सांधू ४
लेकुरें हिंदुजातीचीं । हीं आम्ही
आमुच्या हिंदुधर्मासी । त्या कामीं
प्राणही देअुनी रक्षू । परिणामीं
या झेंड्याखाली पूर्वजांचिया अेकाची नांदू ५

– रत्नागिरी, १९२५

## ६७. अमुचा स्वदेश हिंदुस्थान

(परिचय : रत्नागिरीच्या अखिल हिंदु–मेळ्यांतील पद.)

(जाति : प्रविचंद्रकांत + प्रचंद्रकांत)

(चाल : तूं टाक चिरूनि सारखी)

आमुचा स्वदेश हिंदुस्थान
आम्हां हिंदूंचा तो केवळ, होय जीव कीं प्राण ।। धृ. ।।
देवालय हें पवित्र अपुल्या । देवाचें सुमहान
वाडवडीलांचें हें मंदिर । स्वर्ग मृतांचा जाण
चिल्यापिल्यांची दाअी अपुल्या । देअि दुधांचे पान
फुलांफळांनी डवडवलेलें । प्रेमाचें अुद्यान
सत्ता अपुली मत्ता अपुली । ही रत्नांची खाण
कुणी हिरावुनि नेअू बघता । रक्षू अर्पुनी प्राण[१८३]

– रत्नागिरी, १९२५

[183] ह्या पूर्वीच्या चरणाचे खाली ‘रक्षूं घेअुनी प्राण’ हा चरण, ही स्वातंत्र्यानंतरची सुधारणा होय.

## ६८. दिपवाळीचें लक्ष्मीपूजन

(परिचय : हें पद दिवाळीत परदेशी फटाके वगैरे विदेशी वस्तूंवर बहिष्कार घालण्याचा अुपदेश करीत फिरणाऱ्या रत्नागिरी हिंदुसभेच्या मेळ्यासाठी केलें होतें.)

(जाति : चंद्रकांत)

(चाल : चंद्रकांत राजाची.)

लक्ष्मीपूजन करू घरोघर आम्ही जरि भावें
प्रसन्न पूजेने ना होता लक्ष्मी रागावे
आणी अिंग्रज पूजी जरि ना लक्ष्मीची मूर्ती
राबे ऋद्धीसिद्धी त्याच्या दाराशीं तरि ती
काय बंधुंनो, कारण ? रुसली भारतलक्ष्मी कां ?
लाथाडुनि दे पूजा आमुची शतकांची देखा
कारण आम्ही सुमें अर्चितो परि ना सुमनांनें
विनवू परि ना विष्णुसम तिला जिंकु विक्रमाने
लक्ष्मीपूजन करावया जैं करितों स्नानाला
परका साबू, परकीं तेलें लावू अंगाला
परदेशीचें रेशिम त्याचा मुकटा नेसोनी
देवघरीं परदेशी रंगें रंगित बैसोनी
विदेशांतली साखर घालुनि नैवेद्या दावूं
अशा पूजेने प्रसन्न होअिल लक्ष्मी हें भावूं
साबू नेअी कोटी, कोटी तेल रुपाया ने
नेअि लुटोनी विदेश कोटी अन्य अुपायाने
विलायती जी साखर नैवेद्यासी लक्ष्मीच्या
आणीयली ती नेत विदेशा कोटी रुपयांच्या
अशा रीतिने लक्ष्मी दवडुनि दाराबाहेरी
लक्ष्मीपूजन करीत बसतों आम्ही देवघरीं
आणि विदेशी नळे फटाके फुलबाजा अंतीं
अुडवुनि डिंडिम पिटूं आपल्या मौर्ख्याचा जगतीं
अहो हिंदुंनो, कोटि कोटि रुपयांची ह्या दिवशी
लक्ष्मी पूजावयासि लक्ष्मी धाडु विदेशासी
म्हणुनि आम्हि जरि पुजू घरोघर ही लक्ष्मी भावें
प्रसन्न पूजेने ना होता लक्ष्मी रागावे
तरी हिंदुंनो, घरांत लक्ष्मी आधी आणावी
विदेशीसि ना शिवू शक्य तों वृत्ती बाणावी
देशी तेलें, देशी साबू, देशी वस्त्राने
देशी साखर, देशी अस्त्रें देशी शस्त्राने
स्वदेशलक्ष्मी पूजू साधुनि जरि मंगल वेळ
गजांतलक्ष्मी हिंदुहिंदुच्या दारीं डोलेल!

– रत्नागिरी, १९२५

# ६९. हिंदु नृसिंह

(जाति : भूपतिवैभव)

(चाल : भूपती खरें तें वैभव)

हे हिंदुशक्ति–संभूत–दीप्ततम–तेजा
हे हिंदुतपस्या–पूत ओश्वरी ओजा
हे हिंदुश्री–सौभाग्य–भूतिच्या साजा
हे हिंदु नृसिंहा प्रभो शिवाजीराजा
करि हिंदुराष्ट्र हें तूतें । वंदना
करि अंत:करण तुज अभि–नंदना
तव चरणिं भक्तिच्या चर्ची चंदना
गूढाशा पुरवी त्या न कथूं शकतों ज्या
हे हिंदुनृसिंहा प्रभो शिवाजीराजा !

– २ –

हा भग्न तट असे गडागडाचा आजी
हा भग्न आज जयदुर्ग आंसवांमाजी
ही भवानिची[१८४] ह्या पुन्हा गंजली धारा
ती म्हणुनि भवानी[१८५] दे न कुणा आधारा
गड कोट जंजिरे सारे । भंगले
जाहलीं राजधान्यांचीं । जंगलें
परदास्य–पराभविं सारीं । मंगलें
या जगतिं जगू ही आज गमतसे लज्जा
हें हिंदु–नृसिंहा प्रभो शिवाजीराजा

– ३ –

जी शुद्धि हृदाची रामदासशिर डुलवी
जी बुद्धि पांच शाहींस शत्रुच्या झुलवी
जी युक्ति कूटनीतींत खलांसी बुडवी
जी शक्ति बलोन्मत्तास पदतलीं तुडवी
ती शुद्धि हेतुचि कर्मी । राहु दे
ती बुद्धि भाबड्या जीवां । लाहु दे
ती शक्ती शोणितामाजी । वाहु दे
दे पुन्हा मंत्र तो दिलें समर्थे तुज ज्या
हे हिंदु नृसिंहा प्रभो शिवाजीराजा !

– रत्नागिरी, १९२६

---

[184] भवानी तलवार.

[185] भवानीदेवी

## ७०. तूं सोड सोड भाऊ, दुष्ट दारूला !

(सन १९२६ – पूर्वास्पृश्यांच्या मेळ्यासाठी रचलेलें पद)

तू सोड सोड भाऊ। दुष्ट दारूला ॥ धृ. ॥

भुरळ घातली ह्या पेयाने। कैशी रे तुजला ॥ दुष्ट ॥ १

पैसे देउनि विषासि पीशी। हें न कळे तुजला ॥ दुष्ट ॥ २

मिळे कुठे जी कवडी दमडी। देशि बाटलीला ॥ दुष्ट ॥ ३

देशिल तरि मग भुकेसि कुठला। घास मुलाबाळां ॥ दुष्ट ॥ ४

शुद्धि जातसे मारिसि घरच्या। दीन बायकोला ॥ दुष्ट ॥ ५

क्षणिक सुखास्तव मिळविसि मातिस। सगळ्या जन्माला ॥ दुष्ट ॥ ६

– रत्नागिरी, १९२६

## ७१. जा झुंज !

(परिचय : रत्नागिरीच्या तरुण हिंदु मंडळ ह्या क्रांतिप्रवण संस्थेसाठी हें पद रचलें.)

(जाति : भूपतिवैभव)

(चाल : भूपती खरें तें वैभव)

निजजाति–छळाने हृदय कां न तळमळतें ?
तुम्हि तरुण शिरांतुनि रक्त नवें सळसळतें ?
हें नवें रक्त तो विजेहुनी पेटावें
मृत्यूसि तुम्ही गाठून बळें भेटावें
मग मुकुट आपला कोणी फोडिला ?
हिंदूंचा झेंडा कोणी । तोडिला ?
आशेचा अंकुर कोणी । मोडिला ?
हें चिंतुनि चिंतुनि क्रुद्ध आसवें जळतीं
दिनरात्री डोळ्यांतूनि कां न रे गळती ? ॥ १ ॥
ह्या भारतभूस्तव समररंगणी गेले
ह्या चिंतेने बहु वीर लढुनिया मेले
कुणि घोर यातनांचिया चितेवरि जळले
कुणिं फास गळ्यासी लागताहि ना ढळले
त्या त्यांच्या अपुऱ्या अिच्छा । ह्या क्षणी
तुम्हांसि बाहती हाका । फोडुनी
का अैकु येती कोणा । यांतुनी
जरि येति तरी रे अूठ कोण जो तो तू
घे करी शिरा जा झुंज पुरव तो हेतू ॥ २ ॥

– रत्नागिरी, १९२६

## ७२. माळ गुंफिताना

(जाति : अभिमन्यू)

(चाल : पडला अभिमन्यु.)

माळ गुंफिताना। अैका कवनाला। गुंफी कोण कशी माला
घाली जगदंबा। त्रिगुणातीताला। त्रिगुणी बिल्बदली माळा
प्रकृति देवि गुंफी। देव विराटासी। नव नव सूर्य–मालिकांसी
प्रलयंकर काली। गुंफि महाकाला। ती नरमुंडचंडमाला
अुद्‌भवा घाली। घालि अुद्‌भवाला। सृष्टि भूकंपांची माला
गुंफि सत्यभामा । श्रीहरिला साची । माला पारिजातकांची
माळ मोत्यांची । गुंफी रुचिरा ती । राणी राजाच्यासाठी
फुलांची माळा । माळा ओवि रती । आलिंगि त्या अनंगा ती
विरहिणी तरि ती । प्रिय–स्मरण–काला । ओवी अश्रूंची माला

– रत्नागिरी, १९२६

# ७३. सुखशय्यापलंग

(परिचय : मोरोपंतांचे वंशज श्री. रा. द. पंतपराडकर यांनी सावरकरांना अेक लोहपलंग ‘सुखशय्यापलंग’ असे नांव देअून भेट म्हणून दिला. त्यावर त्यांनी खालील आर्या लिहिल्या होत्या :

‘‘हिंद तपस्वीच गमे सावरकररूप घेअुनी भेटे ।
आर्याकिकास्वाहाकारी मजला चढेचि बळ मोठें ॥
हा सुखशय्यामंचक प्रेमें सावरकरांसि आहेर ।
देतो मयूरवंशज ज्यासि रुची अेक आत बाहेर’’ ॥

राममंदिरात ते आर्या वृत्तातील रामायणाचें आवर्तन करणार होते यालाच वर त्यांनी स्वाहाकार म्हटलें आहे. त्या त्यांच्या भेटीचा स्वीकार करणारे पुढील आर्याबद्ध पत्र सावरकरांनी त्यांस धाडलें.)

(आर्या)

आपण मयूरवंशज, कविचा त्या भक्त तो पुरातन मी
तुम्हांस, त्यांसि सन्मानाया जोडूनि आजि हात नमी
आर्याकिकास्वाहाकारी सांप्रत असां सदा सजलां
पंत पराडकर तुम्ही अैकुनि आनंद होतसे मजला
जों ध्येय प्राप्त न तें, जों न असे राष्ट्रपाश हा तुटला
हा हिंदुजाति–गौरव–रवि ना राहुग्रहांतुनी सुटला
हें आंथरूण तोवरि आपण जें अर्पिलें अुपायनसे[१८६]
तें ती[१८७] निद्रा देवो कर्तव्या जीमधे अपाय नसे
करण्या पुनरपि युद्धोद्युक्तचि निजवूनि देह हा दमला[१८८]
ही सुखशय्या अुठवो रणशय्येसमचि निरपवाद मला

– रत्नागिरी १९२६

[186] अुपायन = आदरपूर्वक दिलेली भेंट वस्तू (नजराणा);.

[187] ती निद्रा – पलंगाचें नाव ‘सुखशय्या’ होतें. त्या नांवांविषयी कवींचे अभिप्राय आहे की, ती ‘सुखशय्या’ असली तरी जोवर हें हिंदुजातीचें राष्टस्वातंत्र्याचें ध्येय प्राप्त झालें नाही तोवर त्या शय्येने मला ‘रणशय्या’ देते तितकाच विसावा द्यावा, प्रत्यहीच्या युद्धात दमलेला देह अुदअीकच्या युद्धाला तोंड देण्यास अधिक समर्थ व्हावा, अितक्याच पुरती निद्रा वेळात वेळ काढून झुंजत्या सैन्यातील सैनिकास जशी घेअू देतात– तितकीच मला मिळो, ध्येय साध्य झाल्यावर मग हीं संपूर्णपणे ‘सुखशय्या’ होवो. तोवर ती रणशय्याच होवो.

[188] कवि त्या वेळेस जन्मठेपेच्या कारागारातून सुटलेले होते. ‘त्या दमण्याचा’ अुल्लेख पराडकरांच्या पत्रात होता. तोच अिथे सूचित केला आहे.

# ७४. अखिल- हिंदु-विजय-ध्वज-गीत

(जाति : मोहिनी)

(चाल : आकळे न अघटित घटना.)

अखिल-हिंदु-विजय-ध्वज हा अुभवु या पुन्हा ॥ ध्रु. ॥
ह्या ध्वजासची त्या काली । रोविती पराक्रमशाली
रामचंद्र लंकेवरती । वधुनि रावणा ॥ १ ॥
करित जैं शिकंदर स्वारी । चंद्रगुप्त ग्रीकां मारी
हिंदुकूश-शिखरी चढला । जिंकुनी रणा ॥ २ ॥
रक्षणी ध्वजाच्या ह्याची । शालिवाहनाने साची
अुडविली शकांची शकलें । समरिं त्या क्षणा ॥ ३ ॥
हाणिले हुसकिता जेथे । हूणांसि विक्रमादित्यें
हाचि घुमवि मंदोसरच्या । त्या रणांगणा ॥ ४ ॥
जअिं जअिं हिंदु सम्राटें । अश्वमेध केले मोठे
करित पुढति गेला हाची । विजयघोषणा ॥ ५ ॥
अुगवुनी सूड हिंदूंचा । मद मर्दुनि मुस्लीमांचा
शिवराय रायगडि करिती । वीर पूजना ॥ ६ ॥
ध्वज हाचि धरुनि दिल्लीला । वीर-बाहु भाअू गेला
मुसलमीन तक्ता फोडी । हाणुनी घणा ॥ ७ ॥
पुढति नेम कांही ढलला, ध्वज जरी करांतून गळला
अुचलुया पुनरपि प्राणा, लावूनी पणा ॥ ८ ॥
आंग्ल दैत्य तोंचि आला । सिंधुतूनि घाली घाला
बुडविला सिंधुतचि त्याही । करुनि कंदना[१८९] ॥ ९ ॥

---

[189] भारत परतंत्र असताना हें ध्वजगीत रत्नागिरी येथे ख्रिस्ताब्द १९३४ मध्ये सावरकरांनी रचिलें होतें. त्या वेळी त्याचें आठवें कडवें खालीलप्रमाणे होते.

''पुढती नेम काही ढळला । ध्वज जरी करातुनि गळला ॥
अुचलू या पुनरपि प्राणा । लावुनी पणा ॥''

हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावर १९५१ मध्ये ह्या आठव्या कडव्याच्या जागी वर आंग्लदैत्यालाही त्याच समुद्रात बुडविलें अशा आशयाचें कवितेत दिलेलें नवें कडवें वीर सावरकरांनी रचलें तेही कवितेत दिले आहे. असे ते जागृत आणि भाग्यवान कवि होते.

# ७५. सुतक युगांचें फिटलें

(परिचय : रत्नागिरीच्या जुन्यांतील जुन्या श्रीविठ्ठलमंदिरांत प्रथमच भरसभेत पहिला पूर्वास्पृश्य ज्या दिवशीं प्रवेश करू शकला त्या प्रसंगी हें पद म्हटलें गेलें. शिवू भंगी नांवाच्या अेका भंग्याच्या मुलानें हें पद सभामंडपाच्या शेवटच्या पायरीवर सभेच्या अनुज्ञेनें म्हणण्यास आरंभ केला. त्याचे ते करुणमधुर आलाप आणि साभिनय विनंती अैकत ती तीन अेक हजार लोकांची सभा अितकी रिझत चालली कीं, पायरीमागून पायरी चढण्याची अनुज्ञा मिळता मिळता पद संपेतों तो भंगी कुमार विठ्ठलाच्या सभामंडपांत येअून टाळ्यांच्या गजरांत अुभा राहिला! अस्पृश्यतेचा नि देवमंदिरांत पूर्वास्पृश्यांस मज्ञाव करण्याचा अन्याय दूर केल्याविषयी स्पृश्यांचे आभार मानण्याचा जरी पदाचा अुत्तान अर्थ आहे तरी त्या आभारांपेक्षा जो घोर अन्याय आजवर चालू शकला त्याचाच प्रच्छन्न निषेध त्यात तीव्रतेने ध्वनित होत आहे.)

(जाति : अक्रूर)

(चाल : अजि अक्रुर हा नेतो.)

तुम्हिं देवाच्या येअू दिलेती दारीं
आभार जाहले भारी ॥ ध्रु. ॥
तुम्हिं वरदानीं शिवुनि पतित हा माथा
मळविलें पावना हाता
या ठेवुं पदांवरति पवित्रां ताता
दिधलाति पतित हा माथा
तुम्हि धर्माचे सूर्य कथू किति नवला
सावली तमाची शिवलां
जें गांव–बहिष्कार्य आंत त्या आणी
बाहेर गाव जावोनी
तुम्हि हिंदू या जवळ हिंदूसी आजी
केलेत अहिंदूहुनि जी
हें सुतक युगांचें सुटलें
विधिलिखित विटाळहि फिटले
जन्मांचें भांडण मिटलें
शत्रूंचें जाळें तुटलें
अम्हि शतकांचे दास : आज सहकारी
आभार जाहले भारी!

– रत्नागिरी, १९२९

## ७६. हा भगतसिंग! हाय हा!!

(परिचय : सरदार भगतसिंग दि. २३ मार्च १९३१ या दिवशी फाशी गेले. त्या वेळी स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर हे रत्नागिरी येथे स्थानबद्ध होते. त्यांना भगतसिंगाच्या फाशीची बातमी दुसऱ्या दिवशी मिळाली आणि त्या बातमीने निर्माण झालेल्या मन:क्षोभांतून सावरकरांनी प्रस्तुत कविता रचिली. लगोलग रत्नागिरीमधील 'हिंदु तरुण मंडळा'तील तरुणांनी ती गुप्तपणे पाठ केली आणि दुसऱ्या दिवशी पहाटेंच्या वेळीं, पोलिस सावध होण्यापूर्वीच, त्या निवडक तरुणांनी हें गीत गात गात रत्नागिरी नगरातून प्रभातफेरी काढून सारें रत्नागिरी नगर भगतसिंगाच्या नि स्वातंत्र्यलक्ष्मीच्या जयजयकाराने दणाणून सोडलें. )

(जाति : बुल्बुल)

हा भगतसिंग, हाय हा
जाशि आजी, फांशि आम्हांस्तवचि वीरा, हाय हा!
राजगुरू तूं, हाय हा!
राष्ट्र समरी, वीर कुमरा पडसि झुंजत, हाय हा!
हाय हा, जयजय अहा!
हाय हायचि आजची, अुदयीकच्या जिंकी जया ॥
राजमुकुटा तो धरी
मृत्यूच्या मुकुटासि आधी बांधि जो जन निजशिरीं!
शस्त्र धरूचि अम्हि स्वत:
धरूनि जें तूं समरिं शत्रुशि मरसि मारित मारतां!
अधम तरि तो कोणता?
हेतुच्या तव वीरतेची जो न वंदिल शुद्धता ॥
जा हुतात्म्यांनो, अहा!
साक्ष ठेवुनि शपथ घेतों आम्हि अुरलों तें पहा!
शस्त्रसंगर चंड हा
झुंजवुनि कीं, जिंकुची स्वातंत्र्यविजयासी पहा!
हा भगतसिंग, हाय हा!! ॥

– रत्नागिरी १९३१

## ७७. अैक भविष्याला । भव्य भीषणाला

(परिचय : नेपाळच्या गुरखा संघाचे अध्यक्ष श्रीमान् लेफ्टनंट ठाकूर चंदनसिंहजी, श्रीमान् कॅप्टन प्रिन्स हेमचंद्रसमशेर जंग बहादुर राणा महाशय ह्या स्वतंत्र हिंदुराज्य नेपाळच्या प्रतिनिधींना, रत्नागिरी नागरिकांच्या वतीने दि. २ नोव्हेंबर १९३१ला शुक्रवारी मानपत्र देण्यात आलें. त्या समारंभाचे आधी स्वातंत्र्यवीर बॅ. वि. दा. सावरकर हे चित्पावन ब्राह्मण नेपाळच्या स्वतंत्र हिंदु राज्यातील राणा वंशीय क्षत्रिय प्रिन्स हेमचंद्र समशेर जंग आणि रत्नागिरीतील अेक सभ्य हिंदु भंगी अशा तिघांनी खांद्याला खांदा लावून पतितपावनाच्या चरणी आपली पुष्पांजलि वाहिली. त्या वेळी सहस्त्रों लोकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. त्यानंतर झालेल्या सत्कारसमारंभाचे प्रारंभी वीस तरुण कुमारिकांनी खालील स्फूर्तिदायी पद गायलें.)

(जाति : मोहिनी)

अैक भविष्याला । भव्य भीषणाला ॥
विगता । भयहता वर्तमानकाला ।
हिंदुजाति ही ज्यासाठी चालली रणाला । भव्य ॥ ध्रु. ॥
अेक अेकला जो तो । होअुनि अजि अेकचि तो ।
कोटि कोटि हिंदुजाति । सज्ज ह्या क्षणाला ॥ भव्य ॥ १
सहनशीलता स्तंभ । तडकुनि विक्राळ जृंभ ॥
अंगि संचरे नृसिंह । हाणितचि घणाला चालली रणाला ॥ भव्य ॥ २
आजवरि छळ करिसी। तो तो तू आजि हरसि ॥
दु:शासन कशिपु कंस । गणि न ती कुणाला ॥ भव्य ॥ ३
सिंहासनि स्थापु देव । प्राणांची देवघेव ॥
आपुलिया अस्तित्वा । लावुनी पणाला ॥ भव्य ॥ ४
होअुनिया मुक्त स्वता । करील मुक्त ती जगता ॥
ममतेच्या समतेच्या । सुजन रक्षणाला ॥ भव्य ॥ ५

– रत्नागिरी १९३२

# ७८. संत रोहिदास

(परिचय : रत्नागिरी येथील 'अखिल हिंदु' मेळ्यासाठी रचलेलें गाणें.)

(चाल : पडला अभिमन्यू.)

संत रोहिदास । रोहिदास संत
जयासी भेटे भगवंत ॥ ध्रु. ॥
जातीचा हिंदू! हिंदू चांभार
मनाचा प्रेमळ अनिवार
नित्यकर्म त्याचें । त्याचें शिवण्याचें
वहाणा जोडहि जोड्यांचे
त्यावरि चालवि तो । चालवि संसारा
मनीं दे मत्सरा न थारा
शिवूनिया देअी । देअी दान भक्ता
वहाणा अनवाणी त्या त्या
स्नान करी घेअी । घेअी तो वाचे
गोड तें नाम विठोबाचें
पूजेचा होता । होता जो बाण
शालिग्राम दिव्य जाण
त्यासी तो ठेवी । ठेवि कातड्याच्या
करुनिया संपुष्टा साच्या
आसनही त्याचें त्याचें चर्माचें
बसे वा भक्तिभरे नाचे
संत रोहिदास । रोहिदास संत
जयासी भेटे भगवंत

– २ –

त्यासि लोक हसुनी । हसुनी बोलति ते
कातडें अशुद्ध त्यामध्ये
देवमूर्ति कैशी । कैशी ठेवावी ?
का न ती विटाळली जावी ?
त्यांसि संत वदला । वदला प्रिय वाचा र
बोलतो, ''अर्थ करा ह्याचा''
कातड्यामध्ये । मध्ये गर्भाच्या
बैसला मनुष्य मातेच्या
आअी दे दूध । दूध गात गाणी
स्तनांच्या चर्मकुप्यांतूनी
मुख हें मढवीलें । मढवीलें देवें
कातड्यानेच काय नोहे ?
मढविले हात । हातपाय आणी
प्राणही चर्में देवांनी
ऋषि मुनी बसती । बसति तपस्येसी

घेति मृगचर्म आसनासी
आणि व्याघ्रचर्म । चर्म आवडीने
अुपरणें केलें सांबाने
सांब सदाशिवजी । शिवजी ज्या शिवती
चर्मे अशुद्ध कैशीं तीं ?
अशुद्ध ना चर्म । चर्म न चांभार
तयाचा तोची अधिकार
अधिकारी साचा । साचा जो भक्त
मांग वा महार वा शाक्त
प्रेमचि अधिकारा । अधिकारा भक्ती
देतसे नाम–भजन मुक्ती
असे हिंदुधर्म । धर्म विठ्ठलाचा
सनातन सकलां कथि साचा
चित्ताचा शुद्ध । शुद्ध तोचि होतो
जातिचा असो कुण्याही तो
अशुद्ध जरि चित्त । चित्त तरी तो तो
ब्राह्मणहि अस्पृश्यचि हो तो !
क्षत्रियहि अस्पृश्यचि हो तो !
महार तो चोखा । चोखामेळ्याला
आलिंगिता देव झाला
झाला सजणासी । सजण कसायासी
प्रसन्नचि परमेश्वर त्यासी
धंदा हा सारा । सारा अुपकारी
त्याविण न चले संसारी
म्हणूनिया कोणीं । कोणीं कर्माचा
विटाळ न मानावा साचा
कथी हिंदुधर्म । धर्म विठ्ठलाचा
आमुच्या वाडवडिलांचा

तुम्ही आम्ही हिंदु । हिंदू जातीचे
सर्वही भक्त विठ्ठलाचे
रक्षुं हिंदुधर्म । धर्म विठ्ठलाचा
आमुच्या वाडवडिलांचा
असें रोहिदास । रोहिदास संत
वदे त्या भेटे भगवंत !
संत रोहिदास । रोहिदास संत
तयासी भेट भगवंत ॥

– रत्नागिरी

## ७९. पाण्यातली आग ती

(शार्दूलविक्रिडित)

माते अद्‌भुत हें पहा, भडकले पाण्यातुनी जाळ ते
सत्ता घे छिनुनी बळेंचि तव जो त्याच्या बळा जाळते
बंदीमाजि तुवा छळांसि सहता जे ढाळिलेसी अहा
अश्रू घेऊनि पेट तेचि अुठती जाळू छळा त्या पहा ॥ १ ॥
बंदीगेहचि आतुनी भडकवी पाण्यातली आग ती
फाशीचे जळण्या, अुडोनि ठिणग्या, ते खांबही लागती
क्रोधाचा ज्वर तो भरे तुज, न तो साहोनि अुत्ताप हा
बेड्याची तव लागताति वितळू आगीत अंती पहा ॥ २ ॥
काही काळ अशीच गाळ तरि तू अुत्तप्त हीं आसवें
काही काळ असाच शोक करि तू, सोशी न जें सोसवें
जो जों पुष्टविशील आग असली अश्रूंसि ढाळूनिया
तो तो टाकिल ती छळासि छळकासंगेचि जाळूनिया ॥ ३ ॥

## ८०. परगावी जाणाऱ्या बहिणीस !

(शार्दूलविक्रीडित)

भक्तीने भजता तुझ्याच करिसी तू भक्त देवास ह्या
सिंहासी हरिणीच लोचनशरें जिंकी विमोहूनिया
होती ठाउक काल ना, न करमे आजी मला तीविना
जाओी जाअि तशी तुझी तनुलता वेढूनि माझ्या मना ॥ १ ॥
स्वप्नी पालविसी तरीहि परिसू जागेपणी ये मला
देता 'अेकचि' दे अनेक मजसी घेअू मुके प्रेमला
घेता घट्ट मिठीतही, न जवळी भासे पुरेशी! परी
जाता दूर खरीच आज विरहा सोसू कसा मी तरी! ॥ २ ॥
केव्हा हासत तू समुत्सक पुन्हा येशील भेटू अशी
आता तू शकशील का तरि पुन्हा भेटीस येअू मशी
जाणें भागचि! जा सखे! परि पुन्हा येशील भेटू जधी
प्रीतीची परतूनि ठेव मज दे ही वाढवूनी हृदीं ॥ ३ ॥

# ८१. हिंदु जातीचा श्रीपतितपावनाचा धावा

(परिचय : रत्नागिरी, श्रीपतितपावनमंदिराचा देवप्रतिष्ठेचा अभूतपूर्व असा अुद्‌घाटन समारंभ झाला. त्या वेळी मुख्य सभेत हें पद म्हटलें गेलें. हिंदुस्थानातही अपूर्व असणाऱ्या त्या अखिल हिंदु मंदिरात ब्राह्मणक्षत्रियांपासून महार भंगी प्रभृतीपर्यंतच्या समस्त हिंदुबंधूंचा तो पांच हजारांवर सरमिसळ दाटलेला समाज, महाराष्ट्रातील अनेक पुढारी, संत महंतांसुद्धा शंकराचार्य डॉ. कुर्तकोटींच्या अध्यक्षतेखाली हिंदुमात्रास वेदोक्ताचा नि देवपूजेचा समान अधिकार नुसत्या शब्दांनीच नव्हे तर प्रत्यक्ष आचरणात तिथल्या तिथेच देत असणारें तें दृश्य, रत्नागिरीस तरी दोन तीन हजार वर्षांत पूर्वी कुणी पाहिलेलें नसेल. त्या काळी ती अेक समाजक्रांतीची चळवळ म्हणूनच गाजली. त्या समयी भंगी, महार, मराठे, ब्राह्मण, वैश्य प्रभृति जातींच्या वीस निवडक तरुण कुमारींनी सरमिसळ अुभें राहून अेक कंठाने या अखिल हिंदु धाव्याचें मंगलाचरण गाअिलें होतें.)

(जाति : अक्रूर)
(चाल : अजि अक्रुर हा नेतो)

अुद्धरिसी गा हिंदुजातिसी केव्हा
हे हिंदुजातिच्या देवा ।। ध्रु. ।।
आब्राह्मण चंडाल पतितची आम्ही[१९०]
तुम्हि पातितपावन स्वामी
निजशीर्ष विटाळेल म्हणुनि कापाया
चुकलो न आपुल्या[१९१] पाया
आणि पायांनी राखु शुद्धता साची
छाटिलें पावलांनाची[१९२]
अैकू न पडो आपुलिया कानातें
मुख[१९३] कथि न म्हणुनि ज्ञानातें
निज सव्यकरें वामकरा जिंकाया
विक्रीयली[१९४] शत्रुला काया
करु, बंधूसी बंद करू दारा, जे
चोर ते घराचे राजे
हें पाप भयंकर झालें । रे
पेरिलें फळाला आलें । रे
हृदिं असह सलसि ते भाले । रे
अुद्धार अता ! मृत्युदंड की दे वा
हे हिंदुजातिच्या देवा ! ।। १ ।।
अनुताप परी जाळितसे या पापा
दे तरी आजि अु:शापा

---

190 केवळ अस्पृश्यांनाच पतित म्हणून काय अुपयोग ? खरें पाहतां हिंदुराष्ट्र राष्ट्रच पतित झालेलें आहे !

191 हिंदुसमाजपुरुषाच्या विराट देहाचें 'ब्राह्मण' शीर्ष म्हणून कल्पिलें; पण मस्तकाने आपणांस विटाळ होअील म्हणून पाय कापून टाकावे तसाच मूर्खपणा शूद्रास जन्मत:च नित्याचे दूर लोटून शरीरसंबंध आमूलाग्र तोडण्यात केला.

192 बरे, स्पृश्यांव्यतिरिक्त हिंदु तरी अेकजाति, अेकजीव, राहिलें म्हणावें, तर तेंही नाही. शूद्रांनीही विटाळ होतो म्हणून अतिशूद्रांस 'अस्पृश्य' मानलें. शरीरसंबंध साफ तोडला. पायांनी स्वत:स विटाळ होअील म्हणून स्वत:च्याच पावलांना छाटलें !

193 ब्राह्मणोस्य मुखमासीत्; पण ज्यांना ज्ञान सांगण्यासाठी तें 'मुख' झाले त्या श्रोत्यांना कानांनाच त्या मुखाने वेदादि पवित्र नांव सांगण्याचें नाकारलें असे सर्व प्रकारे देहाचा देहानेच शरीरसंबंधविच्छेद चालविला. अवयवाने अवयव छाटले.

194 तीच गोष्ट क्षत्रियांची. जयचंदाने पृथ्वीराजास जिंकण्यासाठी महंमद घोरीला आपलें स्वातंत्र्य विकून टाकिले. अुजव्या हाताने डाव्या हाताची अैट अुतरविण्यासाठी आपल्या साऱ्या देहालाच दुसऱ्याच्या हाती दिलें पण त्यासरशी आपणही लुळे पडत आहोत हें लक्षात येअीना !

निर्दाळुनि त्या आजि भेद–दैत्याशी
ये हिंदुजाति तुजपाशी
ते अवयव विच्छिन्न सांधिले[१९५] आजी
तू फुंकि जीव त्यामाजी
देऊनि बळा वामनासि ह्या काळी
तो घाल बळी पाताळी
जरि शस्त्र खुळा कर न आमुचा कवळी
परि तुझी गदा तुजजवळी
जरि करिशि म्हणू जें आता । रे
म्हणशील करू तें नाथा । रे
अुठु आम्हि परी दे हाता । रे
दिधलासि जसा कंस मारिला तेव्हा
हे हिंदुजातिच्या देवा!                    ॥ २ ॥

– रत्नागिरी, १९३१

195 ज्या जन्मजात जातिभेदाच्या दैत्याने समाजाची शकलें केलीं तो भेददैत्य निर्दाळण्यास्तव सगळ्या जाती अेका 'हिंदुजातीत' अेकवटून अेकजीव होअून हिंदुत्वाचे वेदोक्तादि समसमान संस्कार आचरीत अिथे आम्ही अुभे आहोत. आता पुढचें महात्कार्य तेंही करण्यास शक्ति दे, साधन दे.

# ८२. मला देवाचें दर्शन घेऊं द्या

(परिचय : रत्नागिरीचे किल्यावरील श्रीमंत कीरशेटजींचे प्रसिद्ध भागेश्वर मंदिर पूर्वास्पृश्यांस अुघडलें, त्या समारंभात देवाच्या पूजेसाठी पूर्वास्पृश्यांस वाटणारी तळमळ व्यक्तविणारें सावरकरांनी रचलेले हें पद पूर्वास्पृश्यांच्या वतीने भंग्यांच्या दोघी मुलींनी म्हटले.)

(जाति : शूर्पणखा)

(चाल : सुनो सुनोजी)

मला देवाचें दर्शन घेउ द्या
डोळे भरुन देवास मला पाहुं द्या ॥ धृ. ॥
जो तुम्हिच करा दिनरात
मळ काढित मळले हात
म्हणुनीच विमल हृदयात–
हृदय त्या वाहु द्या ! १
मी तहान जल तो जाण
मी कुडि माझा तो प्राण
मी भक्त नि तो भगवान् –
चरण त्याचे शिवुं द्या २
तो हिंदु–देव मी हिंदु
मी दीन तो दया–सिंधु
तुम्हि माझे धर्माचे बंधु–
अडवु नका जाउ द्या ३

– रत्नागिरी, १९३१

## ८३ .मथुरेस जाताना

(जाति : अक्रूर)

(चाल : अजि अक्रुर हा)

तव संगतिच्या गोकुलासि गे बाले
सोडणें प्राप्त कीं झालें
हा कंसाचा क्रूर दूत बघ ठेला
अजि नेत अम्हां मथुरेला
कंसासि अम्ही, कंस अम्हां वा मारी
रणघाअि अशी होणारी
हा हाय! क्वचित् शेवटलीची आजी
ही भेट तुझी नी माझी
लाडके म्हणुनि या कालीं। गे
विरहाच्या व्याकुळ बोलीं। गे
अश्रूंच्या रचुनी ओळी। गे
त्या दिधलेल्या देअि प्रीतिदानाची
पावती प्रिये ही साची!

## ८४. हिंदु मुसलमान संवाद

(परिचय : रत्नागिरी येथील अखिल हिंदु मंडळासाठीं हा संवाद स्वातंत्र्यवीर सावरकरांनी रचला. 'तुम्ही आम्हीं सकल हिंदु बंधुबंधु' ह्या हिंदूंच्या अेकता गानानंतर हा संवाद होत असे.)

(जाति : भूपतिवैभव)

प. हिंदु : अेकीस मान्य व्हा पाय धरितसे तुमचे ।
हें हिंदुस्थानचि हिंदु मुसलमानांचे ॥ ध्रु. ॥

मुसलमान : देशासी हिंदुस्थान अजुनिही म्हणसी :
आणि अेकी करण्या पाय आमुचे धरिसी ॥

प. हिंदु : हां ! चुकलो ! ! हिंदुस्थान नाम देशाचें ।
अिसलामवतन वा म्हणू रुचे तरि साचे ॥

मुसलमान : हिंदीस ठार मारावें (प. हिंदु:– मान्य जी)
अुर्दूसि मात्र बोलावें ('' – '' )
नागरी लिपिस सोडावें ( '' – '')

प. हिंदु : करु सांगा तें तें बंधु तुम्ही प्रेमाचे ।
अेकीस मान्य व्हा पाय धरितसो तुमचे ॥ १ ॥

मुसलमान : शुद्धीचें परंतु बंड आधीं मोडावे ।

दु. हिंदु : परि बाटविण्याचें मात्र तुम्ही सोडावें ॥
घालशी गाठ ही असे मुसलमानांशी ॥

प. हिंदु : हां ! खान ! भाअी हां ! क्षमा करा साहेब ।
हे भांडखोरिचे हिंदुसंघटण पेव ॥

मुसलमान : करुं मुसलमान हिंदूंचे । (प. हिंदु:– मान्यजी)
करु नका हिंदु मुसलमानांचें ( ''– '')
करु नका शुद्ध भ्रष्टांचे । ( ''– '')

प. हिंदु : कमविणें न मुळिं गमविणें ब्रीद हिंदूंचें ।
अेकीस मान्य व्हा; पाय धरितसो तुमचे ॥ २ ॥

दु. हिंदु : परि पळवुनी नेती हिंदु मुली जे दुष्ट ।

मुसलमान : बिघडेल अेकि जरि काढशील ती गोष्ट ॥

प. हिंदु : नचि कोप करा मिय्याजी मूर्ख हे लोक ।
पळवाच पाहिजे तरी माझिही लेक ॥

मुसलमान : मलबारी स्वेच्छेनेच हिंदु बहू बाटे ।

दु. हिंदु : हां अेक कुठेसा जरा पीडिला वाटे ॥

दु. हिंदु : कोहाटामाजी हिंदु ठार बहु झाला ।

प. हिंदु : हा भ्याड हिंदु कां मारु देत दुसऱ्याला ॥

मुसलमान : आणि कलकत्त्यासी मुसलमान बहु मेला ।

प. हिंदु : हा अत्याचारी हिंदु मारी दुसऱ्याला ॥

मुसलमान : खलिफासि मानि गुरु मुसलमान जें राज्य ।

प. हिंदु : तो आम्हांसी बापाहुनि म्हणुनची पूज्य ॥

मुसलमान : 'मुस्लीम राज्य करुं जगी ' सांगतो धर्म ।

प. हिंदु : ते तुम्हिच करा हो हिंदु जाणि ना मर्म ॥

मुसलमान : वाद्यासी तुमच्या फोडा । (प. हिंदु:–मान्यजी)
गोवधा न हरकत पाडा । ( '' – '' )
तुम्ही मूर्ति तितुक्या फोडा । ( '' – '' )

दु. हिंदु : (प. हिंदूस) मान्यजी ! मान्यजी ! काय खुळ्या अेकीचे
हें पुरें प्रदर्शन तुझ्या नीच क्लैब्याचें ॥
(पहिल्या हिंदूला ढकलून घालवून पुढे म्हणतो)
हें पहा बंधु तुम्हि मुसलमान ते सारे।
परि बंधुसम जरी व्हाल प्रेम करणारे ॥
अन्योन्य हितर्थी तरी घडू द्या अेकी।
अडवुनि धरा जरि हीच चालु द्या नेकी ॥
जरि याल तरी संगेचि, नातरी आम्ही।
अेकटे लढुनिहि जिंकु युद्ध परिणामी ॥
जिंकले शकाहूणांसि। जिंकिलें ज्यांनी।
औरंग आणि अफुजुल्ल विद्ध नखरांनीं ॥
ते हिंदु तुच्छ तूं कारे। समजसी
दिसता न खंड मेघाचा। ये जसी
वादळी झोड वीजांची। रे जसी
सहसाचि वादळें अुठुनि हिंदु शौर्याची ।
बुडवितिल कलियुगा सृष्टि घटित सत्याची ॥

– रत्नागिरी

## ८५. लगट अंगाला !

(जाति : फुलारीण)

मनमोहक ललने ये लगट अंगाला ॥ ध्रु. ॥

मान करित वरि मुखासि माझ्या लाव तुझ्या गाला ॥
        लगट अंगाला ॥ १

मधुर मुक्यांचा चारा देउनि अधरा पानाला ॥
        लगट अंगाला ॥ २

हसूं असूंची घाली माला सांग अनंगाला ॥
        लगट अंगाला ॥ ३

हृदयाच्या तव मुरलीवरती गाअिन गानाला ॥
        लगट अंगाला ॥ ४

ये ! न करी या अुत्कट अुत्सुकतेच्या भंगाला ॥
        लगट अंगाला ॥ ५

## ८६. भूमातेस

(शार्दूलविक्रीडित)

माते हे परके घरांत घुसले दस्यू तुझ्या गे कसे ? ।
आधी ह्या परक्यांचिया न घुसले कीं मीच गेहीं तसें ! ।।
होतें जों बळ तों परासि लुटणें मी मानिलें पाप तें ।
जाता मद्‌बळ होत हाय मजला तें पुण्यची शापतें ।।
माते कां म्हणुनी अहा वद अशी हिंसा तुझी होतसे ।
हिंस्त्राचीहि न कीं मनीं मम सुता हिंसा करू येतसे ।।
त्राता देव नृसिंह सोडुनि पुजूं गायीसची जाय मी ।
वाघाच्या पुढती म्हणूनि बनले गायीहुनी गाय मी ।।
तूंते दंशुनि कोण मारक विषें घायाळवी गे अहा ।
मी दे दूध जयासि घे अुलटुनी तो सर्पची दंश हा ।।

– रत्नागिरी

## ८७. घ्या, घ्या, घ्या, शपथा !

(जाति : घुंगुरवाळा) (चाल : पाळण्याची)

(परिचय : हिंदु तरुण मंडळाकरिता रचलेली)

घ्या घ्या घ्या शपथा । तरुणांनो ! । मरूही देशाकरिता ॥ घ्या. ॥ ध्रु. ॥
स्वस्थ कसे बसला । लागेना । तळमळ कारे चिंता ॥ स्वस्थ. ॥ १ ॥
तळमळत्या पडल्या । टिळकांच्या । पुरवा । हेतूला ॥ तळमळ. ॥ २ ॥
हेतूला पुरवा । टिपरूनिया । हिंदुदुंदुभीला ॥ हेतूला. ॥ ३ ॥
सांगसांगता रे । कोरडही । येअि कंठनाला ॥ सांग. ॥ ४ ॥
तरिही आग कशी । लागेना । तुमच्या हृदयाला ॥ तरिही. ॥ ५ ॥
नातरि समजाहा । देश जगी । नामशेष झाला ॥ नातरि. ॥ ६ ॥

– रत्नागिरी

# ८८. तनुवेल

(जाति : चंद्रकान्त)

(चाल : घनश्याम सुंदरा)

सकाळींच तूं तोडित असता जाआीजुअिच्या फुलां
माडीवरुनी सुंदर कन्ये, पाहियलीं मीं तुला
अुंचविता कर छातीवरि ये चोळी तटतटुनी
कुरळ केश रुळताति गोरट्या मानेवरि सुटुनी
पदर खोवले पातळ गेलें कटितटिला लगटुनी
स्मृति सखये तव मनीं माझिया संगतिच्या अुठुनी
बघसि चोरटें मी तुज दिसतो वरती कां कुठुनी
दिसतांची मी हंसूं अुषेसम मुखिं तव ये फुटुनी
अशी सकाळी फुलें तोडितां पाहियली जैं तुला
फुलवेलीहुनि तनुवेलचि तव मोहक दिसली मला!

## ८९. शस्त्रगीत

(परिचय : शस्त्रनिर्बंध रद्द करण्याची मागणी करण्यासाठी पुण्यास विद्यार्थ्यांनी मोठी मिरवणूक काढली तेव्हा त्यांच्यासाठी सावरकरांनी हे पद रचलें.)

(वृत्त : चामर)

व्याघ्र–नक्र–सर्प–सिंह–हिंस्त्र–जीव–संगरी
शस्त्रशक्तिने मनुष्य हा जगे धरेवरीं
रामचंद्र चापपाणि चक्रपाणि श्रीहरी
आर्तरक्षणार्थ घेति शस्त्र देवही करी
शस्त्र पाप ना स्वयेंचि, शस्त्र पुण्य ना स्वयें
अिष्टता अनिष्टताहि त्यास हेतुनेच ये
राष्ट्ररक्षणार्थ शस्त्र धर्म्य मानितें जरी
आंग्ल, जर्मनी, जपान राष्ट्र राष्ट्र भूवरी
भारतातची स्वदेशरक्षणार्थ कां तरी
शस्त्र–धारणीं बळेचि बंध हा अम्हांवरी ?
शस्त्र–बंधनें करा समस्त नष्ट ह्या क्षणा
शस्त्र–सिद्ध व्हा झणी समर्थ आर्त–रक्षणा
व्हावया स्वदेश सर्व सिद्ध आत्मशासना
नव्या पिढीस द्या त्वरें समग्र युद्धशिक्षणा !

– पुणे, १९३८

# ९०. अनंताची आरती

(जाति : चंद्रकांत)

निरंजनासी निरांजनाचा देवा दीप तुला
दाविती, देवा दीप तुला ॥ ध्रु. ॥
आकाशाच्या अंगणांत तव
सूर्यसहस्त्रीं जो दीपोत्सव
पाजळिती हे पणती अपुली त्यास करूं साजरा
दाविती, देवा दीप तुला ॥ १ ॥
सूर्यसहस्त्रीही जो अुरला
पणतीने तो जाअी स्फुरला
नयनी अैसा अंधकारलव[१९६] आहे तोचि भला
दाविती, देवा दीप तुला ॥ २ ॥
आअीच्याची बागेमधुनी
ताजीं ताजी वेंचुनि वेंचुनि
मुली गुंफिती आअीच्याची वेणींतूनि फुलां
दाविती, देवा दीप तुला ॥ ३ ॥

[196] भाविक भक्ति.